# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# भारतीय अर्थव्यवस्था

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**ऐच्छिक पेपर १ व २**

**बी. ए. भाग-१ : अर्थशास्त्र**

**सेमिस्टर १ व २ करिता**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
बी. ए. (भारतीय अर्थव्यवस्था) भाग-१ अर्थशास्त्र पेपर १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-07-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र** ■

अध्यक्ष - **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. डी. सी. तळुले**
अर्थशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
अर्थशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. संतोषकुमार बाबुराव यादव**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
जि. कोल्हापूर

- **डॉ. बाळासोा पांडुरंग पाटील**
यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली

- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
कमला कॉलेज, कोल्हापूर

- **प्राचार्य डॉ. निवास जाधव**
राजा शिव छत्रपती आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज,
महागांव, जि. कोल्हापूर

- **डॉ. एस. एम. भोसले**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
राजर्षी शाहू आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
जि. कोल्हापूर

- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
आर्टस अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
जि. सांगली

- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)

- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
विलिंग्डन कॉलेज, सांगली.

- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
अक्षय, बी-६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
सम्राट नगर, कोल्हापूर

- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील-बुद्धिहाळकर**
सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने जून २०१८ पासून बी.ए.भाग-१ अर्थशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम सत्रपद्धतीनुसार व सुधारित स्वरूपात लागू केला आहे. त्यानुसार दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी 'अर्थशास्त्र' विषयाचा दोन्ही सत्रांचा अभ्यासक्रम विचारात घेवून सदरच्या पुस्तकातील स्वयं अध्ययन साहित्य अनुभवी प्राध्यापकांकडून लेखन करून तयार करण्यात आले आहे. जून २०१८ पासून या वर्गासाठी तयार केलेल्या 'भारतीय अर्थव्यवस्था भाग-१ व भाग-२' या पुस्तकांत विद्यार्थ्यांना समजेल, उमजेल अशा भाषेत लिखाण करण्यात आले आहे.

'भारतीय अर्थव्यवस्था भाग-१' या सेमिस्टर-१ साठीच्या अभ्यासक्रमात स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास, भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने-१, भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने-२, भारतीय लोकसंख्या या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सत्र २ साठी तयार केलेल्या अभ्यासक्रमात शेतीविषयक धोरणे व कामगिरी, उद्योगामधील धोरणे आणि कामगिरी, भारतातील सेवाक्षेत्र आणि आर्थिक सुधारणा या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पुस्तकाची एकूण ८ घटकांमध्ये विभागणी करून मांडणी केली आहे. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सदरचे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असा आम्हास विश्वास वाटतो.

सदरहू पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठ कक्षेतील विविध मान्यवर प्राध्यापकांनी वेळेत पूर्ण केल्याबद्दल, संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे मनापासून आभार मानत आहे.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. एस. एम. भोसले**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

**प्रा. डॉ. ए. के. वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा.

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**भारतीय अर्थव्यवस्था**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : पेपर–१** | |
| **डॉ. ए. के. वावरे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. | १ |
| **प्रा. एस. एम. भोसले**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २, ३ |
| **प्रा. एस. एस. सावंत**<br>र. भा. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | ४ |
| **सत्र–२ : पेपर–२** | |
| **डॉ. आण्णा काका पाटील**<br>ए. एस. सी. कॉलेज, रामानंदनगर | १ |
| **प्रा. जालींदर आनंदराव यादव**<br>पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव,<br>जि. सांगली | २ |
| **प्रा. एस. एस. रूपे**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर | ३ |
| **प्रा. महादेव गुरलिंग पाटील**<br>कन्या महाविद्यालय, मिरज. | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. एस. एम. भोसले**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा

**डॉ. ए. के. वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | पेपर–१ : सेमिस्टर–१<br>भारतीय अर्थव्यवस्था भाग–१ | |
| १. | स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास | १ |
| २. | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने–१ | २२ |
| ३. | भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने–२ | ३८ |
| ४. | भारतातील लोकसंख्या | ६२ |
| | पेपर–२ : सेमिस्टर–२<br>भारतीय अर्थव्यवस्था भाग–२ | |
| १. | शेतीविषयक धोरणे व कामगिरी | ८५ |
| २. | उद्योगामधील धोरणे आणि कामगिरी | ११४ |
| ३. | भारतातील सेवा क्षेत्र | १४६ |
| ४. | आर्थिक सुधारणा | १६६ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १

## स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास

## (Economic Development since Independence)

अनुक्रमाणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्थेची मुलभूत वैशिष्ट्ये

१.२.२. भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल

१.२.३ भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास.

१.२.४ शाश्वत विकास

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### १.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१. स्वातंत्र्याच्या वेळी भारतीय अर्थव्यवस्थेंची मुख्य वैशिष्ट्ये लक्षात येतील.

२. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेत झालेले संरचनात्मक बदल लक्षात येतील.

३. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनुषंगाने सर्वसमावेशक विकासाची संकल्पना अभ्यासता येईल.

४. भारतीय अर्थव्यवस्थेच्या ‘शाश्वत विकासाचे महत्व’ समजावून घेता येईल.

### १.१ प्रास्ताविक :

आपला भारत ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीतून १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला आणि संवैधानिक पाया असलेली प्रजासत्ताक राज्यव्यवस्था २६ जानेवारी १९५० रोजी आपण स्वीकारली. भयावह दारिद्र्य, मागासलेली शेती, पारंपारिक व आजारी उद्योग, निरक्षरता अशा आव्हानांना सामोरे जात देशाने ‘कल्याणकारी

राज्याच्या दिशेने आपली वाटचाल सुरू केली. १९५१ पासून देशाने 'नियोजनाचा' अंगिकार केला. शेती, पायाभूत क्षेत्र, उद्योग, ग्रामीण विकास, शिक्षण, दारिद्र्य निर्मुलन, रोजगारनिर्मित्ती व अणुऊर्जा इ. विविध क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा झाल्या. हरीतक्रांती व औद्योगिक धोरण यांद्वारे शासनाने १९९० च्या दशकापर्यंत विकासामध्ये सक्रिय सहभाग घेतला. १९९१ नंतर स्वीकारण्यात आलेल्या नव्या औद्योगिक धोरणांद्वारे खासगी क्षेत्राला उत्तेजन, स्पर्धाक्षमतेतील वाढ, आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढ, माहिती तंत्रज्ञान व अभियांत्रिकी इ. क्षेत्रातील विकास यावर भर दिला गेला. निर्गुंतवणुक धोरण, कर सुधारणा, डिजीटल क्रांती, बँकिंग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा यांनाही प्राधान्य दिले गेले. मात्र वर्तमानात देशासमोर संकटातील शेती व शेतकरी वर्ग, वाढती महागाई, रूपयाची घसरण, वाढता कर्जबाजारीपणा व वित्तीय तूट असे गंभीर प्रश्नही उभे आहेत.

## १.२ विषय विवेचन : (Subject Description)

प्रस्तूत घटकामध्ये आपण भारतीय अर्थव्यवस्थेची स्वातंत्र्याच्या वेळची वैशिष्टये, भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल, भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वसमावेशक वृद्धी आणि शाश्वत विकास या घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ स्वातंत्र्याच्या वेळची भारतीय अर्थव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये –

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळीच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे वर्णन करताना डॉ. जे.एस.मिल यांनी तिचे वर्णन पुढील शब्दांमध्ये केलेले दिसून येते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यप्राप्ती वेळची भारतीय अर्थव्यवस्था ही वसाहतवादी, मागास, अर्थ सरंजामशाही व स्थिर स्वरूपाची होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लगेचच देशाची फाळणी झाल्यामुळे पाकिस्तानमध्ये देशातील बराच मोठा भाग गेल्याने अनेक आर्थिक प्रश्न निर्माण झालेले होते. या पार्श्वभूमीवर तत्कालीन भारतीय अर्थव्यवस्थेची दिसून येणारी ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. वसाहतवादी अर्थव्यवस्था**

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते १९४७ पर्यंत सुरूवातीला १८५७ पर्यंत इस्ट इंडिया कंपनीने व नंतर ब्रीटन सरकारने प्रामुख्याने व्यापारी दृष्टिकोण समोर ठेऊन भारताची अर्थव्यवस्था एक वसाहत म्हणून वापर केला होता. परिणामी ब्रीटनसह इतर जगाशी भारताचे व्यापारी संबंध हे भारताच्या दृष्टीने सातत्याने प्रतिकूलच राहीले. कारण ब्रिटन भारतातून कच्च्या मालाची मोठ्या प्रमाणावर आयात करत असे व पुन्हा ब्रिटनच्या कारखान्यांमध्ये तयार झालेला पक्का माल भारतात निर्यात केला जात असे. परिणामी या व्यापारातून फार मोठा नफा ब्रिटनलाच होत राहीला. शिवाय ब्रीटनने भारतामध्ये रेल्वे, जहाज, रस्ते, टपाल, टेलीफोन, उद्योग इ. क्षेत्रांमध्ये जी प्रचंड गुंतवणूक केलेली होती याच्या भांडवलावरील नफा, गुंतवणुकीवरचे व्याज, लाभांश ब्रीटनलाच मिळत गेले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था सातत्याने दुबळी होत गेली. भारतीय संपत्तीचे हे नि:सारण सर्वप्रथम शास्त्रीय पद्धतीने आकडे–वारीसह मांडण्याचे काम दादाभाई नौरोजी यांनी केले. 'गृह खर्च' या गोंडस नावाखाली भारतीय संपत्तीची लूट ब्रिटीशांनी राजरोसपणे १५० हून जास्त वर्षे केली. निर्यात कमी व आयात प्रचंड अशी तुटीची व्यापार निती स्वतःच्या स्वार्थाकरता अवलंबिली जात होती.

**२) आर्थिकदृष्ट्या शोषीत अर्थव्यवस्था**

ब्रिटीशांनी व्यापारी व राजकीय हेतूंनी जी धोरणे राबविली त्यातून भारतीय अर्थव्यवस्थेची सातत्याने

पिळवणूक व शोषण झाले व ब्रिटनचा मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा झाला. १७५७ पासून सुरू झालेली भारताची आर्थिक लूट देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ ते ३% एवढी प्रचंड होती. यातूनच अर्थव्यवस्थेत एक कायमस्वरूपी स्थिरावलेपणा आलेला होता.

**३) अनुत्पादक श्रम –**

भारतातील लघु, कुटीर व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांमधील श्रमिकांची उत्पादकता ही फारच अल्प होती. त्यावेळचा भारतातील सर्वात मोठा श्रमावरील उद्योग म्हणजे 'कापड उद्योग'. सन १९४५ च्या आकडेवारीनुसार भारतातील कापड उद्योगातील प्रति श्रमिक उत्पादकता १.९ किलो होती. त्याच वेळ जपानमध्ये हे प्रमाण ३.३ किलो व अमेरिकेमध्ये ६.९ किलो एवढे जास्त होते.

**४) पारंपरिक औद्योगिक संरचना :**

पारंतत्र्याच्या काळातील भारतीय उद्योग हे प्रामुख्याने पारंपारिक स्वरूपाचे होते. घरगुती हस्तोद्योगांचा ऱ्हास होऊन नवे औद्योगिक प्रारूप उदयाला आले. कारण त्यावेळची ही नवी औद्योगिक रचना ही खूपच विषम होती. प्राथमिक क्षेत्राचा औद्योगिक उत्पादनातील वाटा हा ८४% एवढा होता.

**५) स्थिर स्वरूपाची अर्थव्यवस्था :**

ब्रिटीश राजवटीत देशाचे राष्ट्रीय उत्पन्न, देशाची निर्यात व उत्पादकता इ. मध्ये फारशी वाढ झालेली दिसून येत नाही. त्यामुळे ती स्थिर अर्थव्यवस्था होती. कारण विकासाकरता जी साधनसामग्री असावी लागते. ती फारच अल्प होती. उत्पादनापासून-विक्रीपर्यंत सर्वच स्तरांवर वापरले जाणारे तंत्रज्ञान हे खूपच मागास होते. देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासाकरता आवश्यक असणारा व्यापक दृष्टीकोण आणि योग्य अशा संस्थात्मक रचनेचा देखील अभाव होता. आर्थिक स्थिरावस्थेमागील आणखी एक महत्वाचे  कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येचा ताण शिवाय ब्रिटीशांच्या वसाहतविषयक धोरणांमुळे देखील आर्थिक पिळवणूक सातत्याने होत राहिली.

**६. मागासलेली अर्थव्यवस्था :**

ब्रिटीश कालीन भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान होती. जवळपास ७०% पेक्षा जास्त लोकसंख्या शेती क्षेत्रात गुंतलेली होती. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा ५७% पेक्षा जास्त होता. बेकारीचे मोठे प्रमाण, निरक्षरता, शहरीकरणाचा मंद वेग इ. मुळे अर्थव्यवस्था संपूर्णपणे मागास होती. तीचे स्वरूप ब्रिटनची एक वसाहत असे होते. त्यामुळे तीचे आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक शोषण होत होते. भांडवलाच्या वापरातून उद्योधंद्याचे जे काही आधुनिकीकरण घडून आले. त्याचा वेग हा अतिशय मंद होता. एकूण उत्पादनाकरता आवश्यक असणाऱ्या भांडवलाची उपलब्धता ही फारच अल्प होती. उत्पादन कार्यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान मागास व कमी दर्जाचे  होते. उद्योग व व्यापारांकरता ज्या धाडशी व कल्पक संयोजकांची गरज असते. त्यांचा खूपच अभाव होता. आर्थिक वाढीकरता लागणाऱ्या संस्थात्मक रचना देखील नव्हत्या. शिवाय हे सर्व घडून येण्यामध्ये अनेक सामाजिक, सांस्कृतिक अडथळे होते.

**७. अर्थ-सरंजामशाही अर्थव्यवस्था :**

ब्रिटीश काळात प्रदीर्घ काळ भारतीय अर्थव्यवस्था ही अर्थ-सरंजामशाही स्वरूपाची होती. कारण

'जमीनदार' नावाचा मध्यस्थ वर्ग शासन व शेतकरी यांमध्ये होता. शेतकऱ्यांची पिळवणूक करून, त्यांना लुबाडून ते आपले वर्चस्व कायम करत होते. जमीनदारी, रयतवारी व महालवारी या पद्धतींनी शेतकरी पूरता नाडला गेला. पुढे सरंजामशाहीच्याच प्रारूपात देशामध्ये भांडवलशाहीचा प्रवेश झाला.

भारतातील तत्कालीन करप्रणाली ही जमीनीशी संबंधीत होती. परिणामी शेती व शेतकरी यांची दुरावस्था झालेली होती. शेती अत्यंत मागासलेली होती. तिच्यात अनेक सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता होती. २०% पेक्षा कमी जमिनीला सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होत्या. रासायनिक खते, बी-बीयाणे किटकनाशके आधुनिक अवजारे इ.चा वापर हा अल्पच होता. शेतीच्या वित्तपुरवठा स्थितीचा विचार केला तर असे दिसून येते की, शेतकरी वर्ग प्रामुख्याने 'सावकारी' वित्तपुरवठ्यावर अवलंबून होता. कारण प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचा फारसा विकास झालेला नव्हता.

**स्वयंअध्ययन प्रश्न :**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारताने नविन आर्थिक धोरण........................ मध्ये स्वीकारले.

अ) १९३० ब) १९९१ क) १९९२ ड) १९९३

२. भारतीय अर्थव्यवस्था ........................... अर्थव्यवस्था आहे.

अ) भांडवल प्राधान ब) कृषीप्रधान क) साम्यवादी ड) सरंजामशाही.

३. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाने ........................ प्रकारच्या अर्थव्यवस्थेचा अंगिकार केला.

अ) भांडवली ब) समाजवादी क) मिश्र ड) हुकूमशाही

४. देशाच्या आर्थिक विकासासाठी ......................... च्या माध्यमातून प्रयत्न केले गेले.

अ) परकीय व्यापाराच्या ब) नियोजनाच्या क) औद्योगिकीकरणाच्या ड) शेती

**१.२.२. भारतीय अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल.**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा अर्थव्यवस्थेतील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रांच्या प्रगतीवर अवलंबून असतो. कारण या क्षेत्रांच्या विकासातून एकूण समाजाच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला जातो.जरी भारतीय अर्थव्यवस्था 'कृषीप्रधान' असली तरी १९७० च्या दशकानंतर कृषी क्षेत्राचा देशाचा 'स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील वाटा उत्तरोत्तर घटत गेलेला दिसून येतो. याउलट उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा मात्र वाढत गेलेला आहे. १९९१ नंतर च्या आर्थिक उदारीकरणाने उद्योगांवरील निर्बंध शिथील होत गेले व त्यातील सरकारी नियंत्रण, हळूहळू कमी होत गेले. अलिकडील काळात शेती व उद्योगांच्या रचनेत जे आधुनिक बदल घडून आले त्याचा प्रयक्ष व अप्रत्यक्ष फायदा सेवा क्षेत्राच्या वाढीला झाल्याचे दिसून येते. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचे त्याच्या सहभागानुसार स्थान पाहिले असता सेवा क्षेत्राचा सर्वात वरचा क्रमांक लागतो. द्वितीय स्थानावर उद्योगांना तर 'शेती क्षेत्र' तृतीय स्थानी असलेले दिसून येते. या सर्व पार्श्वभूमीवर शेती, उद्योग, सेवा तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये गेल्या ७० वर्षांमध्ये घडून आलेले रचनात्मक बदल पाहुयात.

**भारतीय शेती क्षेत्रातील रचनात्मक बदल.**

**(Structural change in Indias Agricultural Sector)**

१९४७ ला भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा देशाच्या शेतीक्षेत्राची अवस्था अत्यंत दयनीय होती. बहुतांश शेतकरी वर्ग हा 'सावकारी' पाशात अडकला होता.शेतजमीनीचे तुकडीकरण व विभाजन झालेले होते. शेती कसण्याचे तंत्र व पद्धती ही अत्यंत मागास व परंपरागत होती. शेतकरी वर्ग प्रामुख्याने निरक्षर, दैववादी व अंधश्रद्धाळू असल्याने शेतीत नविन तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, खते, बी-बियाणे, जंतुनाशके व किटकनाशके इ.चा वापर होत नव्हता. शेती ही प्रामुख्याने लहरी व बेभरवशाच्या मान्सुनच्या पावसावर अवलंबुन होती. परिणामी शेतीची उत्पादकता फारच कमी होती. अशा शेतीक्षेत्रावर सुमारे ७०% पेक्षा अधिक लोक हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अवलंबून होते. स्वतंत्र प्राप्तीनंतर अन्नधान्य उत्पादन करणारा फार मोठा प्रदेश फाळणी झाल्याने पाकिस्तानात गेला. शिवाय बांग्लादेश व पाकिस्तानातून आलेल्या लाखो निर्वासितांचा प्रश्न गंभीर होता. नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या देशावर पाकिस्तान व चीन यांच्याशी युद्धे करावी लागली. दुष्काळी संकटांना सामोरे जावे लागले. परिणामी देशाला फार मोठ्या प्रमाणावर अन्नधान्यांची आयात करावी लागली. यातूनच देशाला अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण बनविण्याच्या उद्देशाने 'पहिली पंचवार्षिक' योजना पूर्णपणे कृषी विकासाला प्राधान्य देणारी होती. यामध्ये कृषीच्या उत्पादन वाढी सोबतच  कसेल त्याची जमीन, कुळकायदा व कमाल जमीन धारणा कायदा असे काही जमीन सुधारणा कार्यक्रम राबविले गेले. शेतीचा किफायतशीर आकार जमीनीच्या विभाजन व तुकडीकरणाने कमी होत होता यासाठी 'तुकडे जोड' कार्यक्रम हाती घेतला गेला. शेतीसाठी 'जलसिंचन' हा कळीचा मुद्दा लक्षात घेऊन देशपातळीवर 'भाक्रा-नानगल,'दामोदर खोरे' इ. मोठी धरणे, पाठबंधारे प्रकल्प जलसंधारण प्रकल्प यांचे विस्तृत जाळे उभे केले गेले.शेतीला 'वित्तपुरवठा' हा रास्त दरात व वेळेवर व्हावा यासाठी शासन व सहकारी संस्था यांच्या समन्वयातून वित्तपुरवठा, आदानांचे वितरण व मार्गदर्शन याबरोबर विपणन सुविधा इ. विविध पातळ्यांवर संरचना उभी केली गेली अशा विविध प्रयत्नांतून कृषीच्या विकासाचे एक नवीन पर्व सुरू झाले.

कृषी विकासाकरिता पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्येच 'प्रकर्षित शेती जिल्हा कार्यक्रम' राबविण्यात आला. तीसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये हरित क्रांतीच्या माध्यमातून 'उच्च पैदास देणाऱ्या बीयाणांचा कार्यक्रम' राबविला गेला. यातूनच 'शेती विकासाची नवी व्युहरचना आकारास आली. त्यामुळे पूर्वीची उपजीविकेपूरती केली जाणारी शेती जाऊन ती व्यापारी शेती या स्वरूपात विकसित होत गेली. सिंचनाच्या सोयी, आधुनिक यंत्रे व अवजारे, शास्त्रशुद्ध व वैज्ञानिक पद्धतींचा वापर, अधिक उत्पादन देणारी बीयाणे, किटकनाशके, जंतुनाशके यांचा वापर इ. नाविण्यपूर्ण साधणे व पद्धतींचा वापर करून शेतीच्या उत्पादनात लक्षणीय वाढ घडून आली. यात संकरीत बीयाणांच्या वापरावर जास्त भर दिलेला होता. यासाठी खते, बीयाणे, किटकनाशके इ. च्या संशोधन, उत्पादन व वितरण इ. साठी विविध महामंडळांची स्थापना केंद्र व राज्य सरकारांनी केली. याचाच परिणाम गहू, तांदूळ, कापूस व ऊस इ. पीकांच्या उत्पादनात विक्रमी वाढ झाली. यातूनच शेतकरी वर्गाचे उत्पन्न वाटून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत गेला. शेतीच्या हरीत क्रांतीचे वरील फायदे जरी झाले असले तरी काही प्रश्नही यातून निर्माण झाले. जसे यातून झालेला विकास हा काही पिकांपूरताच मर्यादीत राहीला. हरीतक्रांतीचा फायदा काही

विशिष्ट राज्यांनाच झाला. यातून विषम विकास, गरिब श्रीमंत दरी, भांडवली शेती इ. प्रश्नही उभे राहिले.

१९८० च्या दशकामध्ये हरितक्रांतीचाच एक भाग म्हणून सर 'वर्गिस कुरीअन' यांच्या नेतृत्वाखाली 'दुग्ध क्रांती' घडून आली. याद्वारे जी दूध महापूर योजना' (Operation Flood Programme) राबविण्यात आली त्यामुळे आज भारत हा दुध उत्पादनामध्ये जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश म्हणून पुढे आला. पुढे१९९१ नंतर ज्या आर्थिक सुधारणा घडून आल्या त्यामुळे शेती क्षेत्रामध्ये अनेक 'रचनात्मक बदल' घडून आले. आर्थिक उदारीकरणातून शेती क्षेत्रामध्ये 'भांडवलीकरणाला' प्रारंभ झाला. कंत्राटी शेतीसारखे नवे प्रयोग पुढे येऊ लागले. फलोत्पादन, फळबाग लागवड यांद्वारे व्यापारी व नगदी पिके ही प्रामुख्याने प्रक्रिया उद्योग वा निर्यातीच्या उद्दिष्ट्याने घेतली जाऊ लागली. शेतीतील भांडवलीकरण व यांत्रिकीकरणाने रोजगारसंधी कमी होऊन बेकारी वाढली. उत्पादनाचा खर्च वाढला. सध्या तर शेती हा 'न परवडणारा व्यवसाय'' अशी ओळख निर्माण झाली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक वर्षे इतर क्षेत्रांच्या तुलनेत शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा हा जास्त होता. अलिकडील काळात हा वाटा कमी झालेला दिसून येतो. रोजगार निर्मिती आणि निर्यातीबाबतही असेच चित्र दिसून येते. सन १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पानातील शेतीचा वाटा ५९.२ % होता. हरित क्रांतीच्या काळात तो ४५.१% पर्यंत घटला. नविन आर्थिक धोरणाच्या काळात सन १९९०-९१ मध्ये तो ३४% वर आला. आणि आज २०१६-१७ च्या आकडेवारीनुसार तो १६.१ टक्के वर आलेला आहे. सन १९५०-५१ मध्ये शेतीतील रोजगार निर्मितीचे प्रमाण ७०% एवढे होते. सन १९७०-७१ मध्ये ते ६८.७% पर्यंत कमी झाले. १९९०-९१ मध्ये ते ५८.२% इतके कमी झाले. तर सन २०१६-१७ च्या आकडेवारी नुसार ते ४८.९% पर्यंत कमी झाले. शेतीतून सन १९५०-५१ मध्ये ७०% एवढी परकीय निर्यात होत होती. ही निर्यात सन १९९०-९१ मध्ये घटून तब्बल १८.५०% एवढी प्रचंड कमी झाली. २०१६-१७ मध्ये तर हे प्रमाण आणखी घटून १२.१७% तर आले. २००४-०५ मध्ये शेतीतील भांडवलानिर्मितीचा दर ७.५% होता. तो २०१६- १७ मध्ये तो घटून ५.८% एवढा राहिला.

अशाप्रकारे उदारीकरण खाजगीकरण जागतिकीकरण यांच्या परिणामामुळे खाजगी क्षेत्र व भांडवली करणाने शेती क्षेत्रामध्ये वरील विविध रचनात्मक बदल घडून आले.

**भारताच्या औद्योगिक क्षेत्रातील रचनात्मक बदल :**

**(Structural changes in Indias Industrial Sector)**

१८ व्या शतकामध्ये इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. पुढे अमेरिका, जर्मनी, जपान यांसारख्या देशांनी देखील औद्योगिकीकरणाची कास धरली. ब्रिटीश राजवटीतच भारतात औद्योगिकीकरणाला प्रारंभ झाला होता. मात्र त्याचा परिपूर्ण विकास होण्यासाठीचे प्रयत्न स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच सुरू झाले. स्वातंत्र्यापूर्वी टाटा, बिर्ला, किर्लोस्कर इ. च्या प्रयत्नातून व मुंबई, गुजरात इ. ठिकाणच्या कापड गिरण्यांच्या उभारणीतून औद्योगिक विकासाला सुरूवात झाली होती. या सर्व पार्श्वभूमी वर देशाच्या औद्योगिक क्षेत्रात घडून आलेले संरचनात्मक बदल पुढील प्रमाणे-

अ) औद्योगिक विकासाचा पायाभूत विकासाचा काळ - (१९५१-१९६५)

ब) अल्प विकास व संरचनात्मक ऱ्हासाचा काळ- (१९६५-१९८०)

क) अल्प विकास व संरचनात्मक बदलाचा काळ) (१९८०- १९९१)

ड) आर्थिक सुधारणांचा काळ (१९९१)

**अ) औद्योगिक विकास व पायाभूत विकासाचा काळ (१९५१ ते १९६५)**

**(Building up of Strong Industrial Base)**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्राला आवश्यक अशा पायाभूत संरचनेची निर्मिती करण्यावर भर दिला गेला. देशाच्या औद्योगिक विकासाला दिशा व गती देण्याचे कार्य हे खऱ्या अर्थाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत केले गेले. कारण या योजना काळात 'भांडवली वस्तू उद्योग व अवजड व पायाभूत उद्योग' यांच्या संरचनात्मक विकासावर भर दिला गेला. यामध्ये लोह, पोलाद व अवजड यंत्रसामग्री इ. उद्योगांमध्ये मोठी गुंतवणूक केली गेली. यातून देशाच्या औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाला चालना मिळाली.

**ब) अल्प विकास व संरचनात्मक ऱ्हासाचा काळ- (१९६५-८०)**

**(Industrial Declaration & Structural Retrogression)**

सन १९६५ ते १९८० या पंधरा वर्षाच्या काळात औद्योगिक वस्तुंच्या उत्पादनवाढीचा दर मंदावला. तसेच उद्योगांचा संरचनात्मक ऱ्हास झाला. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ९.८% होता सन १९६५ ते १९७६ या कालखंडात तो दर घटून वार्षिक ४.१% एवढा कमी झाला. पहिल्या तीन पंचवार्षिक योजनाकाळात भांडवली वस्तु उद्योगांची वाढ चांगली झालेली होती. मात्र १९६५ ते १९७६ या कालखंडात ही वाढ फक्त २.६% होती. मूलभूत उद्योगांबाबत देखील हीच स्थिती होती. कारण औद्योगिक क्षेत्राचा संरचनात्मक ऱ्हास घडून आला. त्यामुळे अवजड वस्तू आणि भांडवली वस्तू यांच्या उत्पादनात घट घडून आली. डॉ. एन.के. राव यांच्या मते, औद्योगिक क्षेत्रातील या मंदीमागे शेती क्षेत्रातील अल्प उत्पादकता हे कारण होते. कारण त्यामुळे कच्च्या मालाचा पुरवठा घटला व तुलनेने औद्योगिक वस्तूंची मागणी मात्र वाढली. शिवाय सरकारचे चुकीचे औद्योगिक धोरण, परवाना पद्धत, लाल फितीचा कारभार अशीही कारणे जबाबदार होती.

**क) अल्प विकास व संरचनात्मक बदलाचा काळ - (१९८० ते १९९१)**

सन १९८० ते १९९१ हा औद्योगिक सुधारणांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. तसेच तो संरचनात्मक बदल व अल्प विकासाचा कालखंड म्हणूनही ओळखला जातो. कारण सन १९८० मध्ये 'भांडवली वस्तु' उत्पादनाच्या वाढीचा दर ८.७% होता. तो घटून १९९० मध्ये ३.८% एवढा झाला. तर मुलभूत वस्तू उत्पादनाच्या वाढीचा दर ६.१% एवढा खाली आला. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचा दर ५.१% होता. तो १०.४% एवढा वाढला. टिकाऊ वस्तू उद्योगांमध्ये ०.५ % नी वाढ झाली. तर नाशवंत वस्तूंच्या उत्पादनात ६ % नी वाढ झाली. एकूणच औद्योगिक वस्तू उत्पादनाचा निर्देशांक २% नी खाली आला.

**ड) आर्थिक सुधारणांचा काळ - (सन १९९१ पासून)**

देशाने १९९१ मध्ये उदारीकरणाच्या धोरणाचा अंगिकार केला. त्यातूनच औद्योगिक परवाना धोरण शिथील झाले. सार्वजनिक क्षेत्राची मक्तेदारी असलेले उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले झाले. उद्योगांमध्ये विदेशी भांडवलाला

मुक्त प्रवेश दिला जावू लागला. १९९० च्या दशकात चलन तुटवड्यामुळे उद्योगांना अनेक अरिष्टयांना सामोरे जावे लागले. १९९१ मध्ये रूपयाचे जे अवमुल्यन झाले त्याचा परिणाम उद्योगांवर झाला. त्यातून या क्षेत्राला मंदीला सामोरे जावे लागले. खासगी क्षेत्रातील गुंतवणूकीचा वेग खूपच मंद होता. पेट्रोलियम पदार्थाच्या किंमती वाढल्याने उत्पादन खर्च देखील वाढला होता. सर्वत्र सामाजिक व राजकीय अस्थिरतेची स्थिती होती. १९९३-९४ नंतर मात्र परिस्थिती सुधारत गेली. औद्योगिक क्षेत्राला उत्तेजन देणारी धोरणात्मक चौकट आकाराला येऊ लागली. औद्योगिक क्षेत्राचे आजवरचे सार्वजनिक क्षेत्राच्या गुंतवणूकीवरचे अवलंबित्व कमी होत गेले. प्रचंड नफा मिळविणारी 'खाजगी संयुक्त मंडळे' आकाराला येऊ लागली.

सन २००० पर्यंत औद्योगिक वाढीचा दर चांगला राहीला. मात्र पुन्हा औद्योगिक घसरण चालू राहीली. अलिकडील काळात मूलभूत उद्योग, धातू उत्पादने, यंत्रे, रसायने, पेट्रो केमिकल्स, वाहन उद्योग यांमध्ये वेगाने वाढ होत गेली त्याचे महत्त्व वाढले. आर्थिक क्षेत्रात देखील 'नवप्रवर्तन' सुरू झाले. परिणामी रोजगाराच्या नवनव्या संधी निर्माण होत गेल्या मात्र लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास झाला. रोजगारसंधी असुनही कौशल्या अभावी बेरोजगारीचे प्रमाणही वाढले.

**सेवा क्षेत्रातील रचनात्मक बदल : (Structural Changes in Service Sector)**

भारतीय आर्थिक विकासाचा एकूण प्रवास पाहिला असता सन १९८० च्या दशकांपर्यंत 'सेवा क्षेत्राला' फारसे महत्त्व नव्हते त्यामुळे त्याचा फारसा विकासही झाला नाही. मात्र तरीही सन १९५०-५१ ते सन १९७९-८० या कालखंडात सेवा क्षेत्राची वाढ ४.६% नी झाली. १९७९- ८० ते १९९५-९६ या काळात या क्षेत्राचा विकासाचा दर ६.५% एवढा राहीला. पुढे १९९५-९६ ते २०१०-११ मध्ये तर तो वाढून ९.५% एवढा विस्तारला. परिणामी आज देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा हा ६०% एवढा वाढला आहे. कारण आर्थिक सुधारणा कालखंडात वाहतुक-दळणवळण, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, बँकिंग व विमा इ. मध्ये प्रचंड प्रगती झाली. आर्थिक उदारीकरणानंतर यामध्ये 'व्यापारी' क्षेत्राच्या प्रगतीची देखील भर पडलेली दिसून येते.

**सामाजिक क्षेत्रातील बदल :- (Changes in Social Sector)**

लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये सुधारणा करणे हे कोणत्याही विकासासाठीचे मुख्य उद्दिष्टय असते. गेल्या ७ दशकांतील आर्थिक नियोजन व सुधारणांद्वारे जनतेच्या राहणीमानाचा दर्जा बऱ्यापैकी सुधारला आहे. स्त्री व पुरूषांचे आयुर्मान, साक्षरता, आरोग्य सुविधा, रोजगारनिर्मिती इ. मध्ये वाढ होत आहे. दारिद्र्य, कुपोषण, बालमृत्यू इ. मध्ये घट होत आहे. रोजगारनिर्मिती व व्यापारवृद्धीतून उत्पन्न वाढून लोकांची क्रयशक्ती वाढली आहे.

शासनाने शेती, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व दळणवळण यांवर आजवर जो सार्वजनिक खर्च केला त्यामुळे मानवी भांडवलाची उत्पादकता व गतिशीलता वाढली आहे. विषमता कमी होऊन समानतेमुळे सर्व समावेशक विकासाला सुरूवात झाली.

मात्र उद्योगांमुळे व भांडवलनिर्मितीमुळे समाजात गर्भश्रीमंतांचा एक वर्ग उदयाला आला. सरकारच्या आस्थापना, कार्यालये, सरकारच्या मालकीचे उद्योग व सेवा इ. मुळे सरकारी नोकर व कर्मचाऱ्यांचा एक वर्ग उदयाला आला. माहिती तंत्रज्ञान व वाहन उद्योगांतूनही चांगले उत्पन्न असणारा नव श्रीमंत मध्यमवर्ग उदयाला

आला. एकीकडे शहरी भागात हे चित्र असताना ग्रामीण भागात जमीनदार, बागायती शेतकरी आणि कामगार, शेतमजूर व कारागीर असे दोन वर्ग दिसून येतात. आजही समाजात टोकाची विषमता निर्माण झाली आहे.

**स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न–**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण केंव्हा स्वीकारले.

अ) १९९०　　ब) १९३१　　क) १९ ९२　　ड) १९९३

२. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेती विकासासाठी कोणती योजना सुरू केली गेली.

अ) प्रकर्षीत कृषी विकास कार्यक्रम　　ब) सुधारित खते व अवजारांचा कार्यक्रम.

क) उच्च पैदास देणाऱ्या बीयाणांचा कार्यक्रम　　ड) हरितक्रांती

३) धवलक्रांती ................................ शी संबंधीत आहे.

अ) मांस　　ब) दूध　　क) मत्स्य　　ड) सोयाबीन

४) .......................... या पंचवार्षिक योजनेत मूलभूत व अवजड उद्योगांचा विकास झाला.

अ) पहिल्या　　ब) दुसऱ्या　　क) तिसऱ्या　　ड) चौथ्या

५) ...................................... या कालखंडास आर्थिक सुधारणांचा कालखंड म्हणतात.

अ) सन १९५० ते १९६०　　ब) सन १९८० ते १९९१

क) सन १९९१ ते २०००　　ड) सन १९९७ ते १९८०

### १.२.३ भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक विकास

### (Indian Economy and Indusive Growth)

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासाच्या दृष्टीने त्याचबरोबर भारताच्या पंचवार्षिक योजनेच्या मुळाशी असलेल्या कल्याणकारी राज्याच्या निर्मितीच्या उद्दिष्ट्यांच्या दृष्टीने सर्वसमावेशक विकासाची संकल्पना महत्त्वाची ठरते. सर्वसमावेशक विकास ही एक व्यापक कल्पना असून त्यामध्ये अधिकाधिक लोकांना विकासात सहभागी करून घेण्यावर भर दिला जातो. विकासाची फळे समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविणे आणि विकासाच्या प्रक्रियेत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे. या दृष्टीने २१ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विशेष प्रयत्न केले जात आहेत. सर्वसमावेशक विकास हा विकसनशील देशासाठी एक परवलिचा शब्द बनला आहे. विकासाची प्रक्रिया ही सामाजिक न्याय वाढविणारी असावी. सर्वसमावेशक वृद्धित सर्वांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचे लाभ मिळावेत ही अपेक्षा असते. त्यामुळे समाजाच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळू शकते. सर्वसमावेशक विकास व कल्याणकारी राज्य या दोन्ही संकल्पना परस्पर पूरक आहेत. या दोन्ही संकल्पनांचा नव्याने विचार होत असला तरी प्राचीन काळापासून निरनिराळ्या स्वरूपात या संकल्पना मांडल्या गेल्या आहेत. उदा. कौटिल्याची आदर्श शासन व्यवस्था, प्लेटोचे रिपब्लीक या प्राचीन तर अर्वाचिन काळातील गांधीवादातील अंत्योदय, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, हरितक्रांतीचे जनक डॉ. एम.

एस. स्वामीनाथन व दुग्ध क्रांतीचे जनक डॉ. वर्गीस कुरीयन यांच्या स्वप्नातील भारत या सर्व संकल्पनांचा मूळ पाया कल्याणकारी राज्य व सर्वसमावेशक विकास हाच आहे.

**सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेचे सैदधांतिक विश्लेषण–**

**(Therotical explanation of Inclusive Growth)**

जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी त्यांच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सर्वसमावेशक विकासाचे तत्व अंगीकारले आहे. भारताच्या विविध पंचवार्षिक योजनांच्या उद्दिष्टांमध्ये देखील सर्व समावेशक विकासाच्या दृष्टीने वाटचाल केल्याचे दिसुन येते. गरीबी हटाओ कार्यक्रम, २० कलमी कार्यक्रम, कृषी विकासाला प्राधान्य, रोजगारनिर्मिती, महिला व बालविकास, सर्व शिक्षा अभियान यांसारख्या योजनाद्वारे सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अकराव्या पंचवार्षिक योजनेचा मुख्य उददेश सर्वसमावेशक विकास हाच होता. बाराव्या पंचवार्षिक योजनेतही हाच प्रयत्न जाणीवपूर्वक केला गेला. आर्थिक विकास मोजण्याचा दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा जरी महत्वाचा निकष मांडला असला तरी आर्थिक सुधारणा कालखंडात मानव विकास निर्देशांक हा देखील महत्वाचा मानला जात आहे. सर्वसमावेशक वृद्धिच्या संकल्पनेत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत होणाऱ्या विषमतेसह सामाजिक वंचिततेला महत्व दिले जाते.

'सामाजिक वर्जन' ही एक प्रक्रिया आहे. काही समुदायांना, गटांना, किंवा व्यक्तींना आपण ज्या समाजात राहतो त्या समाजात आपण पूर्णतः किंवा अंशतः वर्जित आहोत असे वाटतो. नोबेल परितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी या प्रक्रियेला Capability Depervation असे म्हटले आहे. विल्सन या लेखकाने या प्रक्रियेला Social disclotion असे म्हटले आहे. ''आपल्या देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधावयाचा झाल्यास सर्वच समुदायांना सर्वच क्षेत्रात प्रतिनिधीत्व देवुन त्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणणे अत्यावश्यक आहे.'' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. सर्वसमावेशक विकासाचे धोरण समजून घेण्यासाठी आपल्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जाती व्यवस्था व अस्पृश्यतेविषयीचे मूल्यमापन समजून घ्यावे लागेल. भारतातील जाती, जातीयतेचे उच्चाटन, दि अनटचेबल्स, 'हिंदू धर्माचे तत्वज्ञान', या लिखाणात त्यांचे विचार प्रतिबिंबीत झाले आहेत. जात हा राक्षस आहे आणि जोपर्यंत आपण त्या राक्षसाला नष्ट करत नाही तोपर्यंत भारतीय समाजात समानता व सर्वसमावेशक विकास होवू शकत नाही. अशी त्यांची धारणा होती. देशातील सामाजिक आर्थिक समस्या सोडविणे ही सरकारची मुख्य जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते सर्वांना समान हक्क असले पाहिजेत. मानवी हक्कांचे उल्लंघन होवू नये यासाठी कायदेशीर तरतूद करून सर्वाना सामाजिक, राजकीय नागरी व आर्थिक क्षेत्रात सहभाग आणि प्रवेश तसेच गरीबांच्या सबलीकरणासाठी व सर्वसमावेशक विकासासाठी सरकारने निश्चित कृती योजना राबविणे गरजेचे आहे. महिला, आदिवासी भटके, गरीब आणि अस्पृश्य हे घटक आज ही सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत आहेत. म्हणून डॉ. आंबेडकर सुचवतात वर्गनिहाय सर्वसमावेशक धोरणामुळे सामाजिक भेदभाव व असमानतेच्या परिणामाला उत्तर मिळू शकते. भेदभाव रहित आर्थिक संरचनेत बहिष्कृत वर्गांना देशाच्या आर्थिक विकासात सामावून घेणे गरजेचे आहे. उदा. उद्योगधंदे, बाजारपेठा, खाजगी शिक्षण, घरांची उभारणी करणारी व्यवस्था या क्षेत्रात बहिष्कृत समाजाला प्रवेश मिळेलच असे नाही. म्हणून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पर्यायी उपाययोजना म्हणून ते 'समानसंधी' चा पर्याय सुचवतात. हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे

सर्वसमावेशक विकासाबाबतचे धोरण आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते दारिद्र्याचा प्रत्यक्ष संबंध हा मनुष्यातील मुलभूत क्षमतांपासून दुरावलेल्या गरीबांशी अधिक जवळचा आहे. गरीबांच्या सु-क्षमता शक्तीत आणि कौशल्यात जसजशी वाढ होत जाईल तसतशी त्यांना दारिद्र्यातून मुक्त होण्याची प्रेरणा मिळेल.यासाठी विकासाचा पाया हा 'सर्वसमावेश वृद्धी' या संकल्पनेवर आधारीत असणे आवश्यक आहे. त्यांच्या मते कृषी व बिगर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे हे सर्वसमावेशक वृद्धिचे उद्दिष्ट असले पाहिजे. सन २००८ च्या UNDP च्या अहवालानुसार समाजातील सर्व प्रकारच्या उत्पन्न गटातील लोकांचा उत्पादनातील सहभाग, विकास आणि वितरणातील समानता महत्त्वाची आहे. हि दीर्घकालीन प्रक्रिया असून रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे विकासापासून वंचित असणाऱ्या लोकांच्या उत्पन्नात वाढ होवू शकते.

### सर्वसमावेशक विकासाचे निकष (Indicatiors of Inclusive Growth)

सर्वसमावेशक विकासाची भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात व्यावहारिकता पडताळून पाहताना काही निकष विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. काही प्रमुख निकष आपणास पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

### १. दारिद्र्यनिमूर्लन (Poverty Elimination)

भारतासारख्या बहुसंख्य विकसनशील देशांमध्ये सार्वत्रिक दारिद्र्य ही प्रमुख समस्या आहे. दारिद्र्य निर्मुलन करण्यासाठी देशातील शेती, उद्योग व सेवा क्षेत्रातील रोजगार संधीत वाढ करण्याची आवश्यकता आहे. मानवी संसाधनाच्या कौशल्यात वाढ करण्याची आवश्यकता आहे. भारतामध्ये आज जवळ-जवळ २५% लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. गेल्या ७० वर्षामध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण जरी घटले तरी दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या लोकांची संख्या ३५ कोटीपेक्षा जास्त झाली आहे. यामध्ये सर्वसमावेशक विकास साध्य करावयाचा असेल, तर दारिद्र्य निर्मुलनाच्या योजना आखून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

### २) रोजगार निर्मीती (Employment Generation)

देशामध्ये अस्तित्वातील-लोकसंख्येला (श्रमशक्ती) रोजगार उपलब्ध करून देणे. ही बाब आर्थिक विकासाच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची आहे. देशात योजना काळात रोजगार निर्मीतीचे अनेक प्रयत्न केले गेले. मात्र आजही बेरोजगारीचे प्रमाण फार मोठे असलेले दिसून येते. यामध्ये सुशिक्षित व निरक्षर अशा दोन्हीमध्ये बेकारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. आर्थिक सुधारणा काळात रोजगाराच्या नवनव्या संधी तंत्रवैज्ञानिक बदलांमुळे निर्माण होत आहेत. मात्र त्या मिळविण्याकरता किमान कौशल्यांची आवश्यकता असते. अशी कौशल्ये निर्माण करण्यासाठी योग्य ते शिक्षण व प्रशिक्षण समाजाला देणे गरजेचे आहे. समाजाच्या विविध स्तरांतील व्यक्तींच्या उत्पन्न पातळीत समतोल प्रमाणात वाढ घडवून आणण्यासाठी सर्वसमावेशक विकासाची निकड भासते.

### ३) जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता (Availability of Consumable Goods)

लोकांना राहणीमानाचा वाजवी दर्जा प्राप्त करून देण्याकरता जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता करून देणे हे शाश्वत विकासाच्या दृष्टिने आवश्यक ठरते. सर्वसमावेशक विकासाच्या निकषात 'उपभोग्य वस्तूंची उपलब्धता या घटकास फार महत्त्व आहे. त्यादृष्टिने सरकार सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून अल्प-उत्पन्न गटातील

लोकांना गहू, तांदूळ, साखर, खाद्यतेल, रॉकेल इ. वस्तूंचा पुरवठा अल्प किंमतीत करत असते. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टिने पिण्याचे पाणी, आरोग्य, सुविधा, भाजीपाला, दुध, पेट्रोल, डीझेल, खाद्यतेल इ. वस्तूंच्या रास्त किंमती व त्यांची उपलब्धता ही बाब महत्त्वाची ठरते. त्यादृष्टिने देशाचा सर्वसमावेशक विकास करीत असताना सरकारने या जीवनावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता असते.

### ४) मागणीची कमतरता (Deficiency of Demand)

मागणीतील कमतरता भरूण काढणे ही बाब सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाची आहे.डॉ.अमर्त्य सेन यांच्या मते, ''बाजारपेठेतील मागणीची कमतरता भरून काढण्यासाठी श्रीमंताची श्रीमंती व गरीबांची गरीबी कमी करणे यासाठी सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे.'' गरीबांच्या मागणीत वाढ करण्यासाठी त्यांचे दरडोई उत्पन्न वाढणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने विविध प्रकारच्या रोजगार व स्वयं रोजगाराच्या योजना आखून त्याची प्रभावी अमंलबजावणी करणे गरजेचे आहे.गरीबांच्या खरेदीशक्तीत वाढ झाल्यास आपोआपच मागणीतील कमतरता कमी होऊन सर्वसमावेशक विकास होण्यास मदत होईल.

### ५) ग्रामीण व शहरी विषमता (Rural & Urban Disparity)

सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत व्यक्ती-व्यक्तींमधील प्रादेशिक तसेच ग्रामीण व शहरी विषमता कमी होणे अभिप्रेत आहे. जागतिक बँकेच्या सर्वसमावेशक विकासाच्या संकल्पनेत गरीब व श्रीमंत व्यक्तीच्या उत्पन्नातील विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. भारतात नियोजन काळात शासनाने राबविलेल्या विकास कार्यक्रमांचा लाभ ग्रामीण भागापेक्षा शहरी भागाला अधिक झाला. त्यामुळे ११ व्या व १२ व्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण व शहरी भागातील विषमता कमी करण्यावर भर दिला आहे. त्याचा फायदा सर्व प्रकारच्या सुविधांपासून वंचित असणाऱ्या लोकांना होण्यास मदत होईल.

## भारताचे सर्वसमावेशक विकासाचे धोरण (Policy of Inclusive Growth of India)

भारताने स्वातंत्र्योत्तर काळात १९५१ पासून पंचवार्षिक योजना काळात आर्थिक विकासाचे धोरण अवलंबिले. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील भारतीय अर्थव्यवस्थेची झालेली घसरण भरूण काढणे हे उद्दिष्टय होते. त्यानुसार पहिली पंचवार्षिक योजना शेतीच्या विकासासाठी राबविण्यात आली. त्यानंतरच्या दुसऱ्या योजनेमध्ये मूलभूत व अवघड उद्योगांच्या विकासावर भर देण्यात आला. तिसऱ्या योजनेपासून सातव्या योजनेपर्यंत भारताच्या नियोजनाची प्रमुख उद्दिष्टये दारिद्र्य निर्मुलन, रोजगार निर्मिती, आर्थिक विकास, प्रादेशिक विषमता कमी करणे लघु व कुटीर उद्योगांचा विकास करणे तसेच ग्रामीण विकास हे होते. १९५१ ते १९९० या काळात अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली गेली. त्यासाठीचे आवश्यक भांडवल कर्जाच्या स्वरूपात आंतरराष्ट्रीय स्तरावरून उभारले गेले. त्याचा परिणाम म्हणून भारतावर कर्जाचा बोजा निर्माण झाला. चवथ्या पंचवार्षिक योजनेत निश्चित करण्यात आलेले ''स्थैर्यासह आर्थिक विकास'', हे उद्दिष्टय भारतात ''सर्वसमावेशक आर्थिक विकास'' करण्याच्या दृष्टिने महत्त्वाचे पाऊल होते. पाचव्या पंचवार्षिक योजनेत ''गरीबी हटाओ'' तसेच ''वीस कलमी कार्यक्रम'' हे दारिद्र्य निर्मुलन आणि समाजाच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टिने महत्वाचे उपक्रम होते. रोजगार वृद्धीच्या दृष्टिने महाराष्ट्रासारख्या घटक राज्यात १९७२ मध्ये सुरू करण्यात आलेली ''रोजगार हमी योजना'' ही देशपातळीवर स्वीकारली गेली. देशातील अकुशल व्यक्तींना रोजगाराच्या संधी प्राप्त

करून देऊन त्यांच्या खरेदी शक्तीत वाढ घडवून आणण्यास ही योजना महत्त्वाची ठरत आहे. १९८० नंतर लघु आणि कुटीर उदयोगांच्या विकासातून ग्रामीण व शहरी भागात निर्माण होणाऱ्या रोजगार संधी हे शाश्वत विकासाला प्रेरक ठरत आहे. याबरोबरच योजना काळात सरकारने शैक्षणिक धोरणात सर्वसमावेशकतेच्या दृष्टिकोनातून काही बदल केले आहेत. आरक्षणाचे धोरण, पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार, महीलांना शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षण इ. उपक्रम राबवीले आहेत. गेल्या सहा दशकात सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिने विविध प्रकारच्या योजना शासकीय पातळीवर राबविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये पुढील काही योजना सांगता येतील. इंदिरा आवास  योजना, कामासाठी अन्न योजना, संजय गांधी निराधार योजना, आश्वासीत रोजगार योजना, अंत्योदय योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जवाहर रोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामोद्योग योजना, भारत निर्माण कार्यक्रम, सुक्ष्म वित्त पुरवठा व प्रकर्षित शेती विकास योजना यासारख्या योजना सर्वसमावेशक व शाश्वत विकासाच्या दृष्टिने देशभरात राबविल्या जात आहेत.

**भारतातील सर्वसमावेशक विकास आव्हाने व पर्याय :**

**(Inclusive Growth in India Challenges Alternatives)**

भारताने १९९१ पासून नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीवर आधारीत असे अनुषंगिक बदल आर्थिक धोरणांमध्ये केले गेले. त्याचा अनुकूल व प्रतिकुल परिणाम कृषी, उद्योग व सेवाक्षेत्रावर झाला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक चौकटीमध्ये उपलब्ध मनुष्यबळाला पुरेशा भौतिक व सामाजिक सुविधा प्राप्त करून देण्यात अडथळे निर्माण होऊ लागले. आर्थिक उदारीकरणाच्या काळात अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग ३.५% वरून ९% एवढा वाढला. कृषी अर्थव्यवस्था सेवाप्रधान अर्थव्यवस्था बनू लागली. भारतात ६०% घटक सेवा क्षेत्रावर आधारीत आहेत. माहिती तंत्रज्ञानाचा विकास हा एक महत्त्वाचा घटक देशाच्या विकासाची  गती वाढविण्यास प्रेरक ठरू शकतो. तथापि खेड्यातील लोक आजही विकासापासून वंचित आहेत. अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी कृषी उत्पादनात महत्त्वाचे असूनही सामाजिक व आर्थिक विकासापासून दूर आहेत. महिला, मुले व मागासवर्गीय लोक हे देखील विकासापासून दूर आहेत. वाढत्या आर्थिक गरजा आणि वाढती लोकसंख्या यामध्ये मेळ घालण्यासाठी विकास साधनांचे नियोजन करावे लागेल. अर्थ सत्ता ही मूठभर लोकांच्या हाती एकवटली आहे. देशात १% लोकांच्या हाती १५.९% संपत्ती आहे. तर ५ % लोकांच्या हाती ३८.३% संपत्ती आहे. उर्वरीत लोक मात्र ४५.८% संपत्तीमध्ये अल्प प्रमाणात वाटेकरी आहेत.शाश्वत व सर्वसमावेशक विकासापुढील समस्यांचा आढावा घेतला असता असे दिसते की, दारिद्र्य, बेरोजगारी व शेती क्षेत्राची घसरण या देशासमोरील प्रमुख समस्या आहेत. त्यामुळे राज्यांतर्गत प्रादेशिक विषमताही वाढताना दिसते. गेल्या काही वर्षामध्ये देशात चलनपुरवठा मोठ्या प्रमाणात झाला आहे. जागतिक स्तरावरील अनिश्चितता वाढत आहे. युरो डॉलर व अमेरिकन डॉलरच्या  तुलनेत रूपया दुबळा होत आहे. अनेक योजना, आराखडे, धोरणे तयार असून त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे विकासाची फळे अपेक्षित वर्गापर्यंत पोहोचत नाहीत.

१२ व्या पंचवार्षिक योजनेत सर्वसमावेशक व शाश्वत विकास हे ध्येय निश्चित केले गेले होते. त्यानुसार सर्वसमावेशक विकासासाठी पुढील काही महत्वाच्या उपाययोजना करून सर्वसमावेशक विकासाची व्युहरचना तयार केली गेली.

१. ग्रामीण संरचना भक्कम करणे.

२. कृषी क्षेत्रातील कामगिरीत सुधारणा.

३. शिक्षणाचा दर्जा व कौशल्य विकासाकरता अधिक सशक्त प्रयत्न.

४. मागासलेल्या व उपेक्षित वर्गासाठी विशेष विकास कार्यक्रम.

५. ग्रामीण आरोग्य योजनांमध्ये अमुलाग्र बदल.

६. नागरी विकासाची निकोप संरचना कमी करणे.

७. शहर व ग्रामीण विकासातील दरी कमी करणे.

८. देशातील बालमजुरी, महिलांचे शोषण आणि दुर्बल घटकांची उपेक्षा यांकडे गांभीर्याने लक्ष देणे.

९. रूढी, परंपरा व अंध:श्रद्धांचा प्रभाव कमी करून लोकांमध्ये विकासाबाबत जाणीव-जागृती निर्माण करणे.

१०. चांगल्या सुशासनास रचनात्मक प्रयत्नांची जोड देऊन भावी काळात खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील भागीदारी वाढविणे.

११. बहुराष्ट्रीय उद्योगांना सामाजिक जबाबदारीतून त्यांचे प्रकल्प काळजीपूर्वक आखावयास लावणे. ज्यायोगे संरचनात्मक विकास घडून विविध सामाजिक क्षेत्रात विविध कल्याणकारी योजना गतीने कृतीत येतील.

१२. उद्योगांच्या विकेंद्रिकरणाद्वारे अर्थिक सुधारणा घडवून नवे सामाजिक, आर्थिक व राजकीय वातावरण तयार केले पाहिजे.

अशा प्रकारे सर्वसमावेशक विकास साध्य करताना सर्व सुधारणांची दिशा ही शाश्वत स्वरूपाची असली पाहिजे. सर्वसमावेशक विकास ही केवळ सरकारची जबाबदारी नसून देशातील उद्योगसमूह तसेच सेवाभावी संस्थानीदेखील ह्यात वाटा उचलला पाहिजे. सध्याच्या विकास योजना या अशा पद्धतीने राबविल्या पाहिजेत की, भावी पिढीच्या गरजा सुद्धा योजकतेने पूर्ण होतील.

**स्वयंअध्ययन प्रश्न :**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

१. 'सर्वसमावेशक विकास' हे प्रमुख उद्दिष्ट्य भारताने कोणत्या पंचवार्षिक योजनेत स्वीकारले.

अ) पहिल्या ब) आठव्या क) दहाव्या ड) अकराव्या

२. सर्वसमावेशक विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर खालीलपैकी कोणता पर्याय सुचवितात.

अ) रोजगारात वाढ ब) समान संधी क) दारिद्र्य निर्मूलन ड) वरील सर्व

३. ............................................ हा सर्वसमावेशक विकासाचा निकष आहे.

अ) लोकसंख्या नियंत्रण ब) दारिद्र्य निर्मूलन क) शेती विकास ड) औद्योगिक विकास

४. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, बाजारातील मागणीची कमतरता भरून काढण्यासाठी ............. ची आवश्यकता आहे.

अ) लोकसंख्येचा जननदर कमी करणे ब) शैक्षणिक सुविधा वाढवणे

क) गरीब व श्रीमंत यातील अंतर कमी करणे ड) लोकांना आरोग्यविषयक सुविधा देणे.

५. महाराष्ट्रात रोजगार हमी योजना ............. साली सुरू करण्यात आली.

अ) १९५१ ब) १९७२ क) १९८० ड) १९९१

## १.२.४ शाश्वत विकासः (Sustainable Development)

**प्रस्तावना :**

शाश्वत ही संकल्पना अभ्यासताना शाश्वत या शब्दाचा अर्थ पाहणे आवश्यक आहे. शाश्वत म्हणजे चिरकाल टिकणारा होय. म्हणजेच शाश्वत विकास हा सध्या जो विकास होत आहे तसाच तो भविष्यातही टिकवून ठेवणे. भविष्यात कितीही समस्या निर्माण झाल्या तरी कोणतीही तडजोड न करता व्यक्तीला त्याच्या आवश्यक गरजा पूर्ण करता येतील असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. हा शाश्वत विकास केवळ पर्यावरणशास्त्रापुरताच मर्यादीत राहिलेला नसून तो अनेक शास्त्रांचा एक महत्वाचा घटक बनला आहे. पर्यावरण आणि विकास या विषयावरील ब्रुटलॅंड या जागतिक समितीने १९८७ मध्ये शाश्वत विकास ही संकल्पना सर्व प्रथम मांडली. पुढे सन १९९९ पासून जगातील बहुतेक सर्वच देशांनी शाश्वत विकास या संकल्पनेवर भर दिला आहे.

**शाश्वत विकासाची संकल्पना : (Concept of Sustainable Development)**

'विकास या शब्दाचा अर्थ स्पष्ट करणे अवघड आहे. कारण एकसारखे उत्पन्न असणाऱ्या दोन वेगवेगळ्या देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा भिन्न असू शकतो. युनोच्या निर्देशांकानुसार सरासरी आयुर्मान, प्रौढ साक्षरता, शिक्षण, सरासरी उत्पन्न घटकाच्या निकषाद्वारे मानवी विकास मोजता येतो. या मानवी विकासामध्ये व्यक्तीच्या निरोगी आयुष्यापासून आर्थिक, सामाजिक व राजकीय, स्वातंत्र्यापर्यंतच्या सर्वच घटकांचा समावेश होतो. शाश्वत विकासाची संकल्पना तशी अलिकडीलच आहे. नैसर्गिक साधने व जैवविविधता यांच्या संरक्षणाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने प्रकाशित केलेल्या सन १९८० च्या जागतिक संरक्षण योजनेमध्ये World Conservation Strategy) ही संकल्पना सर्वप्रथम मांडली गेली. Sustainable याचा अर्थ शाश्वत टिकाऊ, चिरस्थायी स्वयंपोषणक्षम असा आहे. सध्या प्रत्येक देश विकासासाठी प्रयत्नशील आहे. मात्र असा विकास करणे जसे महत्वाचे आहे तसेच झालेला विकास चिरकाल टिकवून ठेवणे महत्वाचे आहे. विकास व पर्यावरणावरील जागतिक आयोगाने शाश्वत विकास या संकल्पनेचा विकास केला. आपले समाईक भविष्य (Our Common Future) या सहामाही अहवालामध्ये त्यांनी ही संकल्पना सविस्तर मांडली तो अहवाल म्हणून प्रसिद्ध आहे.

**शाश्वत विकासाचा अर्थ व व्याख्या :**

**(Meaning and Definations of Sustainable Development) -**

शाश्वत विकास ही संकल्पना व्यापक असून ती जगातील सर्व मानवी समूहांशी संबंधित आहे. भविष्यातील विकासाच्या अनुषंगाने वर्तमानातील विकास करणे असा शाश्वत विकासाचा अर्थ मांडला जातो. दुर्मिळ व पर्यायी साधनसंपत्तीच्या अवाजवी वापरातून भविष्यातील पिढ्यासमोर प्रश्न निर्माण होऊ शकतात. म्हणून साधनसामग्रीच्या शाश्वत वापरादवारे भविष्यातील पिढींच्या गरजांचा विचार करून निर्णय घेणे गरजेचे आहे. या दृष्टिने शाश्वत विकास ही एक महत्त्वपूर्ण संकल्पना ठरते. शाश्वत विकासाच्या विविध तज्ञांनी दिलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे

१) **रॉबर्ट ॲलड :** ''शाश्वत विकास म्हणजे, मानवी गरजांचे समाधान चिरकाल टिकवून ठेवणे आणि व्यक्तिच्या जीवनामानात सुधारणा घडवून आणणे होय.''

२) **ब्रुटलँड समिती अहवाल :** ''भविष्यातील पिढींच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेचे (सामर्थ्याचे) तडजोड करण्यावाचून सध्याचा गरजा पूर्ण करणे म्हणजेच शाश्वत विकास होय.''

३) **के. परीखः** '' अर्थ व्यवस्थेमध्ये उत्पादनाची जी शक्यता आहे. त्या शक्यतेचे रक्षण करण्यासाठी निसर्गाकडून वस्तू व सेवा प्राप्त करून त्याचा पुरवठा करणे म्हणजेच शाश्वत विकास होय.''

वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपणास असे लक्षात घेते की, शाश्वत विकास ही संकल्पना पर्यावरणाशी संबंधीत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास त्याचा अनिष्ट परिणाम भविष्यातील पिढ्यांवर होत असतो. म्हणून पर्यावरणाचा अतिरिक्त उपयोग किंवा उत्पादन करणे धोक्याचे असते. शाश्वत विकास ही संकल्पना सध्याची पिढी व भविष्यातील पिढी या दोहोंशी जोडलेली आहे. म्हणजेच सध्याच्या पिढीचा विकास करीत असताना भावी पिढीवर त्याचा अनिष्ट परिणाम होऊ नये याची दक्षता शाश्वत विकास या संकल्पने मध्ये घेतली जाते. थोडक्यात शाश्वत विकास या संकल्पनेत पर्यावरण रक्षण आणि विकास यांना अत्यंत महत्व आहे.

**शाश्वत विकासाची उद्दिष्टये : (Objectives of Sustainable Development)**

पर्यावरण व मानवी जीवन यांच्या चिरस्थायी व शाश्वत विकासाकरीता शाश्वत विकासाची मुख्य उद्दिष्टये पुढीलप्रमाणे.

१) मानवी जीवनाचा गुणात्मक विकास करणे.

२) सर्व मानवी समूहाच्या मुलभूत गरजांची पूर्तता करून आर्थिक विकासाद्वारे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे.

३) सामाजिक जीवनातील सहभागाची समान संधी देवून निकोप व आरोग्यपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक जीवनासाठी सहकार्य करणे.

४) वर्तमानकालीन व भविष्यकालीन पिढ्यामधील एकात्मता वाढविणे.

५) पृथ्वीवरील नैसर्गिक सामाजिक व सांस्कृतिक संसाधनाचा व संपत्तीचा साठा जतन व संवर्धन करून तो पुढच्यापिढीकडे संक्रमित करणे.

६) नैसर्गिक व भांडवली साधनांचा साठा संपुष्टात येवू नये असा शाश्वत विकास करणे.

७) संपूर्ण जगातील निरपेक्ष दारिद्र्य कमी करणे

**✻ जगातील शिखर परिषद (World Earth Summit)**

सध्या वाढत्या पर्यावरण समस्येने अनेक देशाचे लक्ष शाश्वत विकासाकडे वेधले आहे. त्यातून जगातील सर्व देशांची या विषयावर चर्चा व एकमत तयार करण्यासाठी दरवर्षी ''वसुंधरा शिखर परिषद'' आयोजित करण्याचे ठरले. सन १९८८ मध्ये हवामान बदलाच्या समस्येसंदर्भात आंतरराष्ट्रीय चौकशी समिती तयार करण्यात आली. ज्या योगे हरितगृह वायू सोडण्याचे प्रमाण कमी करता येईल. अलीकडच्या काळात विविध कारणांनी जागतिक तापमानात सातत्याने वाढ होत आहे व यासाठी कोणत्याही एका देशाला जबाबदार धरता येणार नाही.

## * शाश्वत विकासाचे निर्देशक (Indicators of Sustainable Development)

### १) स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP)

स्थूल देशांतर्गत उत्पादन म्हणजे देशाच्या सिमारेषेच्या आत तयार होणाऱ्या वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य होय. सध्याची असणारी पिढी व भावी पिढी यांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी आर्थिक वृद्धी होणे अपेक्षित असते. त्याकरिता स्थूल देशांतर्गत उत्पादनात वाढ होणे गरजेचे असते. ही वाढ वस्तू व सेवांच्या उत्पादन दरावर अवलंबून असते. वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ होत असताना पर्यावरणाची कमीत कमी हानी होणे आवश्यक असते व त्याच बरोबर दारिद्र्याचे प्रमाण देखील कमी होणे अपेक्षित असते.

### २) देशाची लोकसंख्या –

उत्पादनाच्या प्रक्रियेत 'श्रम' हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. देशाचा विकास साध्य करण्यासाठी पर्याप्त लोकसंख्या असल्यास देशाचा विकास वेगाने होतो. परंतू लोकसंख्या प्रमाणापेक्षा जास्त वाढत गेल्यास मात्र विकास साध्य होत नाही व ती विकासातील एक मोठा अडथळा बनते. अतिरिक्त लोकसंख्येमुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी होते, प्रदुषणात वाढ होते. त्याचे अनिष्ट परिणाम भावी पिढीवर होताना दिसतात. त्यामुळे प्रदूषण व पर्यावरणाची हानी होऊ नये त्याचबरोबर विकासाला पोषक इतकीच लोकसंख्या असणे आवश्यक आहे.

### ३) मानवी साधनसंपत्तीचा विकास

शाश्वत विकासासाठी मानवी साधन संपत्ती देखील अत्यंत महत्वाची असते. उत्पादन प्रक्रियेत भांडवल व मानवी साधनसंपत्ती हे दोन्ही अत्यंत महत्वाचे ठरतात. उत्पादन प्रक्रियेत जेवढी किंमत भांडवलाला आहे तेवढीच मानवी साधनसंपत्तीला देखील आहे. मानवी सामग्रीचा विकास होत गेल्यास आर्थिक विकासही होत जातो. मानवी विकास मोजण्यासाठी 'मेहबुब – उल – हक' यांनी 'युनो' मार्फत मानवी विकास निर्देशांक मांडला आहे. मानवी विकासाचे मोजमाप करीत असताना व्यक्तीचे शिक्षण व प्रशिक्षण, आयुर्मान, राहणीमानाचा दर्जा उत्पन्न इ.चा विचार केला जातो.

### ४) आवश्यक पाण्याचा पुरवठा–

उत्पादन व उपभोगाच्या प्रक्रियेत पाणी हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. शाश्वत विकास होण्यासाठी आवश्यक तेवढा पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेतल्यास पाणी पुरवठ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी लोकांना मिळत नाही. पाणी हे कुटुंबासाठी, उद्योगासाठी व शेतीसाठी अत्यावश्यक आहे. सध्या पाणी वापराचा वेग हा एवढा जास्त आहे की, तो त्याच्या नुतनीकरणापेक्षा ही जास्त आहे. पाणी टंचाईची आजची स्थिती लक्षात येता. भविष्यातील काळ हा फार चिंतेचा आहे. कारण पाण्याशिवाय मानवी जीवनाचे अस्तित्व नाही. म्हणूनच पाणी हा शाश्वत विकासाचा अत्यंत महत्वाचा घटक आहे.

### ५) भौतिक स्वरूपाची साधनसंपत्ती –

शाश्वत विकासासाठी आवश्यक तेवढी उत्पादनाची साधने असणे गरजेचे असते. उत्पादन साधनांचा तुटवडा असल्यास शाश्वत विकास साध्य होऊ शकणार नाही. उत्पादन साधनांची उपलब्धता असून त्याचा वापर पर्याप्त होत नसेल तरीही शाश्वत विकास होऊ शकणार नाही. म्हणूनच शाश्वत विकासासाठीची साधने उपलब्ध

असणे आणि त्याचा योग्य वापर होणे गरजेचे आहे.

**६) इतर आवश्यक घटक**

**१) हवा –** शाश्वत विकासासाठी इतर घटकांबरोबर इतर घटकही कारणीभूत असतात. त्यामध्ये शुद्ध हवा असणे गरजेचे आहे. शुद्ध हवा ही मानवाला व इतर मानवेत्तर घटकांना जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक असते. जर प्रदुषणाच्या प्रमाणात वाढ होत गेली तर भावी पिढीला शुद्ध हवा मिळणार नाही. त्यांच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम होईल.

**२) ऊर्जा –** शुद्ध हवेबरोबरच 'ऊर्जा' हा घटक देखील शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्वाचा आहे. ऊर्जेचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. एक पारंपरिक ऊर्जा आणि दुसरी अपारंपरिक ऊर्जा. ऊर्जेचा पर्याप्त वापर केल्यास शाश्वत विकास घडून येतो. अशा प्रकारे अनेक घटक शाश्वत विकासाचे निदर्शक ठरतात.

**शाश्वत विकासाचे धोरण –** (Policies for Sustainable Development)

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनाचा दर्जा घसरल्याने लोकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. आर्थिक उत्पादकता घटते आणि सुखसोई कमी होतात. त्यासाठी योग्य धोरण ठरविणे ही काळाची गरज ठरते.

**यादृष्टीने महत्वाची धोरणे पुढीलप्रमाणे –**

१) मोठे प्रकल्प राबवून रोजगार निर्मीतीद्वारे दारिद्रय निर्मुलन करणे.

२) अनुदान (Subsides ) कमी करणे, अथवा बंद केल्याने देशाला अनेक फायदे प्राप्त होतील.

३) उत्पादन व वितरणासाठी बाजारभिमुख दृष्टिकोन स्वीकारणे.

४) संपत्तीचे विकेंद्रिकरण करणे.

५) रास्त किंमत, संस्थात्मक रचना यांद्वारे वितरणात वाढ करणे.

६) दर्जेदार उत्पादनासाठी सुयोग्य नियंत्रण ठेवणे.

७) देशांतर्गत व परकीय व्यापाराच्या वाढीला चालना देणे.

८) सामाजिक सहभाग व सामाजिक ऐक्य निर्माण करणे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा पूर्ण करा.**

१) शाश्वत विकास ही संकल्पना ........मध्ये सर्वप्रथम मांडण्यात आली.

अ) १९८० ब) १९८१ क) १९८२ ड) १९८३

२) ............यांनी मानवी विकास निर्देशांक ही संकल्पना सर्वप्रथम मांडली.

अ) अमर्त्य सेन ब) मेहबुन-उल-हक क) बराक ओबामा ड) लॉर्ड केंन्स

३) तापमान वाढीच्या समस्येची चर्चा करण्यासाठी जगातील सर्व देशांची .....परिषद दरवर्षी भरते.

अ) पॅरीस परिषद ब) दोहा परिषद क) शांतता परिषद ड) वसुंधरा परिषद

४) दुसरी जागतिक हवामान परिषद सन १९९० मध्ये ..... येथे भरली.

अ) पॅरीस ब) क्वेटो क) शांघाय ड) लंडन.

५) ..... ही संकल्पना पर्यावरण व विकास या दोहोंशी संबंधीत आहे.

अ) शाश्वत शेती ब) शाश्वत विकास क) शाश्वत वृद्धी ड) शाश्वत पर्यावरण

## १.३ सारांश –

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये त्या देशातील उपलब्ध साधनसंपत्ती आणि मानवी भांडवल हे घटक अत्यंत महत्वाचे असतात. भारताचा विचार करता भारतात हे दोन्ही घटक मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि भारतातील नैसर्गिक संसाधनांचा विचार करता लोकसंख्या अतिरिक्त आहे. भारताच्या तुलनेत इतर देशांच्या लोकसंख्यावाढीचा दर हा अत्यल्प आहे लोकसंख्येच्या बाबतीत सध्या भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारत हा दिडशे पेक्षा जास्त वर्षे ब्रिटीशांच्या गुलामगिरीत अडकलेला देश होता. ब्रिटीशांनी भारतातून प्रचंड संपत्ती लुबाडून नेली त्यासाठी इथल्या नैसर्गिक संपत्तीची व मानवी भांडवलाची अमानुष पिळवणूक केली. परिणामी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेला भारत व त्याची अर्थव्यवस्था ही अविकसित स्वरूपाची होती. तीचे स्वरूप अर्थसंरजामशाही होते. कृषीप्रधान असलेली अर्थव्यवस्था स्थिर व मागास होती. परंपरागत उत्पादन पद्धती मागास शेती, लघु-कुटीर उद्योगांचे प्राबल्य अशी स्थिती होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात अनेक क्षेत्रात काही रचनात्मक बदल घडून आले शेती क्षेत्राचे महत्व हळू हळू घटत गेले. उदर निर्वाहाची शेती जाऊन व्यापारी पिके येऊ लागली. कृषी आदाने, कृषी प्रक्रिया यांचे उद्योग उभे राहिले. कृषी व उद्योगांचा जसजसा विकास होत गेला तसतसे देशात सेवाक्षेत्र आकाराला येत गेले. लघु-कुटीर उद्योग नष्ट होऊन 'मोठ्या उद्योगांचे 'पर्व सुरू झाले. अंतर्गत व्यापारासोबत बाह्य व्यापाराचे महत्व वाढले. यातून बेरोजगारी, यांत्रिकीकरण, वाढता उत्पादन खर्च, वाढती स्पर्धा असे प्रश्न निर्माण होऊ लागले. गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण असे विषम विभाजन पुढे झाले.

वाढत्या विकासाबरोबर येणारी विषमता, दारिद्र्य, पिळवणूक इ. वर मात करण्याकरता देशाच्या नियोजनात सर्वसमावेशक विकासाला अग्रक्रम दिला गेला. त्यासाठी ग्रामीण विकास, शेती विकास, रोजगार निर्मिती महिला सबलीकरण, अन्न, वस्त्र, निवारा यांची उपलब्धता, आरोग्य व शिक्षणाची सोय, वाहतूक व दळणवळणाची सोय. अशा विविध योजना शासन स्तरावर कार्यान्वित करण्यात आल्या. आदिवासी, प्रौढ नागरिक, महिला, बालके, ग्रामीण भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले गेले.

निसर्ग व संसाधने यांची लयलूट करून साध्य होणारा विकास हा चिरस्थायी नसतो, भविष्य काळातील पिढ्यांना त्यांच्या उपभोगासाठी साधनाची उपलब्धता राहील असा विचारपूर्वक वापर करून होणारा विकास ही आजच्या विकासाची मुख्य अट मानली जाते. नैसर्गिक साधने पर्यावरण उदा.- शुद्ध हवा,मृदा, पाणी, ऊर्जा इ. घटकांची शाश्वत उपलब्धता यावर भर दिला जात आहे.

थोडक्यात १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झालेला भारत त्यावेळच्या परिस्थितीवर मात करत, सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने अग्रेसर होताना विविध क्षेत्रांतील बदलांना सामोरा जात आहे. मात्र या सर्वाला 'शाश्वत विकासाचे निकष' असणेही तितकेच महत्वाचे आहे.

**१.४ पारिभाषिक शब्द :**

**१) नैसर्गिक संसाधने –** मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी व निसर्गत: विनामुल्य उपलब्ध असणारी साधने.

**२) शिरगणती –** लोकसंख्येची मोजदाद करणे.

**३) पंचवार्षिक योजना –** आर्थिक विकास साधण्यासाठी सरकारने पाच वर्षासाठी तयार केलेली योजना.

**१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

**१.२.१**

१)- ब २)- ब ३)- क ४)- ब

**१.२.२**

१)- ब २)- क ३)- ब ४)- क ५)- क

**१.२.३**

१)- ड २)- ब ३)- ब ४)- क ५)- ब

**१.२.४**

१)- अ २)- ब ३)-ड ४)- ब ५)- ब

**१.६ सरावासाठी प्रश्न**

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न**

१. भारतीय अर्थव्यवस्थेची स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळची मुख्य वैशिष्टये सांगा.

२. भारतीय अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्योत्तर घडून आलेले संरचनात्मक बदल स्पष्ट करा.

३. 'सर्वसमावेशक विकास' म्हणजे काय? तिचे विकासातील महत्व स्पष्ट करा.

४. 'शाश्वत विकासाची' संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा**

१. शाश्वत विकास.

२. सर्वसमावेशक वृद्धी.

३. शेतीचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व.

४. हरित क्रांती.

**१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**


१) डॉ. घाटगे एल. एन आणि वावरे ए. के – भारतीय अर्थव्यवस्था – निराली प्रकाशन १३१२ शिवाजी नगर पुणे ४११००५, प्रथमावृत्ती जून २०१०.

२) Rudder Datt. & K.P.M. Sundharam (2018) Indian Economy S. Chand & Company Ltd. Ram Nagar, New Delhi 110055

३) ए. बी. सौदी आणि पी. एस. कोळेकर. (१९९५) मानवी लोकसंख्या भूगोल, निराली प्रकाशन पुणे ४१ बुधवार पेठ, ४११००२.

४) डॉ. देसाई व डॉ. सौ. भालेराव (२०१६) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन ४१ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

५) Misra & Puri (2018), Indian Economy

६) Indian Economy - Pratiyogita Darpan

७) India - 2018


***

# घटक – २

# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने– I

# ( Challenges before Indian Economy - I )

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ दारिद्र्याचा अर्थ व संकल्पना

  २.२.२ दारिद्र्याची कारणे व उपाययोजना

  २.२.३ बेरोजगारीचा अर्थ आणि प्रकार

  २.२.४ बेरोजगारीची कारणे व उपाय

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तूनिष्ठ प्रश्न)

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी प्रश्न

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## २.० उद्दीष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१) दारिद्र्याचा अर्थ आणि संकल्पना लक्षात येईल.

२) दारिद्र्याची कारणे व उपाय यांची माहिती होईल.

३) भारतातील बेरोजगारीचा अर्थ व प्रकार याचे आकलन होईल.

४) भारतातील बेरोजगारीची कारणे व उपाययोजना याचा अभ्यास करता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

घटक क्रमांक १ मध्ये आपण स्वातंत्र्यावेळी भारतीय अर्थव्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील

संरचनात्मक बदल, भारतीय अर्थव्यवस्था आणि सर्वसमावेशक वृद्धी व शाश्वत विकास  या घटकांचा सविस्तर अभ्यास केला आहे. घटक क्रमांक२ मध्ये आपण भारतातील दारिद्र्य, त्याचा अर्थ आणि संकल्पना, दारिद्याची कारणे व उपाययोजना, भारतातील बेरोजगारी, तिचा अर्थ, प्रकार, कारणे व उपाययोजनांचा यांचा अभ्यास करणार आहोत. त्याचप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेला वाढती लोकसंख्या, बेरोजगारी दारिद्र्य, आर्थिक व सामाजिक विषमता, प्रादेशिक असमतोल, वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार यासारख्या महत्त्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्यांमुळे देशाच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत. देशाचा विकास जर जलद गतीने व्हावयाचा असेल तर हे महत्वाचे प्रश्न सोडवावे लागतील. त्यासाठी भारत सरकार व घटकराज्ये प्रयत्नशील आहेत. तरीही या समस्यांची तीव्रता कमी होत नसल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब आहे. नियोजन काळात या समस्या कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अनेक धोरणे व उपाय योजनांचा स्विकार केला आहे.

## २.२ विषय विवेचन :

सदर घटकामध्ये आपण भारतातील दारिद्र्याचा अर्थ, संकल्पना, कारणे व उपाय, बेरोजगारीचा अर्थ, प्रकार, कारणे व उपाय इ. विविध घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### २.२.१ भारतातील दारिद्र्याची समस्या :

भारताच्या अनेक प्रमुख समस्यापैकी दारिद्र्य ही एक महत्वाची समस्या मानली जाते. भारतात सार्वत्रिक दारिद्र्य आढळते. देशाच्या विकासामध्ये दारिद्र्यामुळे अडथळा निर्माण होतो आहे. भारतातील वाढती लोकसंख्या, बेकारीचे मोठे प्रमाण, आर्थिक विषमता, खाजगीकरण, शेतीप्रधान अर्थव्यवस्था अशा अनेक कारणामुळे भारतात दारिद्र्य व्यापक प्रमाणात आढळते. भारतात दारिद्र्य निवारण्यासाठी नियोजन काळात अनेक उपाययोजना आखण्यात आल्या. त्यांची अंमलबजावणी करण्यात आली. परंतु भारतात आजही मोठ्या प्रमाणात दारिद्र्य आढळून येते. भारतीय नियोजनाला मानवी चेहरा देण्याच्या दृष्टीने डॉ. अमर्त्य सेन यांनी दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमावर भर देवून सामाजिक सशक्तता वाढविण्यावर भर देण्याचे सुचविले आहे.

**दारिद्र्याची संकल्पना :**

दारिद्र्य ही आर्थिक व सामाजिक संकल्पना आहे. दारिद्र्याचे मोजमाप करणे कठीण काम आहे. दारिद्र्याची संकल्पना देशानुसार व समाजानुसार वेगवेगळी आढळते. भारत व इतर देशातील दारिद्र्याच्या संकल्पनेत मुलभूत स्वरूपाचा फरक आढळतो. दारिद्र्यामध्ये निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य या दोन महत्वाच्या संकल्पना आहेत. दारिद्र्य ही संकल्पना फार जुनी संकल्पना असून स्वातंत्र्यपूर्व काळात दादाभाई नौरोजी यांच्या दारिद्र्य आणि ब्रिटीशकालीन नियम या पुस्तकात यासंबंधी माहिती दिली आहे. अर्थशास्त्रामध्ये दारिद्र्याची संकल्पना संदिग्ध आहे. दरडोई उत्पन्न व उपभोग खर्च हे दारिद्र्याचे निर्देशांक असल्यामुळे वेगवेगळ्या देशामध्ये  दारिद्र्याची पातळी वेगवेगळी असते म्हणून सापेक्ष दारिद्र्य व निरपेक्ष दारिद्र्य असे दारिद्र्याचे दोन प्रकार केले जातात.

**१) निरपेक्ष दारिद्र्य :**

दारिद्र्याच्या निरपेक्ष संकल्पनेनुसार निर्वाहासाठी अत्यावश्यक असे एक निरपेक्ष मानक किंवा प्रमाण असते.

म्हणजेच जीवन जगण्यासाठी अन्नधान्य, कपडालत्ता आणि निवारा यांची किमान वास्तव परिमाणे असतात. या परिमाणांचे चालू किंमतीनुसार पैशात रूपांतर केले जाते. आणि अशा रितीने दरडोई किमान उपभोगाचा पैशातील आकडा ठरविला जातो. या व्याख्येच्या आधारे ज्या लोकांच्या उत्पन्नाची किंवा खर्चाची पातळी पैशात व्यक्त केलेल्या किमान आवश्यक उपभोगा पेक्षा कमी असते असे लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत असे मानले जाते.

२) **सापेक्ष दारिद्र्य :**

लोकांचे सरासरी राहणीमान निरनिराळ्या देशात निरनिराळे असते. उदा. अमेरिकेसारख्या उच्च श्रीमंत देशातील सरासरी राहणीमान भारतातील सरासरी राहणीमानाशी तुलना करता फार उच्च पातळीवर आहे. अमेरिकेत जे लोक सरासरी राहणीमानापेक्षा खालच्या पातळीवरील जीवन जगतात असे लोक तेथे गरीब मानले जातील. श्रीमंत देशातील गरीब लोक भारतातील किंवा गरीब देशातील परिस्थितीच्या दृष्टीने श्रीमंत असू शकतात. भारताचा विचार केला तर जे लोक शहरी भागात गरीब मानले जातात त्यापैकी काही लोक देशाच्या ग्रामीण व आदिवासी भागातील गरीब लोकांशी तुलना करता श्रीमंत ठरू शकतात. तसेच ग्रामीण भागातील जे लोक गरीब समजले जातात त्यापैकी काही लोक भारतातील अन्य जाती-जमातीतील लोकांशी तुलना करता श्रीमंत मानता येतील. देशाच्या सरासरी राहणीमानाच्या तुलनेत दारिद्र्याची व्याख्या केली जाते. सरासरी राहणीमान पातळी देशपरत्वे बदलते म्हणून एखाद्या विशिष्ठ देशातील गरीब व्यक्ती इतर देशात श्रीमंत मानली जाते. तसेच भारतासारख्या देशातील श्रीमंतापैकी काही लोक श्रीमंत देशात गरीब मानले जाऊ शकतात.

**दारिद्र्याचा अर्थ :**

१) **श्री ओझा :** ''माणसाला दररोज आहारातून किमान २२५० उष्मांकाची गरज असते. व्यक्तीला त्यांच्या आहारातून २२५० कॅलरीज पेक्षा कमी उष्मांक मिळाल्यास त्याला दारिद्र्य किंवा गरीब समजावे.''

२) **गिलिन आणि गिलिन :** ''दारिद्र्य ही अशी अवस्था आहे आज की ज्यामध्ये व्यक्ती अपुऱ्या उत्पन्नात असो या अयोग्य खर्चामुळे असो. ज्या समाजात ती व्यक्ती राहते तेथील राहणीमानाचा दर्जा गाठू शकत नाही की जो त्याची शारिरिक व मानसिक कार्यक्षमता वाढावी''

३) **जागतिक बँक :** ''दर माणसी दर दिवशी एक डॉलरपेक्षा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या व्यक्ती म्हणजे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती होय.''

४) **जागतिक विकास अहवाल :** '' दारिद्र्य म्हणजे योग्य पद्धतीचे अन्न व निवारा यांचा अभाव ही अशी स्थिती आहे की, त्या व्यक्तीस सुयोग्य पद्धतीचे राहणीमान, सुव्यवस्थित राहण्याची घरे, आरोग्य, शिक्षण सुविधा व पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळत नाही. थोडक्यात सर्व प्रकारच्या सुस्थितीपासून संपूर्णपणे वंचीत असणे म्हणजे दारिद्र्य होय.''

५) **प्रा. अमर्त्य सेन :** ''एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मुल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.''

६) **गोगार्ड :** '' दारिद्र्य म्हणजे स्वतःवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे पालन करण्यासाठी तसेच निरोगी

उत्साही राहण्यासाठी लागणाऱ्या जरूरीच्या वस्तूंचा अपुरा पुरवठा होय.''

**दारिद्र्य रेषा संकल्पना** : ''ज्या खर्चाच्या पातळीस पोषणासाठी असलेले किमान उष्मांक व इतर जीवनावश्यक अखाद्य वस्तू व सेवा उपलब्ध होऊ शकतात. ती खर्चाची पातळी म्हणजे दारिद्र्य रेषा होय.'' या रेषेच्या खालचे राहणीमान म्हणजे निकृष्ठ राहणीमान होय. तेव्हा निकृष्ठ राहणीमानामध्ये राहणाऱ्या लोकांना दारिद्र्य किंवा गरीब म्हणता येईल. निरक्षता, कमी उत्पन्न, बेकारी, उपासमार, कुपोषण, आजारपण, कमी आयुर्मान हे दारिद्र्याचे दर्शक आहेत. बकाल वस्त्यामध्ये राहणे, रोज योग्य पोटभर अन्न न मिळणे, पिण्याच्या पाण्याचा अभाव, अर्धनग्रता या अवस्थेत जगणे, वैद्यकीय सुविधा, शिक्षण व करमणूक यांचा अभाव असे दुःखी जीवनाचे चित्र म्हणजे दारिद्र्य होय. जागतिक दारिद्र्यरेषेनुसार दरडोई दर दिवशी १.२५ डॉलरपेक्षा कमी उत्पन्न असणारी व्यक्ती दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती म्हणून ओळखली जाते. त्यानुसार भारतातील ४०% लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. जागतिक बँकेच्या सन२०११ च्या अहवालात भारतातील ३२.७० %लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे.

**भारतातील दारिद्र्याचे प्रमाण** : दारिद्र्य हे आर्थिक वृद्धीच्या प्रक्रियेतील मोठा अडसर आहे. प्रा.नर्क्स यांच्या मते देश दरिद्री आहे कारण तो दारिद्र्यात आहे. दारिद्र्य हे दारिद्र्याचे कारण आणि परिणाम आहे. हे दारिद्र्याचे दृष्टचक्र फिरत राहते. भारताच्या कमी विकासाचे दारिद्र्य हे मुख्य कारणही आहे व परिणामही आहे. भारतातील दारिद्र्याचे प्रमाण पुढीलप्रमाणे :

**तक्ता क्रमांक – २.१**

**भारतातील दारिद्र्याचे प्रमाण**

| वर्ष | १९७३–७४ | १९८३ | १९९३–९४ | १९९९–२००० | २००४–०५ | २००९–२०१० |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ५६.४ | ४५.७ | ३७.३ | २७.१ | २८.३ | ३३.८ |
| नागरी | ५९.० | ४०.८ | ३२.४ | २३.६ | २५.७ | २०.९ |
| **एकूण** | **५४.९** | **४४.५** | **३६.०** | **२६.१** | **२७.१** | **२९.८** |

तक्ता क्र. २.१ वरून असे दिसून येते की भारतातील दारिद्र्यात १९७३–७४ ते १९९९–२००० पर्यंत घट (५६% वरून २६.१%) होत गेल्याचे दिसते. मात्र २००४–०५ नंतर (२७.१%ते ३३.८%) पर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. २०११ मध्ये योजना आयोगाने सर्वोच्च न्यायालयात शहरी भागासाठी ३२ रूपये व ग्रामीण भागासाठी २६ रूपये ही दरडोई दरदिवशी गरिबीची रेषा दिली आहे. २००९–१० मध्ये योजना आयोगाच्या मतानुसार ३५.५ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली होते.

**२.२.२ दारिद्र्याची कारणे :**

**१) लोकसंख्या वाढ :**

राष्ट्रीय उत्पन्नवाढीपेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्त असेल तर दारिद्र्य वाढते. भारतातील लोकसंख्येच्या वृद्धीदरात अलिकडील काळात काही प्रमाणात घट झाली असली तरी वृद्धी दर अजूनही जास्त आहे. त्यामुळे

दरडोई उत्पन्न व दरडोई उपभोग खर्च कमी राहून दारिद्र्य मोठ्या प्रमाणात आहे.

**२) शेतीची कमी उत्पादकता :**

शेतीचा लहान आकार, भांडवलाचा अभाव, जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा यामुळे भारतीय शेतीची दर हेक्टरी व दर श्रमीक उत्पादकता अल्प आहे. पावसाची अनिश्चितता व वारंवार पडणारे दुष्काळ बहुताशी शेतीचे स्वरूप हंगामी व ती मान्सूनवर अवलंबून असल्याने शेती तोट्यात असल्याने शेतीतील संबंधित लोक कर्जबाजरी व दरिद्री आहेत.

**३) वाढती बेकारी :**

मंद औद्योगिकरण व वाढती लोकसंख्या तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राची प्रगती, यांत्रिकीकरण यामुळे रोजगार मागणीच्या तुलनेत रोजगार संधी कमी असल्याने दारिद्र्यात वाढ होत आहे.

**४) मंद आर्थिक विकास :**

गेल्या दोन दशकामध्ये देशाच्या विकासाचा वार्षिक दर ५% पेक्षा अधिक राहिलेला असला तरी १९५१ ते १९९० पर्यत हा दर केवळ सरासरी ३.५% इतकाच होता. वाढती लोकसंख्या ही विकासातील अडसर बनल्याने देशात अजूनही आर्थिक विकासाचा वेग मंदच आहे.त्यामुळे दारिद्र्य अधिक आहे.

**५) शिक्षण व कौशल्याचा अभाव :**

देशात आज शिक्षणप्रसार वाढत असला तरी ग्रामीण निरक्षरता अधिक आहे. देशात भांडवलाचा अभाव, संयोजन कौशल्याचा अभाव, व्यवसाय शिक्षणाचा अभाव, प्रशिक्षण व कौशल्याचा अभाव यामुळे भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोठे आढळते.

**६) आर्थिक विषमता व भ्रष्टाचार :**

खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचा भारताने स्वीकार केल्याने आर्थिक विषमता वाढत आहे. भ्रष्टाचार दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढला आहे. यामुळे देशात एकूण लोकसंख्येपैकी १०% लोकांकडे ९०% संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे. ९०% लोकांकडे फक्त १०% उत्पन्न यामुळे दारिद्र्य टिकून आहे. जेवढी आर्थिक विषमता अधिक तितके सामाजिक कल्याण कमी म्हणजे विषमतेमुळे दारिद्र्याची तीव्रता वाढते.

**७) मूल्यांची घसरण :**

भारतात पूर्वी मानवी मुल्यांधिष्ठित व्यवस्था होती. त्या मुल्यव्यवस्थेमुळे दारिद्र्याची तीव्रता जाणवत नव्हती. परंतु विज्ञान व तंत्रविज्ञानातील प्रगती, औद्योगिकरण, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यामुळे समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय रचना बदलली आहे. कल्याणकारी राज्यव्यवस्थेपासून सरकार दूर चालले आहे. खाजगीकरणाकडे सरकारचा अधिक कल असल्यानेच या बदलत्या रचनेतून मुल्यांची घसरण होत आहे. हेही दारिद्र्याचे एक कारण आहे.

**८) भाववाढ :**

भाववाढ हेही दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. जेव्हा वस्तूंच्या किंमती वाढतात. तेव्हा पैशाची खरेदी

शक्ती कमी होते आणि त्याचा परिणाम समाजातील कनिष्ठ, मध्यम व गरीब वर्गावर होतो. १९५५ पासून भारतात सातत्याने भाववाढ घडून येत आहे. त्यामुळे देशातील गरीब लोकांच्या संख्येत वाढ होत आहे.

**९) पर्यायी रोजगार क्षेत्राचा अभाव :**

ग्रामीण भागात पर्यायी रोजगार क्षेत्रे उपलब्ध नसून वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीक्षेत्रावरील ताण अधिकाधिक वाढत आहे. परिणामत: ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यात भर पडत आहे. ग्रामीण भागात निरक्षरतेमुळे व अंधश्रद्धेमुळे, तसेच पारंपारिक धार्मिक समजुतीमुळे कुटुंबनियोजन कार्यक्रम परिणामकारक ठरलेले नाहीत. त्यामुळे लोकसंख्या वाढून दारिद्र्य वाढच होत आहे..

**१०) जमिन वाटपात विषमता :**

भारतातील फार मोठ्या लोकसंख्येचे उपजिवीकेचे साधन शेती हे आहे. ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मोठे आहे. मात्र भारतात एकूण ग्रामीण कुटुंबापैकी ५५% कुटुंबाकडे १ हेक्टरपेक्षा कमी व १८% कुटुंबाकडे १ ते २ हेक्टर आकाराच्या जमिनी होत्या. तर ग्रामीण भागातील ५०% लोकांकडे जमिनीची कसलीही मालकी नाही. थोडक्यात ग्रामीण भागात बहुसंख्य लोक अल्पभूधारक व भूमीहीन असल्याने त्यांना शेतीतून कमी उत्पन्न मिळत असल्याने दारिद्र्यात वाढ होत आहे.

**११) दारिद्र्याचे दुष्टचक्र :**

दारिद्र्याचे कारण त्या देशाच्या गरीबीत सापडते. भारतात दारिद्र्याचे प्रमाण मोठे असल्याने त्यांची बचत व भांडवल गुंतवणूक कमी आहे. त्यामुळे रोजगार व उत्पादन कमी राहून दारिद्र्य वाढते आहे.

**१२) नैसर्गिक आपत्ती :**

भारतात दुष्काळ, महापूर अतिवृष्टी, भूकंप, प्रतिकूल हवामान, अनिश्चित मान्सून यामुळे लोकांच्या उत्पन्नात सातत्य राहत नाही. त्यामुळे दारिद्र्य मात्र सातत्याने वाढत आहे.

**दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना :**

**१. उद्योगधंदे सुरू करणे :**

शहरी व ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरू केल्यास लोकांना रोजगार मिळून त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल व त्यांचे दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

**२. लोकसंख्या नियंत्रण :**

वेगाने वाढणारी लोकसंख्या भारतातील दारिद्र्य वाढविण्यास कारणीभूत ठरलेली आहे. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या कार्यक्रमात लोकसंख्या नियंत्रणावर भर देण्यात आला आहे. यामुळे लोकसंख्या वाढीचा दर काही प्रमाणात कमी झाला असला तरी लोकसंख्येचा सातत्याने आकार वाढत आहे.

**३. आर्थिक विकासाचा वेग वाढविणे :**

दारिद्र्य निर्मूलनाचा सर्वात योग्य उपाय म्हणजे आर्थिक विकासाचा वेग वाढविणे होय. हा वेग वाढल्यामुळे

गरीब वर्गातील लोकांना अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या वस्तू उपलब्ध होतात. आर्थिक विकासाचा वेग वाढविल्यास दारिद्र्य निर्मूलनास मदत होते.

**४. गरीब शेतकऱ्यांना साहाय्य :**

सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, भूमिहीन शेतकरी, कोरडवाहू शेतकरी अशा आर्थिकदृष्ट्या गरीब शेतकऱ्यांना सरकारने खते, बी-बियाणे, वीज कमी दराने पुरवावीत. तसेच कर्जाचा पुरवठा पुरेसा व बिनव्याजी करावा. अशा शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी बिनव्याजी किंवा कमी दराने कर्जपुरवठा करावा व अशा व्यवसायाचे मार्गदर्शन करण्यात यावे.

**५. कुटुंबातील एका व्यक्तीस रोजगार :**

प्रत्येक कुटुंबातील किमान एका व्यक्तीस रोजगार देण्यात यावा. अशा योजना राबविल्या तर संपत्तीचे केंद्रीकरण कमी होईल व आणखी एका जादाच्या कुटुंबातील व्यक्तीला रोजगार/नोकरी मिळाल्यास त्यांचे दारिद्र्य दूर होण्यास मदत होईल.

**६. शिक्षणाचा प्रसार :**

शिक्षणाचा प्रसार दारिद्र्य निर्मूलनावरील उपाय आहे. देशात नियोजन काळात शिक्षणप्रसारावर मोठ्या प्रमाणात भर देण्यात आला. शिक्षण प्रसारामुळे लोकसंख्या वाढ कमी होण्यास मदत झाली आहे. त्याबरोबर रोगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**७. आर्थिक विषमता कमी करण्यावर भर :**

भारतात उत्पन्न व संपत्तीमधील विषमता कमी करण्यासाठी सरकारने श्रीमंतावर उत्पन्न कर, व्यवसाय कर, असे विविध कर बसवून मिळालेल्या पैशातून गरीबासाठीच्या दारिद्र्य निर्मूलनाच्या अनेक योजना राबविल्या आहेत. मोठ्या शेतकऱ्यांकडील जादाची जमिन काढून घेऊन भूमिहीनांना त्याचे वाटप करण्यात येत आहे. अशारीतीने दारिद्र्य कमी करण्यासाठी उत्पन्न व संपत्ती वाटपातील विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

**भारतातील योजना काळातील दारिद्र्य निर्मूलनाचे कार्यक्रम :**

**१. ग्रामीण भूमिहीन मजूर रोजगार हमी कार्यक्रम :**

या योजनेची सुरूवात १५ ऑगस्ट १९८३ मध्ये करण्यात आली. ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजूराला १०० दिवस रोजगार देण्याची हमी या योजनेत आहे. या योजनेत कुटुंबातील किमान एका व्यक्तीला अशी हमी देते. केंद्रपुरस्कृत ही योजना राज्यशासनामार्फत अंमलात आणली जाते.

**२. प्रधान मंत्री ग्रामोदय योजना :**

२०००-२००१ मध्ये सुरू केलेल्या प्रधानमंत्री ग्रामोदय योजनेअंतर्गत खेड्यातील गरीबांना पिण्याचे पाणी, मोफत आरोग्य योजना, राहण्यासाठी घरे आणि शिक्षण दिले जाते.

**३. इंदिरा महिला योजना :**

गरीब स्त्रियांच्या कल्याणासाठी २० ऑगस्ट १९९५ रोजी इंदिरा महिला योजना सुरू करण्यात आली होती.

४. **इंदिरा आवास योजना :**

(१९८५-८६) या योजनेतून गरीबांना घरे बांधणीसाठी आर्थिक मदत केली जाते. या योजनेचा ६०% फायदा हा अनुसुचित जाती व जमाती यांच्यासाठी आहे. तसेच डोंगरी व आदिवासी भागातील गरीबांना घर बांधणीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

५. **राष्ट्रीय रोजगार हमी योजना :**

(२ फेब्रुवारी २००६) सर्वप्रथम देशातील २०० जिल्ह्यात लागू केली. या योजनेतून कुटुंबातील एका व्यक्तीला १०० दिवस रोजगार दिला जातो. या योजनेची सुरूवात प्रथम आंध्रप्रदेश या राज्यात झाली. या योजनेतून वृक्ष लागवड, जलसंवर्धन, जलव्यवस्थापन, ग्रामीण विकास, रस्ते बांधणी इत्यादी कामे केली जातात.

६. **भारत निर्माण योजना :**

ग्रामीण भागाच्या विकासासाठी भारत सरकारने भारत निर्माण योजना सुरू केली. या योजनेची घोषणा पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी मे २००५ मध्ये केली. पाटबंधारे, रस्ते, घरे, पाणी, वीज व दूरध्वनी अशा ग्रामीण भागातील क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्याची हमी या योजनेत देण्यात आली आहे.

७. **अंत्योदय अन्न योजना (डिसेंबर २०००) :**

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबापैकी गरीबात गरीब अशा १ कोटी कुटुंबांचा या योजनेत समावेश केला आहे. योजनेखालील प्रत्येक पात्र कुटुंबास गहू २ रूपये किलो आणि तांदूळ ३ रू. किलो अशा दराने २५ किलो अन्नधान्य पुरविले जाते.

८. **प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (डिसेंबर २०००) :**

दहाव्या योजनेच्या समाप्तीपर्यंत जेथे रस्ते नाहीत अशा ५०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील रस्त्याने जोडल्या न गेलेल्या १.८ लाख वस्तीस्थानांना रस्त्याची सुविधा पुरविण्याची ही योजना. ही योजना देशभर राबविली जाते.

९. **कामाच्या मोबदल्यात धान्य कार्यक्रम (फेब्रु २००१) :**

हा कार्यक्रम दुष्काळग्रस्त ग्रामीण भागात राबविला जातो. हा कार्यक्रम ८ राज्यात लागू करण्यात आला आहे. इतर दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम : पंतप्रधान रोजगार योजना (२००८-०९), जयप्रकाश रोजगार हमी योजना (२००२), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (१९९७), संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२५ सप्टें २००१), एकात्मिक ग्रामीण विकास योजना (२ आक्टोबर १९८०), दुष्काळपिडीत क्षेत्र कार्यक्रम (१९७३), किमान गरजा कार्यक्रम, वीस कलमी कार्यक्रम (१९७५-१९८२), निर्जन प्रदेश विकास कार्यक्रम (१९७७), खेडे विकास कार्यक्रम, ग्रामीण भागातील स्त्री व बाल विकासासाठीचा कार्यक्रम, समग्र आवास योजना (१९९९), जवाहर रोजगार योजना (१९८९).

१०. **संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना :**

सप्टेंबर २०११ मध्ये जवाहर ग्रामसमृद्धी योजना आली आहे. अशा प्रकारे भारतात दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने अनेक योजना व कार्यक्रम राबविले परंतु रोजगार निर्मितीच्या तुलनेत रोजगार मागणाऱ्यांची संख्या व लोकसंख्या जलद गतीने वाढल्याने दारिद्र्याचे प्रमाण वाढूच लागले आहे.

**२.५ स्वयंअध्ययन प्रश्न :(वस्तूनिष्ठ प्रश्न)**

**दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) जागतिक बँकेच्या सन २०११ च्या अहवालानुसार भारतात .. % लोकसंख्या दारिद्र्य रेषेखाली आढळते.

(अ) ४०% (ब) ३२.७०% (क) ४१% (ड) ४५%

२) ..... यांच्या मते देश दरिद्री आहे कारण तो दरिद्री आहे.

(अ) कार्ल मार्क्स (ब) प्रा.नर्क्स (क) जे.एम. केन्स (ड) मार्शल

३) भारत निर्माण योजनेची घोषणा .... यांनी केली.

(अ) इंदिरा गांधी (ब) राजीव गांधी (क) मनमोहन सिंग (ड) प्रणव मुखर्जी

४) पंतप्रधान ग्रामसडक योजना ..... मध्ये सुरू करण्यात आली.

(अ) १९८२ (ब) २००० (क) २००६ (ड) २०१०

५) जवाहर ग्रामसमृद्धी योजना व रोजगार हमी योजना यांचा समावेश .... योजनेत करण्यात आला आहे.

(अ) राष्ट्रीय रोजगार हमी योजना (ब) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

(क) पंतप्रधान रोजगार योजना (ड) जवाहर रोजगार योजना

**२.२.३ भारतातील बेरोजगारीची समस्या :**

जगातील सर्वच देशामध्ये सध्या बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. भारतातही ही समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. भारताला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांमध्ये बेकारीच्या समस्येला विशेष महत्त्व आहे. कारण वाढत्या बेकारीचे समाजावर व देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकुल परिणाम जाणवत आहेत. याकरिता या प्रश्नाचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे.

**बेरोजगारीचा अर्थ व प्रकार :**

बेरोजगारी म्हणजे काय? बेरोजगार कोणाला म्हणावे? याबाबत एक वाक्यता आढळून येत नाही. बेरोजगारीबाबत अनेकांनी व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही व्याख्यावरून बेरोजगारीचा अर्थ आपल्याला कळेल.

१) ''प्रचलित वेतनदारावर काम करण्याची इच्छा व पात्रता असलेल्या व्यक्तींना काम न मिळण्याची स्थिती म्हणजे बेरोजगारी होय.''

२) प्रा.पिगू मते,'' रोजगारात नसलेल्या परंतू रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेकार म्हणता येईल.''

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बेरोजगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. बेरोजगारी भारतात सार्वत्रिक स्वरूपात आढळते. भारतात ग्रामीण बेरोजगारी व शहरी बेरोजगारी अशी दोन प्रकारची बेरोजगारी दिसून येते. ग्रामीण भागात पूर्ण बेरोजगारी, अर्धबेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, सुप्त बेरोजगारी व सुशिक्षित बेरोजगारी

आढळते. भारतात वाढती लोकसंख्या, यांत्रीकीकरण, चलनवाढ, शेती व उद्योगांचा कमी विकास, लघु, कुटीर व ग्रामोद्योगांचा ऱ्हास इ. कारणामुळे भारतात बेरोजगारींच्या संख्येत वाढ होत आहे.

**तक्ता क्रमांक २.२**

**भारतातील बेरोजगारीचे स्वरूप (आकडेवारी लाखात)**

| अ.क्र. | वर्ष | एकूण उपलब्ध श्रमशक्ती | काम मिळालेली श्रमशक्ती | बेरोजगार व्यक्तींची संख्या | बेरोजगारीचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९७१ | १८०.४ | १६१.७ | १८.७ | १०.४ |
| २) | १९८३ | २७७.३४ | २६९.३६ | ७.९८ | २.८८ |
| ३) | १९९३-९४ | ३४३.५६ | ३३४.५४ | ९.०२ | २.६२ |
| ४) | १९९९-२००० | ३७७.८८ | ३६७.३ | ७१०.५१ | १३.१० |
| ५) | २००९-१० | ४१९.७ | ३८४.९ | ३४.१७ | - |
| ६) | २००९-१० | ४२८.९ | ४००.०८ | २८.०१ | - |

**संदर्भ** - अ) डॉ. घाटगे - डॉ. वावरे - भारतीय अर्थव्यवस्था २०१०, निराली प्रकाशन, पुणे, पान क्र. १२.१ ब) देसाई - भालेराव - भारतीय अर्थव्यवस्था २०१०, निराली प्रकाशन, पुणे. पान क्र. ४४.५

भारतात १९५१ मध्ये ९ लाख लोक, तर १९५६ मध्ये ५३ लाख लोक बेरोजगार होते. त्यानंतर भारतातील बेरोजगारीच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. तक्ता क्र. २.२ वरून एकूण उपलब्ध श्रमशक्ती, काम मिळालेली श्रमशक्ती, बेरोजगार व्यक्ती यामध्ये १९७१ ने २००९-१० पर्यंत वाढच झाल्याचे दिसून येते. बेरोजगारीचा दर मात्र कमी-जास्त झाल्याचे दिसते. तो सुरूवातीला अधिक होता, त्यानंतर तो कमी होत गेला व त्यानंतर पुन्हा त्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**भारतातील बेरोजगारीचे प्रकार :**

### १) हंगामी बेरोजगारी :

हंगामी बेरोजगारीचा प्रकार शेतीक्षेत्रात आढळतो. ज्यांना शेतीत हंगामपुरतेच काम मिळते व इतरवेळी त्यांना कामाविना राहावे लागते. अशा बेरोजगारीला हंगामी बेरोजगारी असे म्हणतात.

### २) सुप्त/ छुपी बेरोजगारी :

जी व्यक्ती वरवर पाहता कामात गुंतलेली दिसते परंतू त्या व्यक्तीमुळे उत्पादनात काहीच बदल होत नाही. त्याची उत्पादनक्षमता शून्य असते. अशा बेरोजगारीला छुपी/सुप्त बेरोजगारी असे म्हणतात. हा बेरोजगारीचा प्रकार शेतीक्षेत्रात आढळतो.

**३) ऐच्छिक बेरोजगारी :**

प्रचलित वेतनदारावर ज्यांची काम करण्याची पात्रता असूनही जे स्वइच्छेने रोजगाराविना राहतात त्याला ऐच्छिक बेरोजगार असे म्हणतात.

**४) अनैच्छिक बेरोजगारी :**

प्रचलित वेतनदारावर काम करण्याची इच्छा, पात्रता, कौशल्य, कुवत, ज्ञान असूनही जर रोजगार मिळत नसेल तर त्याला अनैच्छिक बेरोजगारी असे म्हणतात. अशी बेरोजगारी सर्वच क्षेत्रात आढळते.

**५) चक्रीय बेरोजगारी :**

तेजी-मंदीच्या व्यापार चक्रामुळे निर्माण होणाऱ्या बेरोजगारीला चक्रीय बेरोजगारी असे म्हणतात.

**६) घर्षणजन्य बेरोजगारी :**

जे लोक एक रोजगार सोडून दुसरा रोजगार शोधतात व दुसरा रोजगार मिळेपर्यंत त्यांना बेरोजगार राहावे लागते त्यालाच घर्षणात्मक बेरोजगारी असे म्हणतात.

**७) संरचनात्मक बेरोजगारी :**

उत्पादन तंत्रात व यंत्रात होणाऱ्या बदलामुळे निर्माण होणाऱ्या बेरोजगारीला संरचनात्मक बेरोजगारी असे म्हणतात.

**८) सुशिक्षितांची बेरोजगारी :**

जेव्हा व्यक्तींना पुरेसे उच्चशिक्षण, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण घेऊनही त्यांना जेव्हा रोजगार मिळत नाही तेंव्हा त्याला सुशिक्षित बेरोजगारी असे म्हणतात.

**९) औद्योगिक बेरोजगारी :**

औद्योगिक क्षेत्राचा कमी विकास, यंत्राचा वाढता वापर यामुळे औद्योगिक क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांना रोजगार मिळत नाही. त्यांना औद्योगिक बेरोजगारी असे म्हणतात. वरील बेरोजगारीच्या प्रकाराबरोबरच कायमस्वरूपी बेरोजगारी, दीर्घकालीन बेरोजगारी, अर्ध बेरोजगारी इ. प्रकार आढळतात.

**२.२.४ भारतातील बेकारीची कारणे व उपाय :**

**भारतातील बेरोजगारीची कारणे :**

**१) लोकसंख्या वाढ :**

जगाच्या एकूण भूभागापैकी २.४ भूभाग व एकूण लोकसंख्येपैकी १७.५ लोकसंख्या भारतात राहते लोकसंख्येच्या दृष्टीने भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. भारताची लोकसंख्या प्रतिवर्षी अधिक वेगाने वाढत असल्याने अशा वाढत्या लोकसंख्येला रोजगाराच्या पुरेशी संधी निर्माण होत नसल्याने लोकसंख्या वाढीबरोबर बेरोजगारीतही वाढ होते.

**२) मंद आर्थिक विकास :**

भारतात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे प्रतिवर्षी रोजगार (नोकऱ्या) मागणाऱ्यांची

संख्या खूपच वाढत आहे. पंरतू भारतात आर्थिक विकास मंद गतीने होत असल्यामुळे प्रत्येक वर्षी मागणीच्या प्रमाणात नवीन रोजगाराची (नोकऱ्यांची) संख्या मात्र वाढत नाही. त्यामुळे प्रत्येक वर्षी बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत आहे.

**३) हस्तोद्योग व ग्रामीण उद्योगाचा ऱ्हास :**

स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी ग्रामीण भागात असणाऱ्या हस्तोद्योगांचा व ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास झाला. ग्रामोद्योगात श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जात असल्याने अधिकाधिक लोकांना रोजगार प्राप्त होतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या उद्योगांचे पुनर्जीवन करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध योजना राबविल्या जात आहेत. परंतू त्यात हवे तेवढे यश न आल्याने बेरोजगारीत वाढ झाल्याचे दिसून येते.

**४) शेतीचे हंगामी स्वरूप :**

भारतातील शेती अद्यापी मोठ्या प्रमाणावर पावसावर व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. अद्यापही ७०% शेती सिंचनाशिवाय कोरडवाहू आहे. दुष्काळाचे प्रमाण वाढत आहे. पाणी टंचाईच्या समस्येने भयानक स्वरूप धारण केले आहे. वीजेची टंचाई अशा अनेक कारणामुळे वर्षातून अनेक पिके घेता येत नाहीत. शेतीचे हंगामी स्वरूपामुळे बेरोजगारीत वाढ होत आहे.

**५) दारिद्र्य :**

दारिद्र्य हे बेकारीचे कारण आहे व अनेक व्यक्ती गरीब असण्याचे कारण बेकारी आहे. व्यक्ती गरीब असल्यामुळे त्यांच्याकडे साधन सामग्रीची टंचाई असते व त्यामुळे त्यांना रोजगार मिळविता येत नाही. गरिबीमुळे त्यांना व्यवसायही सुरू करता येत नाही. नोकरी मिळविण्यासाठी पैसा खर्च करावा लागतो. तो गरीबांकडे नसल्याने त्यांना बेरोजगार राहावे लागते.

**६) यांत्रिकीकरणावर भर :**

भारतात भांडवल प्रधान तंत्राचा वापर वाढल्यामुळे पुरेशा प्रमाणात रोजगार संधी निर्माण होऊ शकल्या नाहीत. भारतातील उद्योजक सातत्याने वाजवीकरण, आधुनिकीकरण, श्रमाची बचत करणाऱ्या यंत्राचा वापर, यावर भर देत आहेत. त्यामुळे श्रमाऐवजी यंत्राचा वापर वाढल्याने बेरोजगारीत वाढ होत आहे.

**७) एकत्र कुटुंब पद्धती** : ग्रामीण भागात सुप्त बेकारीचे एकत्र कुटुंब पद्धती हे महत्त्वाचे कारण आहे. लोकसंख्यावाढीमुळे कुटुंबाच्या आकारमानात वाढ होते. परंतु शेतजमिनीच्या आकारमानात वाढ होत नाही. त्यामुळे जमीनीच्या तुलनेत लोकांचे प्रमाण अधिक होते त्यामुळे छुपी किंवा प्रछन्न बेकारी निर्माण होते. शेती क्षेत्रावर लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडल्याने छुप्या बेकारीत वाढ होते.

**८) नवीन आर्थिक धोरण :**

१९९१ मध्ये भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारून अर्थव्यवस्थेचे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, शिथिलीकरणाला परवानगी दिल्याने परदेशातून उच्च तंत्रज्ञान व प्रगत यंत्रसामग्री भारतात आल्याने कामगारांची संख्या कमी करण्यात आल्याने बेरोजगारीत वाढ झाली आहे.खाजगीकरण व यांत्रीकरणामुळे अनेक उद्योगात नोकर कपात करण्यात येत आहे. त्यामुळे बेरोजगारीत वाढ होत आहे.

### ९) दोषपूर्ण शिक्षण व्यवस्था :

भारतात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याने प्रत्येक वर्षी शिक्षण घेऊन पदवीधर होऊन लाखो विद्यार्थी बाहेर पडत आहे. परंतू अशा प्रकारचे शिक्षण औद्योगिक क्षेत्रात फारसे उपयोगी पडत नाही त्यामुळे असे शिक्षण घेणाऱ्यांना नोकऱ्या/ रोजगार मिळत नाही. भारतात उद्योग, सेवा क्षेत्राच्या गरजा विचारात घेऊन शिक्षण पद्धती विकसित करण्यात आली नाही त्यामुळे केवळ कारकुनी स्वरूपाची नोकरी करू इच्छिणाऱ्या बेकारांची संख्या वाढत आहे. व्यावसायिक शिक्षणाचा भर न दिल्याने स्वयंरोजगार करण्यांचे प्रमाण कमी आहे त्यामुळे बेरोजगारी वाढत आहे.

### १०) औद्योगिकरणाचा मंद वेग :

भारतात नियोजन काळात औद्योगिकीकरणाचा वेग वाढविण्याचे मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात आले. याला काही प्रमाणात यशही आले. परंतु शेती क्षेत्रातील अतिरिक्त लोकसंख्या सामावून घेण्याइतपत औद्योगिक क्षेत्रात रोजगारसंधी निर्माण झाल्या नाहीत. मोठ्या शहरातच उद्योगांची वाढ झाली. मात्र देशाच्या अनेक भागात औद्योगिक प्रगती फारशी झाली नसल्याने बेरोजगारीत वाढ होत आहे.

### १०) अपुरे रोजगार नियोजन :

भारतात नियोजनाला १९५१ पासून सुरूवात झाली परंतू देशातील बेकारीच्या प्रश्नाला नियोजनात कधीही प्राधान्य देण्यात आले नाही. नियोजन काळात मनुष्यबळ नियोजनाचा विचार करण्यात आला नाही. देशाचा आर्थिक विकास घडून आला, की आपोआप रोजगार वाढेल असा विचार नियोजन काळात करण्यात आला परंतु रोजगार वाढीसाठी जाणीवपूर्वक राष्ट्रीय धोरण आखून त्याची पद्धतशीरपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न न केल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

## बेरोजगारीवरील उपाय योजना :

### १) लोकसंख्या वाढ रोखणे :

लोकसंख्या वाढ ही बेरोजगारी वाढीची महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी लोकसंख्या वाढीचा दर कमी करणे आवश्यक आहे. भारतात लोकसंख्या वेगाने वाढत राहिल्यास त्यांना रोजगार पुरविणे अतिशय अडचणीचे ठरेल. म्हणून शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी कुटुंबनियोजन करण्याचा प्रचार व प्रसार करावा. आणि लोकांनीही स्व व देश कल्याणासाठी कुटुंबनियोजनाचा अवलंब केल्यास बेरोजगारी आपोआप नियंत्रित होईल.

### २) आर्थिक विकासाची गती वाढविणे :

भारतात आर्थिक विकास सुरू आहे परंतु तो मंद गतीने होत आहे. जर भारताचा आर्थिक विकास जलद गतीने घडवून आणल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार (नोकऱ्या) उपलब्ध होतील.

### ३) शेतीपूरक उद्योगांचा विकास :

भारताच्या ग्रामीण भागात शेती व्यवसायाला पुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन,

इ. व्यवसायांना प्रोत्साहन दिल्यास तसेच ग्रामीण भागात लघु, कुटीर उद्योग व शेतीपुरक उद्योग विशेषतः शेतमालावर आधारीत प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण केल्यास बेरोजगारी कमी होईल.

**४) रोजगार निर्मितीचे कार्यक्रम व योजना राबविणे :**

भारतात नियोजन सुरूवात झाल्यापासून बेरोजगारी दूर करण्यासाठी रोजनिर्मिती करण्यासाठी अनेक कार्यक्रम व योजना राबविल्या जात आहेत. परंतू त्या रोजगार मागणीच्या तुलनेने अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे अनेक नवीन रोजगार निर्मित्तीचे कार्यक्रम प्रकल्प व योजना प्रभावीपणे राबवण्यात यावे. देशातील मनुष्यबळाचा विचार करून रोजगार वाढीसाठी जाणीवपूर्वक राष्ट्रीय रोजगार धोरण आखून त्याची पद्धतशीरपणे अंमलबजावणी केल्यास बेरोजगारी कमी करण्यात यश प्राप्त होईल. नियोजन काळात देशात रोजगार वाढीसाठी शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम (आक्टोबर १९८०) ग्रामीण भूमीहीन रोजगार कार्यक्रम (१५ ऑगस्ट १९८३), प्रधानमंत्री रोजगार योजना (१९९३), ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम (१९९५), स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (१एप्रिल १९९९) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२०००), स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना(१९९७),जवाहर रोजगार योजना (२८/४/१९८९), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (२००५) प्रमुख कार्यक्रम रोजगार निर्मितीचे कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. (ग्रामीण प्रकल्प कार्यक्रम १९६१, ग्रामीण रोजगारासाठी धडक योजना १९७१-७२ कामासाठी धान्य कार्यक्रम १९७७, ग्रामीण भागातील भूमिहीन लोकांना रोजगार हमी योजना(१९८३), राष्ट्रीय रोजगार हमी योजना (२००६).

**५) शेतीपूरक व्यवसायाचा विकास करणे :**

ग्रामीण भागात रोजगारी निर्माण करण्यासाठी शेती व्यवसायाला पूरक असणारे दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन यासारख्या व्यवसायाचा विकास केल्यास रोजगार निर्मिती होऊन बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल. अलिकडे सरकार शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देवून मदत करीत आहे त्यामुळे बेरोजगारी काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.

**६) शेती आणि उद्योगाचा विकास :**

भारत हा शेतीप्रधान देश असून शेती मागासलेली आढळते त्यामुळे रोजगार निर्मिती होत नाही.जर शेतीचा विकास केला तर रोजगार निर्मिती होईल. सध्या शासनामार्फत शेती विकासाच्या विविध योजना राबविल्या जात आहे. शेतीचा विकास व्हावयाचा असेल तर उद्योगाचा विकास झाला पाहिजे. उद्योगातील अनेक समस्या आणि अडचणीमुळे उद्योगांची प्रगती म्हणावी अशी होत नाही. त्यामुळे उद्योग व शेतीच्या विकासाच्या योजना राबविल्यास निश्चितच बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल.

## २.६ सारांश :

विकसित आणि विकसनशील देशातील बेकारीचे स्वरूप, व्याप्ती वेगवेगळी असल्याने विकसनशील देशातील बेकारीचे वेगळ्यां पद्धतीने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. भारतातील बेकारीची समस्या विचारात घेत असताना बेकारीचे स्वरूप, कारणे, परिणाम आणि आजपर्यंत करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यावरून आपणास बेकारीच्या समस्येचे बदलते स्वरूप लक्षात येण्यास मदत होते. बेकारी आणि दारिद्र्य एकमेकांच्या हातात हात घालून येतात बेकारी तेथे दारिद्र्य आणि दारिद्र्य तेथे बेकारी

पाहाण्यास मिळते त्यामुळे बेकारीच्या समस्ये बरोबरच दारिद्र्याच्या समस्येचेही विचार करावा लागतो. भारतामध्ये अजूनही दारिद्र्य ही संकल्पना समजून घेत असताना निरपेक्ष दारिद्र्य व सापेक्ष दारिद्र्य या संकल्पना विचारात घ्याव्या लागतात. त्याप्रमाणेच भारतातील दारिद्र्याचे प्रमाण मोजमाप याबाबतीतही अभ्यास करण्यात आलेला आहे. दारिद्र्य ही संकल्पना समजून घेतल्यानंतर भारतातील दारिद्र्याची कारणे आणि त्यावर आजपर्यंत केलेल्या उपायोजनांचा आढावा घेणे सोयीचे होते. या उपघटकांमध्ये यासंबंधीची सर्व माहिती घेण्यात आली आहे.

**२.४ पारिभाषिक शब्द :**

दारिद्र्य : गरीबी २) श्रमशक्ती-श्रमीकांची काम करण्याची कुवत किंवा त्यांची संख्या ३) बेरोजगार-रोजगार नसलेला ४) सार्वत्रिक - देशभर ५) आर्थिक उदारीकरण - आर्थिक नियंत्रणे शिथिल करणे.

**२.५ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतीय अर्थव्यवस्था ........................................... आहे.

(अ) विकसनशील (ब) विकसित (क) अविकसित (ड) यापैकी नाही.

२. शेती क्षेत्रात ................................................ प्रकारची बेकारी आढळते.

(अ) चक्रीयर (ब) सुप्त (क) घर्षणात्मक (ड) यापैकी नाही

३. भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार ................................. मध्ये केला.

(अ) १९५१ (ब) १९७१ (क) १९९१ (ड) २००१

४. भारतात जवाहर रोजगार योजनेची सुरूवात ..... मध्ये झाली.

(अ) १९८९ (ब) २००१ (क) १९७२ (ड) २००५

५. राष्ट्रीय रोजगार हमी योजना ..... मध्ये सुरू करण्यात आली.

(अ) २००१ (ब) २००६ (क) २०११ (ड) २००२

**२.६ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तुनिष्ठ प्रश्न) उत्तरे :**

२.५ - १) अ २) ब ३) क ४) अ ५) ब

३.५ - १) ब २) ब ३) क ४) ब ५) ब

**२.७ : सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा लिहा :**

१) बेरोजगारीचे प्रकार २) बेरोजगारीची कारणे ३) बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाययोजना

४) भारतातील दारिद्र्य ५) भारतातील दारिद्र्याची कारणे

६) दारिद्र्य निर्मूलनाच्या उपाययोजना

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतातील बेरोजगारी वाढीची कारणे सांगून ती कमी करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा.

२) भारतातील दारिद्र्याच्या समस्येचा सविस्तर आढावा घ्या.

**२.८ : अधिक वाचनसाठी संदर्भ ग्रंथ :**


१) भारतीय अर्थव्यवस्था : देसाई-भालेराव, निराली प्रकाशन-९ वी आवृत्ती, सप्टेंबर २०१२

२) भारतीय अर्थव्यवस्था : घाटगे-वावरे, निराली प्रकाशन, प्रथम आवृत्ती जून २०१०.

३) भारतीय अर्थव्यवस्था : प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, सक्सेस पब्लिकेशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०१०.

४) अर्थव्यवस्था, नियोजन आर्थिक विकास आणि कृषी : जाधव-काळे-मगर सुर्यवंशी, रत्नाई पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती, एप्रिल २०१२.

५) शिवार्थ २३ वे वार्षिक अधिवेशन शिवाजी विद्यापीठ,इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर २०१३

६) भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. प्रभाकर देशमुख,पिंपळी पुरे अ‍ॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

७) भारतीय अर्थव्यवस्था : भोसले- भोसले-कदम-फडके प्रकाशन, कोल्हापूर-प्रथम आवृत्ती २०१८

७) Indian Economy - Datt Sundaram - S. Chand Company Ltd. New Delhi.

८) भारतीय अर्थव्यवस्था : साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

९) Indian Economy - A. N. Agarwal, Wishwa Prakashan, New Delhi.


***

# घटक ३
# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने – II
# ( Challenges before Indian Economy - II)

**अनुक्रमाणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ वाढती आर्थिक विषमतेची समस्या व ती कमी करण्याचे उपाय.

  ३.२.२ सामाजिक विषमतेची समस्या व ती कमी करण्याचे उपाय.

  ३.२.३ भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या व त्यावरील उपाययोजना

  ३.२.४ आंतरराष्ट्रीय तुलना : राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक.

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तूनिष्ठ प्रश्न)

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


**३.० उद्दिष्ट्ये**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील गोष्टींचे आकलन होईल.

१) भारतातील वाढत्या आर्थिक व सामाजिक विषमतेची समस्या करता येईल.

२) भारतातील आर्थिक व सामाजिक विषमता कमी करण्याचे उपायांचा अभ्यास करता येईल.

३) भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या जाणून घेता येईल.

४) भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या कमी करण्याचे उपाय यांचा अभ्यास करता येईल.

५) भारतातील राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक यांची आंतरराष्ट्रीय तुलना समजून घेता येईल.

**३.१ प्रस्तावना :**

घटक क्रमांक २ मध्ये आपण भारतातील बेरोजगारी, तिचे प्रकार, कारणे व उपाययोजनांचा अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे भारतातील दारिद्र्य, संकल्पना, कारणे व उपाययोजना यांचा आढावा घेतला आहे. घटक क्रमांक ३ मध्ये आपण भारतात अलिकडे वाढत जाणाऱ्या आर्थिक व सामाजिक विषमतेच्या समस्येचाही आढावा घेणार असून भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्येचा आपण अभ्यास करणार आहोत. तसेच भारतातील राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांकाची आंतरराष्ट्रीय तुलना याचा आपण अभ्यास करणार आहे. या समस्यांची तीव्रता कमी होत नसल्याचे आढळून येते. ही एक चिंतेची बाब आहे. नियोजन काळात या समस्या कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अनेक धोरणे व उपाय योजनांचा स्विकार केला आहे.

**३.२.१ भारतातील आर्थिक विषमता :**

भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेत समतोल आर्थिक विकास होणे ही महत्त्वाची बाब आहे. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनकाळात समतोल आर्थिक विकास होणे गरजेचे होते. परंतु तसे न होता त्यामध्ये विषमता वाढतच आहे.

**अ) आर्थिक विषमतेचा अर्थ व स्वरूप :**

आर्थिक विषमतेला गरीब आणि श्रीमंतामधील अंतर, संपत्तीची विषमता, उत्पन्नातील फरक असेही म्हटले जाते. ''देशातील एकूण लोकसंख्येमध्ये अगर दोन व्यक्तीमध्ये संपत्तीचे व उत्पन्नाचे होणारे असमान वितरण म्हणजे आर्थिक विषमता होय.'' थोडक्यात देशातील काही व्यक्तीजवळ संपत्तीचा मोठा हिस्सा व जास्त लोकांजवळ संपत्तीचा कमी वाटा केंद्रीत झालेला असतो. आर्थिक विषमतेमध्ये संधीची, अपेक्षांची व उत्पादनाची असमानता यांचाही समावेश होतो. भारतामध्ये सुरूवातीपासूनच आर्थिक विषमता दिसून येते. ही विषमता गरीब-श्रीमंतामध्ये, राज्या-राज्यामध्ये, ग्रामीण-शहरी, ग्रामीण-ग्रामीण, शहरी-शहरी भागामध्येही दिसून येते. भारतामध्ये २०% लोकांच्या हातात ४६.१% संपत्ती केंद्रीत झालेली आहे तर खालच्या स्तरातील २०% लोकांच्या हातात फक्त ८.१% संपत्ती एकवटलेली आहे. अशीच विषमता राज्या-राज्यामध्येही आढळून येते. एनएसएसच्या ५५ व्या अहवालानुसार पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र ही राज्ये अधिक श्रीमंत आहेत तर बिहार व ओरिसा ही राज्ये सर्वात गरीब आहेत. याच अहवालानुसार ग्रामीण क्षेत्राच्या तुलनेने शहरी भागात आर्थिक विषमतता सातत्याने वाढत आहे.

**भारतातील आर्थिक विषमतेची कारणे :**

१) **संपत्तीचे असमान वितरण** : भारतामध्ये संपत्तीचे वितरण असमान झालेले आहे. देशातील २०% श्रीमंताकडे ४६.१% संपत्ती तर खालच्या स्तरातील २०% लोकांच्याकडे ८.१ संपत्ती आहे. त्यामुळे आर्थिक विषमता वाढते आहे.

२) **वेतनातील तफावत** : भारतामध्ये वेतनात मोठ्या प्रमाणात तफावत आढळते. देशात मोठ्या संख्येने अप्रशिक्षित कामगारवर्ग असल्याने त्यांना कमी वेतन दिले जाते तर कुशल, प्रशिक्षित अशा कमी संख्येने असणाऱ्या कामगारांना उच्च वेतन दिले जाते. वेतनातील फरकामुळे विषमता वाढते.

**३) दोषयुक्त करव्यवस्था :**

भारतातील करव्यवस्था दोषयुक्त आढळते. एकूण करामध्ये अप्रत्यक्ष करांचे जास्त प्रमाण आहे. त्याचा भार गरीब लोकांच्यावर अधिक पडतो. कर उत्पन्नाचा गरीबांसाठी योग्य वापर केला जात नाही. मोठ्या प्रमाणात करचुकवेगिरी/करचोरी आढळून येते. परिणामतः श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होतात.

**४) शिक्षणाची संधी :**

शिक्षित, उच्चशिक्षित, प्रशिक्षित कामगारांना चांगले वेतन मिळते. भारतात गरीबांच्या मुलांना दारिद्र्यामुळे शिक्षण व उच्चशिक्षणाची संधी मिळत नाहीत. त्यांना लहान वयातच शिक्षण सोडावे लागते. भारतात उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण केवळ १० ते ११% आहे. परिणामतः गरीबांना उच्चवेतनाचा रोजगार मिळत नाही त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते.

**५) आर्थिक उदारीकरण :**

भारतात आर्थिक सुधारणा नंतर गरीब व श्रीमंतामधील विषमतेची दर रूंदावतच गेली आहे. ग्रामीण क्षेत्रापेक्षा शहरी भागामध्ये आर्थिक विषमता सातत्याने वाढत आहे. उदारीकरणामुळे कामगार संघटनांचे अस्तित्व कमी कमी होत आहे.

**६) जागतिकीकरण :**

जागतिकीकरणामुळे भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी प्रवेश केला आहे. या अकुशल कामगार, स्त्रिया व लहान मुलांना अल्प वेतन देतात. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत आहे.

**७) खाजगीकरण :**

१९९१ नंतर भारतात मोठ्या प्रमाणात खाजगीकरणाला महत्व देण्यात आले आहे. खाजगीकरण आर्थिक विषमतेला जन्म देते. भारतात उद्योग, सेवा सार्वजनिक उपक्रम यांचे खाजगीकरण झाल्याने अधिक विषमता वाढत आहे.

**८) भाववाढ :**

काही ऑस्ट्रेलियन अर्थशास्त्रज्ञांच्या मते भाववाढीमुळे देखील आर्थिक विषमता वाढत जाते. भाववाढीमुळे गरीबांची खरेदीशक्ती कमी होते. भारतात स्वातंत्र्यानंतर सातत्याने भाववाढ होत आहे.

**९) पसंती घटकांचा प्रभाव :**

लोकांच्या आवडी - निवडी, पसंती, प्रदर्शन प्रभाव, कामगारांचा आराम हे घटकदेखील आर्थिक विषमतेवर प्रभाव टाकतात. बरेच कामगार आरामाला पसंती देणारे असतात. शिवाय गरीबांची सीमांत उपभोग प्रवृत्ती जास्त असते यांचा बचत व गुंतवणूकीवर भर नसतो. परिणामतः आर्थिक विषमता वाढत जाते.

**१०) शेतजमिनीचे विषम वाटप :**

भारतात १०% कुटुंबांकडे एकूण शेतजमिनीच्या सुमारे ५६ जमीनीचे मालकी हक्क आहेत. तर ७०% कुटुंबाकडे १४ % जमीनीचा मालकी हक्क आहे. ग्रामीण भागात आर्थिक विषमता असण्याचे प्रमुख कारण म्हणजे शेतजमिनीच्या मालकी हक्कांची अत्यंत विषम वाटणी होय.

**११) वारसा हक्कासंबंधीचे कायदे :** वारसाहक्क कायद्यानुसार वडिलांची संपत्ती मुलांकडे येते. त्यामुळे श्रीमंतांची मुले श्रीमंतच राहतात व शेतमजूरांची, गरीबांची, हमालांची मुले गरीबच राहतात. थोडक्यात वारसाहक्क कायद्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

**१२) वाढती बेकारी :**

मागील ५ दशकात आर्थिक विकासाच्या असमाधानकारक गतीमुळे वाढत्या लोकसंख्येमुळे व वाढत्या श्रमिकांच्या संख्येमुळे देशातील बेकारांच्या संख्येत सतत वाढ होत असल्याने आर्थिक विषमता वाढत असल्याचे दिसून येते.

**आर्थिक विषमता कमी करण्याचे उपाय :**

**१) शेतजमिनविषयक सुधारणा कायदे :**

ग्रामीण भागात आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण म्हणजे शेतजमिनीची मालकी होय. स्वातंत्र्योत्तर काळात जमिनदारी पद्धतीचे व मध्यस्थांच्या व दूरस्थ शेतमालकीच्या पद्धतीचे उच्चाटन करण्यासंबंधी कायदे करण्यात आले. प्रत्येकाच्या मालकीची किती शेतजमीन याबाबत कमाल जमीन धारणा कायदे करण्यात आले.

**२) रोजगार व मजुरीविषयक धोरण :**

चौथ्या योजनेनंतर रोजगारासंबंधीच्या योजना आखण्यात येऊ लागल्या व त्यांची अंमलबजावणी केली जावू लागली. ग्रामीण रोजगाराची धडक योजना, कोरडवाहू जमिनीसाठी क्षेत्रीय योजना, इंजिनियर व सुशिक्षितांसाठी स्वयंरोजगार योजना, कामासाठी अन्नधान्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, जवाहर रोजगार योजना इ. रोजगार विषयक कार्यक्रम सुरू करण्यात आले.

**३) किमान गरजापूर्ती कार्यक्रम :**

५ व्या पंचवार्षिक योजनेत तळागाळतील लोकांसाठी किमान गरजापूर्तीचा कार्यक्रम कार्यवाहीत आणला गेला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्य व इतर काही आवश्यक वस्तू तळागाळातील गटांना कमी किंमतींना देण्याचा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

**४) करआकारणी :**

स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील करपद्धती प्रगतशील आहे त्यामुळे उत्पन्नाच्या संपत्तीच्या केंद्रीकरणावर मर्यादा पडतात. अशा रितीने भारतातील प्रत्यक्ष करआकारणीमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

**५) ग्रामोद्योगांचा विकास :**

ग्रामोद्योगांमुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतात व लोकांची क्रयशक्ती वाढते. ग्रामोद्योगामुळे उत्पन्नाचे अधिक विस्तृत प्रसारण तसेच अधिक समान वाटप घडून येत असल्यामुळे हे उद्योग आर्थिक विषमता कमी करण्यासाठी मदत करतात. या उद्योगांच्या विकासाकरीता योजनाकाळात सर्व स्तरावरून प्रयत्न करण्यात आले आहेत.

**६) शिक्षणाचा प्रसार :**

रोजगार शोधणाऱ्या व्यक्तींना आवश्यक ते शिक्षण व प्रशिक्षण देणे तसेच त्यांच्यामध्ये आवश्यक ती कौशल्ये निर्माण करणे हेही तेवढेच महत्वाचे आहे. भारतात शास्त्रीय व तांत्रिक शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या सोयी मोठ्या प्रमाणात निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे लोकांना चांगला रोजगार मिळाला व आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली.

**७) जीवनमान सुधारण्यासाठी विशेष कार्यक्रम :**

गरीब भूमीहीन शेतमजूर, छोटे शेतकरी, ग्रामीण कारागीर, हरिजन, गिरीजन, भटक्या जमाती यांचे दारिद्र्य कमी करण्यासाठी ६ व्या पंचवार्षिक योजनेत 'समन्वित ग्रामीण विकास योजना' व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना कार्यवाहीत आणली. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**८) कामगार कल्याण योजना :**

केंद्र, राज्य सरकार व कारखानदार यांनी कामगारांना त्यांच्या नेहमीच्या मजुरीशिवाय कामगार कल्याणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या जातात. या सोयीमुळे कामगारांच्या जीवनमानात सुधारणा होते व काही प्रमाणात आर्थिक विषमता कमी होते.

**९) कामगारांना बोनस :**

कामगारांना बोनस दिला जातो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होते तर त्या प्रमाणात कारखानदारांच्या निव्वळ नफ्यामध्ये घट होते. कामगारांना बोनस देण्याची कायदेशीर व्यवस्था असल्यामुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते. थोडक्यात, आर्थिक विषमता कमी करण्याकरिता सरकारी पातळीवरून वरीलप्रमाणे उपाय योजना केल्या आहेत. परंतु ही धोरणे व उपाय आर्थिक विषमता कमी करण्यासाठी फारसे परिणामकारक ठरलेले नाहीत.

**३.२.२ भारतातील सामाजिक विषमतेची समस्या :**

धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय समाजाची रचना चातुर्वर्ण्यावर आधारित आहे. जातियता व अस्पृश्यता हे चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचे अपत्य आहे. ही बाब जगमान्य झाली आहे. भारतात समाजाचे विभाजन उच्चजातीय व कनिष्ठ जातीमध्ये झाले आहे. त्यामुळे समाजामध्ये सामाजिक विषमता वाढत आहे. त्यातूनच आर्थिक, राजकीय विषमता वाढत आहे.

**सामाजिक विषमतेचा अर्थ :**

१) ''समाजातील एक वर्ग उच्चस्तरीय असतो तर दुसरा वर्ग कनिष्ठस्तरीय असतो याला सामाजिक विषमता असे म्हणतात.''

२) ''समाजामध्ये एक वर्ग प्रतिष्ठेची कामे करून मानसन्मान मिळवितो तर दुसरा वर्ग कनिष्ठ कामे करून अनादरयुक्त जीवन जगत असतो. यालाच सामाजिक विषमता असे म्हणतात.''

सामाजिक विषमता ही सामाजिक संबंधाच्या प्रक्रियेशी संबंधीत आहे. सामाजिक विषमता ही जागतिक

घटना आहे व ती आर्थिक विषमतेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. सामाजिक विषमता ही जातीय विषमता, लिंग विषमता व सांपत्तीक विषमता व वर्ण विषमता यांनी युक्त असते. सामाजिक विषमताही नैतिकता आणि धर्म समूह यांच्यामध्ये धर्म, जात, लिंग, संपत्ती, वर्ण यावरून होणारे मतभेद म्हणजेच सामाजिक विषमता होय.

**सामाजिक विषमतेचे प्रकार/कारणे : सामाजिक विषमतेचे पुढील प्रकार पडतात.**

**१) लिंग विषमता :**

भारतामध्ये सामाजिक विषमतेच्या प्रकारामध्ये लिंग विषमता हा प्रकर्षाने जाणवणारा एक प्रकार आहे. पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला जातो. अनेक ठिकाणी स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, रोजगार, शिक्षण, वैचारिक स्वातंत्र्य यांचा अधिकार नाकारला जातो. रोजगारामध्ये कमी वेतन दिले जाते. भारतीय समाजामध्ये स्त्रिया अतिशय नकारात्मक पद्धतीने जीवन जगतात. कुटुंबामध्ये स्त्रियांना फारसे स्थान दिले जात नाही. पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांना अनेक समस्या व अडचणींना तोंड द्यावे लागते.

**२) वर्ण विषमता :**

समाजामध्ये त्वचेचा रंग, इतर शारीरीक विशेषत: राहण्याची ठिकाणे किंवा संस्कृती यावरून नैतिक मुल्यामध्ये भेदभाव केला जातो. तेंव्हा जातीय व सामाजिक विषमता जन्माला येते. उदा. काळ्या व गोऱ्या लोकांमध्ये वर्णावरून भेदभाव केला जातो. वर्ण विषमतेमध्ये कृष्णवर्णीय लोकांना रोजगाराच्या संधी, अधिकाराच्या जागा, शिक्षण इ. सारख्या संधी नाकारल्या जातात. कामाच्या ठिकाणी, सामाजिक ठिकाणी, प्रवासात भेदभाव केला जातो. याचा या लोकांच्या संपूर्ण सामाजिक व आर्थिक जीवनावर प्रतिकूल परिणाम होतात.

**३) जातीय विषमता :**

जाती व्यवस्था व जातीय विषमता भारतात अनेक वर्षापासून आढळते. लोकांच्या जातीवर त्यांचा व्यवसाय अवलंबून असे. भारतात जातीवरून दोन गटात विभाजन झालेले आहे.

**अ) उच्च जाती –** यामध्ये ब्राम्हण व काही स्पृश्य हिंदूचा समावेश होतो.

**ब) कनिष्ठ जाती –** यामध्ये २३९९ अनुसुचित जाती व जमाती व मागासवर्गीय जातीचाही समावेश होतो. कनिष्ठ जाती या अस्पृश्य मानल्या जात. आता ते प्रमाण कमी होत आहे. समाजातील साफसफाई, अप्रतिष्ठेची, अधिक कष्टाची, किळसवाणी, कमी मोबदला देणारी कामे त्यांना करावी लागत. तर प्रतिष्ठेची, मानापानाची कमी कष्टाची अधिक मोबदला देणारी कामे उच्च जातीच्या लोकांच्या हाती असत. त्यामुळे सामाजिक विषमता वाढत गेली.

**४) वर्ग विषमता :**

समाजामध्ये असणाऱ्या वर्गव्यवस्थेमुळे सामाजिक विषमता निर्माण होते. कार्ल मार्क्स यांनी समाजाचे कामगार वर्ग व भांडवलदार वर्ग असे दोन वर्ग पाडले होते. कामगार वर्गाच्या तुलनेत भांडवलदारांना नफा/संपत्ती अधिक मिळते ते अधिक श्रीमंत होतात. अधिक नफा मिळविण्यासाठी कामगार वर्गाचे शोषण केले जाते. यातून सामाजिक असंतोष व विषमता जन्माला येते. वरील विविध कारणांनी भारतामध्ये सामाजिक विषमता वाढत आहे.

**सामाजिक विषमतेचे परिणाम : सामाजिक विषमतेचे समाजावर पुढीलप्रमाणे परिणाम दिसून येतात.**

**१) आर्थिक विषमता वाढते :**

सामाजिक विषमतेमुळे लोकांना कमी वेतन दिले जाते. रोजगाराच्या, व्यवसायाच्या संधी मिळत नाहीत. यामुळे समाजामध्ये आर्थिक विषमता वाढीस लागते.

**२) दारिद्र्यामध्ये वाढ :**

सामाजिक विषमतेमुळे दारिद्र्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. समाजातील खालच्या स्तरातील लोकांना कमी वेतन, नाकारलेल्या विविध संधी यामुळे त्यांच्या दारिद्र्यामध्ये वाढ होत जाते.

**३) सामाजिक असंतोष वाढतो :**

सामाजिक विषमतेमध्ये उच्चवर्णीयांकडून कनिष्ठ वर्गाचे शोषण केले जाते. त्यामुळे उच्चवर्णीय व कनिष्ठ वर्गामध्ये असंतोष निर्माण होऊन त्याचे रूपांतर मारामाऱ्या, दंगली, जाळपोळ, बहिष्कार, भांडणतंटे, यादवी यामध्ये होते.

**४) गुन्हेगारीत वाढ :**

सामाजिक विषमतेमुळे समाजातील कनिष्ठ वर्ग उपेक्षित राहतो. त्यांना नोकऱ्या, रोजगार व व्यवसायाच्या संधी मिळत नाहीत. त्यांना उत्पन्नाचे मार्गच उपलब्ध होत नसल्याने चोऱ्या, लुटमार, खून, दरोडे, बलात्कार यासारख्या गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये वाढ होते.

**५) सामाजिक कल्याणामध्ये घट :**

सामाजिक विषमतेमुळे अर्थव्यवस्थेतील संसाधनाचा योग्य वापर होत नाही त्याचे कार्यक्षम वाटप होत नाही परिणामत: सामाजिक कल्याणात घट होते.

**६) आर्थिक विकासामध्ये घट :**

सामाजिक विषमतेमुळे देशामध्ये वारंवार दंगली, बंद, मारामाऱ्या, बॉंबस्फोट घडून येतात. त्यामुळे लोकांच्या कार्यक्षमतेचा योग्य वापर होत नाही व याचा देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम घडून येतो.

**७) सामाजिक संबंधात बिघाड :**

सामाजिक विषमतेमुळे सामाजिक संबंध सलोख्याचे न राहता ते पूर्णपणे बिघडले जातात. लोकांचा एकमेकांवर विश्वास कमी होत जातो. समाजात व लोकांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण होते व सामाजिक एकात्मता विस्कळीत होऊन सामाजिक संबंधात बिघाड होतो.

**सामाजिक विषमता कमी करण्यासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना :**

**१) शिक्षण सुविधा :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार मागासवर्गीय जातीमधील मुलांचे शिक्षण सोडण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक उपाय केले आहेत. अनेक राज्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निशुल्क पाठ्यपुस्तके, युनिफॉर्म, स्टेशनरी, स्कूल बॅग, स्कॉलरशिप, आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले आहे. शिक्षण शुल्क माफ केले आहे.

किंवा त्यामध्ये काही प्रमाणात सवलत दिली आहे. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम अनुसुचित जातींच्या मुलांसाठी शैक्षणिक विकास कार्यक्रम आहे. मागासवर्गिय मुला-मुलींसाठी वस्तीगृहाच्या व भोजनाच्या मोफत सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

**२) स्वास्थ्य व परिवार कल्याण कार्यक्रम :**

भारत सरकारने मागासवर्गियांसाठी राष्ट्रीय स्वास्थ्य धोरण १९८३ मध्ये सुरू केले. यामध्ये मागासवर्गिय वसाहतीमध्ये किटकनाशकाची फवारणी, मलेरियाविरोधी औषधे पुरविली जातात. तसेच किमान गरजा कार्यक्रमाअंतर्गत जनजातीय क्षेत्रामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे व समुदाय स्वास्थ्य केंद्रे स्थापन केली आहेत.

**३) आर्थिक विकास कार्यक्रम :**

दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांच्यामध्ये आर्थिक विकास व्हावा यासाठी लागणारा निधी उलब्ध व्हावा यासाठी राष्ट्रीय अनुसुचित जाती व जनजाती वित्त व विकास निगमची स्थापना केली आहे. १९९७ मध्ये सफाई कामगारासाठी आर्थिक विकास व स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास निगमची स्थापना केली आहे.

**४) विशेष प्रशिक्षण कार्यक्रम :**

श्रम व रोजगार मंत्रालयाद्वारे मागासवर्गियांच्या कामाच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम लागू केले आहेत. संपूर्ण देशामध्ये २२ कोचिंग कम गाईडन्स केंदे स्थापन केली आहेत.

**५) महिला विकास कार्यक्रम :**

भारत सरकारने  महिलांच्यासाठी १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोग स्थापन केला आहे. या शिवाय महिला स्वयंसिद्धता योजना, कस्तुरबा गांधी शिक्षा योजना (१९९७), बालिका समृद्धी योजना (१९९७) अशा अनेक योजना कार्यक्रम सुरू आहेत. त्यामुळे महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होईल.

**६) कल्याण कार्यक्रम :**

गरीब लोकांचे आर्थिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी किमान वेतन कायदा, अन्नपूर्णा योजना, अंत्योदय अन्न योजना, मध्यान्हीचा भोजन कार्यक्रम, सर्वंकष बालविकास कार्यक्रम राबविले जात आहेत. तसेच राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात सरपंच, पोलीस पाटील, असे पद मागासवर्गियांसाठी राखीव ठेवून सामाजिक मान -सन्मान वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**३.५ स्वयं अध्ययन प्रश्न :**

**अ) दिलेल्या पर्यायापैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतात सामाजिक विषमतेत .... होत आहे.

अ) घट  ब) वाढ  क) स्थिर  ड) यापैकी नाही

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ..... मध्ये सुरू करण्यात आले.

अ) १९८६  ब) १९९१  क) १९५१  ड) २०१४

३) एकाच समाजातील लोकांमध्ये धर्म, जात, लिंग, संपत्ती, वर्ण यावरून होणारे मतभेद म्हणजेच... विषमता होय.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकीय ड) यापैकी नाही

४) भारताच्या सामाजिक विषमतेच्या प्रसारामध्ये .......हा प्रकर्षाने जाणवणारा प्रकार आहे.

अ) वर्ण विषमता ब) लिंग विषमता क) जाती विषमता ड) यापैकी नाही

५) सामाजिक विषमतेमुळे .............................................. मध्ये वाढ होते.

अ) दारिद्र्य ब) गुन्हेगारी क) दारिद्र्य व गुन्हेगारी ड) वरील सर्व

६) उत्पन्न व संपत्तीचे असमान होणारे वितरण म्हणजे .......................... विषमता होय.

अ) सामाजिक ब) आर्थिक क) प्रादेशिक ड) यापैकी नाही

७) ............................................ कायद्यामुळे आर्थिक विषमता वाढते.

अ) वारसा हक्क ब) किमान वेतन कायदा

क) बोनस कायदा ड) यापैकी नाही

८) ......................... योजनेत किमान गरजा पूर्तीचा कार्यक्रम कार्यवाहीत आणला गेला.

अ) पहिल्या ब) सहाव्या क) पाचव्या ड) दहाव्या

९) .............................. कर आकारणीमुळे आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

अ) अप्रत्यक्ष ब) प्रत्यक्ष क) प्रतिगामी ड) वरील सर्व

### ३.२.३ भारतातील प्रादेशिक असमतोलाची समस्या :

**प्रास्ताविक :**

कोणत्याही देशाचा समान विकास होण्यासाठी त्या देशातील सर्व प्रदेशांचा समान विकास होणे आवश्यक असते. भारतासारख्या संघीय राज्य व्यवस्थेमध्ये सर्व राज्यांचा समतोल विकास होणे आवश्यक आहे. परंतु तो होऊ शकला नाही. भारतात आर्थिक विकासाबरोबर प्रादेशिक असमतोल वाढला आहे. गरीब व श्रीमंतामध्ये वाढत जाणारी दरी, विविध राज्यातील भिन्न आर्थिक विकास, भिन्न दरडोई उत्पन्न, उद्योगाचा व शेतीचा भिन्न विकास दर ही सर्व प्रादेशिक असमतोलाची लक्षणे आहेत. प्रादेशिक असमतोलामध्ये भारतातील प्रगत व मागास राज्यांचा समावेश केला जातो. प्रगत राज्यात पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम बंगाल, तामिळनाडू व आंध्रप्रदेश यांचा समावेश होतो. तर मागास राज्यात मध्यप्रदेश, राजस्थान, ओरिसा, बिहार, झारखंड, छत्तीसगड या राज्यांचा समावेश होतो.

**※ प्रादेशिक असमतोलाची व्याख्या :**

१) '' देशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्व प्रदेशांचा समप्रमाणात विकास न होणे म्हणजे प्रादेशिक असमतोल होय.''

२) ''देशामध्ये एका क्षेत्राचा अन्य क्षेत्राच्या तुलनेने कमी/असमान विकास झालेला असतो त्याला प्रादेशिक असमतोल असे म्हणतात.''

३) '' राज्या-राज्यामध्ये शेती, उद्योग व सेवा क्षेत्र यांच्यातील असमान विकासाला प्रादेशिक असमतोल असे

म्हणतात.'' देशा प्रमाणेच एखाद्या राज्याच्या एका प्रदेशामध्ये विकास दिसून येतो तर त्याच राज्याचे दुसरे क्षेत्र अविकसीत असते. यालाच प्रादेशिक विषमता म्हणतात. उदा. महाराष्ट्रात विभागाचा विचार केला तर कोकण, मराठवाडा, विदर्भ विभागाच्या तुलनेत पश्चिम महाराष्ट्राचा विकास अधिक झालेला आहे.

**✲ भारतातील प्रादेशिक असमतोलाची कारणे :**

**१) दारिद्र्य :**

दारिद्र्याचा विचार करता भारतात काही राज्ये व प्रदेश श्रीमंत/ प्रगत आहेत तर काही मागासलेले आहेत. उदा. राज्याच्या लोकसंख्येच्या आधारे सर्वात गरीब ओरिसा राज्य (४७.१५%) आहे. यानंतर बिहार (४२.६०%), मध्यप्रदेश (३७.४३%), सिक्कीम (३६.५५%) याचा क्रम लागतो. तर संपन्नतेच्या दृष्टीकोनातून जम्मू काश्मीर, गोवा, पंजाब राज्ये संपन्न आहेत. त्यामुळे देशात प्रादेशिक विषमता आढळते.

**२) औद्योगिक विकासातील असमतोल :**

भारतात औद्योगिक दृष्टीकोनातून प्रादेशिक असमतोल आढळतो. महाराष्ट्रातून औद्योगिक विकास सर्वात जास्त झालेला आहे. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनाच्या २५% उत्पादन महाराष्ट्रात होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प. बंगाल, तामिळनाडू, गुजरात, उत्तरप्रदेश, उत्तराचल, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, कर्नाटक व आंध्रप्रदेश मिळून एकूण उत्पादनाच्या ८३.५% औद्योगिक उत्पादन करतात व राहिलेले राज्य व केंद्रशासीत प्रदेश केवळ १६.५ % उत्पादन करतात.

**३) दरडोई उत्पन्नातील असमतोल :**

भारतात सर्व राज्यामध्ये दरडोई उत्पन्नामध्ये समानता आढळत नाही. दरडोई उच्च उत्पन्न असणारी राज्ये हरियाणा, महाराष्ट्र, पंजाब, गुजरात व आंधप्रदेश आहेत. तर कमी उत्पन्न असणाऱ्या राज्यामध्ये बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, आसामचा समावेश होतो. थोडक्यात दरडोई उत्पन्नामध्येही प्रादेशिक विषमता आढळून येते.

**४) शहरी लोकसंख्या :**

भारताची २७.८% लोकसंख्या शहरामध्ये राहते. परंतु यामध्येही राज्याराज्यामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत भिन्नता आढळून येते. महाराष्ट्रात ४२.४% तामिळनाडू ४४ % गुजरात ३७.४% कर्नाटक ३४%,पश्चिम बंगाल २८% आंध्रप्रदेश २७.३%,मध्यप्रदेश २६.५%, ओरिसा १५%, हिमाचलप्रदेश ९.८% व बिहारमध्ये १०.५% शहरी लोकसंख्या राहते. थोडक्यात शहरी लोकसंख्येच्या दृष्टीनेही भारतात असमतोल आढळतो.

**५) कृषी विकासातील असमतोल :**

भारतात शेती क्षेत्रामध्येही विकासाच्या दृष्टीने असमतोल आढळतो. पंजाब व हरियाणा ही दोन्ही राज्ये मिळून गव्हाचे ३६% उत्पादन करतात. कृषी विकासाच्या दृष्टीने पंजाब, हरियाणा ही विकसित राज्ये आहे तर इतर राज्यांच्या तुलनेने कमी विकसीत आढळते.

**६) दरडोई विजेचा उपभोग :**

पंजाब, हरियाणा, गुजरात व महाराष्ट्रामध्ये विजेचा उपभोग उच्चस्तरावर आहे तर आसाम, मध्यप्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेशामध्ये विज उपभोग फारच कमी आहे. विज उपभोगाबाबतही प्रादेशिक असमतोल दिसून येतो.

### ७) सिंचन विकास :

सिंचन सुविधांच्या दृष्टीकोनातून पंजाब, हरियाणा, तामिळनाडू व उत्तरप्रदेश या राज्यामध्ये चांगली परिस्थिती आहे. तर गुजरात, कर्नाटक, ओरिसा, राजस्थान, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र व छत्तीसगड इ. राज्यामध्ये वरील राज्यांच्या तुलनेने सिंचनव्यवस्थेचा कमी विकास झाला आहे. त्यामुळे या राज्यामध्ये शेती उत्पादन कमी आहे.

### ८) वाहतूक सुविधा :

वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून केरळ, तामिळनाडू, पंजाब, प. बंगाल इ. राज्यामध्ये वाहतूक रेल्वे सुविधा चांगल्या आहेत. परंतु आसाम, जम्मू काश्मीर, ओरिसा, मध्यप्रदेश, कर्नाटक इ. राज्यामध्ये वाहतूक सुविधा विकसित नाहीत.

### ९) पायाभूत सुविधा :

भारतात पायाभूत सुविधामध्ये प्रादेशिक असमतोल आढळतो. पंजाब, तामिळनाडू, हरियाणा, प. बंगालमध्ये पायाभूत सुविधा विकसित आहेत. तर इतर राज्यामध्ये त्या कमी विकसित आहेत. भारतात प्रादेशिक असमतोल आढळतो. त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे निर्माण होतात. प्रादेशिक असमतोलासाठी जबाबदार असणाऱ्या घटकामध्ये प्रामुख्याने औद्योगिक रचना, श्रम, तंत्रज्ञान, दळणवळण सुविधा, वित्तीय भांडवल इ. घटकांचा समावेश होतो. प्रादेशिक असमतोलाची निर्मिती ब्रिटिश काळात झाली आहे. ब्रिटिशकाळात जमीनदार वर्गाचे वर्चस्व होते. त्यामुळे गरीब व श्रीमंत दरी तेव्हापासून आहे. तसेच या काळात जलसिंचनाच्या सुविधा काही भागात सुरू झाल्याने काही ठराविक भागच विकसित झाला. स्वातंत्र्यानंतरही देशात समतोल विकास न होता असमतोल वाढतच गेला आहे. १९६० च्या दशकात ठराविक राज्यात शेती क्षेत्रासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अधिक वापर केल्यामुळे असमतोल अधिक वाढला. हरितक्रांतीमुळे फक्त पंजाब, हरियाणा या राज्यांचाच प्रचंड विकास झाला. नियोजन काळात प्रगत व विकसित राज्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करण्यात आली. मात्र त्याप्रमाणात मागास राज्यांना मदत केली नाही इत्यादींमुळे प्रादेशिक असमतोल वाढत आहे.

### * प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी शासकीय प्रयत्न :

### १) पहिले औद्योगिक धोरण (१९४८) :

भारत सरकारने प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी पहिल्या औद्योगिक धोरणात औद्योगिक परवाना पद्धतीचा स्वीकार, अविकसित भागात सार्वजनिक उद्योग सुरू करणे, प्रादेशिक नियोजनावर भर, लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन व मागास भागात औद्योगिकरणासाठी प्राधान्य इत्यादींचा स्वीकार करण्यात आला.

### २) वांच्छू समिती : (१९६८)

मागास प्रदेशाकडे सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक वळविण्याचा प्रयत्न करावा, राज्यांनी औद्योगिक विकासाचे समतोल धोरण स्विकारणे, ग्रामोद्योग व शेतीवर भर देण्यात यावा, दळणवळणाच्या समतोल विकासावर भर देण्यात यावा. कृषी माल विक्री करिता सहाय्यभूत योजना सुरू करण्यात वांच्छु समितीची स्थापना राष्ट्रीय विकास परिषदेने १९६८ मध्ये केली.

**३) ६ व्या पंचवार्षिक योजनेतील उपाय :**

सहाव्या योजनेत प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी मागास भागाच्या विकासासाठी राज्य व केंद्राकडून उपाययोजनांचा स्वीकार व मागास प्रदेशांच्या विकासासाठी खास पदाची निर्मिती केली पाहिजे या मार्गांचा स्वीकार केला.

**४) विशेष योजना :**

सरकारने डोंगरी भाग, जनजातीयक्षेत्र, दुष्काळग्रस्त भाग यांच्या विकासासाठी विशेष योजना तयार केल्या आहेत.

**५) केंद्रीय गुंतवणूक सहाय्य योजना (१९७०) :**

या योजनेनुसार स्थिर भांडवलासाठी १०% सवलत दिली जाईल. पण त्यासाठी भांडवलाची अधिकतम मर्यादा ५ रूपये करण्यात आली.

**६) वाहतूक साहाय्य योजना (१९७१) :**

या योजनेनुसार जे उद्योग डोंगरी भागात दूरवरच्या प्रदेशात आहेत. त्यांना रेल्वे वाहतूकीत कच्चा मालाच्या ५०% सवलत दिली जाते. तसेच १९७१ नंतर मागास भागात उद्योग स्थापन करतील त्या उद्योगांना उत्पन्न करात २०% सवलत.

**७) राष्ट्रीय समतोल विकास योजना :**

प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी केंद्रसरकारने दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये राष्ट्रीय समतोल विकास योजना सुरू केली . या योजनेचा प्रमुख उद्देश मागास भागामध्ये सकेंद्रीत विकासात्मक कार्यक्रम चालविणे ज्यामुळे मागास सुधारणा होऊन असमतोल कमी होईल.

**८) आधारभूत संरचना निर्माण करणे :**

मागास प्रदेशामध्ये आधारभूत संरचना विकसित करण्यासाठी सरकार प्रयत्नशिल आहे. मागास भागामध्ये रस्ते बांधणी, रेल्वे वाहतूक विकसित करणे, विजेची उपलब्धता,स्वच्छ पाणी व आरोग्याच्या सोई पुरविल्या जातात.

**९) वित्तीय सहाय्य :**

मागास राज्यांना विशेष वित्तीय सहायत्ता दिली जाते. त्यांना शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे,उद्योग,व्यवसाय सुरू करण्यासाठी वित्तीय सहाय्य दिले जाते.

## ३.२.४ राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक : आंतरराष्ट्रीय तुलना

**(International Comparision : National Income, Per capita Income, Human Development Index)**

**प्रास्ताविक :**

देशाच्या अर्थव्यवस्थाच्या अभ्यासामध्ये राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक यांचे

विवेचन महत्वपूर्ण मानले जाते. कारण या संकल्पनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची वास्तव स्थिती लक्षात येते. देशातील राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्नातील वाढीवर मानवी विकास अवलंबून असतो. तसेच देशाच्या आर्थिक विकासाची गती राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीवर अवलंबून असते. राष्ट्रीय उत्पन्नावरून नागरिकांचे दरडोई उत्पन्न समजू शकते व त्यांच्या राहणीमानाची पातळी समजते. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून देशाच्या विविध क्षेत्रात झालेली प्रगती लक्षात येते. तसेच देशातील लोकांचे आर्थिक कल्याण व आर्थिक विषमता लक्षात येते. त्यामुळे देशाच्या अभ्यासामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना महत्त्वाची आहे.

**राष्ट्रीय उत्पन्नाचा अर्थ :**

'' राष्ट्रीय उत्पन्न ही महत्त्वपूर्ण संकल्पना असून राष्ट्रीय उत्पन्नच्या विविध व्याख्यावरून राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट होईल.''

**१) डॉ. मार्शलची व्याख्या :**

''प्रतिवर्षी एखाद्या राष्ट्रातील श्रमिक आणि भांडवल हे नैसर्गिक साधनसामुग्रीच्या साहाय्याने मूर्त आणि अमूर्त अशा वस्तू व सेवांचे निव्वळ उत्पादन करतात ते त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**२) पिगूची व्याख्या :**

''समाजाच्या वस्तूनिष्ठ उत्पन्नाचा जो भाग पैशात मोजता येतो त्याला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. यामध्ये विदेशातून मिळविलेल्या उत्पन्नाचाही समावेश होता.''

**३) फिशरची व्याख्या :**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालावधीत देशाच्या निव्वळ उत्पादनाकडे जो भाग प्रत्यक्षरित्या उपभोगासाठी वापरला जातो असा भाग होय.''

**४) भारतीय राष्ट्रीय उत्पन्न समितीने केलेली व्याख्या :**

''एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवा यांचे दुहेरी मापन होऊ न देता केलेली मोजदाद म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**५) प्रा. कुझनेटस् ची व्याख्या :**

''राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका वर्षाच्या कालखंडात देशाच्या उत्पादन पद्धतीत अंतिम उपभोक्त्याच्या हातात पडणारे किंवा देशाच्या भांडवली वस्तूंच्या साठ्यात शुद्धरूपाने वाढ घडवून आणणारे उत्पादन होय.''

६) ''देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती व श्रम यांच्या प्रयत्नातून उपभोग्य वस्तू, भांडवली वस्तू आणि सेवांची निर्मिती होत असते. या उत्पादनाचे पैशात काढलेले मुल्य म्हणजे त्या देशाचे त्या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्न होय.''

**राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना :**

**१) व्यक्तिगत उत्पन्न (Personal Income) :**

व्यक्तीला एक वर्षाच्या कालावधीत विविध मार्गाने मिळालेले उत्पन्न म्हणजे व्यक्तिगत उत्पन्न होय. प्रा.जे.एम केन्स यांनी व्यक्तिगत उत्पन्नाची संकल्पना सर्वप्रथम मांडली. 'एका वर्षाच्या कालखंडात अर्थव्यवस्थेत

व्यक्ती व संस्थांनी मिळविलेल्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे व्यक्तिगत उत्पन्न होय.' व्यक्तिगत उत्पन्नामध्ये वेतन, नफा, बोनस, लाभांश, व्याज, बेकारी भत्ता, खंड भाडे इत्यादी मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश असतो. व्यक्तिगत उत्पन्नावरून नागरिकांची खरेदीशक्तीचा अंदाज येतो. तसेच देशातील नागरिकांचे कल्याण कितपत साधले जाईल हे समजते..

**२) विनियोग उत्पन्न (Disposable Income) :**

विनियोग उत्पन्नावरून नागरिकांच्या राहणीमानाची व एकूण बचतीची कल्पना कल्पना येते. व्यक्तिगत उत्पन्न ही प्रत्याक्षात प्राप्त झालेल्या उत्पन्नाची बेरीज असते. परंतू ते प्राप्त झालेले सर्वच उत्पन्न खर्च केले जात नाही. त्यामुळे व्यक्तिगत उत्पन्नापैकी जे उत्पन्न प्रत्यक्षात खर्चासाठी वापरले जाते त्यास विनियोग किंवा खर्च योग्य उत्पन्न असेही म्हणतात. सर्वच व्यक्तिगत उत्पन्न खर्चासाठी प्राप्त होत नाही म्हणून खर्चासाठी उपलब्ध असलेले उत्पन्न म्हणजे विनियोग उत्पन्न होय. कारण व्यक्तीला आपले सर्वच उत्पन्न खर्च करता येत नाही एकूण उत्पन्नातील कर. बचत,विमा हप्ते यासाठी रक्कम यातून वापरावी लागते. त्यामुळे विनियोग उत्पन्न व्यक्तिगत उत्पन्न –प्रत्यक्ष कर व इतर वजावटी होत.

**३) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product - GNP) :**

स्थूल राष्ट्रीय उत्पादनाला एकूण राष्ट्रीय उत्पन्न असेही म्हणतात. राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेमधील स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाची ही संकल्पना अतिशय महत्त्वाची मानली जाते. आपल्या देशात उत्पादन केलेल्या वस्तू व सेवा यांच्या मूल्यातून परदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न वजा केले असता एकूण देशांतर्गत उत्पन्न समजते. ''एका वर्षाच्या कालखंडात एखाद्या देशात निर्माण होणाऱ्या सर्व अंतिम वस्तू व सेवा यांच्या बाजार किंमतीनुसार पैशातील मुल्याची बेरीज म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय.'' ''एका वर्षाच्या कालावधीत देशातील लोकांना त्यांच्या देशातील आणि परदेशातील उत्पादन साधनांद्वारे मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाला स्थूल राष्ट्रीय उत्पादन असे म्हणतात.'' थोडक्यात स्थूल राष्ट्रीय उत्पादनात देशातील नागरिकांनी देशात व देशाबाहेर निर्माण होणाऱ्या सर्व वस्तू व सेवांच्या उत्पादनाचा समावेश यामध्ये केला जाते.

**४) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (Net National Income - NNP) :**

स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या संकल्पनेच्या साहाय्याने निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाची संकल्पना स्पष्ट करता येते. ''एका वर्षाच्या कालखंडात देशात निर्माण होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांच्या एकूण मुल्यातून घसारा खर्च वजा करून केला असता मिळणारे उत्पन्न म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय.'' प्रतिवर्षी विविध वस्तू व सेवांचे उत्पादन करीत असताना यंत्रे, इमारती इत्यादी भांडवली वस्तूंची झीज व मोडतोड होत असते. देशाची उत्पादन क्षमता भविष्यात टिकवून ठेवण्यासाठी ही झीज भरून काढली जाते. त्यासाठी घसारा निधीची तरतूद केली जाते. थोडक्यात स्थूल राष्ट्रीय उत्पादन–घसारा निधी निव्वळ राष्ट्रीय उत्पादन.

**५) स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product GDP) :**

नागरिकांनी आपल्या देशांतर्गत उत्पादन केलेल्या वस्तू व सेवा यांच्या मुल्यातून परदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न वजा केले असता एकूण देशांतर्गत उत्पन्न समजते.'' एक वर्षाच्या कालखंडात देशात उत्पादित केलेल्या वस्तू आणि सेवांचे पैशातील एकूण मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय.'' थोडक्यात देशात राहणाऱ्या नागरिकांच्या बाबतीत व भौगोलिक सीमेशी ही संकल्पना संबंधित आहे.

**६) चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (Naional Income at Current Price) :**

एका देशातील एका वर्षातील उत्पादित वस्तू व सेवांच्या पैशातील मुल्यांची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न असते. राष्ट्रीय उत्पन्न हे पैशात मोजले जाते. ''जेव्हा पैशातील मुल्य चालू किवा वर्तमान किंमतीनुसार काढले जाते तेव्हा त्यास चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.'' थोडक्यात चालू उत्पादनास चालू किंमतीने गुणले असता येणाऱ्या अंकास चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात. परंतू वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नात बदल होतो अशा वेळी विविध वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना करणे अवघड जाते. याकरिता देशातील वस्तू व सेवांचे मापन एखाद्या पायाभूत वर्षातील किंमतीनुसार केले जाते. चालू किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न मोजले तर त्याला पैशातील उत्पन्न असे म्हणतात.

**७) स्थिर/ आधार किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न (National Income at Constant Price) :**

वस्तू आणि सेवांच्या किंमतीत बदल झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नातही बदल होतो. किंमत बदलामुळे होणारे परिणाम टाळण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न स्थिर किंमतीनुसार मोजावे लागते.'' सामान्यत: ज्या वर्षी वस्तूच्या किंमती स्थिर असतात अशा पायाभूत वर्षाची निवड केली जाते आणि पायाभूत वर्षातील किंमतीनुसार चालू उत्पादनाचे पैशात मापन केले जाते त्याला स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात.''राष्ट्रीय उत्पन्न पायाभूत वर्षातील स्थिर किंमतीनुसार मोजले असेल तर त्याला वास्तव उत्पन्न असे म्हणतात. यावरून विविध कालावधीतील नागरिकांच्या राहणीमानाची तुलना करता येते.

**तक्ता क्रमांक ३.१**

**जगातील काही निवडक देशांची राष्ट्रीय उत्पन्नाची तुलना**

| अ.क्र. | देश | राष्ट्रीय उत्पन्न (मिलीयन डॉलर्स) |
|---|---|---|
| १. | यू.एस.ए | १७,८१३ |
| २. | चीन | १०२९६ |
| ३. | जपान | ४७९० |
| ४. | जर्मनी | ३९५६ |
| ५. | फ्रान्स | २८९५ |
| ६. | यू.के. | २८८४ |
| ७. | इटली | २१४१ |
| ८. | भारत | २०४१ |
| ९. | रशिया | १७९३ |
| १०. | कॅनडा | १७५९ |
| ११. | मेक्सिको | १२४८ |

Source - World Bank, World Development Indicators -2015

वरील तक्त्यामध्ये जगातील निवडक देशातील राष्ट्रीय उत्पन्न दर्शविले आहे २०१४ मधील विविध देशातील राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला असता भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा यू.एस.ए, चीन, जपान, जर्मनी, यू.के, फ्रान्स, इटली इ. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जास्त आहे. रशिया, कॅनडा, मेस्किको या देशांचे राष्ट्रीय उत्पन्न भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा कमी आहे. जगात सर्वाधिक राष्ट्रीय उत्पन्न २०१४ मध्ये यू.एस.ए. देशाचे १७८१३ मिलियन इतके होते.

## दरडोई उत्पन्न (Per Capita Income) :

**प्रास्ताविक :**

दरडोई उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा मापदंड समजला जातो. देशातील नागरिकांच्या राहणीमानाची पातळी समजण्यासाठी दरडोई उत्पन्नाची संकल्पना महत्वाची मानली जाते. देशातील नागरिकांच्या उत्पन्नाची सरासरी म्हणजे दरडोई उत्पन्न होय. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नास देशातील एकूण लोकसंख्येने भाग दिला असता दरडोई उत्पन्न मिळते. प्रत्यक्ष व्यक्तिगत उत्पन्न हे दरडोई उत्पन्नापेक्षा कमी किवा जास्त असू शकते. दरडोई उत्पन्न हे चालू किंमतीनुसार व पायाभूत (स्थिर) किंमतीनुसारही मोजता येते. दरडोई उत्पन्नावरून आर्थिक वृद्धीची कल्पना येते. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये त्या देशातील लोकांचा हिस्सा किती आहे हे समजण्यासाठी दरडोई उत्पन्न समजून घ्यावे लागते. संबधित देशाची प्रगती किती झाली आहे तसेच देशाची आर्थिक परिस्थिती व उत्पन्न वाटप याची माहिती त्या देशाच्या दरडोई उत्पन्नावरून कळते.

**दरडोई उत्पन्नाचा अर्थ** : दरडोई उत्पन्नाच्या विविध व्याख्यावरून दरडोई उत्पन्नाचा अर्थ लक्षात येईल.

१) '' देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील एकूण लोकसंख्येने भागले असता जे उत्पन्न मिळते त्याला दरडोई उत्पन्न असे म्हणतात.''

२) ''देशातील प्रत्येक व्यक्तीचा राष्ट्रीय उत्पन्नातील सरासरी हिस्सा म्हणजे दरडोई उत्पन्न होय.''

$$\text{दरडोई उत्पन्नाचे सूत्र} \rightarrow \text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{एकूण राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

दरडोई उत्पन्नाच्या आकडेवारीवरून विविध देशातील प्रगतीची अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय तुलना करता येते.

**तक्ता क्रमांक ३.१**

**जगातील काही निवडक देशांची दरडोई उत्पन्नाची तुलना**

| अ.क्र. | देश | दरडोई उत्पन्न (यू.एस.डॉलर्समध्ये) |
|---|---|---|
| १. | यू.एस.ए | ५५२०० |
| २. | कॅनडा | ५१६९० |
| ३. | जर्मनी | ४७६४० |
| ४. | फ्रान्स | ४३०७० |
| ५. | यू.के | ४२६९० |
| ६. | जपान | ४२००० |
| ७. | इटली | ३४२८० |
| ८. | रशिया | १३२१० |
| ९. | मेस्किको | ९८६० |
| १०. | चीन | ७३८० |
| ११. | भारत | १५७० |

Source - World Bank, World Development Indicators -2015

वरील तक्त्यामध्ये जगातील काही निवडक देशांचे यू.एस. डॉलर्समध्ये दरडोई उत्पन्नाची तुलना केली आहे. वरील तक्त्यामध्ये सर्वाधिक दरडोई उत्पन्न यू.एस.ए. मध्ये आढळते. विविध देशांची तुलना करता भारताचे दरडोई उत्पन्न कमी आढळते. एवढेच नव्हे तर अल्पविकसीत अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांच्या तुलनेने सुद्धा भारताचे दरडोई उत्पन्न फारच अल्प आहे. भारतातील राष्ट्रीय दरडोई उत्पन्न कमी असण्याचे कारणे

**भारतात राष्ट्रीय दरडोई उत्पन्न अतिशय अल्प आहे त्याची कारणे पुढीलप्रमाणे –**

**१) नैसर्गिक आपत्ती :**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा मुख्य हिस्सा हा शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा असतो. परंतू भारतीय शेती ही अनियमित पावसावर अवलंबून असल्याने शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची खात्री नसते. दुष्काळ, महापूर, रोगराई, वाईट हवामान, लहरी, मान्सून, टोळधाड इ. नैसर्गिक आपत्तीमुळे राष्ट्रीय उत्पन्न व पर्यायाने दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**२) लोकसंख्येतील वाढ :**

भारताच्या वाट्याला जगाच्या एकूण भूभागापैकी २.४% भूभाग व लोकसंख्या मात्र १७.५% आली आहे. हे प्रमाण अतिशय विषम आहे. भारताची लोकसंख्या अतिशय वेगाने वाढते आहे. लोकसंख्या वेगाने वाढत

असल्याने राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी होऊन दरडोई उत्पन्न कमी राहते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात जरी वाढ होत असली तरी लोकसंख्येतील उच्च वाढीच्या दरामुळे दरडोई उत्पन्नाची वाढ अल्प राहते.

**३) औद्योगिकरणाचा मंद वेग :**

भारतातील राष्ट्रीय उत्पन्नात उद्योगापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा फारच कमी आहे. बिगर शेती व्यवसायाचा विकास जलदगतीने न झाल्याने राष्ट्रीय उत्पन्न पर्यायाने भारताचे दरडोई उत्पन्न अल्प आहे.

**४) भांडवलाची कमतरता :**

भारतात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न कमी असल्याने बचत कमी आहे, बचत कमी असल्याने भांडवल संचय व भांडवल गुंतवणूक कमी त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात कमी वाढ झाल्याने दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**५) शेतीची अल्प उत्पादकता :**

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान असून ती मागासलेली आहे. भारतीय शेतीची उत्पादकता शेतीतील अनेक संकटामुळे दर हेक्टरी व प्रती श्रमिक जगातील इतर देशांच्या तुलनेने फारच अल्प आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील लोकांचे उत्पन्न कमी राहिल्याने दरडोई उत्पन्नही कमी राहते.

**६) शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव :**

भारतात आजही निरक्षर लोकांचे प्रमाण जवळजवळ २६% इतके प्रचंड आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी आहे परंतू त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण नसते. ते आपला व्यवसाय वंशपरंपरेने करतात. कुटिरोद्योगातील ग्रामीण उद्योगातील कारागीर हे परंपरागत पद्धतीने उत्पादन करतात त्यामुळे त्यांची उत्पादकता कमी राहून दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**७) शासनकर्त्यांची चुकीची धोरणे :**

भारतात १९५१ पासून नियोजनाला सुरवात केली. नियोजन काळात भूधारनेवर कमाल मर्यादा, कुळकायदे, मक्तेदारीविरूद्ध कायदे इ. तसेच अलीकडील काळात नोटाबंदी, जीएसटी इत्यादींची अंमलबजावणी चुकीच्या पद्धतीने केल्याने राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न अपेक्षित प्रमाणात वाढले नाही.

**८) दोषपूर्ण शिक्षण पद्धती :**

भारतातील शिक्षण पद्धती ही कारकून निर्माण करणारी आहे. भारतात प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगी नसलेले व कुचकामी असलेले पुस्तकी शिक्षण दिले जाते. अशा शिक्षणामुळे कला, वाणिज्य, शास्त्र, अभियांत्रिकी शाखेतील लाखो पदवीधर बेरोजगार आहेत. उद्योग व्यवसायाला अपेक्षित असलेले शिक्षण, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध शिक्षण पद्धतीतून मिळत नसल्याने बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढून दरडोई उत्पन्न अल्प आहे.

**९) मानवी भांडवलाचा कनिष्ठ दर्जा :**

देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये मानवी भांडवलाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. भारतात लोकसंख्या अधिक आहे मात्र मानवी भांडवलाची गुणवत्ता कमी दर्जाची आहे. धार्मिक व दैववादी प्रवृत्ती, नशिबावर अवलंबून राहण्याची वृत्ती, श्रमाला महत्त्व नसणे, उदासीनता, शिकावू वृत्ती नसणे, राहणीमान कमी दर्जाचे

इत्यादीमुळे मानवी भांडवल कमी दर्जाचे असल्याने उत्पादकता व राष्ट्रीय उत्पन्न कमी मिळते त्यामुळे दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**१०) क्षमतेचा अपुरा वापर :**

भारतात अनेक लोक, उद्योगसंस्था, उद्योग पूर्ण क्षमतेने काम करीत नाहीत. वीज व कच्च्या मालाची टंचाई अशा अनेक कारणामुळे उद्योगात प्रचंड गुंतवणूक केलेली असतानाही या उद्योगांची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्न कमी मिळून दरडोई उत्पन्न अल्प राहते.

**मानवी विकास निर्देशांक**

**प्रास्ताविक :**

आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी मानवी विकास निर्देशांक महत्त्वपूर्ण असतो. अलीकडील काळात आर्थिक वाढीकडून मानवी विकासाकडे अधिक लक्ष वेधले आहे. १९९० पासून युनोनी आपले मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करण्यास सुरवात करून मानवी विकास निर्देशांक विकसीत केला आहे. यू.एन.डी.पी. च्या सन १९९७ मधील अहवालात मानवी विकास संकल्पनेचे विश्लेषण केले आहे. प्रत्येक देशाच्या सर्वागीण विकासामध्ये मानवी साधन संपत्ती अतिशय महत्त्वाची असून देशाचा विकास हा मानवी भांडवला शिवाय होऊ शकत नाही. कारण देशाच्या आर्थिक विकासामध्ये मानवी संसाधनला मौलिक स्थान आहे.मानवी भांडवलाची उत्पादन क्षमता वाढविणे हे विकासाचे उद्दिष्ट असते. त्यासाठी मानवाचे आरोग्य व शिक्षण यावर आवश्यक खर्च करावा लागतो. म्हणून मानवी भांडवलातील गुंतवणूक महत्त्वाची असते. देशातील नागरिकांचे ज्ञान, कौशल्याचा विकास व त्याचा पर्याप्त वापर न करणारा देश विकसीत होऊ शकत नाही.

**अर्थ** :

‘‘ अपेक्षित आयुमर्यादा निर्देशंक, शैक्षणिक प्राप्ती निर्देशांक, राहणीमान निर्देशांक आणि समायोजन वास्तव दरडोई उत्पन्न निर्देशांक यांची साधी सरासरी म्हणजे मानवी विकास निर्देशांक होय.’’

काही देशामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती असूनही मानवी संसाधनाचा पुरेसा विकास न झाल्यामुळे तो देश मागास राहिलेला दिसून येतो. याउलट इस्त्राईल सारख्या देशाने अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यावर मत करून मानवी विकास घडवून आणून आर्थिक प्रगती केली आहे. जपानने देखील मानवी भांडवल निर्मिती करून जागतिक बाजारपेठवर प्रभुत्व मिळविले आहे. त्यामुळे देशाला आर्थिक विकास करावयाचा असेल तर मानवी विकासाकडे पुरेसे लक्ष देणे गरजेचे आहे. मानवी विकास म्हणजे अधिकाधिक उत्पादकता होय. मानवी विकास हा त्या देशातील लोकांचे शिक्षण, आहार आरोग्य, आणि राष्ट्रीयत्वाची भावना इत्यादी घटकावर अवलंबून असतो.

**मानवी विकास निर्देशांकाचे मापन :**

मानवी विकासाचे मापन करणे अतिशय कठीण आहे. मानवी विकास निर्देशांक तयार करणे ही एक संकल्पना आहे. निर्देशांक तयार करून आर्थिक विकासाची व्याप्ती लक्षात घेतली जाते. किंवा मानवी विकासाच्या सहाय्याने आर्थिक विकासाचा वेग लक्षात घेतला जातो. आर्थिक विकास मोजण्यासाठी उत्पन्ना बरोबरच मानवी विकास निर्देशांक उपयुक्त आहे. मानवी विकास निर्देशांक वरील बाजूने वाढणारा किंवा वाढ होत

जाणारा असेल तर विकास साधणारा किंवा होणारा आहे असे म्हटले जाते.

**मानवी विकास निर्देशांक रचना :** मानवी विकास निर्देशांक तयार करताना तीन प्रमुख निदर्शक मिळून तयार केला जातो.

१) **दीर्घायुष्य** : (Longevity) दीर्घायुष्य हे आयुष्यमान/सरासरी आयुर्मानाच्या सहाय्याने मोजले जाते.

२) **ज्ञान** (Knowledge) :

ज्ञान हे शैक्षणिक कौशल्य किंवा प्रौढ साक्षर प्रमाण किंवा प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण यांच्या सहाय्याने मोजले जाते.

३) **जीवनमान** (Standard of Living ):

जीवनमान दर्जा हा वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या साहाय्याने किंवा पैशातील खरेदीशक्ती समता साहाय्याने मोजले जाते.

मानवी विकास तयार करताना प्रत्येक निर्देशकाचे स्थिर कमाल व किमान मुल्य हे निश्चित केले जाते.

१) सरासरी आयुर्मान = २५ वर्षे ते ८५ वर्षे

२) प्रौढ साक्षर प्रमाण = ० टक्के ते १०० टक्के

३) एकत्रित स्थूल नावनोंदणी गुणोत्तर (ज्ञान) = ० टक्के ते १०० टक्के

पुढील सूत्राच्या साहाय्याने गणिती करून निर्देशांक तयार करता येतो.

$$\text{निर्देशांक (Index)} = \frac{\text{प्रत्यक्षात मूल्य - किमान मूल्य (Actual value -Minimum value)}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य (Maximum value - Minimum value)}}$$

उदा. जर एखाद्या देशातील सरासरी आयुर्मान ६० वर्षे असेल तर सरासरी आयुर्मानाचा निर्देशांक हा ०.५८३ असेल. (६०-२५ भागिले ८५-२५ =३५ भागिले ६०= ०.५८३)

**तक्ता क्रमांक ३.३**

**मानवी विकास निर्देशांक : आंतरराष्ट्रीय तुलना**

**१९९० ते २०१४ मधील निवडक देशांचा मानवी विकास निर्देशांक कल**

| मानवी विकास निर्देशांक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| देश व स्थान – | | १९९० | २००० | २००१ | २०१३ | २०१४ |
| **अतिउच्च मानवी विकास – ४९ देश** | | | | | | |
| १. नार्वे | –०१ | ०.८४९ | ०.९१७ | ०.९४१ | ०.९४२ | ०.९४४ |
| २. ऑस्ट्रेलिया | –०२ | ०.८६५ | ०.८९८ | ०.९३० | ०.९३३ | ०.९३५ |
| ३. स्विझर्लंड | – ०३ | ०.८३१ | ०.८८८ | ०.९२५ | ०.९२८ | ०.९३० |
| ४. डेन्मार्क | – ०४ | ०.७९९ | ०.८६२ | ०.९२० | ०.९२३ | ०.९२३ |
| ५. नेदरलँड | – ०५ | ०.८२९ | ०.८७७ | ०.९१९ | ०.९२२ | ०.९२२ |
| **उच्च मानवी विकास – ५६ देश :** | | | | | | |
| १. रोमानिया | – ५३ | ०.७०३ | ०.७०६ | ०.७८६ | ०.७९१ | ०.७९३ |
| २. उरूग्वे | – ५४ | ०.६९२ | ०.७४२ | ०.७८६ | ०.७९१ | ०.७९३ |
| ३. कझाकिस्तान | – ५५ | ०.६९० | ०.६७९ | ०.७७२ | ०.७८५ | ०.७८८ |
| ४. बोरबोडस | – ५६ | ०.७१६ | ०.७५३ | ०.७८६ | ०.७८५ | ०.७८५ |
| ५. पनामा | – ६० | ०.६५६ | ०.७१४ | ०.७५९ | ०.७७७ | ०.७८० |
| **मध्यम मानवी विकास –३९ देश :** | | | | | | |
| १. इजिप्त | – १०८ | ०.५४६ | ०.६२२ | ०.६८२ | ०.६८९ | ०.६९० |
| २. इंडोनेशिया | – ११० | ०.५३१ | ०.६०६ | ०.६७१ | ०.६८१ | ०.६८४ |
| ३. दक्षिण आफ्रिका | – ११७ | ०.६२१ | ०.६३२ | ०.६५७ | ०.६६३ | ०.६६६ |
| ४. भारत | – १३१ | ०.४२८ | ०.४९६ | ०५९७ | ०.६०४ | ०.६०९ |
| ५. कंबोडिया | – १४४ | ०.३६४ | ०.४१९ | ०.५४१ | ०.५५० | ०.५५५ |
| **अल्प मानवी विकास – ४४ देश :** | | | | | | |
| १. पाकिस्तान | – १४७ | ०.३९९ | ०.४४४ | ०.५७२ | ०.५६३ | ०.५३८ |
| २. नायजर | – १८८ | ०.२१४ | ०२५७ | ०.३३३ | ०.३४५ | ०.३४८ |

**संदर्भ : मानवी विकास अहवाल (२०१४) :**

वरील तक्त्यावरून आपणास पुढील तुलनात्मक बाबी लक्षात येतात. १८८ देशांचे मानवी विकास निर्देशांक

संग्रहित केले आहेत. परंतु १८८ देशांच्या मानवी विकास निर्देशकांचे विश्लेषण करणे कठीण असल्याने विश्लेषनाच्या सोयीसाठी निवडक देशांचेच मानवी विकास निर्देशांक दिले आहेत. १८८ देशांपैकी ४९ देश अति उच्च मानवी विकास गटात आहेत. ५६ देश उच्च मानवी विकास गटात आहेत. ३९ देश मध्यम मानवी विकास गटात येतात. तर ४४ देश अल्प कमी मानवी विकास गटात मोडतात. मानवी विकास निर्देशांकात प्रथम स्थानी नार्वे, दुसऱ्या स्थानी ऑस्ट्रेलिया, तिसऱ्या स्थानी स्विझर्लंड, चौथ्या स्थानी डेन्मार्क तर पाचव्या स्थानी नेदरलँड आहे. रोमानिया ५३ व्या स्थानी, पनामा ६० व्या स्थानी, इजिप्त १०८ व्या स्थानी, भारत १३१ व्या स्थानी, पाकिस्तान १४७ व्या स्थानी तर शेवटच्या १८८ व्या स्थानी नायजर हा देश आहे.

**मानवी विकास निर्देशकाचे महत्व :**

आर्थिक प्रगतीत मानवी विकास निर्देशांक महत्वाची भूमिका पार पाडतो. मानवी विकास निर्देशांकामुळे अहवालावरून देशाच्या विकासाची अवस्था समजते. तसेच यामुळे संबंधित देशातील लोकांचे शिक्षण, आहार, आरोग्य याबाबत योग्य माहिती मिळण्यास मदत होते. मानवी विकास निर्देशांकामुळे मानव विकास निर्देशांक सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. मानवी विकास निर्देशांकामुळे देशातील शिक्षण, आरोग्य, उत्पन्न या परिणामाची योग्य माहिती मिळते. कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचा दर्शक म्हणून मानवी विकास निर्देशांक उपयुक्त असतो. अशा विविध कारणामुळे मानवी विकास निर्देशांकाला महत्व प्राप्त झाले आहे.

**सारांश :** या प्रकरणामध्ये जगातील भारतासह निवडक देशांच्या राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक यांची तुलना केली आहे. जगातील निवडक देशांच्या तुलनेवरून असे लक्षात येते की भारताचे राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक खूपच अल्प आहे. यामध्ये वाढ करण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न केले पाहिजेत.

**३.३ सारांश :**

भारतातील बेकारी आणि दारिद्र्याच्या समस्येतूनच आर्थिक आणि सामाजिक विषमतेचा प्रश्न निर्माण होतो. अलिकडच्या काळात उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकरण स्वीकारल्यापासून आर्थिक व सामाजिक विषमतेचा प्रश्न गंभीर बनत चाललेला आहे. उत्पन्नातील विषमता वाढत जाते. त्यामुळे वर्तमान व भविष्यात या समस्येचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झालेली आहे. त्याला अनुसरून या उपघटकामध्ये आर्थिक व सामाजिक विषमतेच्या संकल्पनांची मांडणी समजण्यास मदत होते. त्याप्रमाणेच आर्थिक विषमता निर्माण होण्याची कारणे, त्याप्रमाणेच आर्थिक विषमता कमी करण्यासाठी केलेल्या व सुचविलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतलेला आहे. त्याप्रमाणेच भारतातील सामाजिक विषमतेची संकल्पना त्याबरोबरच सामाजिक विषमता का निर्माण होते, त्याची पारंपारिक आणि आजची कारणे समजून घेता येतात. सामाजिक विषमतेचे परिणाम काय होतात याची कल्पना येते. ही सामाजिक विषमता कमी करण्यासाठी आतापर्यंत सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या यावरून भविष्यकालीन कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याचा ही अंदाज येतो. आर्थिक आणि सामाजिक विषमते बरोबरच भारताला भेडसावणारी प्रमुख समस्या प्रादेशिक असमतोलाची आहे. भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेमध्ये समतोल आर्थिक विकास घडवावा. सर्व राज्यांचा/प्रदेशांचा समतोल विकास घडून येणे आवश्यक आहे. भारतामध्ये काही राज्ये विकसित तर काही राज्ये मागासलेली दिसून येतात. या मागासलेल्या

राज्यांकडे ही लक्ष पुरविण्याची गरज आहे. प्रादेशिक असमतोल म्हणजे काय ? प्रगत राज्ये व मागासलेली राज्ये कोणती यांचा थोडक्यात आढावा घेतलेला असून प्रादेशिक असमतोलाचे घटक विचारात घेतलेले आहेत. यावरून प्रादेशिक असमतोल का निर्माण होतो. त्याबरोबरच प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी शासनाने केलेले प्रयत्न किंवा उपाययोजना याविषयी माहिती देण्यात आलेली आहे. राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांकांची आंतरराष्ट्रीय तुलना करण्यात आली आहे. थोडक्यात सदर उपघटकामध्ये भारतीय अर्थव्यवस्थे समोरील असणारी आव्हाने, स्वरूप, व्याप्ती, कारणे, परिणाम आणि उपाययोजना इत्यादी विषयी संपूर्ण माहिती मिळण्यास मदत होते.

**३.४ पारिभाषिक शब्द :**

१) आर्थिक विषमता – गरीबी व श्रीमंती यातील फरक. २) प्रादेशिक असमतोल – विभागाविभागाच्या विकासातील फरक. ३) असमतोल – विकासातील असमानता. ४) पायाभूत – विकासाला आवश्यक असणारे घटक. ५) औद्यागिक धोरण – उद्योगाबाबत आखलेले धोरण. ६) राष्ट्रीय उत्पन्न – देशाचे एका वर्षातील उत्पन्न. ७) दरडोई उत्पन्न – देशातील लोकांचे सरासरी उत्पन्न. ८) मानवी विकास – मानवी प्रगती. ९) मानवी विकास निर्देशांक – मानवाच्या विकासाचे मोजमाप.

**३.५ स्वयंअध्ययन प्रश्न :**

**३.५ (ब)दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. भारतात आर्थिक विकासाबरोबर प्रादेशिक असमतोल .......................... आहे.

(अ) घटला (ब) वाढला (क) स्थिर (ड) मध्यम

२. राज्याच्या लोकसंख्येच्या आधारे सर्वात गरीब .......................... राज्य आहे.

(अ) पंजाब (ब) बिहार (क) ओरिसा (ड) महाराष्ट्र

३. .............................. राज्यात औद्योगिक विकास सर्वात जास्त झाला आहे.

(अ) महाराष्ट्र (ब) गोवा (क) प. बंगाल (ड) पंजाब

४. वांच्छू समितीची स्थापना ........ मध्ये करण्यात आली.

(अ) १९५१ (ब) १९७१ (क) १९६८ (ड) १९७५

५. प्रादेशिक असमतोलाची निर्मिती ................................... काळात झाली.

(अ) ब्रिटिश (ब) नियोजन (क) स्वातंत्र्योत्तर (ड) आर्थिक सुधारणा

६. जागतिक बँकेच्या २०१४ च्या अहवालानुसार जगातील ........ देशाचे राष्ट्रीय उत्पन्न सर्वाधिक आहे.

(अ) जपान (ब) रशिया (क) जर्मनी (ड) अमेरिका

७. ................ पासून युनोने मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करण्यास सुरवात केली.

(अ) १९९१ (ब) १९९० (क) २००१ (ड) २००५

८. २०१४ च्या मानवी विकास अहवालानुसार .................. चे प्रथम स्थान आहे.

(अ) डेन्मार्क (ब) नेदरलँड (क) नॉर्वे (ड) अमेरिका

**३.६ स्वयंअध्ययन प्रश्न (वस्तुनिष्ठ प्रश्न) उत्तरे :**

३.५ अ) १) अ २) अ ३) ब ४) ब ५) ब ६) ब ७) अ ८) क ९) ब

३.५ ब) १) ब २) क ३) अ ४) क ५) अ ६) ड ७) ब ८) क

**३.७ सरावासाठी प्रश्न :**

**अ) टीपा लिहा :**

१) भारतातील आर्थिक विषमता २) आर्थिक विषमतेची कारणे ३) भारतातील सामाजिक विषमता कमी करण्याच्या उपाययोजना ४) भारतातील सामाजिक विषमता ५) भारतातील सामाजिक विषमतेचे प्रकार/कारणे ६) भारतातील सामाजिक विषमतेचे परिणाम ७) भारतातील सामाजिक विषमता कमी करण्यासाठी भारत सरकारने केलेल्या उपाययोजना ८) भारतातील प्रादेशिक असमतोल ९) भारतातील प्रादेशिक असमतोलाचे घटक १०) भारतातील असमतोल कमी करण्यासाठी शासकीय प्रयत्न ११) राष्ट्रीय उत्पन्न १२) दरडोई उत्पन्न १३) मानवी विकास निर्देशांक.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतातील आर्थिक विषमता निर्मितीची कारणे सांगून आर्थिक विषमता कमी करण्याचे उपाय सुचवा. २) भारतातील सामाजिक विषमतेचे कारण व परिणामांचा आढावा घ्या. ३) भारतातील प्रादेशिक असमतोलाच्या समस्येचा सविस्तर आढावा घ्या. ४) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ? राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना स्पष्ट करा. ५) दरडोई उत्पन्नाची संकल्पना स्पष्ट करून भारताचे दरडोई उत्पन्न कमी असण्याची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

**३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**


१) भारतीय अर्थव्यवस्था : देसाई-भालेराव, निराली प्रकाशन-९ वी आवृत्ती, सप्टेंबर २०१२

२) भारतीय अर्थव्यवस्था : घाटगे-वावरे, निराली प्रकाशन, प्रथम आवृत्ती, जून २०१०

३) भारतीय अर्थव्यवस्था : प्रा. डॉ. राजेंद्र रसाळ, सक्सेस पब्लिकेशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २०१०

४) अर्थव्यवस्था, नियोजन आर्थिक विकास आणि कृषी : जाधव-काळे-मगर सुर्यवंशी, रत्नाई पब्लिकेशन, दुसरी आवृत्ती, एप्रिल २०१२

५) शिवार्थ २३ वे वार्षिक अधिवेशन, शिवाजी विद्यापीठ, इकॉनॉमिक्स असोशिएशन, कोल्हापूर २०१३

६) भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. प्रभाकर देशमुख, पिंपळी पुणे ॲण्ड के, पब्लिशर्स, नागपूर.

७) Indian Economy - Datt Sundaram - S. Chand Company Ltd. New Delhi.

८) भारतीय अर्थव्यवस्था : साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा.

९) Indian Economy - A. N. Agarwal, Wishwa Prakashan, New Delhi.


***

# घटक क्र. ४

# भारतातील लोकसंख्या
# ( Population in India )


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ लोकसंख्या वाढ आणि वाढीची कारणे -

४.२.२ लोकसंख्येची वैशिष्ट्ये

अ) लोकसंख्येचे आकारमान

ब) जन्मदर आणि मृत्यूदर

क) लोकसंख्येची घनता

ड) स्त्री - पुरूष प्रमाण

इ) साक्षरता प्रमाण

फ) लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी

ग) लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी

ह) लोकसंख्येची ग्रामीण आणि शहरी विभागणी.

४.२.३ लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम

४.२.४ लोकसंख्या धोरण -२०००

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्दांचा अर्थ

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


**४.० उद्दिष्टये :-**

'भारतातील लोकसंख्या या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची कल्पना येईल

१) भारतीय लोकसंख्येचे स्वरूप लक्षात येईल.

२) भारतातील लोकसंख्येची वाढ आणि लोकसंख्या वाढीची कारणे ध्यानात येतील.

३) भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट होतील.

४) लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील परिणाम समजून घेता येईल.

५) भारताचे सन २००० मधील लोकसंख्याविषयक धोरण समजून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

भारताच्या आर्थिक विकासात देशातील नैसर्गिक साधन संपत्ती आणि लोकसंख्या हे दोन घटक अतिशय महत्वपूर्ण ठरतात. लोकसंख्येचे आकारमान, लोकसंख्येची रचना, लोकसंख्या वाढीचा वेग यांचा देशाच्या आर्थिक विकासावर अनुकुल किंवा प्रतिकूल परिणाम होत असतो. लोकसंख्येचे आकारमान पर्याप्त राहिल्यास देशाचा सर्वांगीण विकास गाठता येणे सोपे जाते. या पार्श्वभूमीवर भारतीय लोकसंख्या वाढीची कारणे, भारतीय लोकसंख्येची ठळक लक्षणे तसेच भारतातील लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील होणारा परिणाम इ. बाबींचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

## ४.२ विषय विवेचन :

कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती ही त्या देशातील नैसर्गिक संसाधने आणि लोकसंख्या यावर अवलंबून असते. तसेच देशाची लोकसंख्या आणि त्या देशाचे उत्पादन यांचाही परस्पराशी निकटचा संबंध असतो.देशातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा यावरूनच ठरतो. लोकसंख्येचा आकार, लोकांची उपक्रमशीलता,व्यवसायिक विभागणी तसेच तांत्रिक ज्ञान या घटकांवर देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर अवलंबून असतो. विकसनशील राष्ट्रात लोकसंख्या वेगाने वाढताना दिसते. ही एक गंभीर समस्या आहे. याचा देशाच्या आर्थिक विकासावर बहुतेक वेळा प्रतिकूल परिणाम होतो. भारतातही लोकसंख्या वाढीचा वेग अधिक असून त्याचा भारताच्या आर्थिक विकासावर अनुकुल व प्रतिकूल परिणाम होताना दिसतो. भारत सरकारने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेळोवेळी लोकसंख्याविषयक धोरणाची आखणी व अंमलबजावणी केली आहे. या सर्वाचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केला आहे.

### ४.२.१ लोकसंख्या वाढीची कारणे :-

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकसंख्या खूप वेगाने वाढलेली दिसून येते. १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. त्यामध्ये सातत्याने वाढ होत जाऊन सन २०११ च्या शिरगणतीप्रमाणे भारताची लोकसंख्या १२१ कोटी इतकी झाली आहे. गेल्या दशकात लोकसंख्या वाढीचा एकत्रित वार्षिक वृद्धीदर १.६४ इतका राहिला आहे. भारताच्या इतिहासात सन १९२१ हे वर्ष वगळता लोकसंख्या सातत्याने वाढताना दिसून येते आहे. सन १९११ ते १९२१ या दशकात भारताच्या लोकसंख्येत २५.२ कोटी वरून २५.१ कोटी इतकी घट झाली. म्हणून सन १९२१ या वर्षाला **'लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष'** असे म्हणतात. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सध्या लोकसंख्येबाबत भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. भारताची लोकसंख्या वेगाने वाढण्यास पुढील अनेक घटक कारणीभूत आसलेले दिसून येतात.

**१) विवाहाची सार्वत्रिक प्रथा :**

भारतात विवाहाला एक धार्मिक कर्तव्य मानले जाते. विवाह हा धार्मिक विधी असल्याने लग्न करण्याच्या वयात भारतातील सर्व स्त्री-पुरूष विवाह करतात. अविवाहीत व्यक्तीकडे समाज हिन नजरेने पाहतो. त्यामुळे विवाह केलाच पाहिजे असा समज समाजामध्ये आहे. पर्यायाने नवीन जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण वाढते. सार्वत्रिक विवाहाच्या या प्रथेमुळे भारतातील लोकसंख्या जलद गतीने वाढलेली दिसून येते.

**२) निरक्षरता :**

भारतीय लोकसंख्या वाढीचे निरक्षरता हे मूळ कारण आहे. स्वातंत्र्यानंतर साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी त्यामध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमीच आहे.त्यामुळे अधिक अपत्यांना जन्माला घालण्याचे प्रमाण वाढले. साक्षरतेचे प्रमाण वाढलेले असले तरी लोकसंख्या कमी झालेली नाही. चुकीच्या धार्मिक व सामाजिक समजूतीमुळे आजही दोनपेक्षा अधिक अपत्यांना जन्माला घालण्याचे प्रमाण वाढले आहे.

**३) दारिद्रय :**

भारतीय लोकांचे दारिद्र्य हे ही भारतातील लोकसंख्या वाढीचे कारण झाले आहे. भारतात अद्यापही बेरोजगारी व दारिद्रय मोठ्या प्रमाणात आहे. भारतीय लोकांच्या गरीब परिस्थितीमुळे घरात अधिकाधिक मुलांचा जन्म झाला. जेवढी अधिक मुले होतील तेवढी ती शेतीसाठी किंवा इतरत्र कामधंदा करून पैसे मिळवतील. म्हातारपणी भाकरीला आधार मिळावा म्हणून अधिक मुलांना जन्माला घातले जाते. पर्यायाने लोकसंख्येत वाढ होत गेली.

**४) उच्च जननदर :**

उच्च जननदर हे लोकसंख्यावाढीचे प्रमुख कारण आहे. २०११ च्या शिरगणतीनुसार भारतात जननदर २०.९७ आहे. तर मृत्यूदर ७.९ आहे. म्हणजेच गेल्या काही वर्षापासून भारतात जननदर अधिक आहे व मृत्यूदर कमी असल्याने भारताची लोकसंख्या एकसारखी वाढतच आहे.

**५) अंधश्रध्दांचा पगडा :**

भारतात आजही रूढी-परंपरा, देव-धर्म यांचे अंधानुकरण केले जाते. त्याचबरोबर पितृप्रधान समाज असल्याने मुलगा जन्माला आला तरच आपल्या घराण्याचे नाव व परंपरा चालू राहील असे मानले जाते. त्यामुळे भारतात मुलगा होईपर्यंत मुलांची संख्या वाढविली जाते. वंशाचा दिवा अखंड ठेवावा या हेतूने मुलगा होईपर्यंत लोक अपत्यांना जन्म देतात. त्यामुळे लोकसंख्या वाढत राहते.

**६) बालविवाहाची प्रथा :**

भारतात बालविवाहाची पद्धत बऱ्याच ठिकाणी रूढ आहे. लहान वयात लग्न झाल्याने प्रजोत्पादनासाठी बराच काळ मिळतो व त्यामुळे लोकसंख्या वाढते. सन. १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा संमत झालेला असला तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. भारतातील ८१% मुलींची लग्ने १० ते २० वर्षांच्या वयामध्ये होतात. हे वय प्रजोत्पादनाच्या दृष्टीने अधिक प्रबळ असते. त्यामुळे भारताची लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

**७) बेरोजगारी :**

भारत हा तरूणांचा देश म्हणून ओळखला जातो. भारतीय लोकसंख्येतील जवळ-जवळ ५०% लोकसंख्या ही २५ वर्षाखालील आहे. वाढत्या युवकसंख्येला शेतीशिवाय अन्य क्षेत्रात रोजगार मिळणे आवश्यक आहे. पण शेती व्यवसायातील अदृश्य बेकारीमुळे इतरत्र रोजगार मिळत नसल्याने शेतीवरच अवलंबून रहावे लागते. अशातच रोजगाराच्या अभावामुळे युवकांचे लैंगिक सुखांकडील आकर्षण वाढून लोकसंख्येत वाढ होण्याची भिती आहे.

**८) हवामान :**

भारतातील लोकसंख्या वाढण्याचे कारण हवामान हे एक आहे. भारतातील हवामान उष्ण आहे आणि अशा हवामानात मुले-मुली लवकर वयात येतात. त्यामुळे त्यांची लग्ने लवकर होतात. प्रजननास लहान वयातच सुरवात झाल्याने लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

**९) एकत्र कुटुंबपद्धती :**

एकत्र कुटुंबपद्धतीत घराचा खर्च एकत्रीतरित्या चालत असतो. त्यामुळे आपल्याला कितीही मुले झाली तरी त्यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी ही कुटुंबाची सामुदायिक जबाबदारी मानली जाते. त्यामुळे कोणीही आपले कुटुंब मर्यादित करण्याचा विचार करत नाही. भारतात अजूनही एकत्र कुटुंबपद्धतीचे अस्तित्व असल्याने फार मोठ्या प्रमाणात भारताची लोकसंख्या वाढत आहे.

**१०) बहुपत्नीत्व :**

पूर्वी भारतात अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची प्रथा होती. आज हिंदू कायद्यानुसार द्वि-भार्या प्रतिबंधक कायदा करण्यात आलेला आहे. परंतू त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. मुस्लीम समाजाला याबाबत कायदेशीर निर्बंध नाहीत. अनेक स्त्रियांशी विवाह म्हणजे लोकसंख्येत मोठी वाढ होय.

**१०) कुटुंबनियोजनाला अपूरा प्रतिसाद :**

सरकारने कुटुंबनियोजन मोहिम राबविली तरी भारतातील बहुसंख्य समाज निरक्षर व अज्ञानी असल्यामुळे सरकारी पातळीवर राबविलेली ही मोहिम तितकीशी यशस्वी झाली नाही. कुटुंबनियोजन कार्यक्रमाविषयी लोकांमध्ये निरूत्साह व उदासीनता असल्याने भारताची लोकसंख्या वेगाने वाढते आहे.

**स्वयं - अध्ययन प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या ......................... कोटी आहे.

(अ) १००.२ (ब) ३६.१ (क) १२१ (ड) यापैकी नाही.

२. भारतात सन...............................हे वर्ष वगळता लोकसंख्या सातत्याने वाढत आहे.

(अ) १९५१ (ब) १९०१ (क) १९२० (ड) १९२१

३. लोकसंख्येत भारताचा जगात ...................................... क्रमांक लागतो.

(अ) पहिला (ब) दुसरा (क) तिसरा (ड) चौथा

४) भारतात जन्मदर .... असून मृत्यूदर वेगाने घटत आहे.

(अ) अधिक (ब) कमी (क) १२१ (ड) यापैकी नाही.

### ४.२.२ भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्टये :

भारतातील लोकसंख्येची वैशिष्टये अभ्यासतांना आपणास लोकसंख्येचे आकारमान ,जन्मदर व मृत्यूदरातील तफावत, स्त्री-पुरूष प्रमाण, लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी,सरासरी आयुर्मान, लोकसंख्येचे शहरी व ग्रामीण विभागणी साक्षरता प्रमाण इ. बाबतीत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर झालेला बदल विचारात घेणे उचित ठरेल. या सर्व घटकांचे तपशीलवार विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

### अ) लोकसंख्येचे आकारमान -

लोकसंख्येच्या आकारमानाचा विचार करता भारताच्या लोकसंख्येचे आकारमान खूप मोठे आहे. लोकसंख्येच्या आकारमानावरून भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत भारतातील लोकसंख्या वाढीचा दर अधिक राहीला आहे. सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. सन२०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी झाली आहे. एकूण जागतिक क्षेत्रफळापैकी भारताच्या वाटयाला २.४% भूमी आली आहे. तर जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास १७.५% लोकसंख्या भारतात राहते आहे. अमेरिका, इंग्लंड व रशिया या तीन देशांची मिळून जितकी एकूण लोकसंख्या होईल तितकी लोकसंख्या एकट्या भारतात राहते आहे. यावरून भारतीय लोकसंख्येच्या आकारमानाची कल्पना येते. भारतात पहिली शिरगणती सन १८८१ मध्ये झाली. त्यानंतर प्रति १० वर्षातून एकदा नियमीतपणे शिरगणती केली जाते. भारतीय लोकसंख्येच्या आकारमानातील बदलाची कल्पना कोष्टक क्र. ४.१ वरून येईल.

**तक्ता क्र. ४.१**

**भारतीय लोकसंख्येच्या आकारमानातील बदल**

| जनगणना वर्ष | लोकसंख्या | लोकसंख्येतील दशवार्षिक वाढ (कोटी) | वार्षिक लोकसंख्या वाढ |
|---|---|---|---|
| १९०१ | २३.६ | – | – |
| १९११ | २५.२ | + १.६ | + ०.५७ |
| १९२१ | २५.१ | – ०.१ | – ०.०३ |
| १९३१ | २७.९ | + २.८ | + १.१ |
| १९४१ | ३६.९ | + ४.० | + १.४ |
| १९५१ | ३६.१ | + ४.२ | + १.३ |
| १९६१ | ४३.९ | + ७.८ | + २.१ |
| १९७१ | ५४.८ | + १०.९ | + २.५ |
| १९८१ | ६८.४ | + १३.५ | + २.७ |
| १९९१ | ८४.४ | + १६.१ | + २.४ |
| २००१ | १०२.७ | + १८.३ | + २.१ |
| २०११ | १२१.२ | + १७.६ | + १.६४ |

**संदर्भ :** Datta/Sundaram-Indian Economy - 2011

वरील कोष्टकावरून भारतीय लोकसंख्येच्या आकारमानातील बदल स्पष्ट होतो. सन १९२१ चा अपवाद वगळता भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. या काळात साथीचे रोग, महापूर अवर्षन इ.मुळे लोकसंख्येत घट झाली आहे. म्हणून सन १९२१ हे वर्ष 'लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष' म्हणून ओळखले जाते.

सन १९२१ ते १९५१ या कालखंडात लोकसंख्या हळूवारपणे वाढली आहे. लोकसंख्यावाढीचा वार्षिक सरासरी दर १.२२% इतका राहिला आहे.

सन १९५१ पासून २००१ पर्यंत लोकसंख्या वेगाने वाढलेली दिसून येते. सन २००१ ते २०११ या दशकात लोकसंख्या वाढीचा सरासरी वार्षिक वृद्धीदर १.६४% होता. लोकसंख्या वाढीचा सरासरी ही बाब समाधानाची आहे. तरीसुद्धा भारतीय लोकसंख्येचे आकारमान आणि वाढीचा वेग जागतिक स्तरावर विचार करता खूप मोठा आहे. असे म्हणावे लागेल.

### (ब) जन्मदर आणि मृत्यूदर

प्रतिवर्षी १००० लोकांमागे जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजे जन्मदर होय. यालाच जननदर असेही म्हणतात. उच्च जन्मदर हे भारतीय लोकसंख्येचे वैशिष्ट्ये होय. तसेच दरवर्षी १००० लोकांमागे मृत्यूमुखी

पडणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे मृत्यूदर होय. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात मृत्यूदरात वेगाने घट झाली आहे. जन्मदर व मृत्यूदरात जेव्हा अंतर जास्त असते तेव्हा लोकसंख्या वेगाने वाढते. पुढील कोष्टकावरून भारतातील जन्मदर व मृत्यूदरात झालेल्या बदलांची कल्पना येईल.

**तक्ता क्र. ४.२**

**भारतातील जननदर व मृत्युदर**

| कालावधी | जननदर (दर हजारी) | मृत्युदर (दर हजारी) |
|---|---|---|
| १९५१ | ४०.० | १८.० |
| १९७१ | ३६.९ | १४.९ |
| १९८१ | ३३.९ | १२.५ |
| १९९१ | ३९.५ | ९.८ |
| २००१ | २५.८ | ८.५ |
| २०११ | २०.९ | ७.९ |

संदर्भ : Datta/Sundaram-Indian Economy, Page No.62 - edition 2011

वरील कोष्टक क्र. ४.२ वरून भारतात स्वातंत्र्योत्तर काळात मृत्यूदरात वेगाने घट झालेली दिसून येते. तर जननदर अद्यापही अधिक असलेला दिसून येतो.

सन १९५० ते २०११ या कालावधीत जन्मदर दर हजारी ३९.९ वरून २१.८ पर्यंत कमी झाला सन १९६० ते सन १९७० या दशकात मात्र तो वाढलेला दिसून येतो मृत्यूदराच्या बाबतीत सन १९५० ते २०११ या काळात वेगाने घट झालेली दिसून येते. तो २७.४ वरून ७.१ इतका झाला अर्थात १९६० ते १९७० या दशकात मृत्यूदरातही वाढ झालेली दिसून येते.

भारतातील सर्वच घटक राज्यात जन्मदर व मृत्यूदर समान नाही.बिहार, उ.प्रदेश, राजस्थान, झारखंड या राज्यांमध्ये जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी आहे. तर गोवा, त्रिपूरा, केरळ नागालँड या राज्यात जन्मदर व मृत्यूदर अल्प असलेला दिसून येतो.

जगातील निवडक देशांची तुलना केली असता भारतातील ढोबळ जननदर जास्त आहे. उदा. सन २०१६ मध्ये चीनचा जननदर १२, अमेरिका, जपानचा ८, जर्मनीचा ९ आणि भारताचा जननदर १९ होता. तर भारताचा मृत्यूदर ७, जपान -११, इटली १०, जर्मनी ११ इतका असलेला दिसून येतो. भारतातील बालविवाहाची प्रथा, निरक्षरता, एकत्र कुटुंबपद्धती, स्त्री साक्षरतेचे अल्प प्रमाण, दारिद्र्य इ. कारणामुळे जननदर उच्च राहिला आहे. तर पिण्याच्या पाण्याची सोय सार्वजनिक आरोग्य सेवेत सुधारणा, रूग्णालयांच्या संख्येत वाढ, दळणवळण सोईत सुधारणा इ. मुळे मृत्यूदरात वेगाने घट झाली आहे.

**क) लोकसंख्येची घनता :-**

एक किलोमीटर क्षेत्रात सरासरी किती लोक राहतात. त्याला त्या प्रदेशाची घनता असे म्हणतात.सामान्यपणे लोकसंख्येची घनता ही अनुकुल हवामान, शिक्षण,आरोग्य, वाहतूक व दळणवळण सुविधा, भौगोलिक परिस्थिती जमिनीची सुपीकता इ. घटकावर अवलंबून असते. याशिवाय धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळे तसेच माहितीची उपलब्धता यांचाही लोकसंख्येच्या घनतेवर प्रभाव असतो.

लोकसंख्येच्या घनतेवरून एखाद्या प्रदेशात लोकसंख्या विरळ आहे कि दाटीवाटीने रहाते हे समजते. भारतात सन १९०१ मध्ये लोकसंख्येची घनता ७७ होती ती सातत्याने वाढत जाऊन सन २०११ च्या जनगननेनुसार ३८२ इतकी आहे. भारतात लोकसंख्येची घनता विविध राज्यात कमी-अधिक असलेली दिसून येते मुंबई, दिल्ली, कलकत्ता यासारख्या महानगरात लोकसंख्येची घनता जास्त असलेली दिसून येते. भारतातील बिहार, प. बंगाल, केरळ, उत्तर प्रदेश, हरियाना, तामिळनाडू, पंजाब, आंध्र प्रदेश या राज्यांमधील लोकसंख्येची घनता भारताच्या २०११ च्या सरासरी घनतेपेक्षा जास्त आहे. तर महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, ओरिसा, मध्यप्रदेश, राजस्थान, जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश या राज्यातील लोकसंख्येची घनता भारताच्या सरासरी पेक्षा कमी आहे. सन २०११ मध्ये भारतात लोकसंख्येची सर्वोच्च घनता दिल्लीमध्ये ११३२० इतकी होती तर अरूणाचल प्रदेशाची घनता सर्वात कमी १७ इतकी होती.

पुढील कोष्टकावरून भारतातील लोकसंख्येची घनता कशी बदलत गेली आहे हे लक्षात येते.

**५) स्त्री-पुरूष प्रमाण :-**

दर हजार पुरूषांमागे स्त्रीयांचे असणारे प्रमाण म्हणजे स्त्री -पुरूष प्रमाण होय. स्वातंत्र्योत्तर काळात पुरूषांच्या संख्येच्या मानाने स्त्रीयांच्या संख्येत घट होत गेल्याचे आढळते. भारतातील पुरुष प्रधान संस्कृतीमुळे पाश्चात्य राष्ट्रांच्या तुलनेने स्त्रीयांची संख्या कमी असल्याचे पुढील कोष्टकावरून दिसून येते.

**तक्ता क्र. ४.३**

**भारतातील लोकसंख्येची घनता**

| कालावधी | घनता |
|---|---|
| १९०१ | ७७ |
| १९६१ | १४२ |
| १९९१ | २६७ |
| २००१ | ३२५ |
| २०११ | ३८२ |

| घटकराज्य | घनता |
|---|---|
| दिल्ली | ११२९७ |
| छत्तीसगड | ९२५२ |
| महाराष्ट्र | ३६५ |
| अरूणाचल प्रदेश | १७ |
| अंदमान निकोबार | ४६ |

Source : Census of India - 2011

वरील कोष्टकावरून भारतातील स्त्री-पुरूष प्रमाणात घटीची प्रवृत्ती दिसून येते. सन २०११ मध्ये स्त्री-पुरूष प्रमाणात सुधारणा होतांना दिसते. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात केरळमध्ये १०८४ आणि पाँडेचेरीमध्ये

१०३७ इतके स्त्री पुरूष प्रमाण आहे. तर सर्वात कमी सिक्कीम राज्यात ८९० आणि केंद्रशाशीत प्रदेशात दमन-दिव मध्ये ६१८ इतके कमी असलेले दिसून येते.

**इ) साक्षरता प्रमाण :-**

देशातील लोकसंख्येच्या साक्षरता प्रमाणावरून त्या देशातील लोकसंख्येची गुणवत्ता स्पष्ट होते. साक्षरता प्रमाण हा भारतीय लोकसंख्येच्या अभ्यासाचा एक महत्वाचा घटक आहे. कारण साक्षर लोकसंख्येवरून देशातील लोकसंख्येच्या प्रगतीचा तांत्रिक दर ठरतो. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात साक्षरता प्रमाण खूपच कमी होते. युनोच्या मते व्यक्तीला लिहिता -वाचता येण्याच्या क्षमतेला साक्षरता असे म्हणतात. भारतात ६ वर्षापेक्षा मोठ्या व्यक्तीला किमान त्याच्या मातृभाषेतून लिहिता- वाचता येत असेल. तर अशा व्यक्तीला साक्षर असे म्हटले जाते. याचाच अर्थ ज्यांना लिहिता व वाचता येत नाही अशा व्यक्तींना निरक्षर असे म्हटले जाते. भारत सरकारने नियोजन काळात देशातील विविध वयोगटातील व्यक्तीसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. १४ वर्षाच्या आतील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले आहे तसेच मुलांना जेवण, शिष्यवृत्ती इ.योजना सुरू केल्या आहेत. यामुळे भारतातील साक्षरता प्रमाण वाढलेले दिसून येते ही बाब पुढील कोष्टकाने अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्र. ४.५**

**भारतातील साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

| जनगणना वर्ष | एकूण साक्षरता | पुरूष साक्षरता | स्त्री साक्षरता |
|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | २७.१६ | ८.८६ |
| १९६१ | २८.३३ | ४०.४० | १५.३५ |
| १९७१ | ३४.४५ | ४६.०० | २२.०० |
| १९८१ | ४३.७ | ५६.३८ | २९.५ |
| १९९१ | ५२.२१ | ६४.१३ | ३९.३ |
| २००१ | ६४.८३ | ७५.८५ | ५२.१ |
| २०११ | ७४.०४ | ८२.१४ | ६५.५ |

**Source : Census of India 2011**

**भारतातील साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

कोष्टक क्र. ४.५ वरून असे दिसून येते की भारतात सन १९५१ मध्ये एकूण लोकसंख्येपैकी केवळ ११.३३%लोकसंख्या साक्षर होती, त्यामध्ये २७.१६ % पुरूष तर केवळ ८.८६% स्त्रीयांचा समावेश होता. यामध्ये वाढ होत जाऊन सन २०११ पर्यंत एकूण साक्षरता प्रमाण ७४.४% इतके झाले. पुरूष साक्षरता (८२.१४% आणि स्त्री साक्षरता ६५.०५% पर्यंत वाढली. भारतातील वेगवेगळ्या राज्यात लोकसंख्येच्या साक्षरतेचे प्रमाण कमी-अधिक असलेले दिसून येते. सर्वाधिक साक्षरता प्रमाण असलेले राज्य म्हणून ओळखल्या

जाणाऱ्या केरळमध्ये ९४% इतके साक्षरता प्रमाण आहे.या पाठोपाठ लक्षद्वीप-९१.८५% मिझोराम- ९१.३३% गोवा ८८.७०%इ. साक्षरता प्रमाण उच्च असणारी राज्ये आहेत तर बिहार - ६६.८२% अरूणाचल प्रदेश ६६.९५% व झारखंडमध्ये ६७.६३% इत्यादि साक्षरता प्रमाण कमी असणारी राज्ये आहेत.

तथापि भारत सरकारने साक्षरता प्रमाण वाढविण्यासाठी निरंतर प्रौढ साक्षरता कार्यक्रम - १९७८, राष्ट्रीय साक्षरता अभियान -१९८८, सर्वशिक्षा अभियान- २००१, बेटी बचाओ बेटी पढाओ -२०१५ यासारखे विविध उपक्रम सुरू केले आहेत.

**फ) लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी :-**

देशाच्या लोकसंख्येची वयोगटानुसार विभागणी केल्यास एकूण लोकसंख्येत कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण किती आहे हे समजते. सर्वसाधारणपणे ० ते १४ आणि ६० वर्षावरील व्यक्ती या काम करण्याच्यादृष्टीने अकार्यक्षम म्हणजेच अनुत्पादक मानली जाते. तसेच १५ ते ६० वयोगटातील काम करण्यास सक्षम असणाऱ्या लोकसंख्येला उत्पादक किंवा कर्ती लोकसंख्या म्हणतात. कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असेल तर परावलंबी लोकसंख्येचे प्रमाण कमी असते. सध्या भारतात कर्ती लोकसंख्या अधिक असल्यामुळे भारत सर्वाधिक तरूणांचा देश ठरला आहे.ही बाब पुढील कोष्टकावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४.६**

**लोकसंख्येची वयोमानानुसार विभागणी**

| | वयोगट | | |
|---|---|---|---|
| वर्ष | ० ते १४ | १५ ते ६० | ६० पेक्षा अधिक |
| १९२१ | ३९.२ | ५९.६ | १.२ |
| १९३१ | ३८.४ | ६०.२ | १.५ |
| १९५१ | ३७.४ | ५७.१ | ५.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.३ | ५.७ |
| १९७१ | ४१.४ | ५४.४ | ५.२ |
| १९८१ | ३९.७ | ५४.१ | ६.२ |
| १९९१ | ३६.५ | ५७.१ | ६.४ |
| २००१ | ३५.५ | ५८.२ | ६.३ |
| २०११ | २९.१ | ६५.४ | ५.५ |

**Source : Ashwini Mahajan Indian Economy - 2012**

## ग) लोकसंख्येची व्यवसायानुसार विभागणी

अर्थव्यवस्थेचे स्वरूप आणि विकासाची अवस्था समजण्यासाठी देशातील कर्त्या लोकसंख्येची विविध व्यवसायात कशा रितीने विभागणी झालेली आहे. हे अभ्यासणे उपयुक्त ठरते. भारतात व्यवसायानुसार प्रमुख तीन क्षेत्रात विभागणी केली जाते.

**१) प्राथमिक क्षेत्र –** प्राथमिक क्षेत्रात शेती, वन, पशूसंवर्धन, मासेमारी इ. व्यवसायांचा समावेश होतो. प्राथमिक क्षेत्रावर निसर्गाची भूमिका फार महत्वाची ठरते.

**२) द्वितीय क्षेत्र –** यामध्ये लघु व मोठे उद्योगधंदे, बांधकाम, खाणी इ.चा समावेश होतो. शेती क्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना रोजगार पुरविण्याचे काम या क्षेत्रातून केले जाते.

**३) तृतीय क्षेत्र–** या क्षेत्रात वाहतूक दळण-वळण, व्यापार, शिक्षण, वैद्यकीय व्यवसाय, अभियांत्रिकी, बँक व्यवसाय इ.चा समावेश होतो. सेवांची निर्मिती करणाऱ्या सेवांचा या क्षेत्रात समावेश होतो.

**तक्ता क्र. ४.७**

**लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी (टक्केवारी)**

| व्यावसायिक क्षेत्र | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक | ७२.१ | ७१.८ | ७२.१ | ६८.८ | ६६.७ | ५८.४ | ५२.२ |
| द्वितीय | १०.७ | १२.२ | ११.२ | १३.५ | १२.७ | १६.२ | २०.२ |
| तृतीय | १७.२ | १६.० | १६.७ | १७.५ | २०.५ | २५.४ | २७.३ |

**संदर्भ : महाजन अश्विनी भारतीय अर्थव्यवस्था**

**लोकसंख्येची क्षेत्रीय विभागणी (टक्केवारी)**

## ह) लोकसंख्येची ग्रामीण आणि शहरी विभागणीः–

देशातील एकूण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि किती लोकसंख्या शहरी भागात राहते याची माहिती घेणे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाचे ठरते. कारण देशाच्या आर्थिक विकासाचा वेग, औद्योगिकरणाबरोबर नवीन औद्योगिक शहरांची संख्या वाढते ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करतात. परिणामी शहरातील लोकसंख्या वाढते. ग्रामीण भागातील लोकसंख्येचे होणारे स्थालांतर आर्थिक विकासाचे द्योतक मानले जाते. पुढील कोष्टकावरून भारतीय लोकसंख्येची ग्रामीण शहरी विभागणी कशी झाली आहे हे समजते.

**तक्ता क्र. ४.८**

**भारतातील शहरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण**

| वर्ष | ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण | शहरी लोकसंख्येचे प्रमाण |
|---|---|---|
| १९०१ | ९८.०% | ११.०% |
| १९५१ | ८२.७ % | १७.३ % |
| १९६१ | ८२.० % | १८.० % |
| १९७१ | ८०.१ % | १९.९ % |
| १९८१ | ७६.७ % | २३.३ % |
| १९९१ | ७४.३ % | २५.७ % |
| २००१ | ७२.२ % | २७.८ % |
| २०११ | ६८.८५ % | ३१.१५ % |

**संदर्भ : जनगणना अहवाल, रजिस्ट्रार जनरल, भारत**

**स्वयं - अध्ययन प्रश्न**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. दरवर्षी ................ लोकसंख्येमागे मृत्यूमुखी पडणाऱ्या लोकांचे प्रमाण म्हणजे मृत्यूदर होय.

(अ) १०० (ब) १०,००० (क) १००० (ड) यापैकी नाही.

२. जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी भारताच्या वाट्याला .................. इतकी जमिन आली आहे.

(अ) २०.४% (ब) ५.२% (क) २.४% (ड) यापैकी नाही.

३. युनोच्या मते व्यक्तीच्या लिहिता-वाचता येणाऱ्या क्षमतेला ...................... असे म्हणतात.

(अ) निरक्षरता (ब) घनता (क) साक्षरता (ड) यापैकी नाही.

४. भारतीय लोकसंख्येची ग्रामीण-शहरी विभागणी लक्षात घेता सध्या ग्रामीण भागात ........ लोकसंख्या राहते.

(अ) ३१.१५% (ब) ४०.०% (क) ६८.८५% (ड) यापैकी नाही.

**४.२.३ लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील परिणाम -**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती, मानवी साधनसंपत्ती आणि

वित्तीय साधने या तीन प्रमुख घटकांवर अवलंबून असतो. यापैकी लोकसंख्या आणि आर्थिक विकास या दोहोत परस्पर संबंध असलेला दिसून येतो भारतात लोकसंख्या वाढीबरोबर श्रमपुरवठा वाढत असला तरी लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावर अनेक प्रतिकूल परिणाम होताना दिसतात.

अर्थतज्ञ कोलीन क्लार्क आणि एव्हरेस्ट हंगिन याच्या मते विकसनशील देशात मोठी आणि वाढती लोकसंख्या ही त्या देशाच्या विकासाला लाभदायक ठरते. सध्या प्रगत म्हणून ओळखला जाणाऱ्या अमेरिका,इंग्लंड जपान यासारख्या राष्ट्रात आर्थिक विकासाच्या काळात तेथील वाढत्या लोकसंख्येने हातभारच लावला होता. तथापी भारताच्या बाबतीत स्वातंत्र्योत्तर काळात भारतात घडून आलेली लोकसंख्यावाढ ही प्रतिकूल परिणाम करणारी ठरली आहे. भारताच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गात वाढती लोकसंख्या कशी अडसर ठरली आहे. हे पुढीलप्रमाणे सविस्तर स्पष्ट करता येईल.

**लोकसंख्या वाढीचे आर्थिक विकासावरील आघात –**

**१) राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्न :–**

भारताच्या राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्नातील वाढीच्या तुलनेने लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. दरडोई उत्पन्न म्हणजे त्या देशात राहणाऱ्या लोकांच्या वाट्याला येणारा राष्ट्रीय उत्पन्नातील सरासरी वाटा किंवा हिस्सा होय. राष्ट्रीय उत्पन्न वाढत असताना लोकसंख्या वेगाने वाढत असेल तर राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी होऊन दरडोई उत्पन्न कमी राहील.

भारतात चालु किंमतीनुसार दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न सन १९५०– ५१ मध्ये २६४ रू होते. ते सन १९८०–८१ मध्ये १८५२ रू., सन २००९–१० मध्ये ४६,१७७ रू. आणि सन २०१३–१४ मध्ये ७४,३८० रू. होते. अर्थात आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहिल्यास भारताचे दरडोई उत्पन्न सन २००६ मध्ये ८२० होते. तर चीन चे २०१० आणि अमेरिकेचे ४४७० होते. यावरून भारताची लोकसंख्या स्थिर झाल्याशिवाय दरडोई उत्पन्नात वाढ दिसून येणार नाही.

**२) अन्नधान्य पुरवठा :–**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात सातत्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. हरित क्रांतीनंतर भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण बनला. तथापि, दरडोई प्रतिदिन उपलब्ध होणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाण विशेष वाढू शकले नाही. कारण लोकसंख्या वेगाने वाढत गेली. सन २०११–१२ मध्ये दरडोई अन्नधान्य उपलब्धता ४६२.१ ग्रॅम इतकी होती. हे प्रमाण सन १९९० मध्ये ४८०.१ ग्रॅम होते. याचा अर्थ अन्नधान्य प्रतिव्यक्ती उपलब्धता फारशी वाढलेली नाही. गेल्या ६५ वर्षात अंदाजे अन्नधान्य उत्पादन ५.५ पटीने वाढले. परंतु दरडोई अन्नधान्य उपलब्धता केवळ १.२ पटीने वाढली याचे महत्वाचे कारण म्हणजे लोकसंख्या वाढ होय.

**३) बेरोजगारीत वाढ :–**

वाढती लोकसंख्या बेरोजगारी निर्माण होण्याचे एक महत्वाचे कारण बनले आहे. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्नपुरवठ्यात वाढ होते. परंतू सर्वांनाच रोजगार मिळत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या वेगाने

रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. त्यापेक्षा अधिक प्रमाणात लोकसंख्येत वाढ झाली. राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालानुसार सन १९९३-९४ मध्ये बेरोजगारांची संख्या २०.१३ दशलक्ष होती. ती सन १९९९-२००० मध्ये २६.५८ दशलक्ष झाली. सन २०१६ मध्ये भारतात बेरोजगारीचा दर ३.५१ % इतका होता. तो सन २०१७ मध्ये ३.५२% इतका झाला. भारतात लोकसंख्या वाढीमुळे बेरोजगारीचा दर जास्त राहिला आहे.

**४) शेतजमिनीवर अतिरिक्त भार :-**

जगातील एकूण जमिनीपैकी भारताच्या हिश्याला केवळ २.४ % जमिन आलेली आहे. यामध्ये कोणतीही वाढ होत नाही. तथापि, गेल्या ७० वर्षात भारताची लोकसंख्या वेगाने वाढली आहे. या मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येला सामावून घेईल इतक्या मोठ्या प्रमाणात देशातील औद्योगिक तसेच सेवा क्षेत्राचाही विकास झालेला नाही. त्यातही लोकसंख्या वाढीचा दर शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त आहे. त्यामुळे शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडतो आहे. यातूनच शेतीच्या विभाजनाचा व तुकडीकरणाचा प्रश्न निर्माण होत आहे.

**५) अनुउत्पादक उपभोक्त्यांचा वाढता भार :-**

उत्पादनाला हातभार न लावता जे फक्त देशातील वस्तुंचा उपभोग घेतात. त्यांना अनुत्पादक उपभोक्ते असे म्हणतात. सामान्यपणे १४ वर्षाखालील मुले व ६० वर्षावरील जेष्ठ लोकांचा अनुत्पादक उपभोक्त्यात समावेश होतो. सन २००१ मध्ये ४१.८% एवढे अनुत्पादक उपभोक्त्यांचे प्रमाण होते. ते सन २०११ मध्ये ३७.५ % लोकसंख्या अनुत्पादक होती. एकूण लोकसंख्येमध्ये म्हणजेच १२१ कोटीपैकी ४५.३७५ कोटी लोकसंख्या अनुत्पादक होती. यावरून वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेवर अनुत्पादक लोकसंख्येचा प्रतिकूल परिणाम होत आहे.

**६) सामाजिक सोई-सुविधांवर ताण :-**

भारतात वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे शिक्षण, आरोग्य, वाहतूक दळणवळण, वैद्यकीय सुविधा, पिण्याचे पाणी व वीजपुरवठा यासारख्या मुलभूत सोई-सुविधावर अतिरिक्त ताण होतो आहे. देशाच्या महानगरातून वाढत्या लोकसंख्येमुळे निवासांचा प्रश्न गंभीर बनला आहे. बचतीचे प्रमाण कमी असल्यामुळे आणि या सुविधांवर भरमसाट खर्च करावा लागत असल्यामुळे विकासात अडसर निर्माण झाला आहे.

**७) दारिद्र्यात वाढ :-**

भारतात वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि कृषीची अल्प उत्पादकता, औद्योगिकरणाचा मंद वेग, वाढती बेरोजगारी यामुळे लोकांचे दरडोई उत्पन्न कमी आहे. देशातील जवळपास ४०% लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खाली जीवन जगत आहे. दारिद्र्याच्या दृष्ट चक्रामुळे लोकांची कार्यक्षमता कमी होऊन आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो आहे.

**८) भांडवल संचय :-**

आर्थिक विकासासाठी भांडवल हा घटक महत्वाचा असतो. भारतात भांडवल संचयाचा दर कमी

असल्यामुळे पुनर्गुंतवणूकीचा दरही कमी आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीबरोबर लोकसंख्या वाढ होत असल्यामुळे दरडोई उत्पन्न वेगाने वाढताना दिसत नाही. परिणामी लोकांची बचतक्षमता कमी आहे. यामुळे भांडवल संचयावर प्रतिकूल परिणाम होतो.

**९) स्त्री श्रम शक्तीचा अपव्यय :-**

भारतात जननदर उच्च आहे. सर्वसाधारणपणे प्रतिवर्षी १ कोटी ६० लाख स्त्रियांची प्रसूती होते. त्यामुळे प्रसुतीकाळात स्त्रिया काम करू शकत नाहीत. त्यांची श्रमशक्ती वाया जाते. मानवी संसाधनांचा हा अपव्यय मानवी विकासाला पायबंध घालतो.

**१०) लोकसंख्या वाढ व शाश्वत विकास :-**

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमुळे वेगवेगळ्या प्रकारची साधन संपत्ती मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. भविष्यकाळातील पिढीला कोळसा, लोखंड, पेट्रोलियम पदार्थ यासारख्या मर्यादीत प्रमाणावर असलेल्या नैसर्गिक साधन सामुग्रीचा तुटवडा भासू नये यासाठी पर्यायी धोरण स्विकारावे लागते. परंतु याचवेळी वाढत्या लोकसंख्येचे पोषण करण्यासाठी या नैसर्गिक साधन संपत्तीचा बेसुमार वापर करावा लागत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. थोडक्यात शाश्वत विकासाच्या संकल्पनेत अपेक्षित असलेला मानवी विकास निर्देशांक सुधारण्याचे उद्दीष्ट गाठताना देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण करून पर्यावरण समतोल राखणे कठीण बनले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न:**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. अर्थतज्ञ ------ यांच्या मते विकसनशील देशात मोठी आणि वाढती लोकसंख्या त्या देशाच्या विकासाला लाभदायक असते.

(१) कोलीन क्लार्क व एव्हरेस्ट हेगिन (२) अमर्त्य सेन

(३) केन्स (४) यापैकी नाही

२. भारतात लोकसंख्या वाढीचा वेग देशाच्या राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न वाढीपेक्षा ------ राहीला आहे.

(१) कमी (२) जास्त (३) सारखा (४) यापैकी नाही

३. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीचा दर ----------------- राहीला आहे.

(१) जास्त (२) कमी (३) समान (४) यापैकी नाही

**४.२.४ भारताचे लोकसंख्या विषयक धोरण :**

भारताची सध्याची लोकसंख्या आकाराने खूपच मोठी आहे आणि लोकसंख्या वाढीचा वेग मोठा असल्यामुळे भारतात लोकसंख्येचा प्रश्न गंभीर बनला आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांशी लोकसंख्या वाढीच्या प्रश्नाचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे देशातील आर्थिक व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी

लोकसंख्येचा प्रश्न सोडविणे आवश्यक ठरले आहे. यासाठी भारत सरकारने लोकसंख्या विषयक धोरण आखून त्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते.

लोकसंख्याविषयक धोरण म्हणजे लोकसंख्येचा आकार व रचना याविषयी सरकारने आखलेले धोरण होय. सामान्यत: देशातील आर्थिक विकासाला भरीव मदत व्हावी. यासाठी लोकसंख्येचा आकार व रचना यावर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने आवश्यक व योग्य अशा लोकसंख्यावाढीच्या दराची नीती आखणे म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.

**व्याख्या :-**

**१) स्पेगलर व डंकन-** 'लोकसंख्येचा आकार आणि रचना याबाबत सरकारने निश्चित केलेल्या उद्दिष्टांचा समूह व ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उपयोगात आणलेली साधने म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.'

**२) थॉमसन आणि लेविस -** 'एखाद्या लोकसंख्या समूहाची स्वत:ची संख्या आणि वैशिष्ट्ये नियंत्रित ठेवण्यासाठी अंमलात आणली जाणारी हेतूपूरस्सर योजना म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.'

थोडक्यात लोकसंख्या धोरणात लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यावर भर दिला जातो. शिवाय लोकांचे आयुर्मान वाढविण्यासाठी ठरविलेली उद्दिष्ट्ये व आखलेल्या योजनांचा कार्यक्रम म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.

**लोकसंख्याविषयक धोरणाची उद्दिष्ट्ये :**

१) देशातील जननदरात घट घडवून आणणे.

२) लोकसंख्या वाढीचा वेग कमी करणे.

३) लोकांच्या गुणवत्तेत व कार्यक्षमतेत सुधारणा घडवून आणणे.

४) आर्थिक विकासाचा वेग वाढविणे.

५) मृत्यूदरात घट घडवून आणणे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील लोकसंख्याविषयक धोरणाची वैशिष्ट्ये :**

**१) कुटुंबनियोजन कार्यक्रम -**

कुटुंबनियोजन कार्यक्रम राबविणारा भारत हा पहिला देश आहे. सन १९५२ पासून कुटुंबनियोजन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रारंभी जननदर कमी करण्यासाठी उपाय योजण्यात आले. तद्नंतर माता-बालक स्वास्थ्य, पोषण आहार व कुटुंबकल्याण या बाबींचा समावेश करण्यात आला.

**२) राष्ट्रीय आणीबाणीचा कालावधी (१९७५-७७) -**

भारतात १९७५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या आणीबाणीच्या काळात सरकारने संजयगांधीचा चार कलमी कार्यक्रम आणि इंदिरा गांधीच्या २० कलमी कार्यक्रमाअंतर्गत लोकसंख्या नियंत्रणाचा सक्तीचा कार्यक्रम

राबविला. त्यामध्ये निर्बिजीकरणाच्या शस्त्रक्रिया, आणीबाणीच्या दोन वर्षात ६.२ दशलक्ष पुरूष नसबंदी करण्यात आल्या. कुटुंबनियोजनाचे उद्दिष्ट १००% पेक्षा जास्त पूर्ण करण्यात आले.

**३) कुटुंबकल्याण कार्यक्रम –**

भारत सरकारने कुटुंबकल्याण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागावर या कार्यक्रमाचे केंद्रीकरण करण्याचे ठरविण्यात आले. कुटुंबकल्याण कार्यक्रमाची इतर आरोग्य योजनांशी सांगड घातली. 'लहान कुटुंब, सुखी कुटुंब' या विषयी जनजागृती केली. मुर्लीच्या शिक्षणाला महत्व देण्यात आले. मुलामुलींचे विवाहाचे वय अनुक्रमे २१ व १८ वर्षे निश्चित करण्यात आले. तसेच रेडिओ, दूरदर्शन, मासिके, वर्तमानपत्रे इ.वर या कार्यक्रमाचा प्रचार करण्यात आला.

**४) सन १९८१ ते सन २००० पर्यंतचे लोकसंख्याविषयक धोरण :**

या काळात नियोजन मंडळाने नियुक्त केलेल्या कार्यकारी गटाने लोकसंख्येबाबत पुढीलप्रमाणे उद्दिष्टे सुचविली यात प्रामुख्याने कुटुंबाचे सरासरी आकारमान २ ते ३ मूलापर्यंत ठेवणे, जननदर २१ पर्यंत कमी करणे, प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करणे, सरासरी मृत्यूदरात घट घडवून आणणे, माता व अर्भक दरात घट घडविणे, तसेच परिचारिका प्रशिक्षण राबविणे इ.चा समावेश होतो.

या बरोबरच शासकीय संस्था, सामाजिक मंडळे, शाळा-महाविद्यालये, राष्ट्रीय सेवा योजना यांच्यामार्फत संतती नियमनाचा प्रचार करण्याचा कार्यक्रम राबविला.

**सन २००० मधील भारताचे लोकसंख्याविषयक धोरण :-**

१५ फेब्रुवारी सन २००० रोजी भारत सरकारने नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहिर केले. या धोरणात आरोग्यविषयक सेवांची सुलभ उपलब्धता, संतती नियमन, माता आरोग्य, अर्भक मृत्यूदर कमी करणे यासारख्या तरतूदी करण्यात आल्या. दोन मुलांचे कुटुंब आणि सन २०४६ पर्यत लोकसंख्या स्थिर करणे ही प्रमुख उद्दिष्टे ठेवून या धोरणाची आखणी करण्यात आली. कारण भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्याकरिता आणि उत्पन्नाचे समान वितरण करण्यासाठी लोकसंख्या स्थैर्य आवश्यक आहे. हे ओळखून धोरण जाहीर करण्यात आले.

**धोरणाची उद्दिष्टे :-**

सन २००० मधील धोरणांच्या उद्दिष्टाचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१) **अल्पकालीन उद्दिष्टे :-** यामध्ये नागरिकांना आरोग्याच्या सोई पुरविणे, संतती नियमनाची साधने पुरविणे, प्रजनन क्षम वयोगटातील स्त्रीया आणि मुलांना आरोग्याच्या सेवा पुरविणे, तसेच सुरक्षित प्रसुतीच्या सोई देणे इ. चा समावेश होतो.

२) **मध्यमकालीन उद्द्दिष्टे :-** सन २०१० पर्यंत एकूण प्रजनन (Total Fertility Rate) दर २०१ इतका कमी करणे.

३) **दीर्घ मुदतीची उद्दिष्टे :-** सन २०४६ पर्यत भारतीय लोकसंख्या नियंत्रीत करून लोकसंख्या स्थिर करणे.

**लोकसंख्या धोरणाची लक्ष्ये :-**

सन २००० च्या लोकसंख्या धोरणात पुढील लक्ष्ये ठेवण्यात आली.

१) प्रतिलाख जन्मामागे माता मृत्यूदर १०० पेक्षा कमी करणे.

२) मुलींचे विवाहाचे किमान वय १८ वर्षे ठरविण्यात आले.

३) १००० बालकामध्ये अर्भक मृत्यूदर ३० पेक्षा कमी करणे.

४) सुरक्षित गर्भपाताच्या सोईंचा विस्तार करणे.

५) बालकांना लसीकरण मोहिमे अंतर्गत सर्व प्रकारच्या रोगप्रतिबंधक लसींची सोय करणे.

६) जन्म, मृत्यू, विवाह इ.च्या १०० % नोंदी करणे.

७) दोन अपत्यांचे कुटुंब यासाठी प्रोत्साहन देणे.

८) कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिक लोकाभिमुख बनविणे.

**लोकसंख्या धोरणाची वैशिष्ट्ये :-**

**१) सन २०४६ पर्यंत लोकसंख्या स्थिर करणे :** सन २००० च्या लोकसंख्या धोरणाचे हे एक महत्वाचे वैशिष्ट आहे. देशातील शुद्ध जननदर कमी करून सदृढ माता बालकांची संख्या वाढविण्यावर या धोरणात भर दिला आहे. देशातील लोकसंख्या वाढीचा वेग कमी करून लोकसंख्येत स्थैर्य प्रस्थापित करणे साठी ग्रामपंचायत, निमसरकारी संस्था, खाजगी डॉक्टर्स इ.चे सहाय्य घेतले जाईल.

**२) ग्रामीण भागात आरोग्याच्या सोई वाढविणे :** ग्रामीण भागात आरोग्यविषयक सोईची असलेली कमतरता दूर करून प्रसुतिविषयक सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

**३) विवाह, जन्ममृत्यूच्या नोंदी** : या धोरणानुसार विवाह व जन्म आणि मृत्यूच्या नोंदी काटेकोरपणे केल्या जाणार आहेत. प्रसुतीकाळात मृत्यू पावणाऱ्या महिलांची नोंद घेतली जाईल.

**४) महिलांना सकस आहार पुरविणे** : महिलांना पोष्टीक व सकस आहार मिळत नाही. तसेच अल्पवयीन विवाह, निरक्षरता, अंधःश्रद्धा, कुपोषण आणि लहान वयात प्रजननास सुरवात इ. मुळे त्यांचे आरोग्य चांगले राहत नाही. यासाठी त्यांना सकस आहार उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

**५) बालमृत्यू कमी करणे** : या धोरणात बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यावर भर देण्यात आला. गरोदर महिलांना प्रतिबंधात्मक लस पुरविण्याचे ठरविण्यात आले.

**६) राष्ट्रीय लोकसंख्या समिती** : या धोरणात राष्ट्रीय लोकसंख्या समिती स्थापन करण्यात आली. देशाचे पंतप्रधान या समितीचे अध्यक्ष असतील. राज्यपातळीवरही या पद्धतीच्या समित्या कार्यरत असतील.

**लोकसंख्या धोरणाचे मूल्यमापन :-**

**सन २००० मधील लोकसंख्या धोरणाचे टीकात्मक परिक्षण पुढीलप्रमाणे करता येईल.**

१) डॉ. नीना पुरी (भारतीय कुटुंबनियोजन संघटनेच्या अध्यक्ष)

यांच्या मते हे धोरण कुटुंब नियोजनाच्या बाबतीत पुरूषांच्या सहभागाबाबत सौम्य असल्याची टीका केली आहे.

२) या धोरणाने कुटुंब मर्यादित ठेवण्याची जबाबदारी प्रामुख्याने स्त्रीयांवर सोपविण्यात आली आहे. अशी टीका केली जाते.

३) कुटुंबनियोजन कार्यक्रमासाठी निधीची तरतूद करण्यात आली परंतू पुरेशा प्रमाणात खर्च न झाल्याने कुटुंबनियोजन कार्यक्रमाला अपयश आले अशी टीका केली जाते.

४) कुटुंब नियोजन कार्यक्रम लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या प्रयत्नांना यश आले नाही. त्यामुळे हा कार्यक्रम सरकारचा कार्यक्रम बनला.

५) केंद्र सरकारने आखलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात देशातील अनेक राज्यांना अपयश आले. त्यामुळे हे धोरण केंद्र सरकारचेच राहिले. थोडक्यात लोकसंख्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक होते. तसेच या कार्यक्रमामध्ये लोकसहभाग महत्वाचा होता. परंतू या बाबतीत अपयश आल्याने लोकसंख्या धोरण प्रभावी ठरले नाही.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :-**

**योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

१) लोकसंख्येचा ........... याविषयी सरकारने आखलेले धोरण म्हणजे लोकसंख्याविषयक धोरण होय.

(अ) आकार व रचना (ब) घनता (क) साक्षरता (ड) यापैकी नाही.

२) लोकसंख्या धोरणात लोकसंख्या ....................................... कमी करण्यावर भर असतो.

(अ) साक्षरता दर (ब) निरक्षरता दर (क) वाढीचा दर (ड) यापैकी नाही.

३) .................................. रोजी भारत सरकारने नवीन राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर केले.

(अ) १५ ऑगस्ट १९४७ (ब) १ जानेवारी १९५० (क) १५ फेब्रुवारी २००० (ड) यापैकी नाही.

## ४.३ सारांश :

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात त्या देशातील उपलब्ध असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती आणि लोकसंख्या हे घटक महत्वाचे असतात. भारतात हे दोन्ही घटक विपूल प्रमाणात उपलब्ध आहेत. तथापि भारतातील नैसर्गिक साधन संपत्तीच्या तुलनेने भारताची लोकसंख्या अतिरिक्त आहे. लोकसंख्येच्या आकारमानाचा विचार करता भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो. स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकसंख्येचे आकारमान वेगाने वाढत गेलेले दिसून येते. जगातील इतर देशांचा विचार करता भारतीय लोकसंख्या वाढीचा दर अद्यापही उच्च असलेला

दिसून येतो. भारतीय लोकसंख्या वेगाने वाढ होण्यास जबाबदार असलेल्या कारणांमध्ये उच्च जननदर आणि वेगाने घटत असलेला मृत्यूदर, विवाहाची सार्वत्रिक प्रथा, बालविवाहाची पद्धत, भारताचे हवामान, बहुपत्नीत्व, निरक्षरता, एकत्र कुटुंबपद्धती, अंधःश्रद्धा, सामाजिक जागृतीचा अभाव, आरोग्याच्या सोई-सुविधात वाढ तसेच कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे अपयश इ. विविध कारणे असलेली दिसून येतात.

भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये विचारात घेता भारतात कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे भारताची ओळख सर्वाधिक तरूणांचा देश अशी बनलेली दिसून येते. भारतीय लोकसंख्येची ग्रामीण -शहरी विभागणी अभ्यासता अद्यापही सत्तर टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करते. भारतात शहरीकरणाचा दर कमी आहे. लोकसंख्येची क्षेत्रिय विभागणी विचारात घेता मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात काम करते आहे. उद्योग क्षेत्राच्या मंद वाढीमुळे औद्योगिक क्षेत्रात तुलनेने कमी काम करताना दिसते. अर्थात अलिकडील काळात सेवा क्षेत्राचा विस्तार होऊ लागल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. भारतातील लोकसंख्येची घनता दिवसेंदिवस वाढत असून विशेषत: स्वातंत्र्यानंतर घनता वेगाने वाढली आहे. तथापि भारतात सर्वत्र ती एकसारखी नसून दिल्लीमध्ये ती सर्वाधिक आहे. तर अरूणाचल प्रदेशात ती सर्वात कमी असलेली दिसून येते. लोकसंख्येची घनता वाढत असल्याने सामाजिक मुलभूत सुविधांवर अतिरिक्त ताण येतो आहे. भारतीय लोकसंख्येचे सरासरी आयुर्मान आणि साक्षरता प्रमाण स्वातंत्र्योत्तर काळात वाढले आहे. मात्र भारतातील स्त्रियांचे सरासरी आयुर्मान आणि साक्षरता प्रमाण पुरूषांच्या तुलनेत अद्यापही कमी असलेले दिसून येते. त्यामध्ये वाढ घडून येणे आवश्यक आहे.

लोकसंख्या वाढीचा भारताच्या आर्थिक विकासावर बहुतांशी प्रतिकूल परिणाम होतांना दिसून येतो. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊनही लोकांचे दरडोई उत्पन्न त्याप्रमाणात वाढलेले दिसून येत नाही. लोकसंख्येचा शेतीवरील अतिरिक्त भार, वाढती बेरोजगारी, अनुत्पादक उपभोक्त्यांची वाढ, मुलभूत सोई-सुविधांवर ताण निर्माण झाला आहे. भांडवल निर्मितीच्या दरावर प्रतिकूल परिणाम, स्त्रियांच्या श्रमशक्तीचा अपव्यय, दारिद्र्यात वाढ इ. गंभीर परिणाम होत असलेले दिसून येतात. परिणामी भारताच्या आर्थिक विकासात अडसर निर्माण होतो आहे. भारताची लोकसंख्या अशीच वाढत राहीली तर नियोजनामुळे मिळणारे फायदे भारतीय समाजाला मिळणार नाहीत. यासाठी भारत सरकार लोकसंख्या विषयक धोरण राबविताना दिसते.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात श्री. आर. डी. कर्वे, म. गांधी, पं नेहरू, रविंद्रनाथ टागोर यांनी लोकसंख्या नियोजनाबाबत कार्य केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या सुरवातीपासूनच स्वतंत्र असे लोकसंख्याविषयक धोरण आखले आणि त्याची अंमलबजावणी केलेली दिसून येते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत लोकसंख्या नियंत्रणासाठी कालबद्ध कार्यक्रम ठरवून खर्चाची तरतूद केली आहे. तथापि लोकसंख्या नियंत्रणात भारत सरकारला फारसे यश आलेले नाही. यासाठी सरकार बरोबरच देशातील स्वयंसेवी संस्था, शिक्षण संस्था, खाजगी उद्योग इ. नी सामाजिक कल्याणाच्या हेतूने हा कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने राबविणे आवश्यक आहे. असे झाले तर लोकसंख्या वाढ रोखणे शक्य होऊन भारताची आर्थिक प्रगती वेगाने घडून येईल.

**४.४ पारिभाषिक शब्दांचा अर्थ :**

१) शिरगणती – जनगणना किंवा लोकसंख्येची मोजदाद करणे.

२) नैसर्गिक संसाधने – मानवी जीवनासाठी आवश्यक असणारी आणि निसर्गत: विनामूल्य उपलब्ध असणारी साधने.

३) अनुत्पादक – उत्पादन कार्यात सहभागी नसणारे.

४) दरडोई उत्पन्न – देशातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी उत्पन्न.

५) पंचवार्षिक योजना – आर्थिक विकासासाठी सरकारने पाच वर्षाच्या काळासाठी तयार केलेली योजना.

**४.५ स्वयंअध्यन प्रश्नांची उत्तरे :**

**४.२.१ –** i) 3

ii) 4

iii) 2

iv) 1

**४.२.२ –** i) 3

ii) 1

iii) 3

iv) 3

**४.२.३ –** i) 1

ii) 2

iii) 1

**४.२.४ –** i) 1

ii) 3

iii) 3

**४.६ सरावासाठी प्रश्न :**

**(अ) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) भारतातील वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येची कारणे स्पष्ट करा.

२) भारतीय लोकसंख्येची ठळक वैशिष्ट्ये लिहा.

३) भारतीय लोकसंख्या वाढीचा आर्थिक विकासावरील परिणाम स्पष्ट करा.

४) इ.स २००० मधील भारताचे धोरण स्पष्ट करा.

**(ब) टीपा लिहा :**

१) जन्मदर व मृत्यूदर

२) लोकसंख्येची क्षेत्रिय विभागणी

३) लोकसंख्येचे आकारमान

४) लोकसंख्येची ग्रामीण-शहरी विभागणी

५) स्त्री-पुरूष प्रमाण

६) लोकसंख्या वाढ आणि आर्थिक विकास

७) भारताचे लोकसंख्याविषयक धोरण

**४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :**


i) Ruddar Datt & K. P. M. Sundharam (2004) Indian Ecomomy S. Chand & Company Ltd, Ram Nager New Delhi 110055

ii) डॉ. घाटगे, एल. एन. आणि डॉ. वावरे, ए. के. (२०१०) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन १३१२, शिवाजीनगर, पुणे - ४११००५

iii) ए. बी. सवदी आणि पी. एस. कोळेकर, १९९५ मानवी लोकसंख्या भूगोल निराली प्रकाशन ४१ बुधवार पेठ, पुणे - ४११००५

iv) Census of India - 2011 Govt. of India

v) डॉ. देसाई व डॉ. सौ. भालेराव १९९८ भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन ४१, बुधवार पेठ, पुणे - ४११००५ बी. ए. भाग - १ : भारतीय अर्थव्यवस्था-३.


***

# घटक – १
# शेतीविषयक धोरणे व कामगिरी
# (Policies and Performance in Agriclture)

अनुक्रम


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका

१.२.२ कृषी उत्पादकता : संकल्पना, अल्प कृषी उत्पादकतेची कारणे आणि त्यावरील उपाय

१.२.३ हरितक्रांती : कारणे, यश आणि अपयश, दुसऱ्या हरितक्रांतीची गरज

१.२.४ कृषीविषयक किंमती व खरेदी (Procurement)

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


**१.० उद्दिष्ट्ये : (Objectives)**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका समजून येईल.

२) भारतीय शेतीतील अल्प उत्पादकतेची संकल्पना, कारणे व त्यावरील उपाय स्पष्ट करता येतील.

३) भारतीय हरितक्रांतीची कारणे समजून येतील

४) भारतीय हरितक्रांतीचे यश व अपशय समजून येईल

५) दुसऱ्या हरितक्रांतीचे यश व अपयश समजून येईल

६) कृषी विषयक किंमती व खरेदी लक्षात येतील.

## १.१ प्रस्तावना : (Introduction)

कृषी क्षेत्र देशाच्या ग्रमाणी भागातील उपजिविकेचे एक प्रमुख साधन आहे. म्हणून कृषी व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख व्यवसाय आहे. देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील कृषी क्षेत्राचा हिस्सा उत्तरोत्तर घटत गेला असला तरी देशातील ६४% लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेती व तत्सम व्यवसायावर अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राचा हिस्सा सन १९५१ मध्ये ५५.१ टक्के होता तो सन २०१८ मध्ये १३.५% पर्यंत घटला आहे. ही घट कृषी क्षेत्राचे महत्त्व कमी झाल्याने किंवा कृषीविषयक धोरणाचा परिणाम म्हणून नाही तर उद्योग, सेवा क्षेत्राचे उत्पादन आणि बिगर कृषीक्षेत्राच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख आर्थिक क्षेत्र असून प्रचंड प्रमाणात रोजगार निर्माण करणारे स्त्रोत आहे. एक विकसनशील राष्ट्र म्हणून शेती व्यवसायाच्या माध्यमातून जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी धोरणात्मक तरतुदीची गरज आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला उर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी व देशाला आर्थिक महासत्ता बनविण्यासाठी शेती क्षेत्राच्या शाश्वत विकासाची अत्यंत गरज आहे.

## १.२ विषय विवेचन : (Subject Description)

प्रस्तूत घटकामध्ये आपण भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका, उत्पादकतेची संकल्पना भारतीय कृषीच्या अल्प उत्पादकतेची कारणे व त्यावरील उपाय योजना यांची सविस्तर चर्चा करणार आहोत. तसेच भारतातील हरितक्रांतीचे यश व अपयश याविषयी चर्चा करून दुसऱ्या हरितक्रांतीची गरज अभ्यासणार आहोत. याशिवाय कृषी विषयक किंमती व खरेदी याचाही अभ्यास करणार आहोत. जगातील सुप्त विकसनशील अर्थव्यवस्थांपैकी भारतीय अर्थव्यवस्था ही एक आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा दर सातत्याने ६ ते ७% राहिला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक मंदीपासून कमी झळ पोहचल्याने भारतीय अर्थव्यवस्था प्रबळ अर्थव्यवस्था मानली जाते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारत सरकारचे वित्तीय धोरण व भारतातील कृषीची बदलती भूमिका होय.

### १.२.१ भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका :

प्राचिन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. सन १९८० मध्ये भारतात शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या ५५% होती, आज ६४% लोकसंख्या शेती व शेती व्यवसायावर अवलंबून आहे. एक विकसनशील देश म्हणून शेती व्यवसायाच्या माध्यमातून जलदगतीने औद्योगिकरण व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी शेतीक्षेत्र उपयुक्त आहे. २०२० मध्ये आर्थिक महासत्ता बनण्याच्या दृष्टीने भारतताने शेतीक्षेत्राकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी (३२.९ कोटी हेक्टर) ९२.७% म्हणजेच ३०.५ कोटी हेक्टर जमिनीचे मापन करण्यात आले. त्यापैकी लागवडीखालील

क्षेत्र १४.२ कोटी हेक्टर इतके आहे. देशाच्या एकूण उपलब्ध जमिनीपैकी ४६.४% जमिनीतून विविध प्रकारची पिके घेतली जातात. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका आपणास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीला सन १९५०-५१ मध्ये राष्ट्राच्या एकूण उत्पान्नात शेती क्षेत्राचा हिस्सा ५६.५% इतका होता. पंचवार्षिक योजना काळात कृषी विकासाबरोबरच कृषी आधारीत उद्योग, व्यवसायामूळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला, मात्र सन १९७०-७१ ला शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ४५.९% इतका राहिला. त्यामध्ये घट होवून सन १९९०-९१ मध्ये तो २४.७% इतका झाला. तर सन २०१०-११ मध्ये भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा हा १४.५% पर्यंत कमी झाला. दूसऱ्या बाजूला उद्योग व सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मात्र वाढतच चालला आहे. कारण मुख्यत्वे आर्थिक सुधारणांच्या काळात उद्योग व सेवा क्षेत्रांचा विकास दर वेगाने वाढत आहे. सद्या शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा घटत चालला आहे.

**२) रोजगार निर्मिती :-**

विसाव्या शतकाचा विचार केल्यास भारतात शेती व शेतीपुरक व्यवसायात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ७० ते ८०% च्या दरम्यान होते. तर सध्या हे प्रमाण ६४% आहे. शेती व्यवसायातून भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वाधिक रोजगार पुरविला जातो. त्यामूळे शेतीचे अर्थव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सन १९५०-५१ मध्ये शेती क्षेत्रांतून ७०% पर्यंत रोजगार पुरविला जात होता. सन २०१०-११ पर्यंत हे प्रमाण ४५.५% पर्यंत कमी झालेले आहे. कारण स्वातंत्र्योत्तर काळात बिगर कृषी क्षेत्राची झालेली वाढ ही मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यास उपयुक्त ठरली नाही. परिणामी आज ग्रामीण भारतात सर्वाधिक लोक शेती व शेती आधारीत व्यवसायावर अवलंबून आहेत. भारताशेजारील पाकिस्तान-५७%, इंडोनेशिया ५२%, इजिप्तामध्ये ४२%, इंग्लंडमध्ये २%, अमेरिकेत ३%, जपानमध्ये ७% तर ऑस्ट्रेलियामध्ये ६% लोकशेती क्षेत्रांशी संबंधीत रोजगार करतात.

**३) औद्योगिक विकासातील योगदान :-**

भारताच्या औद्योगिक क्षेत्राच्या विकासातही शेतीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कापड गिरण्या, साखर, ताग गिरण्या, डेअरी उद्योग, तेल, वनस्पती, कागद, कातडी, तंबाखू, प्रक्रिया, चहा, कॉफी, कोको व रबर इत्यादी उद्योग शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असणारा कच्चा माल मुख्यत्वे शेती क्षेत्रातून प्राप्त होतो. थोडक्यात औद्योगिकीकरणाचा वेग हा शेती विकासावर अवलंबून असतो.

### ४) आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा :-

गेल्या अनेक वर्षापासून भारताच्या कृषी आधारित निर्यातीमध्ये चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, तंबाखू, काजूगर, वनस्पती तेल यांचा समावेश आहे. गेल्या दोन दशकात फळे व फूलांची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. देशाच्या एकूण आंतरराष्ट्रीय व्यापारात कृषी क्षेत्राचा हिस्सा हा ७० ते ७५% च्या दरम्यान होता अशा प्रकारे कृषी क्षेत्रावरील अवलंबित्व हे अविकसीत पणाचे लक्षण दर्शविते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय व्यापारातील शेतीचा हिस्सा घटून उद्योग व सेवा क्षेत्राच्या हिस्स्यात वाढ होणे अपेक्षित असते. सन १९५०-५१ मध्ये कृषी क्षेत्राचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा ७०% होता. सन १९६०-६१ मध्ये तो ४४.२% पर्यंत घटला. सन १९८०-८१ मध्ये ३०.७% पर्यंत कमी झाला. सन १९९०-९१ मध्ये यामध्ये १८.५% पर्यंत घट झाली, तर सन २००८-०९ मध्ये कृषी क्षेत्राचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा ९.१% इतका कमी होता.

### ५) वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज पूर्ण करणे :-

भारताचा लोकसंख्या वाढीचा दर अधिक असल्याने वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याला मागणी अधिक राहते. अशावेळी जर कृषी उत्पादकता व उत्पादन वाढले तर राष्ट्राला मोठ्या संकटाला सामोरे जावे लागते. जागतील अनेक विकसनशील राष्ट्रांमध्ये अन्नधान्याची टंचाई असल्याने त्याची आयात करावी लागत आहे. भारताचा विचार करता सन २००४ -०५ पर्यंत देशांतर्गत अन्नधान्याची मागणी २०७ दशलक्ष टनांपासून ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी २३५.०४ दशलक्ष टनापर्यंत वाढली तर २०२०-२१ पर्यंत ती २८०.६ दशलक्ष टनांपर्यंत वाढणयाचा अंदाज आहे. ही वाढती अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी ११ व्या पंचवार्षिक योजना काळात अन्नधान्य उत्पादन वृद्धीचा दर १.८६% तर त्यानंतर वार्षिक २%पेक्षा अधिक असण्याची आवश्यकता आहे. भारतात सन १९९७-९८ ते २००६-०७ या कालावधीत अन्नधान्य उत्पादन वृद्धीचा दर हा फक्त ०.४८% इतका अल्प होता.

### ६) भांडवल निर्मितीस योगदान :-

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भांडवल निर्मितीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात भांडवल निर्मितीत कृषी क्षेत्रातून अत्यंत महत्त्वपूर्ण अशी भर घातली जाते. विकासाच्या प्रारंभीच्या काळात कृषी क्षेत्र भांडवल निर्मितीत कमी पडल्यास विकास मागे पडू शकतो. जगातील अनेक राष्ट्रांनी शेती अधिक्याची गुंतवणूक करून आपला आर्थिक विकास केला आहे. उदा. जपान, चीन, रशिया इत्यादी. कृषी क्षेत्रातून अधिक्य निर्माण करावयाचे असल्यास शेती क्षेत्राची उत्पादकता वाढविणे ही पूर्व अट ठरते.

### ७) सरकारी महसूलातील हिस्सा :-

भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत, नगरपालिका,

महानगर पालिका, राज्यसरकार व केंद्रसरकार या संस्था लोककल्याणकारी कार्ये करतात. या संस्थाना आपला खर्च भागविण्यासाठी शेती क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळते. उदा. सिंचनकर, उत्पन्नकर, विक्रीकर जमिन महसूल तसेच शेतमालावरील जकात इत्यादी. त्याचबरोबर शेती आधारीत उद्योगातील उत्पादनावर प्राप्तीकर, शिक्षणकर, निर्यातकर तसेच स्टँप ड्यूटी व रजिस्ट्रेशन फी पासूनचे उत्पन्न सरकारला मिळते म्हणजेच सरकारी तिजोरीत शेती क्षेत्रापासून मोठया प्रमाणात भर घातली जाते.

**८) सर्वसाधारण किंमत पातळीत स्थैर्य :-**

अर्थव्यवस्थेतील किंमत पातळी आणि शेतमालाच्या किंमती यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. त्यामुळे शेतमाल किंमतीतील बदलांचा सर्वसाधारण किंमत पातळीवर परिणाम होतो. भारतासारख्या देशातील व्यक्तींचा एकूण उत्पन्नापैकी ६०% ते ७०% हिस्सा अन्नधान्य खरेदीवर खर्च होतो. भारतीय शेती ही मानसूनवर आधारित असल्याने कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढउतार होतात. परिणामी शेतमालाच्या किंमतीही अस्थिर होतात. देशातील भाववाढीस कारणीभूत असलेल्या अनेक घटकांपैकी शासनाचे अयोग्य धोरण, तुटीचा अर्थ भरणा, शेतमाल साठविण्यासाठीच्या सोयींचा अभाव, आधार किंमती ठरविण्यातील दिरंगाई, वाहतूक सोयींची अपुरी व्यवस्था इत्यादी कारणानींही भाववाढ होते. यासाठी सर्वसाधारण किंमत पातळीत स्थिरता आणण्यासाठी शेतमाल किंमतीत स्थिरता राहण्याची आवश्यकता आहे.

**९) देशांतर्गत व्यापार व वाहतूक व्यावसायाचा विकास :-**

देशांतर्गत शेती उत्पादनाच्या व्यापारास अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतमालामध्ये अन्नधान्य, फळे, फुले, भाजीपाला, कापूस, तंबाखू, साखर, खाद्यतेल यासारख्या उपभोग्य वस्तूंच्या व्यापारांचे तसेच शेती अवजारे, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादी शेती आदानांच्या व्यापाराचे प्रमाण अधिक दिसून येते. शेती आदाने व उत्पादने यांची वाहतूक देशात मुख्यत्वे रस्ते व रेल्वेमार्गाने होत असते. परिणामी देशांतर्गत व्यापार आणि वाहतूक विकासासाठी शेतीला अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**१०) पशुधनाचा विकास :-**

भारताच्या ग्रामीण भागात शेती व्यवसायास पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, मेंढी पालन, बकरी पालन, वराह पालन, कुक्कुट पालन, मत्स्य व्यवसाय व अलिकडील काळात इमू पालन व बदक पालन यासारखे व्यवसाय केले जातात. या पूरक व्यवसायांचा विकास हा मुख्यत्वे शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो. शेतकरी वर्गाला उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्त्रोत म्हणून पशूधन महत्त्वाचे ठरते. यासाठी आवश्यक असणारा सर्व प्रकारचा चारा हा शेतीतून उपलब्ध होतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती क्षेत्राचा हिस्सा ----------------

अ) घटत आहे. ब) वाढत आहे क) स्थिर आहे ड) वरीलपैकी नाही.

२) भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ------------ क्षेत्राने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती केली आहे.

अ) शेती ब) उद्योग क) सेवा ड) वरीलपैकी नाही.

३) भारताच्या एकूण निर्यातीमध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा -------------- आहे.

अ) ५०% ब) ५% क) १५% ड) २५%

४) शेतीक्षेत्रावर आधारीत उद्योग --------------- आहे.

अ) कापड ब) साखर क) कागद ड) वरील सर्व

५) शेतमालाच्या किंमती सातत्याने --------------- आहेत.

अ) स्थिर ब) वाढत्या क) अस्थिर ड) यापैकी नाही

**१.२.२ कृषी उत्पादकता : संकल्पना, अल्प उत्पादकतेची कारणे व त्यावरील उपाय :-**

कृषी उत्पादकता म्हणजे कृषी आदाने व कृषी प्रदाने यांच्यातील प्रमाण होय. एखाद्या उत्पादनाच्या आदानांपासून किती प्रदान किंवा उत्पादन निर्माण झाले हे वजन व आकारामानानुसार मोजमाप करणे कठिण असते. म्हणून उत्पादन हे अंतिम उत्पादनाच्या बाजारमूल्यानुसार मोजणे योग्य ठरते. यामध्ये मध्यस्थ उत्पादने वगळली जातात उदा. मांस उद्योगासाठी लागणारे धान्य, चारा उत्पादनमूल्य हे विविध आदानांशी तुलनात्मक मोजले जाते. श्रम व भूमि यांचा विचार करुन उत्पादकता मोजली जाते. यास उत्पादकतेचे अंशत: मापन म्हणतात. कृषी उत्पादकता एकूण घटक उत्पादकता म्हणून मोजले जाते. ही कृषी उत्पादकता मोजण्याच्या पद्धतीची तुलना कृषी आदानाच्या निर्देशांकाची कृषी उत्पादनाच्या निर्देशांकाशी केली जाते. कृषी उत्पादकतेत बदल घडवून आणणारे घटक ओळखणे कठिण असते. साधारणपणे एकूण घटक उत्पादकतेत तंत्रवैज्ञानिक सुधारणेचे योगदान महत्त्वाचे असते. एखाद्या प्रदेशातील शेतीची उत्पादकता अनेक कारणांनी महत्त्वाची असते. शेतीच्या उत्पादकतेतील वाढीमुळे उत्पादन वृद्धी होते. त्याचा परिणाम कृषी विपणन, उत्पन्न वितरण, बचत व श्रम स्थलांतरावर होतो. उत्पादकता वाढ हे दुर्मिळ संसाधनाच्या योग्य वितरणाचे निर्देशक आहे. शेतकरी नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन अन्नधान्य उत्पादकता वाढवितात त्याचा परिणाम त्यांचे कल्याण होण्यात होते.

*** भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे –**

**(Causes of Low Productivity of Agriculture in India)**

भारतीय शेती व्यवसायाची उत्पादकता प्रगत देशांच्या तुलनेने कमी आहे. या अल्प उत्पादकतेची कारणे प्रामुख्याने तीन प्रकारची आहेत. भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेच्या कारणांचे विवेचन आपणास

पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ) सर्वसाधारण कारणे –**

भारतीय शेतीची उत्पादकता अल्प असण्याची कारणे ही देशातील सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणात्मक घटकांमधून निर्माण झाली आहेत. ही कारणे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सामाजिक वातावरण –**

भारताचे ग्रामीण सामाजिक वातावरण शेती विकासास अनुकूल नाही. भारतीय शेतकरी हा निरक्षर, अंधश्रद्धाळू, परंपरावादी व जातीसंस्थेच्या बंधनात अडकलेला असल्यामुळे शेती व्यवसायात सुधारित तंत्राचा वापर करण्यास तो सहजासहजी तयार होत नाही. अर्थतज्ज्ञांच्या मते, भारतीय शेतकऱ्यांच्या या सदोष सामाजिक प्रवृत्तीमुळे शेती उत्पादनवाढीत अनेक अडथळे निर्माण होतात व त्याचा परिणाम शेतीची सिमांत उत्पादकता अल्प राहण्यावर होतो.

**२) लोकसंख्येचा अतिरिक्त भार –**

भारतातील वाढती लोकसंख्या शेती क्षेत्रावर अतिरिक्त भार निर्माण करीत आहे. सन २००९ च्या जनगणनेनुसार देशाच्या ग्रामीण लोकसंख्येच्या एकूण श्रमशक्तीचे ३/४ म्हणजे २२.८ कोटी लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. शिवाय नियोजन काळात लोकसंख्येत द्रुतगतीने वाढ झाल्यामुळे शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण होऊन शेतीच्या उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम झालेला दिसून येतो.

**३) जमिनीची धूप –**

भारतातील एकूण उपलब्ध जमिनीपैकी ५०% जमिनीची धूप होते असे भारत सरकारने अलीकडेच सुचित केले आहे. देशातील ४३% जमिनीची मोठ्या प्रमाणात धूप झाल्यामुळे ३३ ते ६७% उत्पादनात घट होत आहे. तर देशातील एकूण जमिनीपैकी ५% जमिन पूर्णपणे निरूपयोगी बनली आहे. सी. बर्द्रेउ व के. हेमान्न यांनी केलेल्या अंदाजानुसार भारतात जमिनीची धूप झाल्यामुळे दरवर्षी १०९ दशलक्ष डॉलर्स इतक्या रक्कमेचे नुकसान होते. पाणथळ जमिनीमुळे देशातील शेतजमिनीची उत्पादकता २०% ने कमी झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मृदासंधारणाचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम हाती घेऊनही जमिनीची धूप न थांबल्यामुळे शेतीची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे.

**४) शेतकऱ्यांचे अज्ञान व निरक्षरता –**

भारतातील शेतकरी निरक्षर व अज्ञानी असल्यामुळे त्यांच्या शेती उत्पादकतेत बदल घडूवन आणण्यासाठी सुधारीत तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात अडचणी निर्माण होतात. जागतिकीकरणाच्या आजच्या युगात भारतीय शेतीची उत्पादकता व स्पर्धा सामर्थ्य वाढविण्यासाठी आवश्यक असलेला नवा दृष्टीकोन स्वीकारण्याची देशातील अज्ञानी व निरक्षर शेतकऱ्यांमध्ये मानसिकता नसल्यामुळे तिचा परिणाम देशातील अल्प उत्पादकतेत

झालेला दिसून येतो.

### ५) व्यावसायिक दृष्टीकोनाचा अभाव –

इंग्लंड, अमेरिका, रशिया, व जपान इत्यादी प्रगत राष्ट्रांमध्ये शेती एक व्यवसाय (Business) आहे. त्यामुळे तिथे व्यापारी हेतु व नफा यांचे संगोपन केले जाते. मात्र भारतात आजही शेतकरी आपली शेती हे एक उदरनिर्वाहाचे साधन म्हणून करतो. शेतकऱ्यांच्या या पारंपारिक अल्पसंतुष्ट धोरणांमुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत.

### ब) संस्थात्मक कारणे :-

भारतीय अर्थव्यवस्थेत संस्थात्मक बदलाला नेहमीच दुय्यम स्थान देण्यात आले आहे. या संस्थात्मक घटकांमध्ये जमिनीची धारण पद्धती, लहान आकारमान, पतपुरवठा व बाजारपेठा सुविधांचा अभाव व बिनकिफायतशीर धारणक्षेत्र इत्यादींचा समोवश होतो. या घटकांचे विवेचन आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

### १) जमीनधारणा पद्धती –

भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी जमीन सुधारणा कायदे करण्यात आले. यामध्ये जमीनदाराचे उच्चाटन, कुळकायदे, कमाल जमीनधारणा कायदा, विभाजन व तुकडीकरणावर बंदी, कुळांना शेतजमिनीची मालकी व खंडाचे नियम इत्यादी बाबतीत करण्यात आलेल्या कायदेशीर तरतुदीची प्रभावीपणे अंमलबजावणी न केल्यामुळे शेतजमिनीची उत्पादकता वाढू शकलेली नाही. विशेषत: कुळ शेतकऱ्यांना शेतजमिनीची मालकी प्राप्त न झाल्यामुळे त्यांच्याकडून शेतजमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी तांत्रिक सुधारणा घडवून आणण्यात अडथळे निर्माण होऊन शेतजमिनीची उत्पादकता अल्प राहिली आहे.

### २) पतपुरवठा व शेतमाल विपणनाच्या सुविधांचा अभाव –

भारतीय शेतकऱ्यांच्या शेतमालाला मिळणाऱ्या किंमती गेल्या काही वर्षात प्रेरणादायी ठरलेल्या नाहीत. तरीसुद्धा शेतकरी उदरनिर्वाहाचे इतर कोणतेही साधन नसल्यामुळे शेती व्यवसाय परंपरेने करतो आहे. स्वातंत्र्योत्तर काळात विविध प्रकारच्या बँकानी शेती व्यवसायाला वित्त पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध केलेल्या असल्या तरी त्या पुरेशा नाहीत ही वस्तुस्थिती आहे. बऱ्याच वेळा शेती कर्जावरील व्याजदर शेतकऱ्याला परवडणारा नसतो तर ग्रामीण भागात बहुतांशी घटकराज्यात सावकारांचा आधार घेऊन शेती वित्त पुरवठ्याच्या गरजा भागविल्या जातात. मात्र सावकारांच्या साम-दाम-दंड व भेद नीतीचा प्रभाव शेतीच्या अल्प उत्पादकतेवर व शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावर झालेला दिसून येतो. थोडक्यात परतुरवठ्याच्या अपुऱ्या सुविधा व शेतकऱ्यास उत्पादनवाढीसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या शेतमाल किंमतीचा अभाव या कारणांमुळे भारतीय शेतीची उत्पादकता अल्प राहिली आहे.

### ३) बिगर किफायतशीर धारण क्षेत्र –

स्वातंत्र्योत्तर काळात वारसा हक्काचे कायदे व खाजगी मालमत्ता बाळगण्याचा हक्क भारतीयांना प्राप्त झाल्यामुळे वाढत्या लोकसंख्येबरोबर शेतजमिनीचे तुकडे सातत्याने पडत गेलेले दिसू येतात. सध्या देशातील ८% शेतकऱ्यांची जमिन २ हेक्टपेक्षा कमी आहे. अलीकडील काळात शासनाने विभाजन व तुकडीकरणावर कायद्यान्वये जरी बंदी घालण्यात आली असली तरी व्यावहारीक पातळीवर तुकडीकरण होत आहे. परिणामी अशा लहान आकारमानाच्या शेत जमिनीच्या तुकड्यात जलसिंचन पतपुरवठा, सुधारीत बी–बियाणांचा वापर करणे अशक्य झाल्यामुळे बिनकिफायतशीर धारणक्षेत्रात वाढ होऊन शेतीची उत्पादकता घटली आहे.

### क) तांत्रिक कारणे :–

भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. शेतीक्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी शेती उत्पादन तंत्रात बदल घडवून आणण्यात येणाऱ्या अडचणी अनेक आहेत. या तांत्रिक घटकांचे विवेचन आपणास पुढील प्रमाणे करता येईल.

### १) जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा –

नियोजन काळात भारतीय शेतीच्या जलसिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेत वित्तीय तरतूद करूनही देशातील ६०% जमिनीला आपण जलसिंचनाच्या सुविधा पुरवू शकलेलो नाही. त्यामुळे भारतातील बहुतांशी जमिनीचे क्षेत्र मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. पर्जन्यमानाच्या बाबतीत भारतात ५ पैकी ३ वर्षे प्रतिकूल असतात. महापूर व दुष्काळच्या परिस्थितीत पुरेशा जलसिंचन सुविधांच्या अभावामुळे शेतीत रासायनिक खते, सुधारित बी–बियाणे व जंतुनाशकांचा वापर पुरेशा प्रमाणात करता येत नाही. त्यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता कमी असलेली दिसून येते.

### २) परंपरागत उत्पादन पद्धती –

भारतात धारणाक्षेत्राचा आकार लहान असल्यामुळे व शेतकऱ्यांच्या कुमकुवत आर्थिक स्थितीमुळे अत्याधुनिक पद्धतीने शेती करण्यात अनेक अडथळे येतात. गरीब व दारिद्र्यावस्थेतील शेतकऱ्याला सुधारित अवजारे व यंत्रामग्रीचा वापर करून शेती करणे परवडत नाही. परिणामी शेती जुन्या व पंरपरागत पद्धतीने केली जाते. त्यामुळे शेतीची उत्पादकता अल्प राहते.

### ३) भांडवलाचा अभाव –

भारतीय शेती व्यवसायात आधुनिकीकरण घडवून आणण्यात भांडवल टंचाई ही महत्त्वाची अडचण आहे. देशात लहान आकारमानाचे धारणक्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची संख्या ८०% इतकी असल्यामुळे अशा शेतीतून मोठ्या प्रमाणावर उत्पादन व उत्पन्न मिळत नाही. परिणामी शेतकऱ्यांची बचत क्षमता

कमी राहून शेतीतील गुंतवणुकीचे प्रमाण अल्प राहते, बँका व वित्तीय संस्थाकडून कर्जे मिळविण्यात अनेक अडचणी निर्माण होतात. ग्रामीण सावकार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे शोषण करतात. अशा प्रतिकूल परिस्थितीत शेतीची उत्पाकता वाढविणे शेतकऱ्याला अशक्य बनत आहे.

**४) शेती संशोधनाकडे दुर्लक्ष –**

भारतात शेती संशोधनावर केला जाणारा खर्च हा खूप कमी असल्याचे दिसून येते. हा खर्च वाढविणे गरजेचे आहे. तसेच कृषी विद्यापीठ, महाविद्यालये शेतमालाचा दर्जा नियंत्रित करणाऱ्या संस्थाची संख्या कमी असलेली दिसून येते. या संस्थांमार्फत संशोधन करून ते शेतकऱ्यापर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. संशोधन झाले तर शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

वरील सर्व घटकांखेरीज शेती संशोधनाचा अभाव, शेतीत उपयोगात आणलेल्या जनावरांच्या पालनपोषणांवर होणारा खर्च, अपुरा खतांचा पुरवठा व बदलते कृषीविषयक धोरण इत्यादी कारणांमुळे भातातील शेती व्यवसायाची उत्पादकता अल्प राहिलेली दिसून येते.

**भारतातील अल्पकृषी उत्पादकतेवरील उपाय –**

भारतीय शेतीची उत्पादकता जागतिक सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. शेतीच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविता येतील.

**१) संस्थात्मक सुधारणा –**

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी संस्थात्मक सुधारणांची गरज आहे. यामध्ये भूसुधारणा, पुरेशा वित्त सुविधा, कृषी उत्पादन वितरणाचे नियमन इत्यादी बाबींचा समावेश होतो. शेती विकास करण्यासाठी संस्थात्मक संरचना बळकट करण्याचे धोरण आखले पाहिजे. संस्थात्मक सुधारणाचा दुसरा पैलू म्हणजे ग्रामीण विकासातील वितरण पद्धती कार्यक्षम करण्याची गरज आहे. यासाठी प्रशासकीय जबाबदारातील कार्यपद्धती सबळ करणे, आवश्यक संसाधनांचे स्थलांतर या काही बाबीची आवश्यकता आहे.

**२) तंत्रवैज्ञानिक सुधारणा –**

शेतीतील तंत्रवैज्ञानिक सुधारणांचे वर्गीकरण पुढील दोन भागात केले जाते.

**अ) जैविक –**

जैविक नाविन्याच्या वापराने कृषी उत्पादकता वाढविली जाते. जैविक नवनिर्मीतीचा वापर करून लहान आकारमानाच्या शेतीतून अधिक उत्पादन घेतले जाते.

**ब) यांत्रिक –**

यांत्रिक नवनिर्मितीमूळे कृषी उत्पादकता वाढविण्यास मदत होते. योग्य धोरणांच्या निर्मितीने यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामूळे श्रमिकांची बचत होवून उत्पादकता वाढण्यास मदत होते.

## ३) शेतकऱ्यांना परतावा वाढविणे -

शेतकऱ्यांना त्याच्या शेतमालाचा विक्री परतावा वाढविण्यासाठी दोन उपाययोजना स्वीकारल्या जातात.

### अ) किंमत उपाययोजना -

यामध्ये पुढील उपायांचा समावेश होतो. शेतीच्या व्यापारशर्तीत सुधारणा करण्यासाठी सरकारी खरेदी किंमत व आधार किंमतीत वाढ करणे. कोरडवाहू शेती व डोंगराळ शेतीच्या बाबतीत वर्षातून एखादेच पिक घेतले जाते उदा. मिलू अशा प्रदेशातील शेतमालासाठी किंमती स्थिर असाव्यात. अशा पिकांची मागणी शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी प्रोत्साहन देत.

### ब) बिगर किंमत उपाययोजना -

शेतीतून स्थिर परतावा मिळावा विशेषत: कोरडवाहू शेतीतून पिकांची हमी उत्पन्न मिळण्यासाठी पिक विमा योजना कार्यक्षमपणे राबविणे. बिगर शेती आर्थिक क्रियांमध्ये वाढ करून उत्पादनाच्या प्रत्येक युनिटमागे शेतकऱ्याची संख्या कमी करणे. शेतकऱ्यांना बाजारात सरळ प्रवेश दिल्यास व्यापाऱ्यांना जाणाऱ्या नफातील काही हिस्सा मिळेल. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढेल. कोरडवाहू भागात कमी खर्चिक आधुनिक तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करणे, कृषी उत्पादकता वाढीस प्रोत्साहन देते. करार शेतीच्या माध्यमातून कृषी-उद्योग जोडण्या निर्माण केल्या पाहिजेत. शेतीचे आकारमान मोठे ठेवल्यास उत्पादन प्रमाणाचे फायदे मिळातात.

## ४) वृद्धीसाठी उत्पादक प्रोत्साहन -

कृषी विकासासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन व नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. आधार किंमत, आदान अंशदान, सवलतीचा संस्थात्मक पत पुरवठा, अन्न सवलती इत्यादींच्या माध्यमातून कृषी वृद्धी घडवून आणता येईल व प्रादेशिक व सामाजिक समतेच्या कल्याणाचा हेतू साध्य करता येईल. थोडक्यात कृषी उत्पादकता अनेक मोठ्या निर्धारकांचे फलन आहे. कार्यक्षम धोरणाद्वारे शेतीक्षेत्राचा सर्वांगिण विकास करणे शक्य आहे.

## ५) जमीनीचे एकत्रिकरण -

भारतीय शेतीच्या आधुनिकीकरणासाठी पहिली पायरी म्हणजे जमीनीचे एकत्रीकरण करणे होय. जमिन एत्रीकरणाचा योग्य कायदा करून तात्काळ कार्यान्वीत करावा यामूळे कृषी उत्पादकता वाढेल. सहकारी शेती संस्थांच्या माध्यमातून लहान शेतीचे एकत्रीकरण करून आर्थिक आकारमान निर्माण केले पाहिजे त्यामूळे कृषी उत्पादकता वाढते.

## ६) नैसर्गिक संकटांवर मात -

शेतीसंबधीत नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी योग्य पावले उचलली पाहिजेत. यामध्ये महापूर

नियंत्रण, पुरेसे सिंचन उपलब्धता, किटकनाशके व तणनाशकांच्या पुरेशा मात्रांची उपलब्धता करणे इत्यादी उपायांमुळे कृषी उत्पादकता वाढ करता येते.

**७) आधुनिक तंत्रज्ञनाचा वापर –**

भारतीय शेतकऱ्यांनी लागवडीसाठी आधुनिक तंत्रज्ञनाचा अवलंब करावा. आधुनिक आदानांचा वापर, खतांच्या पुरेशा मात्रेचा वापर, संकरीत उच्च पैदास देणाऱ्या बीयाणांचा वापर, पिकांचे शास्त्रीय फेरबदल व काळजीपूर्वक पिक नियोजन इत्यादी बाबींचा उपयोग शेतीत करून उत्पादकता वाढविली पाहिजे. शेती विषयक संशोधनावर भर देवून त्याची उपलब्धता सर्वसामान्य शेतकऱ्यांना करून दिली पाहिजे. त्यामुळे उत्पादकता वाढेल.

**८) आर्थिक उपाय –**

भारतीय शेती अधिक उत्पादक बनविण्यासाठी आर्थिक उपायांचा अवलंब करणे आवश्यक ठरते. शेती संघटन व भूव्यवस्थापनामध्ये सूधारणा करणे याविषयी योग्य पावले उचलणे याशिवाय ग्रामीण भागात कृषी आधारीत उद्योग स्थापन करणे योग्य ठरेल; पुरेसा पतपुरवठा व विपणन सुविधा उपलब्ध करून देणे. तसेच शासनाने देशातील उत्पादनासाठी किमान आधार किंमती व हमी भावाची आखणी व अंमलबजावणी करावी. शेतीतील विविध धोक्यांपासून बचाव करण्यासाठी पिक विमा योजना राबवावी.

**९) मानवी विकास –**

भारतीय शेतीची उत्पादकता वाढीसाठी शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात बदल होणे आवश्यक आहे. शेतकरी म्हणून मानवी संसाधनाची गुणवत्ता वाढ व्हावी. यासाठी सामान्य व तांत्रिक शिक्षण पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावे. ग्रामीण भागात सार्वजनिक आरोग्याचे उपाय करणे, शेतकऱ्यांनी दैववादी दृष्टिकोन सोडून विज्ञानवादी विचारांची पेरणी करावी. देशात कृषी उत्पादकता वाढीसाठी वरीलप्रमाणे उपाययोजना केल्यास शेती क्षेत्राचा विकास होणे सहज शक्य आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न –**

**रिकाम्या जागी योग्य शब्द निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१) कृषी ----------- म्हणजे कृषी आदाने व प्रदाने यांच्यातील प्रमाण होय.

अ) किंमत ब) उत्पन्न क) उत्पादकता ड) हवामान

२) कृषी उत्पादकता वाढीमूळे --------------- होते.

अ) उत्पन्न घट ब) उत्पन्न वाढ क) किंमत वाढ ड) किंमत घट

३) कृषी उत्पादकता कमी राहते कारण ------------------------

अ) जमीनधारणा पद्धती ब) अपूरा पतपुरवठा

क) अपुरे सिंचन ड) वरील सर्व

४) ----------- यामुळे कृषी उत्पादकता वाढते.

अ) यांत्रिकीकरण ब) सिंचन सुविधा वाढ क) पतपुरवठा ड) वरील सर्व

५) भारतसरकारच्या अंदाजानुसार देशातील एकूण उपलब्ध जमिनीपैकी ------- टक्के जमिनीची धूप होते.

अ) १०% ब) २५% क) ५०% ड) शून्य

## १.२.३ हरितक्रांती – (Green Revolution)

**भारतातील हरितक्रांती** (Green Revolution In India)

कृषी क्षेत्रात आवड असणारे अमेरिकन शास्त्रज्ञ नॉर्मन बोरलॉग यांनी जगात प्रथम हरितक्रांतीची सुरूवात केली. सन १९४० मध्ये मॅक्सीको येथे प्रथम गव्हाच्या उच्च पैदास देणाऱ्या बियाणाचा शोध लागला. मॅक्सीको मध्ये नॉरमन बोरलॉग यांनी शोधलेच्या उच्च पैदास गव्हाचे बियाणे आणि तेथील यांत्रिकीकरणाची प्रगती यामुळे लोकांच्या गरजेपेक्षा अधिक उत्पादन या देशात उत्पादित झाले, तर १९६० मध्ये मॅक्सीको गव्हाची निर्यातदार देश बनला, यापूर्वी हा देश गव्हाची आयात करीत होता.

'हरितक्रांती म्हणजे उच्च पैदास बी-बीयाणाचा वापर, खतांचा वाढता वापर व जलसिंचन यामुळे शेती उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ होणे होय.' हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. भारतात प्रथम १९६३ साली उच्च पैदास देणाऱ्या बियाणांचा वापर केला. याचे सर्व श्रेय डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना जाते. त्यांना भारतीय हरितक्रांतीचे जनक असे म्हणतात. हरितक्रांतीमुळे नविन तंत्रज्ञानाचा वापर, संकरित बियाणे-उच्चपैदास बियाणे आदीचा वापर वाढून उत्पादकता दुप्पटीपेक्षा अधिक वाढली. हरितक्रांती कालावधीत रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे माती व शेती उत्पादकतेवर पर्यावरणीय विघातक परिणाम दिसू लागले.

अन्नधान्य उत्पादनातील वाढ जागतिक हरितक्रांतीचे जनक नॉर्मन बोरलॉग यांच्या प्रयत्नामुळे झाली. हरितक्रांती ही सिंचन विस्तार, पायाभूत सुविधात वाढ, व्यवस्थापन तंत्रातील आधुनिकिकरण, संकरित बियाणांचे वितरण, रासायनिक खते, किटकनाशके व तणणाशकांचा वापर काही आदानांचा विस्तार व वृद्धी झाल्यामुळे घडून आली. याचा परिणाम जगातील अब्जावधी लोकांना उपासमारीपासून वाचविले आहे.

## १.२.३ हरितक्रांतीची कारणे –

**अ) नविन आदानांचा पुरवठा**

**१) उच्च पैदास बियाणांचा वापर–** सन १९६६ पासून उच्च पैदास देणाऱ्या बी-बियाणांचा वापर वाढल्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. अन्नधान्यामध्ये प्रामुख्याने गहू व तांदळाच्या उत्पादनात पुरेशा प्रमाणात वाढ झाली. तांदळाच्या तुलनेत गहू उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले. याचा परिणाम म्हणून अनेक शेतकरी उच्च पैदास देणाऱ्या संकरित बी-बियाणांचा वापर करू लागले.

**२) रासायनिक खतांचा वापर–** उच्च पैदास देणाऱ्या बी-बियाणा बरोबरच रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे भारतातील हरितक्रांतीला वेग आला. उच्च पैदास बियाणांच्या पिकांची वाढ योग्य पद्धतीने होण्यासाठी रासायनिक खतांचा वापर सातत्याने करावा लागला. यामुळे जमिनीची सुपिकता व पिकाचा पोत सुधारतो. भारतात सन २००८-०९ मध्ये २४९०९ हजार टनांचा रासायनिक खतांचा उपभोग होता.

**३) जलसिंचन सुविधांचा विस्तार–** भारतातील हरितक्रांतीसाठी सिंचन सुविधांच्या विस्ताराचे महत्त्वाचे योगदान आहे. उच्च पैदास देणाऱ्या बियाणांसाठी रासायनिक खतांचा वापर आवश्यक असतो आणि रासायनिक खतांच्या वापरासाठी शेतीला सिंचन अत्यंत गरजेचे असते. सन २००६-२००७ पर्यंत भारतातील एकूण सिंचन क्षमता १०२.८ दशलक्ष हेक्टर्स पर्यंत वाढली तर सिंचन क्षमतेचा प्रत्यक्षातील वापर ८७.२ दशलक्ष हेक्टर्स पर्यंत वाढला. सिंचनामुळे पिकांचे होणारे नुकसान कमी होते. त्यामुळे अप्रत्यक्षपणे सिंचन विस्तारामुळे नविन बी-बियाणांच्या वापरासाठी प्रोत्साहन मिळते.

**४) पिक संरक्षण व किड नियंत्रण–** उच्च पैदास देणाऱ्या बी-बियाणांमुळे विविध पिकांची दर हेक्टरी उत्पादकता मोठ्या प्रमाणावर वाढली. परंतु जैविकदृष्टया पिक उत्पादकता वाढीबरोबर पिकांवरील रोगांचे प्रमाणही वाढले. खतांच्या वापरामुळे विविध रोगांचे, किडीचे प्रमाण वाढले. त्यामुळे पिक संरक्षणाचे विविध उपाय करून नविन बियाणांपासून महत्तम उत्पादकता मिळविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**५) पायाभूत सुविधांचा विकास–** भारतात पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजना कालावधीत ग्रामीण पायाूत सुविधांचा झालेला विकास हा हरितक्रांतीसाठी प्रेरक ठरला. पायाभूत सुविधांच्या घटका मध्ये वाहतूक व दळणवळण, नियंत्रित बाजारपेठा, साठागृहे, शेती शिक्षण व प्रशिक्षण, शेती विस्तार व संशोधन आदी बाबींचा समोवश होतो. अशा पायाभूत सुविधा शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात पुरविल्यास नविन तांत्रिक लागवड पद्धतीच्या वापरास प्रोत्साहन मिळते. भारतात पायाभूत सुविधांचा विस्तार झाल्यामुळे हरितक्रांती घडून आली.

**६) यंत्राचा वापर–** शेती विकासासाठी नविन यंत्राचा वापर केल्यास श्रमिक बेकार होऊन बेरोजगारी वाढते. असे असले तरी नवीन यंत्राचा वापर करणे शेती विकासासाठी आवश्यक असते. वर्षातून २-३ पिके घेण्यासाठी यंत्राचा वापर केला जातो. भारतात हरित क्रांती कालावधीत ट्रॅक्टर, कापणीयंत्र, मळणीयंत्र, विद्युत मोटार, ठिबक व तुषार सिंचन इत्यादी यंत्राचा वापर वाढला.

**ब) बहूपिक कार्यक्रम :–** देशातील उपलब्ध सिंचन सुविधांचा विस्तार विस्तार व नविन सिंचनक्षमतांचा विकास करुन बहूपिक पद्धतीचा अवलंब करून जमिनीचा महत्तम वापर केला जातो. बहुपिक पद्धतीमुळे शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते.

**क) कृषीपत सुविधा :–** भारतातील हरितक्रांती व नविन कृषीतंत्रज्ञानाचा वापर होण्यासाठी स्वस्त व पुरेशा कृषीपत पुरवठा सुविधांचा विस्तार जबाबदार आहे. शेतकऱ्यांना नविन बी–बियाणांची खरेदी, खते, किटकनाशके, जमिनीच्या कायमस्वरुपी सुधारणा आदी आदानांच्या खरेदीसाठी अर्थपुरवठा गरजेचा असतो. भारतामध्ये संस्थात्मक शेती पतपुरवठा हा बिगर संस्थात्मक किंवा खाजगी पतपुरवठ्यापेक्षा विस्तारल्यामुळे हरितक्रांती घडून आली.

**ड) प्रेरक किंमती :–** नविन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे फक्त शेती उत्पादनच वाढले नाही तर शेती आदानांच्या किंमतीही वाढल्या कारण आदाने बाजारातून खरेदी करावी लागतात. यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या शेतमालाला योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाबरोबरच विकासासाठी प्रेरणादायी ठरणारा आवश्यक नफा मिळाला पाहिजे. हरितक्रांती कालावधीत शेतमालाला प्रेरक किंमती मिळू लागल्या.

**इ) लघु व सिमांत शेतकऱ्यांसाठी विकास कार्यक्रम :–** हरितक्रांतीमध्ये मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांबरोबरच लघु व सिमांत शेतकऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. शासनानेही विशेष योजना अंतर्गत लघु व सिमांत शेतकऱ्यांना संस्थात्मक परतुरवठा वाढीसाठी प्रयत्न केला. यामुळे हरितक्रांतीचा लाभ अधिक संख्येने असणाऱ्या लघु व सिमांत शेतकऱ्यांपर्यंत पोहचला.

**हरितक्रांतीचे मूल्यमापन (Evaluation of Green Revolution) :–**

भारतातील हरितक्रांतीच्या यशापयशाची चर्चा करताना कृषीतज्ञांमध्ये मतमतांतर दिसून येते. हरितक्रांतीचे यश व अपयश खालीलप्रमाणे :

**अ) हरितक्रांतीचे गुण / फायदे –**

**१) अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता :** भारतात हरितक्रांतीच्या कालावधीत लागवडीखालील क्षेत्रात वाढ, सखोल लागवड, उच्चपैदास देणाऱ्या बी–बियाणांचा वापर, सिंचन वाढ आदी बीबींमुळे अन्नधान्य उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. हरितक्रांती पूर्व कालावधीत भारत अमेरिकेकडून पी. एल. ४८० नुसार अन्नधान्याची आयात केली जात होती. परंतु हरितक्रांतीने अन्नधान्याच्या उत्पादनात भारताने १९७६–७७ मध्ये स्वावलंबन प्राप्त केले.

**२) लागवडीखालील क्षेत्रात वाढ :** भारतातील लागवडीखालील क्षेत्र सन १९४७ पासून वाढत होते. मात्र हरितक्रांती कालावधीत लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली जलसिंचनाच्या सुविधातील वाढ, यांत्रीकीकरणातील वाढ यामूळे लागवड क्षेत्र वाढले. याचा परिणाम म्हणून अन्नधान्य उत्पादनात वाढ

झाली. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी पूर्ण करता येते.

**३) शेती उत्पादन व उत्पादकता वाढली –** हरितक्रांतीमुळे भारतीय शेतीत नविन तंत्र, संकरित बियाणे, जलसिंचन, संशोधन इत्यादी कारणांनी दरएकरी उत्पादकता वाढली. गहू, तांदूळ या पिकांची उत्पादकता वेगाने वाढली. हरितक्रांतीने ज्वारी, बाजरी, मका या अन्नधान्याच्या पिकांबरोबरच ऊस, कापूस, तेलबिया या नगदी पिकांच्या उत्पादनातही वाढ झाली. अन्नधान्य उत्पादन सन १९६०-६१ मध्ये ८२ दशलक्ष टन होते ते सन २०१०-११ मध्ये २३० दशलक्ष टनांपर्यंत वाढले. याच कालावधीत गव्हाचे उत्पादन ८७ दशलक्ष टनांपर्यंत वाढले.

**४) शेतकऱ्यांच्या दृष्टिकोणात बदल –** भारतीय शेतकरी शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहत होता. परंतु हरितक्रांतीमुळे प्रथमच भारतीय शेतकरी संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, यंत्रे वापरण्यास तयार झाला. शेतीला व्यावसायिक स्वरुप येऊन शेतकरी बाजाराभिमुख झाला. शेतकरी अन्नधान्याच्या पिकांबरोबरच नगदी पिके घेवू लागला. कमी कालावधीत अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या नविन जाती निर्माण झाल्याने शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ झाली, त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावला.

**५) शेतकऱ्यांचा फायदा –** भारतातील फक्त ३८% लागवडीखालील क्षेत्रास सिंचनाच्या सुविधा असल्यामुळे उर्वरित शेतकरी व त्यांची शेती मान्सूनच्या लहरी पावसावर अवलंबून आहे. हरितक्रांतीमुळे यांत्रिकीकरण, ठिबक व तुषार सिंचन पद्धती इत्यादीमुळे पिकांची उत्पादकता व उत्पादन वाढले. देशातील ५ एकरापर्यंत जमिन असणाऱ्या ७८% लघू व सिमांत शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यात हरितक्रांतीमुळे मदत झाली. आर्थिक स्थिती सुधारण्याने शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला. त्यांचे समाजातील स्थान उंचावले. आधुनिक सुख सोईची साधने शेतकरी वापरू लागले.

**६) रोजगार वाढ –** हरितक्रांतीचा आणखी एक फायदा म्हणजे वाढत्या श्रमशक्तीला सामावून घेवून श्रमिकांचा परिणामकारक वापर करण्याच्या दृष्टिकोणातून शेती क्षेत्रात रोजगार निर्मिती करणे होय. हरितक्रांतीमुळे पुरोगामी व आधोगामी जोडण्या (Forward and Backward) तयार झाल्या याचा परिणाम म्हणून शेतीतील अदृश्य, दृश्य व अर्धबेकारी नाहीशी होण्यास मदत झाली. हरितक्रांतीने वर्षातून २-३ पिके घेण्याचे प्रमाण वाढल्यामुळे ग्रामीण भागातील बेरोजगारांना वर्षभर काम मिळू लागले. विविध दुय्यम व्यवसायात वाढ झाल्यामुळे शेतमजुरांच्या रोजगाराबरोबरच वेतनात वाढ होऊन उत्पन्नात वाढ झाली. साहजिकच शेतमजुरांच्या राहणीमानात वाढ होवून सामाजिक-आर्थिक दर्जात वाढ झाली.

**७) शेतीमधील भांडवली गुंतवणूकीत वाढ –** हरितक्रांतीमुळे व्यापारी पिके, वर्षातून २ ते ३ वेळा पिके, उत्पादकता व उत्पादन वाढ, किंमतीतील स्थैर्य इत्यादी बाबींमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. शेतीतून उत्पन्न मिळू लागल्यामुळे भांडवली गुंतवणूकीत वाढ होवून शेतीचा सर्वांगिण विकास झाला. शेतीत विहीर खणणे, वीजपंप, पाईप लाईन, ट्रॅक्टर, मळणी, कापणीयंत्राची खरेदी, जमीन सपाटीकरण, बांधबंदिस्ती, शेती संलग्न व्यवसायात वाढ इत्यादी बाबींमुळे शेतीत प्रचंड गुंतवणूक वाढली.

**८) औद्योगिक विकास –** शेती विकास व औद्योगिक विकास परस्परांवर अवलंबून असतात. हरितक्रांतीमुळे शेतीतील विविध प्रकारचा कच्चा माल मोठ्या प्रमाणात उत्पादित होवून औद्योगिक विकासाला चालना मिळाली. शेतीतील दर्जेदार व भरपूर कच्च्या मालामुळे उद्योगातील पक्क्या मालाचे उत्पादन व दर्जा उंचावला. ऊस, कापूस ताग या पिकांच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाल्यामुळे त्यावर आधारित उद्योगांचा विस्तार झाला. त्याचबरोबर हरितक्रांतीने शेती आदानांची मागणी वाढली. ट्रॅक्टर, शेती आवजारे, रासायनिक खते, कीटकनाशके, विद्युतपंप, सिंचन अवजारे इत्यादी नवीन उद्योगांचा विकास हरितक्रांतीमुळे झाला.

**९) शेतमाल किंमतीमध्ये स्थैर्य –** देशाच्या समतोल आर्थिक वृद्धीसाठी किंमत स्थैर्य आवश्यक असते. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अन्नधान्याच्या व दैनंदिन वापराच्या वस्तूतील किंमतीतील अस्थिरता असंतोष निर्माण करते. मात्र हरितक्रांतीमुळे अन्नधान्याचा पुरवठा वाढला व अर्थव्यवस्थेतील वाढत्या लोकसंख्येमुळे वाढती अन्नधान्याची गरज पूर्ण करता आली. अर्थव्यवस्थेत शेतमालाची मागणी आणि शेतमालाचा पुरवठा यामध्ये समतोल निर्माण होवून किंमत स्थिरता येते. त्यामुळे शेतमालावर आधारित औद्योगिक वस्तूंच्या किंमत स्थिर राहतात. अलीकडे अन्नधान्याच्या किंमती वाढल्या आहेत. पण याचे कारण अन्नधान्याची कमतरता नसून पेट्रोल, डिझेलच्या किंमती वाढल्याने वाहतूक खर्च वाढून किंमती वाढतात.

**१०) आर्थिक विकास –** देशाच्या आर्थिक विकासातील शेतीक्षेत्राचे योदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. आजही जवळपास ६४% लोकसंख्या शेती व शेतीसंलंग्न व्यवसायावर अवलंबून आहे. हरितक्रांतीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने औद्योगिक व सेवाक्षेत्रातील वस्तूंची मागणी वाढली. औद्योगिक विकास गतिमान होवून आर्थिक विकास होण्यासाठी हरितक्रांतीचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**ब) हरितक्रांतीचे दोष/ तोटे :–** हरितक्रांतीची फळे सर्वदूर न पसरल्यामुळे तज्ञांकडून टीका केली जाते. हरितक्रांतीमुळे जमीन उत्पादकता चिरंतन न राहता घटू लागली. पडीक जमीन लागवडीखाली आणल्यामुळे जंगलक्षेत्र कमी झाले. जमीन धूप घडून आली. थोडक्यात हरितक्रांतीमुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली तरी जमीनीचा ऱ्हास घडून आला.

**१) जमीनीचा ऱ्हास –**

हरित क्रांतीमुळे पिकाच्या आकृतीबंधातील बदल वर्षातून २–३ पिके घेणे, रासायनिक खतांचा वापर, कीटकनाशके इत्यादी सवयीमुळे जमीन उत्पादकता चिरंतन न राहता घटू लागली. पडीक जमीन लागवडीखाली आणल्यामुळे जंगलक्षेत्र कमी झाले, जमीन धूप घडून आली. थोडक्यात हरितक्रांतीमुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाली तरी जमीनीचा ऱ्हास घडून आला.

### २) ठराविक पिकांच्या उत्पादनात वाढ –

हरितक्रांतीचा प्रभाव गहू, तांदूळ, मका, बाजरी आदी पिकांच्या उत्पादनावर दिसून आला. मात्र तेलबिया, कापूस, ताग या व्यापारी पिकांमधील उत्पादनात फारसी वाढ झाली नाही. शेती संशोधनाने अन्नधान्याच्या काही पिकांच्या नवीन जाती निर्माण झाल्या परंतु कडधान्याच्या उत्पादनात वाढ झाली नाही. त्याचबरोबर भारतातील विविध राज्यातील पिकांची उत्पादकता भिन्न दिसून येते. थोडक्यात अनेक पिकांच्या उत्पादनात हरित क्रांतीचा प्रभाव फारसा दिसून आला नाही.

### ३) प्रादेशिक विषमता वाढली –

हरित क्रांतीमुळे राज्या-राज्यातील पिक उत्पादनातील विषमता वाढली. प्रामुख्याने पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग, गुजरात, तमिळनाडू, पश्चिम महाराष्ट्र इत्यादी राज्यांमध्ये संकरित बियाणे, रासायनिक खते, सिंचन पुरवठ्यामुळे हरितक्रांतीचा प्रभाव दिसून आला. मात्र उर्वरित राज्यांमध्ये हरितक्रांती दिसून आली नाही. देशाच्या भौगोलिक विस्ताराच्या मानाने हरित क्रांतीचा प्रभाव मर्यादित राहिला. आर्थिक विषमता वाढली.

### ४) बेरोजगार वाढला –

हरितक्रांतीने वर्षातून २-३ पिके घेण्याच्या धोरणांमुळे रोजगार वाढतो असे समर्थन दिले जाते, मात्र यांत्रिकिकरण, ट्रॅक्टरचा वापर, मळणीयंत्र, कापणीयंत्र, इत्यादीमुळे शेतमजुरांचे काम कमी झाले. शेतमजुर बेकार होऊन शहरी भागात स्थलांतरीत होवू लागले. शेतमजुरांचे स्थलांतर वाढले.

### ५) शेती उत्पादनात अस्थैर्य –

भारतीय शेती ही मान्सून पावसावर आधारीत असल्यामुळे हरितक्रांती कालावधीतही शेती उत्पादनात चढ-उतार दिसून येतात. उदा. सन २००१-०२ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन २१२ दशलक्ष टन झाले. ते २००२-०३ मध्ये १८३ दशलक्ष टन पर्यंत कमी झाले. तर सन २००९-१० मध्ये २३० दशलक्ष टनांपर्यंत वाढले. थोडक्यात हरितक्रांतीनंतरही अन्नधान्य पिकांच्या उत्पादनात स्थिरता निर्माण होवू शकली नाही.

### ६) श्रीमंत व मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा –

भारतातील २०% मध्यम व मोठ्या शेतकऱ्यांना हरितक्रांतीचा फायदा झाला. हरितक्रांती कालावधीत यांत्रिकीकरण, नवीन शेतीतंत्र, नवीन अवजारे, खते, संकरित बियाणांचा वापर यासाठी लागणारे भांडवल फक्त श्रीमंत व मोठ्या शेतकऱ्यांकडे उपलब्ध होते. देशातील जवळपास ८०% शेतकरी अल्प व सीमांत भूधारक शेतकऱ्यांना हरितक्रांतीचा फायदा झाला नाही. ग्रामीण भागात वरच्या १०% श्रीमंत लोकांकडे संपत्तीचे केंद्रीकरण झाले.

### ७) पायाभूत सुविधात वाढ नाही –

हरितक्रांतीमुळे शेती उत्पादनात वाढ झाली असली तरी वाढीचा वेग आंतरराष्ट्रीय उत्पादकतेच्या तुलनेत कमी राहिला. याचे प्रमुख कारण म्हणजे पायाभूत सुविधांचा अभाव होय. प्रक्रिया, वाहतुक, साठवणूक, गोदाम व्यवस्था, विपणन, पतपुरवठा इत्यादी शेती व्यवसायाशी संबंधीत बाबींच्या कमतरतेमुळे हरित क्रांतीचा प्रभाव कमी राहिला.

### ८) सिंचन सुविधांचा अभाव –

भारतात एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या ३८% क्षेत्रास सिंचन सुविधा उपलब्ध आहेत. उर्वरित लागवडी खालील क्षेत्र मान्सूनच्या लहरीपणावर अवलंबून आहे. सिंचन सुविधा अपुऱ्या असल्यास संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके आदींच्या वापरावर मर्यादा येतात. जलव्यवस्थापनाच्या अभावामुळे भारतातील भूजलपातळी दिवसेंदिवस खोल जात आहे.

### ९) जैविक विविधतेचा ऱ्हास –

हरितक्रांतीच्या कालावधीत रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके आदीचा वापर वाढल्यामुळे विविध जैविक घटकांचा नाश झाला. संकरित बियाणांच्या वापरामुळे देशी व परंपरागत बियाणे संपुष्टात आली, संकरित अन्नधान्याच्या वापरामुळे लोकांच्या आरोग्यावर विघातक परिणाम झाले.

### १०) इतर परिणाम –

हरितक्रांतीमुळे नगदी पिकांचे उत्पादन वाढले, मात्र नगदी पिकांच्या वाढीसाठी रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके वापरल्याने आंतराष्ट्रीय बाजारातील भारतीय शेतमालाची मगणी घटली. हरितक्रांतमुळे विविध पर्यावरणीय परिणाम दिसून आले.

### दुसऱ्या हरित क्रांतीची गरज –

सन २०१०-११ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन २३० दशलक्ष टन होते, तर दुसऱ्या हरित क्रांतीचे लक्ष्य ४०० दशलक्ष टन अन्नधान्याचे उत्पादन करणे आहे. एवढे उत्पादन करणे सन २०२० मध्ये शक्य होईल असा तज्ञांचा अंदाज आहे. यासाठी पुढील ९-१० वर्षाच्या कालावधीत शेतीक्षेत्राचा वृद्धीदर ५ ते ६% असणे गरजेचे आहे. परंतु गेल्या १० वर्षातील या क्षेत्राचा वृद्धीदर २% एवढा कमी राहीला आहे. देशांतील अन्नधान्याचा साठा कमी झाल्याने सरकारला ५ दशलक्ष टन गव्हाची आयात करावी लागली. प्रत्यक्षात अधिक जमीन लागवडीखाली आणणे शक्य नाही. तसेच अस्तित्वातील लागवडलायक जमीनीचा पर्यावरणीय असमतोल होत आहे अशावेळी दुसऱ्या हरित क्रांतीसाठी विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. उच्च पैदास देणारी बियाणे, खाजगी क्षेत्राचा सहभाग व सिंचन योजनांवरील दीर्घकालीन खर्च इत्यादींमुळे अधिक उत्पादन करता येणे शक्य होईल. पहिली हरित क्रांती गव्हाची संकरित बियाणे व शेतीला वीजपुरवठा व भूसूधारणा यामुळे शक्य झाली. दुसऱ्या हरितक्रांतीची आवश्यकता खालीलप्रमाणे सांगता येते.

**१) कृषी वृद्धीदर –**

भारतीय शेतीचा वृद्धीदर ५ ते ६% दरम्यान सातत्याने राहिला पाहिजे. शेती विकासासाठी दीर्घकालीन आवश्यक गुंतवणूक केंद्र व राज्य सरकारांनी केली पाहिजे. अजूनही कोरडवाहू शेतीच्या विकासासाठी पाहिजे तेवढे प्रयत्न झाले नाहीत. कृषी वृद्धीदर ५ ते ६% होण्यासाठी दुसरी हरित क्रांती आवश्यक आहे.

**२) अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता –**

भारतीय लोकसंख्या वाढीचा दर प्रतिवर्षी १.८ ते २.२% च्या दरम्यान राहिला आहे. मात्र कृषी वृद्धीदर तुलनेने अत्यल्प राहिला आहे. तेव्हा येत्या काही वर्षात अन्नधान्याची समस्या निर्माण होईल. भारतात दुष्काळामुळे अन्नटंचाई निर्माण होणार नाही मात्र अन्नधान्याचा तुटवडा हा वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होईल. यासाठी राष्ट्रांचा आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी प्रचंड तंत्रज्ञानात्मक बदल होऊन दुसरी हरितक्रांती अपेक्षित आहे.

**३) जनुकिय बियाणे – (GM Seeds)**

जैवतंत्रज्ञानाबरोबर जनुकिय तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीची दर एकरी उत्पादकता दुप्पट होईल. यासाठी नविन तंत्रज्ञनाचा वापर, खाजगी क्षेत्राचा सहभाग, जनुकिय शेतमालाचा बाजार विस्तार इत्यादी बाबी आवश्यक आहेत. जनुकिय पिकांची लागवड सर्व देशभर झाल्यास अन्नधान्य उत्पादनात दुसरी हरितक्रांती घडून येईल.

**४) कृषी व्यवसाय –**

भारतीय शेतीमध्ये अल्प व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण ७८% आहे. लघु व सीमांत शेतकऱ्यांच्या शेतीला व्यवसायाचे स्वरुप निर्माण झाले पाहिजे. शेतीतून उत्पादित होणाऱ्या शेतमालाला व्यापाराचा दर्जा मिळाला पाहिजे. शेतीकडे उदरनिवार्हाचे साधन म्हणून न पाहता व्यावसायाचे स्वरुप आले पाहिजे. शेतीव्यवसायमध्ये नफ्याच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी भांडवली गुंतवणूक केली पाहिजे.

**५) जमीन आकाराची पुनर्रचना –**

भारतीय शेती वारसाहक्काने वडिलांनंतर अनेक मुलांमध्ये विभागली जाते. यामुळे जमिनीची आर्थिक कार्यक्षमता, उत्पादन क्षमता कमी राहते. शेतीच्या विकासासाठी शेतीच्या आकारमानाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. कमाल उत्पादन क्षमता राहिल असे आकारमान असावे. त्याचबरोबर सरकारचा शेतमाल व्यापारातील सहभाग व नियंत्रण किमान असावे. यासाठी शेतकऱ्यांची भूमिका जाबाबदार उद्योजकाची असणे आवश्यक आहे.

**६) जनुकिय अन्नधान्य – (G.M. Food)**

ग्राहकांनी जनुकिय अन्नधान्याची सवय लावली पाहिजे. जनुकिय बदलाद्वारे निर्माण होणारे अन्नधान्य हे भारतीय वाढत्या लोकसंख्येची भूक पूर्ण करणारे आहे; परंतु भारतात जनुकिय तंत्राने तयार केलेल्या अन्नधान्यासाठी होणारा विरोध हा राजकीय हेतूने प्रेरित झालेला आहे. पहिल्या हरित क्रांती कालावधीतही काही राजकिय मंडळीनी मॅक्सिको संकरित गव्हाच्या बियाणाच्या वापराबाबत भारतात विरोध केला होता. परंतु या संकरित गव्हाच्या उत्पादनात क्रांती झाल्यामुळे संपूर्ण भारत आश्चर्यचकित झाला. जनुकिय बदलाने अन्नधान्य प्रचंड प्रमाणात उत्पादन होवून सर्व जग याचा वापर करू लागेल अशा अशावाद आहे.

**७) नद्या जोडणी –**

भारतात १५० दशलक्ष हेक्टर्स जमीन लागवडीखाली आहे. त्यापैकी फक्त ४५ दशलक्ष हेक्टर्स जमीन सिंचित आहे. ही सिंचित जमीन एकूण उत्पादनाच्या ५५% उत्पादन करते. उर्वरित ९५ दशलक्ष हेक्टर्स जमीन पावसावर आधारित आहे. यातून फक्त ४५% उत्पादन होते. भारतातील प्रयोगशील शेतकऱ्यांनी जनुकिय तंत्रज्ञानाचा वापर सिंचित जमीनीत केल्यास शेती उत्पादकता प्रचंड प्रमाणात वाढेल. लघु व मोठ्या सिंचन प्रकल्पाची बिगर सिंचन क्षेत्राची उत्पादकता वाढीसाठी निर्णायक भूमिका ठरणार आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी नद्या जोड प्रकल्प अतिरिक्त पाणी कोरडवाहूशेतीसाठी वापरुन आर्थिकदृष्टया शक्य केला पाहिजे.

**८) कोरडवाहू शेतीक्रांती – (Dry Land Revolution)**

भारत हा खेड्यांचा देश आहे. देशात ६ लाखापेक्षा अधिक खेडयांत ७०% लोक राहतात. भारतातील १७७ जिल्ह्यांमध्ये (जवळपास ५६% भूभाग) कोरडवाहू आहे. तेंव्हा देशाचा विकास करीत असताना या क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. भारतात राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र पदेश व तमिळनाडू राज्यातील कोरडवाहू शेतीतील उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे दुसऱ्या हरित क्रांतीचे उद्दिष्ट आहे. कोरडवाहू शेती क्रांती करित असताना पर्यावरणीय दक्षता घेतली पाहिजे.

**९) खाजगी क्षेत्राचा सहभाग –**

दुसऱ्या हरितक्रांतीसाठी सरकारच्या नियंत्रणापेक्षा खाजगी क्षेत्राचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतात शेतमाल विपणन व साठवणूक प्रक्रिया भारतीय अन्नमहामंडळाच्या नियंत्रणाखाली आहे. तज्ञाच्यामते अन्नधान्य उत्पादकापासून उपभोक्तयापर्यंत वितरणामध्ये २० ते ३०% नासाडी किंवा नुकसान होते. यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे शेतमाल उत्पादन, विपणन व वितरणामध्ये कार्यक्षमता निर्माण होईल. दुसऱ्या हरितक्रांतीमध्ये खाजगी क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे राहणार आहे.

**१०) बहुराष्ट्रीय करार –**

शेती उत्पादनासाठी विविध देशांमध्ये बहूराष्ट्रीय करार केले जातात यामुळे शेतमालाची आयात निर्यात वाढ होते. अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्या सरकारी क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्राशी व्यापारी करार करण्यास अधिक पसंती देतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न –**

१) भारत अमेरिकेकडून ---------- ची आयात करीत होता.

अ) साखर ब) गहू क) ज्वारी ड) तांदूळ

२) हरितक्रांतीचे यश --------------- आहे.

अ) अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता ब) उत्पादकता वाढली

क) रोजगार वाढ ड) वरील सर्व

३) हरितक्रांतीमुळे --------- शेतकऱ्यांचा फायदा झाला.

अ) सीमांत ब) लहान क) मोठ्या ड) वरीलपैकी नाही

४) हरितक्रांतीमुळे------------------ चा वापर वाढला.

अ) रासायनिक खते ब) उच्च पैदास देणारी बियाणे क) सिंचन ड) वरील सर्व

५) हरितक्रांतीमुळे अन्नधान्याच्या ------------- च्या उत्पादनात वाढ झाली.

अ) गहू व तांदूळ ब) ज्वारी व बाजरी क) ऊस ड) सोयाबीन

**१.२.४ कृषीविषयक किंमती व खरेदी – (Agricultural Prices & Procurement)**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अन्नधान्य व तेलबियाच्या किंमती महत्त्वाची भूमिका बजावतात. शेतमालाच्या किंमतीचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. किंमतीतील बदलामूळे भारतीय कृषी अर्थव्यवस्थेत अडचणी निर्माण होतात. कारण तेथे उत्पादन हे लहरी मान्सूनवर अवलंबून असते. शेतमालाच्या किंमतीमध्ये हंगामी, वार्षिक व दिर्घकालीन उच्चावचन घडून येतात. शेती हा ग्रामीण भागातील उत्पन्न व रोगाराचा प्रमुख स्त्रोत आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेमध्ये शेतीतील रोजगार निर्मितीची भूमिका आर्थिक व्यवहारासाठी महत्त्वाची ठरते. शेतमालाच्या किंमतीचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) सर्वसाधारण किंमत स्थैर्य –**

सर्व साधारण किंमत पातळी अधिक प्रमाणावर शेतमालाच्या किंमतीवर अवलंबून असते. शेतमालाच्या

किंमतीतील वाढ किंवा घट सर्वसाधारण किंमतपातळीत वाढ किंवा घट करते. सर्वसाधारण किंमत पातळी ही घाऊक किंमत निर्देशांकातील बदलाच्या आधारावर मोजली जाते. घाऊक किंमत निर्देशांक तयार करताना कृषी शेतमाल किंवा शेतमालाच्या १५% भार दिला जातो. त्यामूळे कृषी किंमतीतील बदल हा घाऊक किंमत निर्देशांकात बदल करतो, त्यामूळे सर्वसाधारण किंमतपातळी बदलते.

**२) शेतकऱ्यांना योग्य मोबदला –**

विकसनशील देशातील अर्थव्यवस्थांमध्ये कृषी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. देशातील ६४% लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर आधारित आहे. शेतमालाच्या किंमतीतील सतत व दिर्घकालीन वाढ ग्राहकाच्या दृष्टीने कल्याणात घट करणारी असते, उत्पादकता शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाची असते. शेतमालाच्या किंमतीतील बदल व बदलाचा परिणाम शेतकऱ्याच्या राहणीमानाच्या दर्जावर दिसून येतो.

**३) कृषी उत्पादन वाढीस प्रोत्साहन –**

शेतमाल किंमती अशा असाव्यात की, त्यामध्ये उत्पादनखर्चाबरोबर शेतकऱ्यांना समान नफा मिळाला पाहिजे. अशा स्वरुपाच्या किंमत धोरणामूळे कृषी उत्पादन वाढीस प्रोत्साहन मिळते. कृषी उत्पादन वाढीमुळे वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज पूर्ण होवून अर्थव्यवस्था अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होते.

**४) पिकाच्या आकृतीबंधातील बदल –**

शेतमालाच्या किंमतीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाच्या आकृतीबंधात बदल होतो. ज्या पिकांच्या किंमतह सातत्याने वाढत असतात. अशा पिकांच्या लागवडीत वाढ होते. तर इतर पिकाच्या लागवडीत घट होते. सर्व पिकांच्या किंमतीमध्ये स्थैर्य असल्यास विविध पिकांचे उत्पादन घेतले जावू शकते.

**५) ग्राहकांचे कल्याण –**

सातत्याने शेतमालाच्या किंमतीतील वाढ ग्राहकांच्या राहणीमान खर्चात वाढ करते याचा परिणाम म्हणून ग्राहकाचे कल्याण घटते. अविकसीत देशामध्ये अन्नधान्य उत्पादनाच्या मागणीची किंमत लवचीकता जास्त राहते. याचा अर्थ गरीब लोकांच्या उत्पन्नातील हिस्सा अन्नधान्य व उपभोगासाठी वापरला जातो म्हणून शेतमाल किंमतीतील वाढ किंवा घट ग्राहकाची वाढ करते.

**६) औद्योगिक विकास –**

शेतमालाच्या किंमतीवर औद्योगिक विकास अवलंबून असतो. उद्योगासाठी वापरल्या जाणाऱ्या शेती उत्पादनाच्या किंमतीमध्ये सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यास औद्योगिक उत्पादनाचा खर्च वाढतो साहजिकच त्याचा परिणाम किंमत वाढून मागणी घटल्याने औद्योगिक विकासाला अडथळे निर्माण

होतात. थोडक्यात शेतमालाच्या किंमतीतील बदलाचा परिणाम औद्योगिक विकासावर होतो.

**कृषी किंमत उच्चावचनाचे स्वरुप :-**

**१) हंगामी उच्चावचन -**

हंगामी उच्चावचनाच्या स्वरुपामध्ये एका वर्षाच्या कालावधीतील बदलाचा आकृत्तीबंध दिसून येतो. उदा. आंब्यांची विक्री अधिक प्रमाणात मार्च ते जुलै महिन्यात होत. कारण आंबा उत्पादन हे हंगामी उत्पादन आहे. शेतमालाच्या किंमतीतील हंगामी बदल नियमीत आकृतीबंधाचे असल्यामूळे त्याच्या भविष्यातील उत्पादनाचा अंदाज घेणे सोयीचे जाते. मागणीच्या तुलनेने शेतमालाच्या पुरवठा हंगामात बदलाने घाऊक व किरकोळ उच्चावचन घडून येतात. हंगामी किंमती बटाटे, पालेभाज्या, फळे, कांदा व इतर अनेक कृषी उत्पादनाच्या बाबतीत लागू पडतात. बाजारातील अपूर्णता व शेतमालाचे नाशवंत स्वरुप यामूळे कृषी शेतमालाच्या किंमतीत अधिक उच्चा वचने घडून येतात. हंगामाच्या कालावधीत शेतमालाच्या मागणीच्या तुलनेत पुरवठा अधिक झाल्यामूळे किंमती कमी होतात. याऊलट बिगर हंगाम कालावधीत शेतमालाच्या मागणीच्या तुलनेत पुरवठा घटल्याने किंमती वाढतात. शेतकऱ्यांच्या दृष्टीने विचार करता हंगामाच्या कालावधीत शेतमालाच्या किंमती कमी मिळतात तर ग्राहकाचा विचार करता बिगर हंगामात जास्त किंमत मोजावी लागते.

**२) चक्रीय उच्चावचन - (Cuclical Fluctuations)**

हा शेतमालाच्या किंमतीतील उच्चावचनाचा दुसरा प्रकार आहे. यामध्ये चक्रिय उच्चावचन हे व्यापारचक्राचे उत्तम उदाहरण आहे. चक्रिय उच्चावचनामध्ये अर्थव्यवस्थेत शेतमालाच्या किंमती ठराविक कालावधीत वाढल्या असल्या तर त्यानंतरच्या कलावधीत त्यामध्ये घट घडून येते, किंमती उतरताना दिसतात, म्हणजे साधारणपणे ३ ते ५ वर्षाच्या कालावधी विचारात घेतल्यास शेतमालाच्या किंमतीतील तेजी कमी होवून घसरणीस सुरूवात होते. कालांतराने शेतमालाच्या किंमतीमध्ये मंदी येते. या दोन्ही अवस्था मिळून होणाऱ्या बदलांना चक्रीय बदल असे म्हणतात.

**३) दिर्घकालीन उच्चावचन - (Secular - Fluctations)**

दिर्घ कालावधीत शेतमालाच्या उत्पन्नात वाढ किंवा घट होणे याला दीर्घकालीन उच्चावचन असे म्हणतात. दिर्घकालीन उच्चावचनाचे उत्तम उदाहरण म्हणजे ग्राहक किंमत निर्देशांकानुसार राहणीमानाच्या खर्चातील स्थिर वाढ होय. जर वर्षात राहणीमान खर्चातील बदल विचारात घेतल्यास तो स्थिर दराने वाढ होत आहे. दिर्घकालीन उच्चावचनाचे दुसरे उदाहरण दिर्घकालावधीत लोकसंख्या सरळ किंवा स्थिर वृद्धी दिसून येते.

**सरकारी खरेदी किंमत - (Procurement Price)**

'भारत सरकार ज्या किंमतीस धान्याची खरेदी करत असते अशा किंमतीना सरकारी खरेदी किंमत असे म्हणतात.' सामान्यपणे अशा किंमती किमान आधार किंमतीपेक्षा जास्त व बाजारातील किंमतीपेक्षा कमी असतात. सरकारी खरेदी किंमतीमूळे शेतकऱ्यांना उत्पादन वाढीची प्रेरणा मिळते. 'सरकार शेतकऱ्यांकडील अन्नधान्य ज्या दराने खरेदी करते अशा किंमतीना सरकारी खरेदी किंमत असे म्हणतात.' सामान्यत: सरकारी खरेदी किंमत या किमान आधार किंमतीपेक्षा थोड्या जास्त परंतु प्रत्यक्ष बाजार किंमती पेक्षा कमी असतात. शेती विकासास मदत होण्यासाठी सरकार अनेक पिकांच्या किंमती निश्चित करते. देशातील शेतकरी व ग्राहक तसेच कृषी आधारीत उद्योगाची गरज लक्षात घेवून ह्या किंमती जाहीर केल्या जातात. यामध्ये तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी, मका, हरभरा, तूर, मुग, उडीद, ऊस, भूईमूग, सोयाबीन सूर्यफूल, तीळ, कापूस, ताग, तंबाखू, इत्यादी पिकांचा समावेश होतो. सरकारला या खर्च व किंमत शिफारशीमुळे समतोलिन व एकात्मिक किंमत धोरण आखून संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या प्रगतीला चालना देता येते. त्याचबरोबर उत्पादक व उपभोक्त्यांचा उत्साह राखला जातो. ऊस, कापूस, तंबाखू, तेलबिया इत्यादी नगदी पिकांच्या किंमती सरकार ठरविते. त्याचबरोबर चहा, कॉफी, रबर, मसल्याचे पदार्थ इत्यादींच्या किंमती ठरविताना आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमती विचारात घेतल्या जातात. कारण या मळ्यांच्या उत्पादनाची निर्यात होत असते. उरलेल्या शेतमालाच्या किंमती ह्या बाजारातील मागणी पुरवठ्यानुसार ठरतात. अन्नधान्याच्या किंमती निश्चित करण्यासाठी १९६५-६६ मध्ये अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली अन्नधान्य समिती नेमली होती. या समितीने किंमत स्थिरीकरणासाठी संघटना स्थापन करण्याची शिफारस केली होती. एल. के. झा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या 'झा' समितीने शेतमाल किंमत आयोगाची (Agricultural Price Commission) स्थापना करण्याची शिफारस केली होती. त्याची सरकारने त्वरीत अंमलबावणी केली. सध्या या आयोगाला शेतीविषयक खर्च किंमत आयोग (Agricultural Costs & Prices Commission) असे संबोधले जाते. शेतमालाच्या प्रशासकिय किंमती निश्चित करताना शेती क्षेत्रात सुधारित तंत्राचा अवलंब केला जावा व उत्पादनात वाढ घडवून आणण्याचे शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे ही बाब लक्षात घेतली जाते. जमीन व अन्य उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर व्हावा हा हेतू असतो. किंमती निश्चित करताना संबंधीत मालाचा मागणी पुरवठा, आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत स्थिती इत्यादी घटक विचारात घेवून त्या किंमतीचे राहणीखर्चावर, उद्योगाच्या खर्च रचनेवर आणि सर्वसाधारण किंमतपातळीवर काय परिणाम घडून येतील. हे सर्व घटक विचारात घेतले जातात. किंमती ठरविताना त्यातील भूतकाळातील प्रवृत्ती विचारात घेवून त्या जाहिर केल्या जातात. त्यामध्ये किमान आधार किंमती किंवा हमीदत्त किंमती महत्त्वाच्या ठरतात. याशिवाय या कमिशनकडून पुढील किंमती जाहिर केल्या जातात. सरकार काही पिकांच्या किंमतीस कायदेशिर दर्जा देत असते. अशा किंमतींना वैधानिक किमान आधार किंमती असे म्हणतात. उदा. भारत सरकारने ऊस आणि ताग यांच्या किंमती याप्रकारे जाहिर केल्या आहेत. सरकारने ठरवून दिलेल्या या किंमती पेक्षा कमी किंमतीला खरेदी केल्यास तो कायदेशीर दखल पात्र गुन्हा समजला जातो. असे कृत्य

बेकायदेशिर ठरते. त्यामूळे सरकारने एकदा ठरवून दिलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कोणत्याही साखर कारखान्याला कमी किंमतीने ऊस खरेदी केरता येत नाही. प्रसंगी यापेक्षा जादा किंमत देऊन कारखान्यांकडून ऊसाची खरेदी होत असते. स्वस्तधान्य दुकानांमार्फत सरकारच्या किंमतीला जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करते, अशा विक्री किंमतीला वाटप किंमती असे म्हणतात. सरकारी खरेदी किंमतीपेक्षा वाटप किंमती कमी असतात. ग्राहक हिताचा विचार करून अर्थसाहाय्य देत असते.

**स्वयंअध्यायनासाठी प्रश्न**

रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

१) शेतमालाच्या किंमतीचा परिणाम शेतकऱ्यांच्या ---------- होतो.

अ) हवामानावर ब) पावसावर क) उत्पन्नावर ड) वरील सर्व

२) शेतमाल किंमतीतील बदल ----------- किंमतीत बदल करतो.

अ) उद्योग ब) शेती आधारीत व्यवसाय क) सर्वसाधारण ड) वरील सर्व

३) हंगामी उच्चावचनाच्या स्वरुपामध्ये ----------- कालावधीतील बदलाचा आकृतीबंध दिसून येतो.

अ) एक वर्ष ब) १०० वर्षे क) २५ वर्षे ड) वरील सर्व

४) शेतमालाच्या किंमतीतील वाढीमूळे ग्राहकाचे कल्याण ------------

अ) वाढते ब) स्थिर राहते क) घटते ड) यापैकी नाही

५) ---------- उच्चावचन हे व्यापारचक्राचे उत्तम उदाहरण आहे.

अ) हंगामी ब) चक्रीय क) दिर्घकालीन ड) वरील सर्व

**१.३ सारांश :**

**अ)** प्राचीन काळापासून भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. सन १९८० मध्ये भारतात शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या ५५% होती. आज ६४% लोकसंख्या शेती व शेतीव्यवसायावर अवलंबून आहे. एक विकसनशील देश म्हणून शेतीव्यवसायाच्या माध्यमातून जलदगतीने औद्योगिकरण व आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी शेतीक्षेत्राकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भारताच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी (३२.९ कोटी हेक्टर) ९२.७% म्हणजेच ३०.५ कोटी हेक्टर जमिनीचे मापन करण्यात आले त्यापैकी लागवडीखालील क्षेत्र १४.२ कोटी हेक्टर इतके आहे. देशाच्या एकूण उपलब्ध जमिनीपैकी ४६.४% जमिनीतून विविध प्रकारची पिके घेतली जातात. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका आपणास पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**ब)** प्रत्येक देशामध्ये पर्याप्त अन्नधान्याचे उत्पादन अत्यंत महत्त्वाचे असते. हा देशाच्या अन्न सुरक्षितता धोरणाचा महत्त्वाचा भाग असतो. अलिकडे भारत सरकार कृषी उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांना विविध प्रकारे प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न करीत आहे. त्यामुळे भारतातील अन्नधान्याचे उत्पादन ५०.८ दशलक्ष टन होते. ते २०११-१२ पर्यंत २५९.३२ दशलक्ष टनापर्यंत वाढले आहे तर भारत सरकारच्या २०१२-१३ च्या अलिकडील अंदाजानुसार एप्रिल २०१३ मध्ये अन्नधान्य उत्पादन अल्पश: घटून २५५.३६ दशलक्ष झाले आहे.

**क)** हरितक्रांती म्हणजे उच्च पैदास देणाऱ्या बी-बियाणांचा वापर, खतांचा वाढता वापर व जलसिंचन यामुळे शेती उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढ होणे होय. हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. भारतात प्रथम १९६५ साली उच्च पैदास बियाणांचा वापर केला. याचे सर्व श्रेय डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे आहे. त्यांना भारतीय हरितक्रांतीचे जनक असे म्हणतात. हरितक्रांतीमुळे नविन तंत्रज्ञानाचा वापर, संकरित बियाणे, उच्चपैदास बियाणे आदीचा वापर वाढून उत्पादकता दुप्पटीपेक्षा अधिक वाढली. हरितक्रांती कालावधीत रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे माती व शेती उत्पादकतेवर पर्यावरणीय विघातक परिणाम दिसू लागले.

**ड)** आर्थिक सुधारणा कालखंडात कुटीर उद्योग व ग्रामोद्योग ऱ्हास पावल्याने या व्यवसाातील लोक शेती व्यवसायावर अतिरिक्त भार म्हणून राहू लागले. शेतीमध्ये खाणारी तोंडे जास्त व उत्पन्न कमी अशी स्थिती निर्माण झाली त्यामुळे शेतकरी अधिकाधिक कर्जबाजारी झाला. त्याचबरोबर अतिपाऊस, वादळ, महापूर, दुष्काळ, टोळधाड, भूकंप, अधिक नैसर्गिक संकटे शेती व शेतकऱ्यांवर हल्ला करून मोठ्या प्रमाणात नुकसान केले. शेतकरी वर्ग हा शेती खर्चासाठी सावकाराकडून कर्ज घेत असल्याने शेतकऱ्याच्या संकटात भर पडत गेली.

### १.४ पारिभाषिक शब्द

**१) उच्च पैदास बियाणे -**

कृषी क्षेत्रात उत्पादन वाढीसाठी वापरण्यात येणारे संकरित वाण.

**२) यांत्रिकीकरण -**

शेतीतील विविध प्रक्रिया अल्पावधीत पार पाडण्यासाठी वापरण्यात येणारी साधने.

**३) आदान प्रदान प्रमाण -**

उत्पादनासाठी ज्या घटकांचा उपयोग केला जातो व त्यांच्यापासून जे प्रत्यक्ष उत्पादन मिळते त्या उत्पादन मिळते त्या उत्पादन घटकाशी उत्पादनाचे जे प्रमाण असते त्यास आदान प्रदान प्रमाण असे म्हणतात.

४) उत्पादन–

निसर्गनिर्मित वस्तूत मानवी गरज पूर्ण करण्याची शक्ती निर्माण करणे म्हणजे उत्पन्न होय. किंवा उपयोगितेची निर्मिती म्हणजे उत्पादन होय.

**१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१.२.१ :** | १) अ | २) अ | ३) क | ४) ड | ५) क |
| **१.२.२ :** | १) क | २) ब | ३) ड | ४) ड | ५) क |
| **१.२.३ :** | १) ब | २) ड | ३) क | ४) ड | ५) अ |
| **१.२.४ :** | १) क | २) ड | ३) अ | ४) क | ५) ब |

**१.६ सरावासाठी स्वाध्याय**

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची बदलती भूमिका स्पष्ट करा.

२) भारतातील हरितक्रांतीचे यशापयश स्पष्ट करा.

३) भारतीय हरितक्रांतीची कारणे लिहा.

४) भारतात दुसऱ्या हरितक्रांतीची गरज विशद करा.

५) शेतमाल किंमतीचे महत्त्व स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) हरितक्रांती

२) कृषी अल्प उत्पादकतेची कारणे

३) कृषी अल्प उत्पादकतेवर उपाय

४) दुसऱ्या हरितक्रांतीची गरज

५) हरितक्रांतीची कारणे.

**1.7 References :**

1. Eonomic & Political Weekly- Vol. 48, Issue No. 20 May 18, 2013.

2. Misra, S. K. & Puri, V. K. (2011): Indian Economoy, Himalaya Publishing House, New Delhi and pg. No. 225-256.

3. K.P.M. Sundaram, (2008) : Indian Economy, Himalaya Publication, New Delhi.
4. Ahuwalia, M.S. (1996) : New Economic policy and agriculture : Some reflections Indian Journal fo Agricultural Economics, vol 51, No.3, pp 412-426
5. Chand, Ramesh (2001) Emerging Trends and Issues in Public and Private Investments in Indian Agriculture: a State wise Analysis Indian Journal of Agricultural Economics 56 (2) 161-184.
6. India 2011-12
7. Handbook of Indian Statistics-2012
8. Jagawat, H, (2005): Transforming the Drylands, The Sadgure Story of Westen India, India Research Press, New Delhi
9. Naiks G (2001) An analysis of socio-economic impact of bt technology on Indian cotton farmers. Ahmadabad.India: Indian Institute of Management, Centre for Managment in Agriculture.
10. Chand R. (2000) Emerging Trends and Regional Variations in Agricultural Investments and Implications for Growth and Equity Policy Paper, NCAP Pulication.
11. Remasamy C. (2004) Constraints to Growth in Indian Agriculture: Needed Technology Resource Management and Trade Strategies Indian Journal of Agricultural Economics 59.
12. Dhaka J.M. (2009), Economics of Agricultural Production and Farm Management, Aavishkar Publishers, Jaipar.
13. Sadhu and Singh (1983), Fundamentals of Agricultural Economics, Himalaya Publishing House, Bombay.
14. Wallance L. T. (1982), Agricultural Economics and Resource Management, Prertic Hall of India Pvt. Ltd., New Delhi.
15. Agrawal A. N. & Kundan Lal, (1996), Agricultural problems of India, Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi.

***

# घटक – २
# उद्योगामधील धोरणे आणि कामगिरी
# (Policies and Performance in Industry)

अनुक्रम

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ औद्योगिकीकरणाची आवश्यकता

२.२.२ १९९१ पासूनचे औद्योगिक धोरण

२.२.३ कुटीरोद्योग व लघुउद्योगाच्या समस्या व भवितव्य

२.२.४ १९९१ पासूनची परकीय गुंतवणूक धोरणे.

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

**२.० उद्दिष्ट्ये : (Objectives)**

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबीं समजतील.

१) औद्योगिकीकरणाचा अर्थ, व्याख्या व आवश्यकता याची माहिती मिळेल.

२) औद्योगिक धोरणाचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्ट्ये व वैशिष्ट्ये समजावून घेता येईल.

३) भारतीय अर्थव्यवस्थेतील कुटिरोद्योग व लघुउद्योगाचे महत्त्व, समस्या याची माहिती करुन घेता येईल.

४) कुटीरोद्योग व लघुउद्योग याचे भवितव्य वा संभव अभ्यासता येईल.

५) १९९१ पासूनच्या परकीय गुंतवणूक धोरणांची माहिती करून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक – (Introduction)

आपण घटक क्रमांक १ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्राची बदलती भूमिका, कृषी क्षेत्राची उत्पादकता हरितक्रांती, दुसऱ्या हरितक्रांतीची आवश्यकता, कृषी किंमत आणि खरेदी याविषयी माहिती करुन घेतली. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील कृषी क्षेत्राचा विकास आणि औद्योगिक क्षेत्राचा विकास या दोहोंवर अवलंबून असतो. इंग्लंड सारख्या प्रगत देशाच्या इतिहासावरुन हे स्पष्ट होते की कृषी क्रांती औद्योगिक क्रांतीचे कारणही आणि परिणामही ठरली आहे. तेंव्हा आपण या घटक क्रमांक दोन मध्ये उद्योगधंद्याविषयीची संपूर्ण माहिती करुन घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन –

प्रस्तूत घटकांमध्ये आपण औद्योगिकीकरणाची आवश्यकता, १९९१ पासूनचे औद्योगिक धोरण, कुटीरोद्योग व लघुउद्योगाच्या समस्या व भवितव्य तसेच १९९१ पासूनची परकीय गुंतवणूक धोरणे यांचा अभ्यास करणार आहोत.

### २.२.१ औद्योगिकीकरणाची आवश्यकता –

**औद्योगिकीकरण :** औद्योगिकीरण व आर्थिक विकास यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. त्यामुळेच देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिकीकरणास विशेष असे महत्त्व प्राप्त झाले आहे. आज जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी औद्योगिकीकरणाचा स्वीकार केला आहे. भारतही त्याला अपवाद नाही. स्वातंत्र्योत्तर काळात भारतानेही औद्योगिकीकरणाच्या साहाय्याने जलद आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू केली आहे. जगाचा इतिहास पाहता असे आढळून येते की, अमेरिका, इंग्लंड, जपान व रशिया या सारख्या राष्ट्रांनी औद्योगिकीकरणाच्या मदतीने प्रगती साध्य केली आहे एवढेच नव्हे तर आज ही राष्ट्रे प्रगतीच्या उत्तुंग शिखरावर आहेत. त्यांचेच अनुकरण भारतासारखी विकसनशील राष्ट्रेही करीत आहेत. औद्योगिकीकरणाचा स्वीकार करुन जलद आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. तेंव्हा या भागात आपण औद्योगिकीकरण विषयी माहिती जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

**✻ औद्योगिकीकरणाचा अर्थ व व्याप्ती :–**

औद्योगिकीकरण या संकल्पनेची व्याप्ती विचारात घेता त्याची अचूक व काटेकोर अशी व्याख्या करणे अवघड काम आहे. पारंपारिक विचारानुसार औद्योगिकीकरण म्हणजे नवीन कारखाने काढून आणि आस्तित्वात असलेल्या कारखान्यांची उत्पादन क्षमता वाढवून देशातील उद्योगधंद्याचा विकास घडवून आणणे होय. दुसऱ्या शब्दात औद्योगिकीकरण म्हणजे उत्पादन फलात बदल घडवून आणणारी प्रक्रिया होय. यामध्ये अत्याधुनिक यंत्र व तंत्र याचा वापर केला जाऊन उत्पादनात वाढ घडून येते.

**व्याख्या –**

१) **पै–कँग–चँग :** विविध उत्पादन फल व बदल घडविणारी प्रक्रिया म्हणजे औद्योगिकीकरण होय''.

**२) रोझेन्टिन रोडान आणि कॅन्डालिक:**

''औद्योगिकीकरण हा लोकसंख्या समस्या सोडविण्याचा आणि अल्पविकसित देशातील राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठीचा पर्याय आहे.''

**३) पॉल. एम. स्वीझी –**

''औद्योगिकीकरण म्हणजे नवीन उद्योगांच्या स्थापनेद्वारे केलेली उत्पादनाची निर्मिती होय.''

**४) कार्ल मार्क्स –**

''औद्योगिकीकरण म्हणजे उत्पादक साधनांची उत्पादनास आवश्यक अशी व्यवस्था निर्माण करुन तिचा विकास करणे होय.''

वरील व्याख्यांवरुन आपणास असे म्हणता येईल की, औद्योगिकीकरण ही एक प्रक्रिया असून या प्रक्रियेत अधिकाधिक भांडवलाचा वापर केला जातो. तसेच उपलब्ध भांडवलाचा सखोल आणि विस्तृत प्रमाणावर वापर करुन उत्पादन घटकांची उत्पादनक्षमता वाढविण्यावर भर दिला जातो. उद्योगात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, नवनवीन उत्पादन पद्धतीचा शोध घेणे, बाजार पेठांचा विस्तार करणे इत्यादींचा अंतर्भाव औद्योगिकीकरणात होतो.

**※ औद्योगिकीकरणाची आवश्यकता: (गरज) – Need of Industrialization**

प्राचीन काळापासून भारत हा देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. परंतु त्याच बरोबर भारतात असे अनेक कसबी कारागीर होते की जे अत्यंत सुंदर, सुबक व दर्जेदार वस्तूंचे उत्पादन करीत होते. याचाच अर्थ भारतात अनेकविध वस्तूचे उत्पादन होत होते व त्याची निर्यातही होत होती. मात्र बिटिश काळात या दोन्ही क्षेत्रांची आधोगती झाली. आज जगातील विकसित देशांचा इतिहास पाहता औद्योगिकीकरणाचे महत्त्व लक्षात येते. भारतानेही जलद आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाचा अवलंब केला. परंतु वाढती लोकसंख्या, बेरोजगारीची समस्या, सार्वत्रिक दारिद्र्य यामुळे विकासात अवरोध निर्माण झाला. तेव्हा भारताच्या जलद आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरण नितांत गरजेचे आहे. त्याचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल.

**१) नैसर्गिक साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर करण्यासाठी –**

भारत हा नैसर्गिक साधन संपत्तीच्या बाबतीत समृद्ध असा देश आहे. भारताचा भौगोलिक विस्तार ही फार मोठा आहे. तसेच विविध राज्यातील हवामान, जमिनीची प्रत, पर्जन्यमान इत्यादी बाबतीत भिन्नता आढळते. हवा, पाणी, सूर्यप्रकाश, सागर संपत्ती, खनिज संपत्ती व विविध धातू इत्यादींची उपलब्धता मुबलक प्रमाणात आहे. परंतु त्यांचा अद्यापही पर्याप्त वापर झालेला नाही. भारताला जर आपला जलद आर्थिक विकास साधावयाचा असेल तर उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्रीचा पूरेपूर उपयोग करुन घेतला पाहिजे. त्यासाठी छोटे, मोठे उद्योग स्थापन करणे आवश्यक आहे. विकसित देशानी औद्योगिकीकरणाच्या साहाय्याने देशातील साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करून घेतला आहे. भारतातही

औद्योगिकीकरणाचा स्वीकार करून नैसर्गिक साधनसंपत्तीच्या पर्याप्त वापराने जलद विकास साधता येईल.

**२) पर्याप्त संधीत वाढ करण्यासाठी –**

भारत हा फार मोठ्या लोकसंख्येचा देश आहे. तसेच लोकसंख्या वाढीचा वेगही जास्त आहे. त्यामुळे भारतात बेरोजगारीची समस्या अत्यंत उग्र रूप धारण करीत आहे. भारत हा कृषीप्रधान देश असल्याने आजही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ७०% लोकसंख्या शेतीत काम करते आहे. शेतीवर या अतिरिक्त लोकसंख्येचा ताण पडतो आहे. शेती क्षेत्रात गरज नसतानाही अधिक लोकसंख्या सामावलेली आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची सीमांत उत्पादकता शून्य आहे. शेती क्षेत्रात सुप्त बेरोजगारी वा छुपी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळते. तेंव्हा या अतिरिक्त लोकांना शेती व्यतिरिक्त रोजंदारी उपलब्ध करुन दिल्यास त्यांचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. यावर औद्योगिकीकरण हा एकमेव उपाय ठरतो. औद्यागिकीकरणामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा उत्पादनात कार्यक्षमपणे वापर करता येतो. तेंव्हा वाढत्या लोकसंख्येला अधिक रोजगार संधी निर्माण करण्यात औद्योगिकीकरणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते आहे.

**३) शेती क्षेत्राच्या विकासासाठी –**

भारतात शेती क्षेत्राच्या विकासासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे. औद्योगिक विकास व शेती विकास परस्पर पूरक आहेत. शेतीसाठी आवश्यक असणारी सर्व आदाने म्हणजे यंत्रसामग्री हत्यारे, पाणी पंप इत्यादींची निर्मिती औद्योगिक क्षेत्रात होते. तसेच किटकनाशके, जंतूनाशके, रासायनिक खते, सुधारित बी-बियाणे यांचे उत्पादनही उद्योग क्षेत्रात होते; या सर्वांचा वापर करुन शेतीमध्ये आधुनिक उत्पादन पद्धतीचा अवलंब करता येतो. परिणामी शेतीची दर हेक्टरी उत्पादकता वाढण्यास मदत होते. शेतीवर आधारित असणाऱ्या उद्योगांना कच्चा माल शेती क्षेत्रातून उपलब्ध होतो. त्यामुळे औद्योगिकीकरणास मदत होते. थोडक्यात औद्योगिकीकरणामुळे शेती विकास घडून येतो.

**४) प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी –**

भारत हा खंडप्राय देश असून तो विविध घटक राज्यांनी मिळून बनलेला आहे. देशातील प्रत्येक राज्य आर्थिक व औद्योगिक विकासात वेगवेगळ्या पातळीवर आहेत. काही राज्ये विकसित वा प्रगत आहेत. त्यामध्ये गुजरात, महाराष्ट्र, पंजाब, हरियाना, कर्नाटक, केरळ इ. राज्यांचा समोवश होतो. तर काही राज्ये ही मागासलेली आहेत. त्यामध्ये बिहार आसाम, उत्तर प्रदेश, ओरिसा इ. राज्यांचा समावेश होतो. तसेच काही राज्यांमध्येच विभागवार मागासलेपणा व प्रगतशीलता आढळते. याला काही नैसर्गिक घटक वा मानव निर्मित घटक जबाबदार ठरतात. हा प्रादेशिक असमतोल दूर करावयाचा असेल तर मागासलेल्या राज्यात वा प्रत्यक्षात औद्योगिकीकरणाची गती वाढविणे आवश्यक आहे.

**५) वाढत्या फलाचा लाभ घेण्यासाठी –**

भारतीय अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या सामावलेली आहे. शेती

मच्छीमारी, खत प्रकल्प, इत्यादी उत्पादन फलाची प्रचिती लवकर येते. मात्र सापेक्षतेने औद्योगिक क्षेतात वाढत्या फलाचा अनुभव दीर्घकाळ प्राचितीस येतो. तेंव्हा भारतीय अर्थव्यवस्थेत जलद औद्योगिकीकरण घडवून आणल्यास देशाला वाढत्या फलाचे लाभ दीर्घकाल मिळतील. देशाच्या आर्थिक विकासासाठी उद्योगांचा विकास महत्त्वाचा ठरतो.

**६) दारिद्र्य निमूर्लनासाठी –**

भारतीय अर्थव्यवस्थेत दारिद्र्याचा प्रश्‍न हा गंभीर स्वरूपाचा आहे. मनुष्याला किमान मूलभूत गरजा पूर्ण करता न येण्याची स्थिती म्हणजे दारिद्र्य होय. भारतात आजही दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. शेतीचा मागासलेपणा, बिगर शेती, रोजगाराचा अभाव आणि सतत वाढणारी लोकसंख्या यामुळे लोकांचे उत्पन्न कमी वा अत्यल्प असते. त्यातून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह सुद्धा पूर्ण होवू शकत नाही तेंव्हा त्यांना या दारिद्र्याच्या दुष्ट चक्रातून मुक्त करण्यासाठी औद्योगिकीकरण हा एकमेव उपाय आहे. उद्योगधंद्याच्या विकासामुळे वर्षभर रोजगार उपलब्ध होतो. हातांना काम मिळाल्यास त्यांचे उत्पन्न वाढून दारिद्र्यातून त्यांची मुक्तता होईल.

**७) राष्ट्रीय उत्पन्न वाढीसाठी मदत –**

आज जगातील कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासाचे मोजमाप हे राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरुन केले जाते. एखाद्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न जितके अधिक तितका तो देश आर्थिक दृष्ट्या विकसित समजला जातो. तसेच ज्या देशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा अधिक असतो. तो देश कृषीप्रधान व अल्पविकसित मानला जातो. भारता सारख्या विकसनशील देशाला राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे. औद्योगिकीकरण व राष्ट्रीय उत्पन्न वाढ यांचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे.

**८) जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी –**

अलिकडील काळात जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी जलद आर्थिक विकासासाठी औद्योगिकीकरणाचा स्वीकार केला आहे. आर्थिक विकास म्हणजे दीर्घकाळात वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे होय. औद्योगिकीकरणाच्या साहाय्याने देशातील वस्तूरुप उत्पन्न वाढून लोकांना अधिकाधिक वस्तू व सेवा उपभोगावयास मिळातात. मागणीतील बदलानुसार उत्पादन केले जाते. त्यामुळे गुंतवणूकीत वाढ होवून रोजगारात वाढ होते. थोडक्यात औद्योगिकीकरणाने जलद आर्थिक विकास होतो.

**९) लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी –**

सध्याच्या कल्याणकारी राज्याच्या कल्पनेत लोकांच्या राहणीमानात वाढ घडूवन आणण्याच्या दृष्टिने व्यूहरचना तयार करावी लागते. त्यासाठी त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरणात रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे बेरोजगारी व दारिद्र्य या सारखे गंभीर प्रश्‍न सुटण्यास मदत होते. लोकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत

गरजांची संख्यात्मक व गुणात्मक उपलब्धता औद्योगिकीकरणामुळे होते. थोडक्यात राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी औद्योगिकीकरण अत्यावश्यक आहे.

**१०) उत्पादन व उत्पादनक्षमतेत वाढ –**

औद्योगिकीकरणाचा संबंध उत्पादन व उत्पादनक्षमततेतील वाढीशी आहे. इतर क्षेत्राच्या तुलनेत औद्योगिक क्षेत्रात उत्पादन हे अधिक गतीने व मोठ्या प्रमाणात होते व त्यामध्ये निश्चितता असते. तसेच औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत आधुनिक यंत्रसामग्री व व्यवस्थापन तंत्राचा वापर केल्याने उत्पादन घटकांची उत्पादन क्षमता वाढते. इतर क्षेत्रांच्या तुलनेत औद्योगिक कामगारांची कार्यक्षमता जास्त असते. त्यामुळे कमी उत्पादक क्षेत्राकडून अधिक उत्पादक क्षेत्राकडे कामगारांचे स्थलांतर होते. त्याचा फायदा अर्थव्यवस्थेच्या विकासाला होतो.

**११) देशाचे सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी –**

जगातील सर्वच देश परकीय शत्रूपासून देशाचे संरक्षण करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट वा कर्तव्य मानतात. अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथने म्हटंल्या प्रमाणे 'देशाच्या समृद्धी पेक्षा देशाचे संरक्षण महत्त्वाचे असते.'तेंव्हा देशाला संरक्षण सज्जतेसाठी फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रात्रे, दारूगोळा, रणगाडे, क्षेपणास्त्रे, अणुबाँब लढाऊ विमाने, महाकाय युद्ध नौका, पाणबुडी इत्यादींची निर्मिती स्वदेशातच होणे आवश्यक असते. या युद्धसाहित्यांची निर्मिती औद्योगिक क्षेत्रातच होवू शकते. त्यामुळेच देशाचे सार्वभौमत्व टिकविण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे.

**१२) स्वावलंबनासाठी –**

कोणत्याही देशाला औद्योगिक वस्तूसाठी दुसऱ्या देशावर अवलंबून राहणे धोक्याचे असते. देशाचा जसजसा विकास होवू लागतो तसतशी देशांतर्गत वस्तू व सेवांची मागणी वाढत जाते. देशातली ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी देशाला स्वदेशातच वस्तूचे उत्पादन करणे आवश्यक असते. अन्यथा देशाला परकीयाकडून नाडले जाण्याची शक्यता असते प्रसंगी देशाला सार्वभौमत्वाची किंमत मोजावी लागण्याची शक्यता असते भारताने हे अनुभवले आहे. तेव्हा देशाला स्वावलंबी बनविण्यासाठी औद्योगिकीकरणाची नितांत गरज असते.

**१३) लोकांची करक्षमता व सरकारच्या महसूल वाढीसाठी –**

आधुनिक काळात सरकारच्या कार्याच्या सीमारेषा विस्तारलेल्या आहेत. त्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सरकारला वाढीव खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाचे विविध मार्ग शोधावे लागते. कर आकारण्याच्या माध्यमातूनही सरकारला पैसा जमा करावा लागतो. लोकांकडून कररुपाने पैसा जमा करण्यासाठी लोकांची करदेयक्षमता वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी लोकांची उत्पन्न पातळी वाढणे आवश्यक असते. औद्योगिकीकरणातून लोकांची करक्षमता व सरकारच्या महसूलात वाढ करता येईल.

**१४) सेवा क्षेत्राच्या विकासासाठी –**

देशातील सेवा क्षेत्राचा विकास हा त्या देशाच्या आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. औद्योगिकीकरणामुळे सेवा क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते. औद्योगिकीकरणाने उद्योगधंद्याचा विकास होतो. उद्योगधंद्यासाठी वीज, पाणी, वाहतूक व दळणवळणाची साधने, संपर्क माध्यमे व साधने, बँक, विमा कंपन्या यांची नितांत गरज असते. तसेच शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे, तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये यांच्या संख्येत वाढ होते. या सर्वांचा परिणाम देशाच्या सेवा क्षेत्राची प्रगती घडून येते.

**१५) सामाजिक परिवर्तनासाठी –**

भारतीय समाज हा रूढीप्रिय आहे. तसेच तो ऐहिकतत्त्वज्ञान उराशी बाळगणारा असा आहे. त्यामुळे अंधश्रद्धा, दैववाद, जातीयता, कर्मकांड, या जुन्या बुरसटलेल्या विचारांना चिटकून आहे. त्यामुळे स्वत:च्या कर्तृत्वावर त्याचा विश्वासच नाही. आपण स्वत:च्या मनगटाच्या जोरावर आपला विकास घडवून आणू शकतो असा विचार तो कधी करीत नाही. तसेच अपत्य प्राप्ती ही दैवी देणगी मानतो. त्यामुळे लोकसंख्या वाढते. बेरोजगारी व दारिद्र्य यासारखे गंभीर प्रश्न निर्माण होतात. तेंव्हा सुसंस्कृत, विज्ञानधिष्ठीत समाजनिर्मितीसाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे. औद्योगिकीकरणामुळे, रोजगारात वाढ होते. उत्पन्नात व उत्पादनात वाढ होते. कार्यक्षमतेत वाढ होते. परिणामी एकसंघ व प्रगतशील समाज निर्माण होण्यास मदत होते.

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, भारताला महासत्ता बनावयाचे असेल तर समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी व स्थैर्यासह आर्थिक विकास साध्य करण्यासाठी औद्योगिकीकरणाची आवश्यकता आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न: –**

**अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) ---------------- म्हणजे उत्पादन फलात बदल घडवून आणणारी प्रक्रिया होय.

अ) भांडवलीकरण ब) औद्योगिकीकरण क) व्यावसायीकरण ड) यापैकी नाही.

२) औद्योगिकीकरणामुळे लोकांची कर भरण्याची क्षमता -----------------

अ) कमी होते ब) स्थिर राहते क) वाढते ड) यापैकी नाही

३) औद्योगिकीकरणामुळे ------------- यांचा विकास घडून येण्यास मदत होते.

अ) सेवा क्षेत्र ब) शेतीक्षेत्र क) उद्योगक्षेत्र ड) वरील सर्व

४) शेतीक्षेत्र आणि उद्योगक्षेत्र यांचा विकास -------------------- असतो.

अ) परस्पर पूरक ब) परस्पर विरोध क) स्वतंत्र ड) यापैकी नाही

५) -------------------- मते देशाच्या समृद्धीपेक्षा देशाचे संरक्षण महत्त्वाचे असते.

अ) ॲडम स्मिथ ब) कार्ल मार्क्स क) केन्स ड) रिकार्डो

**२.२.२ भारताचे १९९१ पासूनचे औद्योगिक धोरण :**

यापूर्वीच्या उपघटकामध्ये आपण अर्थव्यवस्थेच्या जलद आर्थिक विकासात औद्योगिकीकरणाची गरज वा आवश्यकता असल्याचे पाहिले आहे. या उपघटकात आपण औद्योगिक धोरणाचा अर्थ, व्याख्या व उद्दिष्ट्ये यांचा अभ्यास करणार आहोत. त्याचबरोबर १९९१ चे नवीन औद्योगिक धोरण आणि त्यानंतर त्यामध्ये करण्यात आलेल्या सुधारणा याविषयीची माहिती करून घेणार आहोत.

*** औद्योगिक धोरणाचा अर्थ व व्याख्या :**

अर्थव्यवस्थेतील विविध उद्योगांचा विकास साधण्यासाठी सरकारमार्फत राबविले जाणारे धोरण म्हणजे औद्योगिक धोरण होय. औद्योगिक धोरण हे देशाच्या आर्थिक धोरणाचे महत्त्वपूर्ण अंग मानले जाते. देशातील उद्योगाची वाढ निकोप, संतुलित आणि सुदृढ पायांवर उभी करण्यासाठी औद्योगिक धोरणाची आवश्यकता असते. औद्योगिक धोरणाशिवाय औद्योगिक विकासाची कल्पनाच करता येत नाही. त्यामुळे सरकार आपली औद्योगिकीकरणाची भूमिका औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून स्पष्ट करते. औद्योगिकीकरणाचे स्वरुप, व्यवस्थापन, उद्दीष्ट्ये, तंत्रज्ञान, भांडवल व औद्योगिक संबध याबाबतच्या तरतूदी औद्योगिक धोरणातून सरकार मांडत असते व त्यातून आपले जलद आर्थिक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करते.

अलिकडील काळात अर्थकारण व राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू बनल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यात परस्परावलंबन व एकरूपता झाल्याचे दिसून येते. याचाच अर्थ राजकारणाचा अर्थकारणावर प्रभाव पडलेला दिसून येतो. तसेच अर्थकारणाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राजकारणावर प्रभाव पडल्याचे आढळते. थोडक्यात अर्थव्यवस्थेतील उद्योगांच्या विकासासाठी सरकार जे धोरण राबविते त्यास औद्योगिक धोरण असे म्हणतात. तर व्यापक अर्थाने औद्योगिक धोरण म्हणजे देशाच्या औद्योगिकीकरणाचे सिद्धांत, औद्योगिकीकरणाचे व्यवस्थापन, औद्योगिकीकरणाची पद्धत व वेग याबाबतीत सरकारचा दृष्टिकोन स्पष्ट करणारी अधिकृत घोषणा होय.

सरकारचे औद्योगिक धोरण हे निश्चित, पूर्वनियोजन, प्रेरणा देणारे आणि विशेष म्हणजे ते वास्तववादी असावे लागते. सरकारचे धोरण जेवढे प्रभावी आणि सर्वसमावेशक असेल तेवढे जलद औद्योगिकीकरण घडून येते. या धोरणाच्या यशस्वीतेवरच औद्योगिक आणि आर्थिक प्रगती अवलंबून असते.

स्वांतत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी भारताच्या औद्योगिकीकरणाकडे फारशे लक्ष दिले नाही. उद्योगांच्या वाढीसाठी पोषक व निश्चित धोरण आखले गेले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र भारत सरकारने औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने विविध धोरणे आखली व त्यांची अंमलबजावणी केली. त्यामध्ये ६ एप्रिल १९४८ मध्ये पहीले औद्योगिक धोरण जाहीर केले. देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा पर्याप्त वापर करण्यासाठी, रोजगार निर्मितीसाठी उद्योगांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने हे धोरण राबविण्यात आले भारत सरकारने १९५६ मध्ये दुसरे औद्योगिक धोरण जाहीर केले. यामध्ये खाजगी क्षेत्रातील उद्योगांना

उत्तेजन देण्याचे त्याच बरोबर त्यावर नियंत्रण ठेवण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. त्यानंतर सत्तेवर आलेल्या जनता पक्षाच्या सरकारने डिसेंबर १९७७ मध्ये औद्योगिक धोरण जाहीर केले. यामध्ये कुटीर व लघु उद्योगावर अधिक भर देण्यात आला. परंतू १९८० मध्ये राजीव गांधीजींच्या क्राँग्रेस सरकाने पुन्हा २३ जुलै १९८० रोजी औद्योगिक धोरण जाहीर केले. त्यामध्ये औद्योगिक स्पर्धेत वाढ, आधुनिकीकरण, खाजगी क्षेत्राला अधिक वाव देणे इत्यादी बदल केले असले तरी १९५६ च्या औद्योगिक धोरणाच्या मूलभूत चौकटीत बदल झाला असे म्हणता येणार नाही.

## * १९९१ चे नवीन आर्थिक धोरण :

भारताचे पतंप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी २४ जुलै १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर केले. नवीन औद्योगिक धोरण हे आत्तापर्यंतच्या औद्योगिक धोरणापेक्षा वेगळे धोरण होते. या धोरणात मूलभूत बदल करण्यात आले. सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्याचे व खाजगी क्षेत्राला उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले. जागतीक पातळीवर अनेक देशांनी मुक्त व खुल्या अर्थव्यवस्थेचा अंगीकार करण्यास सुरूवात केली. भारतानेही खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा स्वीकार केला. या आधारावरच नवीन औद्योगिक धोरणाची मांडणी करण्यात आली.

### १९९१ च्या औद्योगिक धोरणाची उद्दिष्ट्ये :

नवीन आर्थिक धोरणाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) बदलत्या राष्ट्रीय आणि जागतिक परिस्थितीचा विचार करुन त्या दृष्टीने उद्योगांची पूनर्रचना करणे.

२) भारतीय उद्योगाची उत्पादनक्षमता वाढवून त्यांना अधिकाधिक स्पर्धात्मक बनविणे.

३) प्रादेशिक असंतुलन दूर करणे.

४) जलद आर्थिक विकास घडवून आणणे.

५) भारतीय अर्थव्यवस्थेची कोंडी फोडून तिला जागतिक अर्थव्यवस्थेशी निगडित करणे.

६) सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती मर्यादित करून खाजगीकरणाला उत्तेजन देणे.

७) उच्च तंत्रज्ञानाचा वापर करता यावा व निर्यातिला प्रोत्साहान मिळावे म्हणून गुंतवणूकीला चालन देणे.

८) मक्तेदारी आणि व्यापारी नियंत्रण कायदा शिथील करणे.

९) औद्योगिक परवाना पद्धती नष्ट करणे.

१०) भांडवल बाजाराचा विकास घडवून आणणे.

## * १९९१ च्या औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये व तरतूदी –

१९९१ चे औद्योगिक धोरण हे प्रामुख्याने औद्योगिक परवाना पद्धती, विदेशी गुंतवणूक, विदेशी तंत्रज्ञान, मक्तेदारी कायद्यात शिथिलता इत्यादी बाबतीत होते. या धोरणाची ठळक वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

### १) औद्योगिक परवाना पद्धती रद्द –

भारत सरकारने 'औद्योगिक विकास व निगम कायदा' १९५१ मध्ये संमत केला. या कायद्यानुसार कोणते उद्योग सुरू करावेत, कोणत्या वस्तूंचे किती प्रमाणात उत्पादन करावे, कारखाना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करणे इत्यादींसाठी शासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागत होती. याचाच अर्थ परवाना राज पद्धती होती. परंतू यामुळे सरकारी नोकरांची दप्तर दिरंगाई, लचलूचपत, वशिलेबाजी यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते.

नवीन औद्योगिक धोरणानुसार देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे १२ उद्योग वगळता इतर कोणताही उद्योग सुरू करताना सरकाच्या परवानगीची आवश्यकता नाही. तसेच ही परवाना राज पद्धती संपुष्टात आणल्याने उद्योजकांची या त्रासातून सुटका झाली. तसेच या धोरणाने उद्योगांच्या वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले.

### २) विदेशी गुंतवणूक –

भारतात मोठ्या उद्योगांची उभारणी करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूक करावी लागते. तसेच त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची गरज असते. या दृष्टीने विदेशी गुंतवणूक अत्यंत महत्त्वाची ठरते. या धोरणानुसार प्राधान्यक्रम उद्योगामध्ये अनिवासी भारतीय गुंतवणुकदार व परकीय कंपन्यांना ५१ टक्के थेट परकीय भाग भांडवल गुंतवणूकीसाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामध्ये वाहतूक, अन्नक्रिया उद्योग, हॉटेल, पर्यटन, खते, कृषी अवजारे, रसायने इत्यादींचा समावेश होतो. या धोरणात निर्यातीत वाढ व्हावी म्हणून सरकार विदेशी कंपन्यांना भारतीय याशिवाय निर्यात क्षेत्रातील उद्योगपतीशी सहकार्य करण्याचे याशिवाय एका निर्यात मंडळाची स्थापना करण्याचे ठरले होते.

### ३) परकीय तंत्रज्ञानास मुक्त परवाने –

भारतात परदेशातून आधुनिक तंत्रज्ञान यावे म्हणून परकीय तंत्रज्ञानाची आयात करण्यासाठी आवश्यक ते करार करता यावेत म्हणून सरकाने मुक्त हस्ताने परवानगी देण्याचे ठरविले. अशा कारारामुळे परकीय चलनाचा प्रश्न निर्माण होणार नाही. त्याच प्रमाणे ज्या करारामुळे निर्यात करून रॉयल्टी देण्याची तरतूद असेल. अशा करारांना सरकारच्या परवानगीची गरज असणार नाही.

### ४) मक्तेदारी व व्यापार प्रतिबंध कायद्यात सुधारणा –

ठराविक ओद्योजकांच्या किंवा औद्योगिक घराण्यांच्या हातामध्ये औद्योगिकीकरणातून आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होऊ नये, मक्तेदारी निर्माण होऊ नये यासाठी १९७० मध्ये सरकारने मक्तेदारी व व्यापार प्रतिबंध कायदा संमत केला होता. या कायद्यानुसार मोठ्या उद्योजकांवर विविध प्रकारची नियंत्रणे घातली होती. नवीन आर्थिक धोरणात ही नियंत्रणे काढून टाकण्यात आली. नवीन प्रकल्प सुरू करणे, उत्पादन क्षमतेत वाढ करणे, उद्योजकाचा विस्तार करणे, एकत्रीकरण करणे इत्यादीसाठी आता सरकारी परवानगीची गरज उरणार नाही. यामुळे औद्योगिकरणास चालना मिळाली.

### ५) सार्वजनिक क्षेत्रासंबंधीचे धोरण –

पूर्वीच्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक क्षेत्रावर फार मोठी जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार सार्वजनिक क्षेत्राने देशातील औद्योगिकीकरणाचा पाया घातला. मूलभूत व महत्त्वाचे उद्योग सरकारी क्षेत्रात सुरू करण्यात आले. त्यामुळे मागास भागांचा विकास होण्यास मदत झाली. सरकारने समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या उद्देशाने अनेक उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरू केले. मात्र अलिकडील काळातील सार्वजनिक क्षेत्राचा अनुभव वाईट होता. अनेक उद्योग तोट्यात चालले होते. त्यामुळे नवीन आर्थिक धोरणात सरकारने सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्याचे धोरण स्वीकारले. या धोरणात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची संख्या १८ वरुन ८ वर आणण्यात आली. यामध्ये अणूशक्ती कोळसा व लिग्नाईट, लोखंड व पोलाद, शस्त्रात्रे, दारूगोळा इत्यादींचा समोवश होता. अर्वरित उद्योग खाजगी क्षेत्रांना सुरू करता येतील.

### ६) लघु व कुटीरउद्योगाबाबत धोरण –

भारतीय अर्थव्यवस्थेत लघु व कुटीरोद्योगांना विशेष असे महत्त्व प्राप्त झाले आहे. विशेषत: ग्रामीण भागात व मागास भागात रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन म्हणून लघु उद्योगांकडे पाहिले जाते. नवीन औद्योगिक धोरणात लघु उद्योगाची व्याख्या विस्तृत करण्यात आली. या धोरणानुसार उत्पादन संस्थेच्या स्थानिकीकरणाचा विचार करता चिमुकल्या उद्योगातील भांडवल गुंतवणूक मर्यादा २ लाखावरुन ५ लाख करण्यात आली. तसेच लघु उद्योगाची भांडवल गुंतवणूक मर्यादा ६० लाख रूपयापर्यंत तर सहाय्यक उद्योगांची भांडवल गुंतवणूक मर्यादा ७५ लाख रूपयापर्यंत वाढविण्यात आली. भांडवल गुंतवणूकीचे प्रमाण वाढविल्याने या उद्योगांना आधुनिक व उच्च तंत्रज्ञानाचा स्वीकार करता येईल.

नवीन औद्योगिक धोरणात लघु व कुटीरोद्योगांच्या विकासासाठी अनेक उपाय योजण्यात आले. त्यामध्ये वेळेवर, योग्य दराने, पुरेशा वित्त पुरवठ्याची सोय निर्माण करण्यात आली. तसेच जे उद्योग ग्रामीण विकासाचा भाग बनत आहेत अशा उद्योगांना सवलती देण्यात आल्या. तसेच या धोरणात. हातमाग, खादी व ग्रामोद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगांच्या विकासाला मदत करण्याचे आश्वासन दिले.

### ७) समतोल प्रादेशिक विकास –

समतोल प्रादेशिक विकासाच्या तत्वाला नवीन औद्योगिक धोरणात प्राधान्य देण्यात आले. मागासलेल्या भागात उद्योगधंद्याचा विकास घडून येण्याच्या दृष्टिने सरकार मदत करणार होते. मागसलेल्या भागातील उद्योगांना कच्चा माल, पतपुरवठा, बाजारपेठा इत्यादी सोयी उपलब्ध केल्या जातील. मागास भागात किंवा १० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या भागात उद्योगांची उभारणी करताना सरकारच्या परवानगीची गरज भासणार नाही. तसेच मागास भागातील उद्योगांना वीज, पाणी, वाहतूक व दळणवळणाच्या सोयी आणि इतर पायाभूत सोयीसुविधा सरकारकडून उपलब्ध करून दिल्या जातील. यामुळे मागास भागातील उद्योगाच्या विकासास मदत होणार आहे. याशिवाय सरकारने मागास भागांच्या विकासासाठी विकास

केंद्रे सुरू केली आहेत. थोडक्यात या नवीन औद्योगिक धोरणात समतोल प्रादेशिक विकासास महत्त्व देण्यात आले.

**८) निर्यात प्रोत्साहन –**

भारताची निर्यात वाढविण्यासाठी सरकार विशेष प्रयत्न करेल. त्यासाठी परकीय कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. या कंपन्या जेंव्हा भारतीय उद्योगातून तयार झालेल्या वस्तूंची निर्यात करून उत्पन्न मिळवितील तेंव्हाच परकीय भागधारकांना नफ्याचे वाटप केले जाईल. तथापि याबाबतचा निर्णय कंपन्यानीच घ्यावयाचा आहे सरकार यामध्ये हस्तक्षेप करणार नाही हे स्पष्ट केले. तसेच निर्यात वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने सरकारने मुक्त व्यापार धोरण, जागतिकीकरण आणि रूपयाची पूर्ण परिवर्तनियता यासारख्या धोरणांचा स्वीकार करण्यात आला. यातून देशातील परकीय गुंतवणूक वाढून निर्यातीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळण्यास मदत होईल.

**९) उद्योगाच्या स्थानविषयक धोरणात उदारता –**

यापूर्वीच्या औद्योगिक धोरणात उद्योगाच्या स्थानिश्चितीबाबत सरकारचे अनेक निर्बंध होते. त्यामुळे नवीन उद्योगाच्या उभारणीस अनेक अडथळे पार करून जावे लागत असे मात्र या नवीन औद्योगिक धारेणात स्थान निश्चीतीच्या अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहारापासून २५ किलोमीटरच्या पुढील भागात उद्योगाची उभारणी करता येईल. यासाठी सरकारच्या परवानगीची आवश्यकता भासणार नाही. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी ही अट घातल्याचे सांगण्यात आले.

**१०) सामान्य माणसाचे हित –**

१९९१ च्या औद्योगिक धोरणात सामान्य माणसाचे हित साधले जाईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या धोरणानुसार स्पर्धात्मकतेत वाढ होईल व परकीय गुंतवणूकीच्या वाढत्या प्रवाहामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. तसेच रास्त किंमतीत वैविध्यपूर्ण आणि दर्जेदार वस्तू व सेवा सर्वसामान्य लोकांना सहज उपलब्ध होतील. थोडक्यात या धोरणामुळे सामान्य माणसाचे हित साधण्यास मदत झाली आहे.

**१९९१ च्या औद्योगिक धोरणाचे मुल्यमापन –**

१९९१ चे औद्योगिक धोरण हे यापूर्वीच्या औद्योगिक धोरणापेक्षा फारच वेगळे असे धोरण आहे. या धोरणात सार्वजनिक क्षेत्राचा संकोच करण्यात आला. आज पर्यंत निर्बंधात असणारे खाजगी क्षेत्र निर्बंधमुक्त करण्यात आले. स्पर्धात्मकता वाढीसाठी विदेशी गुंतवणूकीत वाढ घडून यावी, विदेशातून उच्च तंत्रज्ञानाची विनासायास आयात करता यावी या हेतूने खाजगीकरण, उदरीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा अवलंब करण्यात आला. यातून अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती मिळाली. असे असले तरी या धोरणात समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट बाजूला पडल्याचे दिसून येते. यामध्ये प्रगतराष्ट्रे व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दबावाला बळी पडून परकीय भांडवलदार व कंपन्याकडे भारतीय औद्योगिक

क्षेत्र गहाण टाकण्यात आले. तसेच महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्याच्या प्रवेशाने भारतातील लघु उद्योग व मोठे उद्योग संपुष्टात येण्याची भिती निर्माण झाली आहे. या धोरणावरील काही टीका पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) १९९१ च्या औद्योगिक धोरणात सार्वजनिक क्षेत्राचा संकोच केला आहे. भारताच्या सामाजिक आर्थिक विकासात सार्वजनिक क्षेत्राने भरीव कामगिरी केली आहे. खाजगी क्षेत्र ही कामगिरी पार पाडेल का? अशी शंका उपस्थित केली जाते.

२) मोठ्या उद्योगावरील नियंत्रणे दूर केल्याने लघु व कुटीरोद्योगा वर विपरीत परिणाम होईल. स्पर्धेत हे उद्योग टिकणार नाहीत.

३) मक्तेदारी तथा व्यापार प्रतिबंध कायदा (MRTP) रद्द केल्याने संपत्तीचे केंद्रीकरण वाढेल. समाजवादी समाजरचनेचे ध्येय गाठता येणार नाही.

४) नवीन औद्योगिक धोरणानुसार परकीय गुंतवणूक व तंत्रज्ञान मुक्तपणे भारतात प्रवेश करेल याचा विपरीत परिणाम देशातील उद्योगावर होईल त्यातून बेकारीचा प्रश्न निर्माण होईल.

५) या धोरणात खाजगीकरणाला प्रोत्साहन दिल्याने आर्थिक विषमता निर्माण होईल.

*** सन १९९१ नंतरचे औद्योगिक धोरणातील बदल –**

भारताने अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या आर्थिक समस्येवर उपाय म्हणून अपरिहार्यतेने आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यात आला. त्यानुसार खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनांचा अवलंब करण्यात आला. त्यावर आधारित १९९१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण स्वीकारले. या धोरणात आजपर्यंत वेळोवेळी अनेक बदल करण्यात आले त्याच्या ऊहापोह पुढील प्रमाणे करता येईल.

*** १९९३ चे औद्योगिक धोरण –**

१९९३ च्या औद्योगिक धोरणात १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणातील प्रमुख तरतूदी तशाच पुढेही सूरू ठेवण्यात आल्या. त्याच बरोबर भांडवल बाजार सरकारी नियंत्रणातून मुक्त करण्यात आला. परकीय विनिमय नियंत्रण कायद्याऐवजी (FERA - Foreign Exchange Regulation Act) भारतीय संसदेने 'परकीय वित्तीय व्यवस्थापन कायदा (FEMA Foreign Exchange Management Act) १९९९ मध्ये संमत केला. त्यानुसार परकीय कंपन्यावरील गुंतवणूकीबाबतची सर्व नियंत्रणे दूर करण्यात आली. विदेशी गुंतवणूकी संदर्भात अधिक उदारपणाचे धोरण स्वीकारण्यात आले. अर्थव्यवस्थेत अनेक क्षेत्रात मुक्त गुंतवणूकीला परवानगी देण्यात आली. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीची मर्यादा ५१ टक्क्या पर्यंत वाढविण्यात आली. तसेच अनिवासी भारतीयांना व विदेशी निगम मंडळांना १०० टक्के गुंतवणूकीस परवानगी देण्यात आली.

सरकारने १९९४-९५ पासून सुधारित वर्धित मूल्यकर प्रणालीचा अवलंब केला. औद्योगिक उत्पादनास

साहाय्य व्हावे म्हणून जकातकर ८५ टक्कयांवरून ६५ टक्के करण्यात आला. तसेच भांडवली वस्तूवरील जकात कर कमी करण्यात आला. परिणामी औद्योगिकीकरणास पोषक वातावरण निर्माण झाले. त्याचप्रमाणे भांडवलबाजाराचे परिणामकारक नियंत्रण व्हावे म्हणून भारतीय रोखे व विनिमय मंडळ (सेबी) स्थापन करण्यात आले. तसेच या धोरणामध्ये लघू उद्योगाची मर्यादा ६० लाखांवरुन ७५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली.

*** २००१ चे औद्योगिक धोरण –**

२००१ मध्ये आर्थिक सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्याला सुरूवात झाली. देशाची अर्थव्यवस्था अधिक खुली करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. औद्योगिक विकासाच्या वेगात वाढ करण्यासाठी परकीय थेट गुंतवणूकीला उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले. म्हणजेच परकीय गुंतवणूकीबाबत उदार धोरणाचा अवलंब करण्यात आला. या धोरणात सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवूणक हळूहळू मोकळी करण्याचे धोरण आखण्यात आले. निर्गुंतवणूक धोरण हा आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग होता. २००२ ते २००७ या ५ वर्षासाठी पंचवार्षिक आयात निर्यात धोरणाची घोषणा करण्यात आली. निर्यात व्यापाराला उत्तेजन देण्यासाठी विविध तरतूदी करण्यात आल्या. त्यामध्ये कृषी उत्पादनांसाठी वाहतूक व्यवस्था, लघु आणि कुटीरोद्योगासाठी आधारभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरले. त्याचप्रमाणे निर्यात प्रधान उद्योगांना सुलभ वित्त पुरवठा, नवीन बाजारपेठांच्या शोधासाठी मदत करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले.

अशा प्रकारे भारताने परिस्थितीनुरूप औद्योगिक धोरणात सतत बदल केलेले दिसून येतात. जागतिक बदलती परिस्थिती व देशांतर्गत विकासाची उद्दिष्ट्ये यांच्यात योग्य समन्वय साधण्यासाठी औद्योगिक धोरणात आवश्यक ते बदल केलेले दिसून येतात.

**स्वयंअध्ययन प्रशन:**

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

१) ------------ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.

अ) १९९१ ब) १९९५ क) १९८० ड) १९५६

२) अर्थव्यवस्थेतील विविध उद्योगांचा विकास साधण्यासाठी सरकार मार्फत राबविले जाणारे धोरण म्हणजे ------------- धोरण होय.

अ) वित्तीय ब) औद्योगिक क) व्यवस्थापकीय ड) यापैकी नाही

३) भारत सरकारने ‘औद्योगिक विकास व निगम कायदा’ सन ------------ मध्ये संमत केला.

अ) १९६१ ब) १९४८ क) १९५१ ड) १९७५

४) भारताचे माजी पंतप्रधान -------------- यांनी १९९१ चे नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले.

अ) पी. व्ही नरसिंहराव ब) राजीवजी गांधी क) डॉ. मनमोहनसिंग ड) व्ही. पी. सिंग

५) सन १९९१ च्या औद्योगिकधोरणात ------------ विदेशी गुंतवणूकीला परवानगी देण्यात आली.

अ) ५१ टक्के ब) १०० टक्के क) ५५ टक्के ड) ७५ टक्के

### २.२.३ कुटीर व लघु उद्योगांच्या समस्या व भवितव्य :

### (Problems and Prospects of Cottage and Small Scale Industries) -

यापूर्वीच्या उपघटकांमध्ये आपण अर्थव्यवस्थेतील औद्योगिकीकरणाची आवश्यकता, १९९१ पासूनचे नवीन औद्योगिक धोरण यांचा अभ्यास केला आहे. या उपघटकात कुटीर व लघु उद्योगांच्या समस्या व भवितव्य या विषयीची माहिती जाणून घेणार आहोत.

आज जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रांत कुटीर व लघु उद्योगांचे कमी अधिक प्रमाणात आस्तित्व आढळून येते. विकसित व विकसनशील अर्थव्यवस्थेच्या प्रगतीत लघु उद्योग हे महत्त्वाची भूमिका बजावित आहेत. फार पूर्वी पासून भारतीय अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत कुटीर व लघु उद्योगाचे योगदान फार मोठे आहे. आजही हे उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. वाढती लोकसंख्या, बेरोजगारीची समस्या, सार्वत्रिक दारिद्र्य आणि मागासलेपणा यातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणून कुटीर व लघु उद्योगाकडे पाहिले जाते.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्र्य दूर करण्यासाठी कुटीरोद्योगांवर भर दिला. कुटीरोद्योग हे सामान्यत: घराघरातून चालविले जाणारे लहान प्रमाणावरील उद्योग आहेत. लघु उद्योग हे कुटीरोद्योगापेक्षा थोडे मोठे असतात. हे उद्योग श्रमप्रधान उद्योग असल्याने कमी भांडवल गुंतवणूकीतून अधिक रोजगारी निर्माण करतात. त्यामुळे भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांना कमी भांडवल गुंतवणूकीत अधिक रोजगार उपलब्ध करून देता येईल. तेंव्हा कुटीर व लघु उद्योग अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने महत्त्वाचे ठरतात. तसेच हे उद्योग मोठ्या उद्योगांनाही पूरक ठरतात. त्यामुळे देशात औद्योगिकीकरण घडून येण्यास हातभार लागतो. भारतातील औद्योगिक क्षेत्रातील एकूण उत्पादनापैकी जवळवजळ ५० टक्के उत्पादन हे या उद्योगातून होते. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेतील कुटीर व लघु उद्योगांचे महत्त्व अधोरेखित होते.

### कुटीरोद्योग व लघु उद्योगाचा अर्थ -

लघु, कुटीर आणि अतिलहान उद्योग या संकल्पना बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरल्या जातात. त्यांच्या व्याख्यांचा अभ्यास केल्या नंतर त्यांच्यातील अर्थ स्पष्ट होईल.

**कुटीर उद्योग – (Cottage Industries)** -

१९४९-५० च्या फिस्कल कमिशनच्या मते, ''कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने पूर्णकालीन किंवा अंशकालीन व्यवसाय म्हणून चालविण्यात येणाऱ्या उद्योगाला कुटीर उद्योग म्हणतात.''

" A Cottage Industry has been defined as on which is carried on wholly or primarily with the help of members occupation : Fiscal Commission."

कुटीर उद्योग हे प्रामुख्याने शेतीशी संबंधित असतात. कारागिर आपल्या घरी राहून या उद्योगामध्ये काम करतात. कुटीरोद्योगातील उत्पादन हे घरगुती स्वरुपाचे व छोट्या प्रमाणात असते. 'ग्रामीण भागातील लोकांच्या गरजांचा विचार करुन उत्पादन घेतले जाते. हा व्यवसाय वा उद्योग वंशपरंपरागत असतो त्यामुळे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे उद्योगातील ज्ञान व गुणकौशल्य दिली जातात. अशा प्रकारे अंशकालीन किंवा पूर्णकालीन रोजगार मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. कुटीर उद्योग हे कुटुंबातील व्यक्तींच्या मदतीने केले जातात. कामगारांची संख्या १० पेक्षा जास्त असत नाही. भांडवल ५००० रूपयांपेक्षा अधिक नसते.

**लघु उद्योग – Small Scale Industries**

१९४९-५० च्या फिस्कल कमिशनच्या मते, ''ज्या उद्योगात १० ते ५० कामगार काम करतात व ज्या उद्योगातील भांडवल गुंतवणूक ५ लाखापेक्षा जास्त नसते अशा उद्योगांना लघु उद्योग असे म्हणतात.''

लघु उद्योगाची व्याख्या ही त्यामध्ये गुंतविलेले भांडवल व निर्माण होणारी रोजंदारी यावरुन केली जाते. तसेच भारतातील लघु उद्योगातील गुंतवणूकीची कमाल रक्कम ही प्राप्त परिस्थितीनुसार वाढविण्यात आल्याचे स्पष्ट होते.

१९६६ मध्ये लघुउद्योगांची गुंतवणूक मर्यादा ७.५लाख रूपये करण्यात आली. १ मे १९७५ मध्ये ही मर्यादा वाढवून १० लाख रूपये पर्यंत आली. २३ जुलै १९८० च्या औद्योगिक धोरणात लघु उद्योगातील भांडवल गुंतवणूक मर्यादा २० लाख रूपये करण्यात आली. मे १९९० च्या औद्योगिक धोरणामध्ये भांडवल गुंतवणूक मर्यादा ६० लाख रूपयांपर्यंत वाढविण्यात आली. तसेच जे लघु उद्योग स्थापनेनंतर ३ वर्षांनी आपल्या उत्पादनापैकी कमीत कमी ३० टक्के उत्पादन निर्यात करतील त्यांची भांडवल गुंतवणूकीची मर्यादा ७५ लाख रूपये करण्यात आली. सन १९९७ च्या अबिदहुसेन कमिटीच्या शिफारशीनुसार ही मर्यादा ३ कोटी रुपये करण्यात आली.

२ ऑक्टोबर २००६ रोजी केंद्र सरकारने संमत केलेल्या कायद्यानुसार लघु उद्योगाची भांडवल मर्यादा २५ लाख ते ५ कोटी रूपये अशी ठरविण्यात आली. २२ फेब्रुवारी २००७ रोजी केंद्रीय अर्थमंत्र्यानी २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात लघु उद्योगांची भांडवल मर्यादा १.५ कोटी रूपयांपर्यंत वाढविली असून ६९ निवडक राखीव कारखानदारी स्वरुपाच्या लघुउद्योगासाठी ती ५ कोटी रूपये इतकी करण्यात आली.

सहाय्यक अगर पूरक (Ancillary) उद्योग म्हणजे जे उद्योग मोठ्या उद्योगांना सुटे भाग पुरविण्याचे कार्य करतात असे उद्योग होत. पूरक उद्योगात फक्त यंत्रसामग्रीतील गुंतवणूकीचा विचार केला जातो. या उद्योगातील भांडवल गुंतवणूक मर्यादा १९६६ मध्ये १० लाख रूपये होती, ती १९७५ मध्ये १५ लाख रुपये इतकी करण्यात आली. १९८० मध्ये २५ लाख रूपयांपर्यंत भांडवल गुंतवणूक मर्यादा वाढविण्यात आली. १९८५ मध्ये पूरक उद्योगातील भांडवल गुंतवणूक मर्यादा रूपये ४५ लाख रूपये इतकी करण्यात आली. सन १९९० च्या औद्योगिक धोरणात ही भांडवल गुंतवणूक मर्यादा ७५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. १९९७ च्या अबिदहुसेन कमिटीच्या शिफारशीनुसार ही मर्यादा ३ कोटी रुपये इतकी करण्यात आली. परंतु २००० मध्ये ही मर्यादा १ कोटी रुपये इतकी कमी करण्यात आली.

लघु उद्योग हे कुटीरोद्योगांपेक्षा आकाराने थोडे मोट्या स्वरूपाचे असतात. लघु उद्योगात आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर केला जात असल्याने भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा अंगीकार करीत असल्याचे दिसून येते.' हे उद्योग ग्रामीण किंवा शहरीभागात स्थापन केले जातात. लघु उद्योगातील माल स्थानिक बाजारपेठ, देश पातळीवर तसेच विदेशी बाजारपेठेत विक्री केला जातो. निर्यात व्यापाराच्या दृष्टीने लघू उद्योगांना विशेष महत्त्व आहे.

### अति लहान उद्योग – Tiny Industries

''ज्या उद्योगात ५ ते १० कामगार काम करतात व उद्योगातील गुंतवणूक १ लाख रूपयापेक्षा जास्त नसते अशा उद्योगांना 'अति लहान उद्योग' असे म्हणतात.'' मार्च १९८५ मध्ये या उद्योगातील भांडवल गुंतवणूक मर्यादा २ लाख रूपये इतकी करण्यात आली, तर १९९१ मध्ये हीच मर्यादा ५ लाख रूपये इतकी करण्यात आली. १९९७ मध्ये हबिदहुशेन कमिटीच्या शिफारशीनुसार ही मर्यादा २५ लाख रुपये इतकी करण्यात आली.

### कुटीरोद्योग व लघु उद्योगासमोरील समस्या –

भारतीय अर्थव्यवस्थेत कुटीर व लघु उद्योगांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारत सरकारकडून या उद्योगांच्या विकासाकरिता नियोजनाच्या माध्यमातून बरेच प्रयत्न करण्यात आले. तथापि या उद्योगांचा विकास करण्यात अपेक्षित यश मिळालेले नाही. या उद्योगासमोर अनेक समस्या आहेत त्याचा उल्लेख पुढील प्रमाणे करता येईल .

### १. भांडवलाची कमतरता –

भारतातील बहुतांश लघु उद्योगांना आवश्यक असलेले भांडवल पुरेशा प्रमाणात व वेळेवर उपलब्ध होत नाही ही एक प्रमुख समस्या आहे. उद्योग चालविण्यासाठी आवश्यक अवजारे, यंत्रसामग्री व कच्चा माल विकत घेण्यासाठी भांडवलाची नितांत गरज असते. या उद्योगांची आर्थिक पत कमी असल्याने उद्योजकांना भांडवल उभे करणे अवघड जाते. लघु उद्योगांना स्वत: जवळ फारसे भांडवल नसल्यामुळे यांच्याकडून पुरेशा प्रमाणात कर्ज पुरवठा होवू शकत नाही. १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणात लघुउद्योगा

पुढील वित्तीय प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. अद्यापही या उद्योगांना पुरेसा वित्त पुरवठा होत नसल्यांचे दिसून येते. त्यामुळे या उद्योगांना सावकार व सरफी पेढीवाले या असंघटीत घटकाकडूनच वित्त पुरवठ्याची गरज पूर्ण करावी लागते. त्यामुळे कुटीरोद्योगांना व लघु उद्योगांना उत्पादनात आधुनिकता आणता येत नाही. परिणामी या उद्योगांना तोट्याला सामोरे जावे लागते.

**२. कच्चा मालाचा तुटवडा–**

भारतातील कुटीर व लघु उद्योगासमोर 'कच्च्या मालाचा तुटवडा' ही एक समस्या आहे. या उद्योगांच्या विकासासाठी योग्य प्रतीच्या कच्चा मालाचा पुरवठा स्वस्तात व नियमित होणे आवश्यक आहे. बहुसंख्य कुटीर व लघु उद्योगांना स्थानिक कच्चा मालावर अवलंबून राहावे लागते. याचा फायदा स्थानिक व्यापारी घेतात. ते या उद्योगांना कच्चा माल अधिक किंमतीला विकून त्यांच्याकडून दुहेरी शोषण करतात. भारतात कच्च्या मालाचा तुटवडा असल्याने बऱ्याच वेळा सरकार नियंत्रित वाटप सुरू करते. त्यात मोठ्या उद्योगांना अधिक हिस्सा मिळतो. तर लघु व कुटीर उद्योगांना अल्प हिस्सा मिळतो. तसेच वाटप पद्धती सुद्धा कार्यक्षम नसते. परिणामी कुटीरोद्योग व लघु उद्योगातील उत्पादन हे हलक्या दर्जाचे व महागडे ठरते. त्यामुळे स्पर्धात्मकता कमी राहते. थोडक्यात लघु उद्योगांना कच्च्या मालाच्या अडचणींना तोंड द्यावे लागते.

**३. पायाभूत सुविधांची कमतरता–**

पायाभूत सुविधांची कमतरता ही कुटीरोद्योग व लघु उद्योगासमोरील एक महत्त्वाची समस्या आहे. पायाभूत सुविधांच्या अभावी या उद्योगांना आपला विकास घडवून आणताना अनेक अडचणिंना सामोरे जावे लागते. यामध्ये वीज, पाणी पुरवठा, वाहतूक व दळणवळण साधने, बँका, बाजारपेठा इत्यादींचा समावेश होतो. मोठ्या उद्योगांच्या तुलनेत या उद्योगांना ही समस्या अधिक प्रमाणात जाणवते. त्यामुळे त्यांचा विकास खुंटतो. अनियमित विजपुरवठ्याचा प्रश्न तर अत्यंत कठीण प्रश्न आहे. त्यामुळे एकतर उत्पादन कमी करावे लागते. अन्यथा ते बंद करावे लागते. शिवाय देशाच्या विविध खेड्यात कार्यरत असणाऱ्या लघु उद्योगांना वाहतूक व दळणवळणाची सुविधा, बाजार माहिती यांची वाणवा जाणवते. त्यामुळे या उद्योगांना आपला विकास घडवून आणण्यात अनेक अडचणींना सामारे जावे लागते.

**४. उत्पादन तत्रांची समस्या–**

आधुनिक उत्पादन तंत्राचा वापर केल्यास कमी उत्पादन खर्चात दर्जेदार उत्पादन करता येते. मात्र भारतातील कुटीर व लघु उद्योगात अजूनही जुनाट व परंपरागत उत्पादन तंत्राचा वापर केला जात आहे. लघु उद्योजक हे अशिक्षित असल्याने व बरेचसे व्यवसाय हे वंशपंरपरेने चालत आले असल्याने नवीन उत्पादन तंत्र वा पद्धत यांचा ते अवलंब करू शकत नाहीत. त्याची तशी मानसिकताही नसते. त्यामुळे वस्तूचा दर्जा कमी प्रतीचा राहतो. थोडक्यात उत्पादन तंत्राच्या समस्येमुळे अनेक अडचणींचा सामना या उद्योगांना करावा लागतो.

**५. मालाच्या विक्रीची समस्या –**

भारतातील कुटीरोद्योग व लघु उद्योगातील उत्पादीत मालाची विक्री करण्यासाठी संघटित बाजारपेठेची आवश्यकता आहे. परंतु तिचा अभाव दिसून येतो. त्यामुळे या क्षेत्रातील उद्योगांना आपल्या मालाची विक्री योग्य प्रकारे व योग्य किंमतीला करता येत नाही. तसेच या उद्योजकांना बाजाराबद्दलची पूर्ण माहिती ही नसते किंवा या उद्योगांची स्वत:ची अशी विक्री व्यवस्था नसते. परिणामत: या उद्योगांची उत्पादने ग्राहकापर्यंत पोहचत नाहीत. त्या वस्तूंची योग्य गुणवत्ता ग्राहकासमोर मांडली जात नाही. त्यामुळे या उद्योगांना आपल्या वस्तू कमी किंमतीला विकाव्या लागतात. तेंव्हा सरकारला लघु उद्योगांच्या मालविक्री बाबतच्या अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

**६. करांचा वाढता बोजा –**

भारतात कुटीरोद्योगात व लघु उद्योगात उत्पादित होणाऱ्या वस्तूंवर निरनिराळ्या प्रकारच्या करांचा मोठा बोजा आहे. या उद्योगात वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालावर जकात लादली जाते. तसेच या उद्योगात तयार होणाऱ्या मालावरही विक्रीकर भरावा लागतो. त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होवून नफ्याचे प्रमाण कमी राहते. त्यासाठी सरकारने लघु उद्योगांना कर सवलती, माफी आणि नियमातील शिथिलता इत्यादी सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

**७. मोठ्या उद्योगांबरोबर स्पर्धा –**

मोठ्या उद्योगातील उत्पादन हे आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून तयार केले जात असल्याने त्याची सुबकता व दर्जेदारपणा अधिक असतो. तसेच व्यवस्थापण कौशल्याचा वापर केल्याने किमान खर्चात वस्तूंचे उत्पादन होते. तुलनात्मकदृष्ट्या विचार करता कुटीर व लघु उद्योगातील उत्पादन हे गुणात्मक दृष्ट्या कमी दर्जाचे व किंमती असते. त्यामुळे मोठ्या उद्योगांबरोबर स्पर्धा करताना हे उद्योग मागे पडतात. परिणामी मागणी अभावी हे उद्योग एक तर नष्ट होतात नाहीतर कसेबसे टिकतात.

**८. प्रशिक्षण व संशोधनाची समस्या –**

कुटीर व लघु उद्योगातील कामगारांना प्रशिक्षणाची कोणतीही व्यवस्था नसते. तसेच वस्तूचा दर्जा सुधारण्याबाबत उत्पादन खर्च कमी करण्याबाबतचे संशोधन कार्य करण्याकरीता आवश्यक असणारा निधीच या उद्योगांकडे नसतो. त्यामुळे प्रशिक्षणाच्या अभावी संशोधन कार्य होत नसल्याने वस्तूंची गुणवत्ता कमी राहते व किंमत वाढते. थोडक्यात प्रशिक्षण व संशोधनाची समस्या ही मोठी समस्या असून या उद्योगांच्या विकासासाठी तिची सोडवणूक करणे अत्यंत महत्त्वाचे असते.

**९. आजारी उद्योगांची संख्या जास्त –**

अलिकडील काळात भारतात आजारी कुटीरोद्योग व लघु उद्योगांच्या संख्येत सतत वाढ होत असल्याने हा प्रश्न दिवसेंदिवस जटील होत आहे. कुशल कामगारांचा प्रश्न, करांचा वाढता बोजा, अकार्यक्षम व्यवस्थापन, मोठ्या उद्योगाशी स्पर्धा करण्यातील अडचण या सर्व कारणामुळे लघु उद्योग

आजारी पडत आहेत. मार्च २००५ अखेर १.३८ लाख लघु उद्योग आजारी होते तर त्यांच्याकडील थकबाकी ५३८० कोटी रुपये इतकी होती. यावरुन आजारी उद्योगांची समस्या लक्षात येते.

**१०. आर्थिक सुधारणांचा प्रतिकूल परिणाम –**

भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. या धोरणात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यावर भर देण्यात आला. या धोरणाचा प्रतिकूल परिणाम म्हणून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत चीनमधील वस्तू भारतीय बाजारपेठेत स्वस्त किंमतीत उपलब्ध झाल्या आहेत. १९९९ – २००० पासून चीनच्या वस्तूंनी भारतीय बाजारपेठ काबीज केली आहे. स्वस्त व दिखाऊ वस्तू असल्याने लोकांची मागणी ही सतत वाढत आहे. चीनमधील लघु उद्योगातील उत्पादन खर्च कमी असल्यामुळे भारतीय उद्योगांवर त्याचा प्रतिकूल परिणाम झालेला आहे. कापड उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, खेळणी, शालेय वस्तू इत्यादी बाबतीत ही स्थिती आढळते. थोडक्यात नव्या आर्थिक धोरणाने भारतातील लघु उद्योगासमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत.

**११. इतर समस्या –**

भारतातील लघु उद्योगासमोर वरील सर्व समस्यांशिवाय कारखान्यांची जागा, माल साठवणूकीची गोदामे, अद्ययावत आकडेवारीचा अभाव, कमी सौदाशक्ती इत्यादी समस्या सुद्धा आहेत. तसेच सरकारने या उद्योगांना आर्थिक व इतर सवलती दिल्याने बोगस लघु उद्योगांची संख्या वाढत आहे. त्यांचा शोध घेवून त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे. जागतिकीकरणाच्या युगात स्पर्धात्मक परिस्थितीला सामोरे जाण्याचे सामर्थ्य या उद्योगांकडे नाही. देशातील लघु उद्योगातील अनेक उत्पादने जागतिक बाजारपेठेत महत्त्वाची असूनही या समस्येमुळे या उद्योगांना जागतिक बाजारपेठेत आपले स्थान प्राप्त करू शकले नाहीत हे वास्तव आहे. वरील सर्व समस्या सोडविल्याशिवाय कुटीरोद्योग व लघु उद्योगांचे भविष्य उज्ज्वल असणार नाही हे निश्चित.

**कुटीर व लघु उद्योगांच्या समस्या सोडविण्याचे उपाय –**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने कुटीर व लघु उद्योगासमोरील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. अर्थव्यवस्थेतील या उद्योगाचे स्थान लक्षात घेवून १९४८ च्या औद्योगिक धोरणात व १९५६ च्या औद्योगिक धोरणात तसेच विविध पंचवार्षिक योजनांमध्ये या उद्योगांना प्राधान्य देण्यात आले आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेत कुटीर व लघु उद्योगासाठी १९४५ कोटी रूपये सातव्या पंचवार्षिक योजनेत ३२४९ कोटी रूपये तर आठव्या योजनेत ६३३४ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली.

**भारत सरकारने राबविलेले विविध कार्यक्रम व धोरणे पुढील प्रमाणे सांगता येतील.**

**१. लघु उद्योगांच्या समस्या पाहणी समित्या–**

भारत सरकारने कुटीर व लघु उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी अनेक

तज्ञ समित्यांची नेमणूक करण्यात आली. आंतरराष्ट्रीय नियोजन संघ (१९५०), प्रा. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली १९५५ मध्ये नेमण्यात आलेली ग्रामोद्योग व लघु उद्योग समिती जपानी संघ (१९६०) लघु उद्योग उत्पादकता संघ (१९६०) आंतरराष्ट्रीय प्रदीर्घकालीन नियोजन संघ (१९६३) लोकनाथ समिती (१९६९) इत्यादी समित्यांच्या शिफारशी लक्षात घेऊन शासनाने वेळोवेळी आपल्या लघु उद्योगविषयक धोरणात बदल केले आहेत.

**२. विविध मंडळाची व संस्थाची निर्मिती –**

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने कुटीर व लघु उद्योगासमोरील प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांचा नियोजनबद्ध विकास घडवून आणण्यासाठी विविध मंडळांची स्थापना केली आहे. त्यामध्ये सरकारने कुटीर उद्योग मंडळ (१९४८), केंद्रीय रेशीम मंडळ (१९४९), लघु उद्योग मंडळ, (१९५२) अखिल भारतीय हस्तोद्योग मंडळ (१९५१), अखिल भारतीय हातमाग मंडळ (१९५२), अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग आयोग (१९५३), काथ्याबोर्ड, राष्ट्रीय लघु उद्योग मंडळ (१९५५), भारतीय हस्तोद्योग विकास महामंडळ (१९५८) इत्यादी मंडळांची स्थापना केली आहे. ही मंडळे कुटीर व लघु उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करून उपाय शोधून त्या सोडविण्याचा व त्यांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**३. भांडवल पुरवठ्याच्या सुविधांमध्ये वाढ –**

कुटीर व लघु उद्योगांना पुरेसे व योग्य व्याजदराने भांडवल उपलब्ध व्हावे यासाठी भारत सरकाने अनेक संस्था स्थापन केल्या आहेत. राष्ट्रीयकृत बँका, इतर वित्तीय संस्था या क्षेत्राला अल्प व्याजदराने मध्यम व दीर्घ मुदती कर्ज पुरवठा करतात. भारतीय स्टेट बँक, व्यापारी बँका, राज्य वित्तीय महामंडळे आणि राज्य सरकार या सर्वांकडून लघु उद्योगांना अर्थसाहाय्य केले जात आहे. १९६० मध्ये रिझर्व्ह बँकेने ‘कर्ज हमी योजना’ सुरू केली आहे. या योजनेनुसार लघु उद्योगांना भारतातील बँका कर्ज देण्यास तयार झाल्या आहेत. राष्ट्रीयीकरणानंतरही व्यापारी बँकांनी लघु उद्योगांना कर्जपुरवठा करण्याच्या आपल्या धोरणात बदल करून सवलतीच्या व्याजदराने अधिक प्रमाणात कर्ज पुरवठा केला आहे. तसेच लघु उद्योगांना कर्ज पुरवठा करण्यासाठी १९९० मध्ये ‘भारतीय लघु उद्योग विकास बँक’ स्थापन करण्यात आली. या बँकेने लघु उद्योगांना १९९०-९१ मध्ये १५०८ कोटी रूपयांचा कर्ज पुरवठा केला आहे. याशिवाय या उद्योगांना कर्ज पुरवठा करण्यासाठी ३० औद्योगिक पतपुरवठा संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. भारतातील लघु उद्योगांना विविध बँकाकडून सन २००१ -२००२ मध्ये २२,९१७ कोटी रूपयांच्या कर्जपुरवठा करण्यात आला.

**४. कच्च्या मालाची उपलब्धता –**

कुटीर व लघु उद्योगांना उत्तम दर्जाचा कच्च्या माल पुरेशा प्रमाणात व वेळेवर उपलब्ध व्हावा यासाठी सरकाने मदत केली आहे. औद्योगिक सहकारी संस्थामार्फत सरकार कच्च्या मालाचा पुरवठा करते. राज्य व्यापार महामंडळ लघु उद्योगासाठी लागणारा कच्चा माल परदेशातून आयात करते.

**५. विक्री व्यवस्था –**

कुटीर व लघु उद्योगामध्ये उत्पादित होणाऱ्या मालाची विक्री योग्य प्रकारे व्हावी यासाठी सरकार देशात आणि विदेशात विविध वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन करते. या उद्योगातील मालाची विक्री वाढविण्यासाठी भारतातील प्रमुख शहरात विक्री केंद्रे उभारण्यात आली आहेत. तसेच विदेशात वस्तू मालाची विक्री करण्यासाठी भारत सरकारने १९५५ मध्ये निर्यात विकास महामंडळे स्थापन केली आहेत. ही निर्यात विकास मंडळे बाजाराची माहिती देवून विक्रीसाठी मदत करतात.

**६. आधुनिक यंत्रसामग्रीची उपलब्धता –**

या उद्योगांना आधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध व्हावी यासाठी सरकाने राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाची स्थापना केली. या महामंडळामार्फत आवश्यक ती यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली जाते. आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापराचे फायदे सांगून त्याच्या वापरास उद्युक्त केले जाते. यासाठी यंत्राची प्रात्यक्षिके भारतातील विविध ठिकाणी सरकार मार्फत दाखविली जातात. तसेच मागणी प्रमाणे यंत्रसामग्री पुरविली जाते.

**७. तांत्रिक शिक्षण व प्राशिक्षणाच्या सोई –**

कुटीर व लघु उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना तांत्रिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने अनेक प्रशिक्षण केंद्रे उघडली आहेत. ग्रामीण भागातील उद्योगांना तांत्रिक ज्ञान पुरविण्यासाठी सरकारने तांत्रिक शिक्षण देणारी फिरती केंद्रे उघडली आहेत. त्यामुळे खेड्यापाड्यातील कारागिरांना तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे. नवीन तांत्रीक ज्ञान, आधुनिक यंत्र वापराच्या पद्धती यांची प्रात्यक्षिके दाखविली जातात. तसेस 'मध्यवर्ती उद्योग संघटना' ही उद्योजकांना तांत्रिक बाबीबद्दल मार्गदर्शन करते.

**८. सरकार मार्फत मालाची खरेदी –**

लघु उद्योगांना उत्तेजन देण्यासाठी सरकार स्वत: पुढाकार घेऊन या उद्योगात तयार होणारा माल मोठ्या प्रमाणात खरेदी करते. तर काही वेळा अधिक किंमतीने खरेदी करते. उदा. भारतातील खादी उद्योगाला उत्तेजन देण्यासाठी चतुर्थ श्रेणी कामगारांना गणवेशासाठी खादीच्या वापर सक्तीचा केला आहे. त्यासाठी सरकारने खादीची खरेदी लघु उद्योगाकडून करावी अशी सक्ती करण्यात आली आहे.

**९. औद्योगिक वसाहती –**

कुटीर व लघु उद्योगांना आवश्यक असणाऱ्या विविध सोई एकत्र उपलब्ध व्हाव्यात. उदा. – पाणी, वीज रस्ते, बँक, पोस्ट, दळणवळणे इत्यादी. अशा सर्व सोईंनी युक्त अशा औद्योगिक वसाहती निर्माण करण्याचे प्रयत्न सरकाने केले. सहाव्या योजने अखेर देशात ६६२ औद्योगिक वसाहती १३४६७ लघु उद्योग कार्यरत होते. त्याचे वार्षिक उत्पादन ३६३ कोटी रुपयांचे होते. त्यामध्ये २.२ लाख लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

### १०. सहकारी संस्थांची स्थापना –

भारतातील कुटीर व लघु उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी सरकारने या उद्योगात सहकारी संस्थांची स्थापना केली आहे. या संस्थामार्फत लघु उद्योगांना कर्जपुरवठा, कच्च्या मालाचा पुरवठा, पक्क्या मालाची विक्री इत्यादी कार्ये केली जातात. भारतात सध्या ४५,११२ पेक्षा अधिक औद्योगिक सहकारी संस्था कार्यरत आहेत.

अशा प्रकारे भारत सरकारने कुटीर व लघु उद्योगासमोरील समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सरकारला फारसे यश मिळताना दिसत नाही. तसेच सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात काही नवीन प्रश्न जन्माला येत आहेत. त्यामुळे या उद्योगातील आजारी उद्योगांचा प्रश्न गंभीर आहे. त्यासाठी सरकारने अधिक प्रयत्न करून या उद्योगांच्या विकासाला बळकटी देणे आवश्यक आहे.

### कुटीर व लघु उद्योगांचे भवितव्य – Prospects of Cottage and Small Scale Industries.

भारतीय अर्थव्यवस्थेत कुटीर व लघु उद्योगांना फार मोठे भवितव्य आहे, संभव आहे. देशातील सर्वच घटकांकडून कुटीर व लघु उद्योगाबाबत फार आशा आहेत. कमी भांडवल गुंतवूणकीतून अधिक रोजगार निर्माण करण्याची क्षमता फक्त या कुटीर व लघु उद्योगात आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या विकासात या उद्योगांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. भारतातील एकूण रोजगार व उत्पादन निर्मितीत या उद्योगांचा वाटा अधिक मोठा आहे. भारतातील बेरोजगारी दूर करण्यासाठी दारिद्र्य निर्मूलनासाठी, ग्रामीण विकासासाठी, शेती विकासासाठी कुटीर व लघु उद्योगांचा विकास महत्त्वाचा आहे.

### १. रोजगार निर्मिती –

भारतासारख्या विकसनशील देशात भांडवल टंचाई व अतिरिक्त लोकसंख्या यामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते व ती गंभीर स्वरुप धारण करते. मोठ्या उद्योगांच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. हे उद्योग भांडवलप्रधान असतात. त्यामुळे रोजगारनिर्मितीचा हा मार्ग उचित ठरत नाही. मात्र कुटीर व लघु उद्योग हे श्रमप्रधान असल्याने यामध्ये जास्तीत जास्त श्रमशक्तीचा वापर केला जातो. भारतात सन १९७३–७४ मध्ये या उद्योगात ३९.७ लक्ष लोकांना रोजगार उपलब्ध झाला तर २००० – २००९ मध्ये १७९ लक्ष लोकांना रोजगार मिळाला थोडक्यात रोजंदारी निर्माण करणारा एक महत्त्वाचा उद्योग म्हणून कुटीर व लघु उद्योगाकडे पाहिले जाते.

### २. अल्प भांडवलाची गरज –

कुटीर व लघु उद्योग हे कमी वा अल्प भांडवलात सुरू करता येतात. भारतातील भांडवल उपलब्धता अल्प असल्याने कमी भांडवलात सूरू करता येणारे कुटीर व लघु उद्योग अधिक उपयुक्त ठरतात. सन १९७४–७५ च्या वार्षिक पाहणीनुसार लघु उद्योगाची रोजगार क्षमता मोठ्या उद्योगापेक्षा ७ पट जास्त आहे. तेंव्हा विकासाच्या मार्गावर असणाऱ्या देशाला अल्प भांडवलात कुटीर व लघु उद्योगांची निर्मिती करून औद्योगिक विकासाला चालना देता येईल.

### ३. शेतीवरील भार कमी करणे –

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आजही जवळ जवळ ६० टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर आत्मनिर्भर आहे. आज शेती क्षेत्रात गरजेपेक्षा अधिक लोक सामावलेले आहेत. शेती करण्याची परंपरागत पद्धत, शेतीचे पावसावरील अवलंबित्व यामुळे शेतीची उत्पादकता अल्प आहे. त्यामुळे शेतीवर काम करणाऱ्या लोकांचे उत्पन्न अल्प आहे. तसेच शेतीक्षेत्रात सुप्त बेरोजगारी आढळून येते. याचाच अर्थ शेतीत काम करणाऱ्या व्यक्तींची सीमांत उत्पादकता शून्य असते. इतरत्र काम नसल्याने ते शेतीत काम करतात मात्र हे लोक वरवर पाहता काम करतात. हे लोक शेतीत असले तरी किंवा नसले तरी उत्पादनात काहीच भर पडत नाही. तेंव्हा या अतिरिक्त लोकांना कुटीर व लघु उद्योगात रोजगार उपलब्ध करून दिल्यास शेतीवरील भार कमी होईल व शेतीचा विकास होण्यास मदत होईल. त्यामुळे या उद्योगांना अधिक महत्त्व प्राप्त होत आहे.

### ४. आर्थिक विषमता कमी करणे –

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकाने समाजवादी समाज रचनेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून देशाच्या विकासाची व्यूहरचना तयार केली. कुटीर व लघु उद्योगांचा विकास झाल्यास आर्थिक उत्पन्नाचे समान वाटप होण्यास मदत होते. या छोट्या उद्योगामुळे संपत्तीचे विकेंद्रीकरण घडून येते. तसेच मोठ्या प्रमाणावरील उद्योगामुळे प्रंचड गुंतवणूक करून फारच थोड्या लोकांना रोजगार उपलब्ध होतो. त्यांचा पगारही मोठा असतो. साहजिकच उच्च-निच असा भेदभाव निर्माण होतो. त्यातून संघर्ष, कलह, अशांतता निर्माण होते. हे सर्व टाळून आर्थिक समता निर्माण करण्यात लघु उद्योगांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

### ५. पर्यावरण पूरक उद्योग –

मोठ्या उद्योगांच्या स्थापनेमुळे पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनतो.' मोठी यंत्रसामग्री तसेच विविध रासायनिक घटकांचा वापर यामुळे वायुप्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि पाणी प्रदूषण निर्माण होते या प्रदुषणामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. निसर्ग चक्रात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे जीवसृष्टीला धोका निर्माण होतो. पर्यावरणाचा ऱ्हास हा प्रश्न जागतिक बनला आहे. मात्र कुटीरोद्योग व लघु उद्योग हे पर्यावरण पुरक आहेत. यामध्ये साधे तंत्रज्ञान वापरले जाते. तसेच ते ग्रामीण भागात सुरू करता येत असल्याने ते विकेंद्रीत बनतात. परिणाम अनेक प्रश्न आपोआप सुटतात. आज खऱ्या अर्थाने सर्वांच्या कल्याणास कुटीर व लघु उद्योगांचा विकास करणे ही काळाची गरज आहे.

### ६. परकीय चलनाची उपलब्धता –

कुटीर व लघु उद्योग हे स्वदेशी तंत्रज्ञानावर अधिक प्रमाणात अवलंबून असतात. त्यामुळे विदेशातून यंत्रे व तंत्रज्ञान वा कच्चा माल यासारख्या वस्तूंची आयात करण्याची गरज भारत नाही. त्यामुळे दुर्मिळ परकीय चलनाची बचत होते. तसेच या लघु व कुटीर उद्योगात तयार होणार वस्तूमाल कलाकुसरीच्या

वस्तू, भांडी, कपडे यांची निर्यात मोठ्या प्रमाणावर होते. या निर्यातीतून देशाला फार मोठ्या प्रमाणात परकीय चलन उपलब्ध होत आहे.

**७. आर्थिक स्थैर्य प्रस्थापित होते –**

मोठ्या उद्योगांच्या उभारणीने अर्थव्यवस्थेत तेजी-मंदी सारख्या अवस्था निर्माण होतात. भांडवलाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याने व्यापर चक्रे निर्माण होतातच मात्र कुटीर व लघु उद्योग अल्प भांडवलावर चालविले जात असल्याने व मागणी प्रमाणे उत्पादन करण्याची त्याची खासियत वा क्षमता यामुळे अर्थव्यवस्थेत स्थैर्य प्रस्थापित होण्यास मदत होते.

**८. आर्थिक विकासास पोषक –**

कुटीर व लघु उद्योगात विविध वस्तूंचे उत्पादन होते. त्यामुळे लोकांना गरजेच्या वस्तू सहज उपलब्ध झाल्याने त्यांच्या उपभोगात वाढ होते. त्याच बरोबर रोजगारात वाढ झाल्याने आर्थिक विकासास हे उद्योग हातभार लावतात. त्याचप्रमाणे हे छोटे उद्योग मोठ्या उद्योगांना पूरक ठरतात त्यांना आवश्यक असणाऱ्या उपवस्तूंचे (सुट्टेभाग) उत्पादन या उद्योगात होत असल्याने देशाच्या विकासास ते मदत करीत आहेत.

**९. ग्रामीण विकास –**

भारत हा खेडयांचा देश आहे. अद्यापही भारतात ७४% लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आहे. त्यामुळे ग्रामीण विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे. कुटीर व लघु उद्योग विकेंद्रीत असल्याने तसेच ते प्रत्येक गावा गावात सुरू करता येतात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना बिगर शेती हंगामात रोजगार उपलब्ध होतो. परिणामी ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात वाढ होवून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळते. तसेच या उद्योगामुळे प्रादेशिक समतोलही साधला जातो.

**१०. उपलब्ध साधन सामग्रीचा वापर –**

भारता सारख्या गरीब देशात साधन सामग्री विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु भांडवला अभावी त्यांचा योग्य व पुरेपूर वापर करता आलेला नाही. ही साधन सामग्री वापरा शिवाय पडून आहे. कुटीर व लघु उद्योगांची निर्मिती केल्यास ही साधन संपत्ती वापरता येईल. देशाच्या विकासाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे कार्य आहे.

अशा प्रकारे देशांच्या चिरंतन आर्थिक विकासात कुटीर व लघु उद्योगाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे देशाच्या शेती विकासात, ग्रामीण विकासात पर्यावरण पूरक अशा या उद्योगांचे भवितव्य उज्ज्वल आहे यात शंका नाही.

**स्वयंअध्ययन प्रश्न:**

**योग्य पर्यायाची निवड करून विधाने पूर्ण करा.**

१. ------------ हे लहान प्रमाणावर सामान्यत: घराघरातून चालविले जाणारे उद्योग आहेत.

अ) लघु उद्योग ब) मोठे उद्योग क) कुटिरोद्योग ड) यापैकी नाही.

२. ------------ मध्ये 'भारतीय लघु उद्योग विकास बँकेची' स्थापना करण्यात आली.

अ) १९९० ब) १९९१ क) १९८० ड) १९९३

३. लघु उद्योग हे --------------- असतात.

अ) भांडवल प्रधान ब) श्रमप्रधान क) अ आणि ब ड) यापैकी नाही.

४. भारतात शेतीनंतरचा रोजगार उपलब्ध करून देणारा ------------ उद्योग आहे.

अ) मोठे ब) कुटीर व लघु

क) वाहतूक व दळणवळण ड) यापैकी नाही.

५. मोठ्या उद्योगांना सुटे भाग पुरविण्याचे कार्य करणाऱ्या उद्योगाला ----------- उद्योग म्हणतात.

अ) कुटीर ब) अति लहान क) पूरक ड) यापैकी नाही.

## २.२.४ १९९१ नंतरची विदेशी गुंतवणूक धोरणे – Foreign Investment Policies Since 1991

यापूर्वीच्या उपघटकामध्ये आपण कुटीर व लघु उद्योगासमोरील प्रश्न आणि भवितव्य वा संभव यांचा अभ्यास केला. या उपघटकात आपण भारतातील १९९१ नंतरच्या विदेशी गुंतवणूक धोरणांचा अभ्यास करणार आहोत.

अलिकडील काळात विशेषत: १९९१ नंतर देशाच्या आर्थिक विकासात विदेशी गुंतवणूकीला विशेष असे महत्त्व प्राप्त झाले आहे. विदेशी गुंतवणूक म्हणजे विदेशी गुंतवणूकदारांनी देशाच्या उद्योगात उत्पादने वितरण, सेवा पुरवठा यामध्ये केलेली गुंतवणूक होय. विदेशी गुंतवणूकीमुळे भारतासारख्या गरीब देशाला विकासासाठी आवश्यक असणारे भांडवल उपलब्ध होते. त्यामुळे देशातील जनतेला बचतीसाठी कोणत्याही पद्धतीचा त्याग न करताही देशाचा जलद आर्थिक विकास साधता येतो. जगातील अमेरिका, जपान यासारख्या प्रगत राष्ट्रांनीही विदेशी गुंतवणूकीची वा भांडवलाची मदत घेवूनच आपली प्रगती साधली आहे. विदेशी गुंतवणूकीच्या आधारे भारतात विविध प्रकल्प साकारण्यास मदत मिळाली आहे विदेशी गुंतवणूक जेंव्हा भारतात होते तेंव्हा परकीय गुंतकवणूकदार फक्त भांडवलच घेवून येतात असे नाही भांडवला सोबतचे प्रगत तंत्रज्ञान, उच्च व्यवस्थापन कौशल्य, यंत्रसामग्री, भांडवली वस्तू इत्यादी सोबत आणतात. त्यामुळे देशातील लोकांना अनेक विविध वस्तूंचा उपभोग मिळतो. तसेच देशातील लोक हे कौशल्य हळूहळू आत्मसात करतात व त्याच्या आधारे देश आत्मनिर्भर होण्यास मदत होते.

भारत सरकारने २४ जुलै १९९१ पासून नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. या काळात भारतात नवीन आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली. त्यानुसार उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा अवलंब करण्यात आला. याचा परिणाम म्हणून भारतात परकीय गुंतवणूकीला अनुकूल वातावरण निर्माण झाले. देशातील सरकारने वेळोवेळी आपल्या धोरणात बदल करून परकीय गुंतवणूक आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला. अलिकडील काळात भारतात परकीय गुंतवणूकीचा ओघ वाढलेला दिसतो.

भारतात १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणामुळे विदेशी गुंतवणूकीला अधिक चालना मिळाली या धोरणात भारत सरकारने विदेशी गुंतवणूकीबाबतचे धोरण अधिक उदार केले. त्यानुसार परकीय गुंतवणूकदारांना ५१ टक्के गुंतवणूकीस परवानगी दिली. तसेच गुंतवणूक उद्योगांची संख्या ३४ पर्यंत वाढविण्यात आली. सध्या ही गुंतवणूक मर्यादा ७४ ते १०० टक्क्यापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्याच प्रमाणे गुंतवणूक उद्योगांच्या संख्येतही वाढ झाली आहे.

विदेशी गुंतवणूकीला देशाच्या आर्थिक विकासात विशेष असे महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशांना नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल असून सुद्धा भांडवला अभावी आर्थिक विकासाठी त्याचा वापर करून घेता आलेला नाही. विदेशी गुंतवणूकीने नैसर्गिक साधन संपत्तीचा पूरेपूर वापर करून जलद आर्थिक विकास साधता येतो. ग्रामीण विकास, रस्ते, पाणीपुरठा, विद्युत पुरवठा यासारख्या सुविधांची उपलब्धता विदेशी गुंतवणूकीच्या सहाय्याने होते. थोडक्यात आर्थिक विकासातील अडसर विदेशी गुंतवणूकीने दूर करून विकासाची प्रक्रिया गतिमान करता येते.

**विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह –**

भारतीय अर्थव्यवस्थेतील विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह हा सातत्याने वाढताना दिसतो आहे. विदेशी गुंतवणूक ही सामान्यत: दोन प्रकारची असते. एक म्हणजे परकीय वा विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक आणि दोन परकीय वा विदेशी संस्थात्मक किंवा रोखारूपी गुंतवणूक होय. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक ही प्रत्यक्ष उत्पादन कार्यात केली जाणारी गुंतवणूक असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादन, उत्पन्न, रोजगार यामध्ये वाढ होत असते. या गुंतवणूकीचा उत्पादनात प्रत्यक्ष स्वरुपातील सहभाग असल्याने त्याची सरकारकडून अधिक मागणी राहते. शिवाय ही गुंतवणूक कायम स्वरुपाची असते. रोखारूपी गुंतवणूक ही प्रामुख्याने शेअर बाजारामध्ये केली जाते. त्यामुळे ही गुंतवणूक अल्पकाळासाठी असते.

विदेशी गुंतवणूक ही विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक, अप्रत्यक्ष गुंतवणूक किंवा रोखारूपी गुंतवणूक आणि अनिवासी भारतीयांकडून केली जाणारी गुंतवणूक या स्वरूपात असते. त्याची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे सांगता येईल.

**१. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक :**

१९९१ नंतरच्या काळात देशातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीत वाढ झाली आहे. या काळात १२९

दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली. २००१-२००२ मध्ये देशात ६,१३१ दशलक्ष अमेरिकन डॉलरची प्रत्यक्ष गुंतवणुक झाली. तर २०१०-२०११ मध्ये ती २७, ०२४ दशलक्ष डॉलर्स इतकी झाली. सन १९९१-९२ ते २०१०-११ या काळात भारतातील एकूण विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक २,१०,२९७ दशलक्ष अमेरिकन डॉलर एवढी झाली. एकूण गुंतवणूकीतील हा हिस्सा ५९.८ टक्के एवढा होता. यावरून विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या प्रवाहाचे महत्त्व लक्षात येते.

भारतात सर्वाधिक प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ही मॉरिशस कडून होत असल्याचे स्पष्ट होते. या देशाकडून सन १९९१ ते २००२ या काळात २७,८९१ कोटी रूपये इतकी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक करण्यात आली आहे. एकूण गुंतवणूकीतील त्यांचा हिस्सा ३८.७ टक्के इतका असलेला दिसतो. त्यानंतर सिंगापूर, अमेरिका, जपान, इंग्लंड या देशांचा नंबर लागतो. उद्योगानुसार विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीची आकडेवारी पाहता सेवा क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणूक सर्वाधिक आहे. एप्रिल २००० ते २०१५ मध्ये २,०५,५३२ कोटी रू. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक सेवा क्षेत्रात झालेली आहे. त्याखालोखाल टेलिकम्युनिकेशन व संगणक क्षेत्रातील गुंतवणूक आहे.

भारतातील थेट विदेशी गुंतवणूक मुंबई विभागात सर्वाधिक झालेली दिसून येते. या काळात ३,५३,०२२ कोटी रूपयांची गुंतवणूक ही मुंबई विभागात झाली आहे. एकूण गुंतवणूकीतील हे प्रमाण २९ टक्के इतके आहे. तर दुसरा क्रमांक दिल्लीचा लागतो. दिल्ली विभागात एकूण गुंतवणूकीच्या २० टक्के गुंतवणूक झाली आहे. याचाच अर्थ देशातील एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीतील जवळजवळ ५० टक्के हिस्सा हा मुंबई व दिल्ली विभागात झालेल्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचा आहे. इतर विभागात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण थोडे कमी आहे.

प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीचे प्रमुख दोन भाग पडतात त्यामध्ये एक रिझर्व्ह बँकेचा सहज मार्ग व दुसरा अनिवासी भारतीयाकडून होणारी प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक यांचा समावेश होतो.

**१) विदेशी अनुषय -**

या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीत रिझर्व्ह बँकेच्या स्वयंचलित मार्गाने होणारी गुंतवणूक विचारात घेतली जाते. सन १९९१-९२ मध्ये यामार्गाने झालेली विदेशी गुंतवणूक ही ६६ दशलक्ष डॉलर्स इतकी होती. हे प्रमाण एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीशी ५१ टक्के होते. सन २०१०-११ मध्ये विदेशी अनुषय गुंतवणूक ही १४०३० दशलक्ष डॉलर्स होती. तिचा हिस्सा हा ५२ टक्के इतका होता.

**२) अनिवासी भारतीयाकडून होणारी गुंतवणूक -**

देशाच्या विदेशी गुंतवणूकीत परदेशात राहणाऱ्या भारतीयांचा हिस्सा अधिक महत्त्वाचा आहे. सन. १९९१-९२ दशलक्ष मध्ये एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक ही १२९ दशलक्ष डॉलर्सची होती. त्यातील अनिवासी भारतीयांकडून केलेली गुंतवणूक ही ६३ दशलक्ष डॉलर्सची होती. म्हणजे एकूण विदेशी गुंतवणूकीतील त्यांचा हिस्सा ४९ टक्के इतका होता. तर सन २०१०-२०११ मध्ये अनिवासी भारतीयांची गुंतवणूक

१२,९९४ दशलक्ष डॉलर्स इतकी होती. एकूण गुंतवणूकीतील त्यांचा हिस्सा ४८ टक्के होता.

**२. रोखांरूपी /रोखासंग्रह गुंतवणूक -**

विदेशी गुंतवणूकीत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकी बरोबरच रोखरूपी किंवा अप्रत्यक्ष गुंतवणूकीचा समावेश असतो. सन १९९१-९२ मध्ये भारतात ४ दशलक्ष अमेरिकन डॉलरची रोखारूपी गुंतवणूक करण्यात आली. सन १९९९ - २००० ते २००२ - २००३ या काळात या प्रकारच्या गुंतवणूकीत घट झाली आहे. सन १९९१-९२ ते २०१०-११ या काळात भारतात रोखारूपी एकूण गुंतवणूक ही १,४१,७०१ दशलक्ष डॉलर्स एवढी झाली. रोखे गुंतवणूकीचा एकूण गुंतवणूकीतील हिस्सा ४०.२ टक्के होता. रोखारूपी गुंतवणूकीचे दोन भाग पडतात.

**१) विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार -**

रोखारूपी विदेशी गुंतवणूकीत विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांचा हिस्सा अधिक आहे. सन १९९१-९२ मधील ४ दशलक्ष डॉलर्सची रोखे गुंतवणूक ही फक्त संस्थात्मक गुंतवणूकदारांचीच होती. सन २०१०-११ मध्ये ती २९,४२२ दशलक्ष डॉलर्स होती. म्हणजे या संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या रोखारूपी गुंतवणूकीमधील हिस्सा ९३ टक्के होता.

**२) इतर गुंतवणूक -**

इतर गुंतवणूकीत भारतीय कार्पोरेटची गुंतवणूक, जागतिक ठेवी प्राप्ती, समुद्रपार निधी इत्यादींचा समावेश होतो. सुरूवातीस ही गुंतवणूक काहीही नव्हती.

सन २०१०-११ मध्ये ती २,०४९ दशलक्ष डॉलर्स होती. याचाच अर्थ या गुंतवणूकीचा एकूण गुंतवणूकीतील हिस्सा केवळ ७ टक्के इतका होता.

थोडक्यात भारतात विदेशी गुंतवणूकीमुळे आर्थिक विकासाला हातभार लागलेला आहे. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीमुळे देशाच्या विविध क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होवू लागला आहे. श्रमाच्या उत्पादकतेतही वाढ होवून त्यांच्या कार्यक्षमता व कौशल्यात वाढ झाली आहे. विदेशी गुंतवणूकीबाबत एक महत्त्वाची गोष्ट विचारात घ्यावी लागते ती म्हणजे देशाचे सार्वभौमत्व अबाधित ठेवणे अत्यावश्यक असते. तसेच देशातील उद्योगावर त्याचे प्रतिकूल परिणाम होवू नये याबात दक्षता घ्यावी लागेल. भारताने विदेशी सहकार्याबाबत धोरण व पद्धती ठरविण्यासाठी विदेशी गुंतवणूक मंडळ (Foreign Investment Board) स्थापन केले आहे. त्यामुळे देशातील विदेशी गुंतवणूक अधिकाधिक होण्यास मदत होईल.

**स्वयंअध्ययन प्रश्न -**

**योग्य पर्यायाची निवड करून विधाने पूर्ण करा.**

१) भारतात --------------------- क्षेत्रात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक सर्वाधिक आहे.

अ) उद्योग    ब) शेती    क) सेवा    ड) यापैकी नाही.

२) ------------------------ विदेशी गुंतवणूक म्हणजे रोखारूपी गुंतवणूक होय.

अ) संस्थात्मक ब) अनिवासी भारतीयांची

क) बँकांकडून ड) यापैकी नाही.

३) १९९१ नंतरच्या काळात देशातील विदेशी गुंतवणूकीत --------------- झाली आहे.

अ) वाढ ब) घट क) स्थिर ड) यापैकी नाही.

४) भारतात ----------- या विभागात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक अधिक आहे.

अ) हैद्राबाद ब) दिल्ली क) मुंबई ड) यापैकी नाही

५) १९९१ च्या विदेशी गुंतवणूक धोरणानुसार परकीय गुंतवणूकदारांना -------------- गुंतवणूकीस परवानगी मिळाली

अ) ५१ टक्के ब) ४८ टक्के क) ८० टक्के ड) यापैकी नाही.

**२.३ सारांश –**

औद्योगिकीकरण व आर्थिक विकास यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. त्यामुळेच देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिकीकरणास विशेष असे महत्त्व प्राप्त झाले आहे. आज जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी औद्योगिकीकरणाचा स्वीकार केला आहे. भारतही त्याला अपवाद नाही. स्वातंत्र्योत्तर काळात भारतानेही औद्योगिकीकरणाच्या साहाय्याने जलद आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू केली आहे. औद्योगिकीकरण म्हणजे नवीन उद्योगांच्या स्थापनेद्वारे केलेली उत्पादनाची निर्मिती होय. उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्रीचा आणि मनुष्यबळाचा पर्याप्त व कार्यक्षम वापर करण्यासाठी, वस्तू व सेवांच्या उत्पादनात वाढ घडवून लोकांना उच्च राहणीमानाचा दर्जा प्राप्त करण्यासाठी, देशाला संरक्षणाच्या बाबतीत स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनविण्यासाठी, दारिद्र्य, बेकारी, अज्ञान दूर करून समाजपरिर्तन करण्यासाठी औद्योगिकरणाची आवश्यकता आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासासाठी भारत सरकारने विविध औद्योगिक धोरणे जाहीर केली. जागतिक बदलत्या परिस्थितीला जुळवून घेण्यासाठी १९९१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. हे धोरण आता पर्यंतच्या औद्योगिक धोरणापेक्षा वेगळे धोरण होते. या धोरणात मूलभूत संरचनेत बदल करण्यात आला. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या त्रिसूत्रीचा स्वीकार केला. हा आर्थिक सुधारणांचा पहिला टप्पा होता. त्यानंतर १९९३ मध्ये व २००१ मध्येही औद्योगिक धोरण जाहीर केले.

भारताच्या जलद आर्थिक विकासात कुटीरोद्योग व लघु उद्योगाचे स्थान अत्यंत वरचे आहे. असे असले तरी त्या उद्योगासमोर अनेक अडचणी वा समस्या आहेत. त्यामध्ये भांडवलाची कमतरता, कच्च्या मालाचा तुटवडा, पायाभूत सुविधांची कमतरता, उत्पादन तंत्राची समस्या, मालाच्या विक्रीची समस्या,

कराचा वाढता बोजा, मोठ्या उद्योगांशी स्पर्धा, संघटनेचा अभाव, प्रशिक्षण व संशोधन समस्या, आजारी उद्योगाची समस्या इत्यादी होत. तसेच भारतातील बेरोजगारी दूर करण्यासाठी, दारिद्र्य निर्मूलनासाठी, ग्रामीण विकासासाठी शेती विकासासाठी कुटीर व लघु उद्योगांचा विकास महत्त्वाचा ठरतो.

अलिकडील काळात देशाच्या आर्थिक विकासात विदेशी गुंतवणूकीला विशेष असे महत्त्व प्राप्त झाले आहे. विदेशी गुंतवणूकीने भारतासारख्या विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला मोठा हातभार लागला आहे. जगातील अनेक प्रगत देशांनी सुद्धा विदेशी मदतीच्या साहाय्याने आपली प्रगती साधली आहे. विदेशी गुंतवणूकीमुळे फक्त भांडवलच उपलब्ध होते असे नसून प्रगत तंत्रज्ञान, अत्याधुनिक यंत्रसामग्री, उच्च व्यावस्थापन कौशल्यही प्राप्त होते. याचा फायदा देशातील लोकांना होतो. त्याची कार्यक्षमता व कौशल्यात वाढ होते. याचा अर्थ विदेशी गुंतवणूकीच्या आधारे देश आत्मनिर्भर होण्यास मदत होते.

## २.४ : पारिभाषिक शब्द

**कुटीर उद्योग –** घरातील सदस्यांकडून घरच्या घरी चालविले जाणारे उद्योग

**श्रमप्रधान उत्पादनतंत्र –** भांडवलापेक्षा श्रमाचा अधिकाधिक वापर करणारे तंत्र

**भांडवलप्रधान उत्पादनतंत्र –** श्रमापेक्षा भांडवलाचा अधिकाधिक वापर करणारे तंत्र

**संप –** कामगारांनी आपल्या मागण्यासाठी जाणिवपूर्वक काम बंद करणे.

**टाळेबंदी –** उद्योजकाने उत्पादन बंद करणे.

**जागतिकीकरण –** बंधनविरहित आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू ठेवणे.

**खाजगीकरण –** सरकारी क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील सहभाग कमी करणे.

**उदारीकरण –** उद्योग व व्यवसाय क्षेत्रावरील सरकारी नियंत्रणे कमी करणे.

**निर्गुंतवणूक –** सरकार सार्वजनिक क्षेत्रातील आपली गुंतवणूक मोकळी करते.

**विदेशी गुंतवणूक –** परकीय सरकारे वा संस्थानी देशात केलेली गुंतवणूक.

**औद्योगिकीकरण –** अत्याधुनिक यंत्र व तंत्र याचा वापर करून उत्पादनात वाढ करणे.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे –

२.२.१ – १) ब २) क ३) ड ४) अ ५) अ

२.२.२ – १) अ २) ब ३) क ४) अ ५) अ

२.२.३ – १) क २) अ ३) ब ४) ब ५) क

## २.६ सरावासाठी प्रश्न –

**अ) टीपा लिहा.**

१) औद्योगिकीकरण

२) औद्योगिक धोरणाची आवश्यकता

३) कुटीर व लघु उद्योगाच्या समस्या

४) १९९१ चे नवीन औद्योगिक धोरण

५) विदेशी गुंतवणूक

**ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) औद्योगिकीकरण म्हणजे काय? औद्योगिकीकरणाची आवश्यकता स्पष्ट करा?

२) १९९१ च्या नवीन औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये व तरतूदी सांगा?

३) कुटीर व लघु उद्योगांच्या समस्या सविस्तर सांगा?

४) कुटीर व लघु उद्योगांच्या भवितव्याविषयी भाष्य करा.

५) विदेशी गुंतवणूक धोरण म्हणजे काय? विदेशी गुंतवणूकीतील बदलांचा आढावा घ्या.

**२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ–**


१) Misra - Puri. 'Indian Economy' (2009) 27th Edition - Himalaya Publishing House.

२) A. N. Agrawal - 'Indian Economy' (1996) Wishwas Prakashan, Mumbai.

३) डॉ. स. श्री. मु. देसाई आणि डॉ. सौ. निर्मल भालेराव, 'भारतीय अर्थव्यवस्था' (२०१२) निराली प्रकाशन, पुणे.

४) डॉ. राजेंद्र अ. रसाळ. 'भारतीय अर्थव्यवस्था' (२०१०) सक्सेस प्रकाशन, पुणे.

५) डॉ. घाटगे/डॉ. वावरे 'भारतीय अर्थव्यवस्था' (२०१०) निराली प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती.

६) श्रीधर देशपांडे व विनायक देशपांडे, भारतीय अर्थव्यवस्था' हिमालया पब्लिशींग हाऊस मुंबई.


✻✻✻

# घटक – ३
# भारतातील सेवा क्षेत्र
# ( Service Sector in India )

**अनुक्रमाणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ सेवा क्षेत्रांचा अर्थ व रचना

३.२.२ भारतातील सेवा क्षेत्रांचे वाढते महत्व

३.२.३ बँका, वित्तीय संस्था व विमा क्षेत्रांचे महत्व

३.२.४ माहिती तंत्रज्ञान, वाहतुक दळणवळण व पर्यटन उद्योगाचे महत्व

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ.


## ३.० उद्दिष्ट्ये (Obiectives)

या घटकांच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची कल्पना येईल.

१) सेवा क्षेत्र म्हणजे काय हे समजेल

२) सेवा क्षेत्रांची रचना लक्षात येईल.

३) भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्रांचे वाढते महत्व समजेल

४) बँका, वित्तीय संस्था व विमा क्षेत्रातील भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व समजून येईल.

५) माहिती तंत्रज्ञान, वाहतूक, दळणवळण व पर्यटन उद्योगाचे महत्व समजून घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना :

घटक क्र. २ मध्ये आपल्याला भारतातील उद्योगधंद्यांचा अभ्यास करता आला. या घटकामध्ये औद्योगिकरणाची गरज १९९१ चे औद्योगिक धोरण, भारतातील लघु व कुटीरोद्योगांच्या समस्या व त्या वरील उपाययोजना व

औद्योगिक आजारपणाच्या समस्या इ घटकांचा अभ्यास केला प्रस्तुत घटकांमध्ये आपण भारतातील सेवा क्षेत्रांचा अभ्यास करणार आहोत. यामध्ये प्रामुख्याने सेवा क्षेत्राचा अर्थ व रचना भारतातील सेवा क्षेत्रांचे वाढते महत्व, बँका वित्तसंस्था व विमा व्यवसायाचे महत्व तसेच माहिती तंत्रज्ञान वाहतुक - दळणवळण आणि पर्यटन उद्योगाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व विचारात घेणार आहोत. स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रांचा विकासातील असणारा हिस्सा वाढल्यामुळे देशाचा विकास जलद गतीने होण्यास मदत झाली आहे.

**३.२ विषय विवेचन :**

या घटकामध्ये आपण सेवा क्षेत्रांचा अर्थ व रचना भारतातील सेवा क्षेत्रांचे वाढते महत्व बँका, वित्तीय संस्था व विमा क्षेत्राचे महत्व त्याच बरोबर माहिती तंत्रज्ञान, वाहतुक, दळणवळण व पर्यटन उद्योगाचे महत्व यांचाही अभ्यास करणार आहोत.

**३.२.१ सेवा क्षेत्राचा अर्थ व रचना :**

सेवा क्षेत्रांचा अर्थव्यवस्थेच्या तृतीय क्षेत्रामध्ये समावेश केला जातो. या क्षेत्रात व्यापार, हॉटेल उपहारगृहे, रेल्वे वाहतुक दळणवळण, बँक व वित्तीय सेवा, स्थावर मालमत्ता व विमा, गुदाम सेवा, पर्यटन व्यवसाय इत्यादींचा समावेश होतो. या सर्व सेवा मुख्यता. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांकडून पुरविल्या जातात. अलिकडे हॉटेल, पर्यटन संगणक व सॉफ्टवेअर सेवांचाही समावेश या क्षेत्रात केला आहे. सेवा क्षेत्राचा नेमका अर्थ व स्वरूप आपणास त्याच्या रचेनवरून अधिक स्पष्ट होईल.

**सेवा क्षेत्राची रचना :**

सेवा क्षेत्राचा अभ्यास हा पुढील ३ घटकांच्या सहाय्याने केला जातो.

अ) व्यापार, वाहतुक गुदाम सेवा व दळणवळण सुविधा

ब) वित्तीय संस्था, विमा, स्थावर मालमत्ता आणि उद्योग व्यवसायांशी संबंधित बाबी

क) समाजाच्या संयुक्तपणे व वैयक्तिक पातळीवर पुरविण्यात येणाऱ्या विविध सुविधा (आरोग्य, शिक्षण, वाहतुक)

ड) युनायटेड नेशन्स सेट्रल उत्पादन संस्थेच्या असे सेवा क्षेत्राची रचना ही एखाद्या देशाने पुरविलेल्या सेवांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर विचार करण्यात यावा असे म्हटले आहे. भारतात सध्या भारतीय राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण संस्थेचे २००८ साली पुढील १५ विविध विभागात सेवा क्षेत्रांची विभागणी केली आहे.

१) घाऊक व किरकोळ व्यापार, दुचाकी व चार चाकी दुरूस्ती करणारे व्यवसाय

२) वाहतुक व साठवणूक सेवा

३) निवास व हॉटेल सेवा

४) माहिती व दळणवळण सेवा

५) वित्तविषयक व विमा सेवा

६) स्थावर मालमत्तेशी संबंधित सेवा

७) शास्त्रीय व तांत्रिक सुविधा पुरविणाऱ्या संस्था

८) प्रशासकीय सेवा

९) सार्वजनिक प्रशासन व सामाजिक सुरक्षिततेच्या सुविधा

१०) शिक्षण

११) खाजगी व सार्वजनिक आरोग्य सेवा

१२) कौटुंबिक पातळीवर केले जाणारे व्यवसाय

१३) कला, करमणूक व विविध गुणदर्शन सुविधा

१४) सेवा क्षेत्रातील संस्थांनी राबविलेले उपक्रम

१५) अन्य सेवा.

भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार सेवाक्षेत्रांची विभागणी पुढील ३ सूची मध्ये करण्यात आली आहे.

**अ) केंद्र सूचीतील सेवा –** यामध्ये पोस्ट, तार, रेडिओ, विमा, वित्त पुरवठा करण्याऱ्या संस्था, राष्ट्रीय महामार्ग खनिजे इत्यादी १७ सेवांचा समावेश केला जातो. या सेवांचा विकास केंद्र सरकारकडून केला जातो.

**ब) राज्य सूचीतील सेवा –** या सेवा राज्य सरकारच्या असतात. यामध्ये आरोग्य, स्थावर मालमत्ता, पशुपालन व जंगल व्यवसायांचा समावेश होतो.

**क) समवर्ती सूचीतील सेवा –** या सूचीतील सेवा ह्या केंद्र व राज्य सरकार यांच्या संयुक्त प्रयत्नातून केला जातो. या विभागात कर सेवा, हिशेब, अभियांत्रिकी व स्थापत्य शास्त्र, नागरी नियोजन, विज पुरवठा, मेडिकल व दंत वैद्यकीय सेवा शिक्षण इत्यादी सेवांचा अंतर्भाव केला जातो.

भारतातील सेवा क्षेत्रांचा विचार करताना आणखी एका प्रकाराचा विचारा करावा लागतो. यामध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांचा हिस्सा विचारात घेऊन करण्यात आलेले वर्गीकरण होय. या प्रकाराच्या वर्गीकरणात सेवा क्षेत्रांची रचना पुढील ४ प्रकारात केली आहे.

अ) सामाजिक व वैयक्तिक सेवा

ब) वित्त, विमा, स्थावर मालमत्ता. उद्योग व्यवसाय

क) व्यापार, हॉटेल व्यवसाय व निवास व्यवस्था

ड) वाहतुक गुदाम व्यवस्था व दळणवळण.

अशा प्रकारे भारतात सेवा स्तरावर उभारणी व विकास शासन, खाजगी व वैयक्तिक स्तरावर करण्यात आली आहे. सेवा क्षेत्रांचे अर्थव्यवस्थेतील महत्व दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे शासकीय महसूल व रोजगार वृद्धि मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न – योग्य पर्यायाची निवड करून विधाने पूर्ण करा.**

१) भारतीय अर्थव्यवस्थेची विभागणी ही ............... गटात केली जाते.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ६

२) सेवा क्षेत्रात ............. हा व्यवसाय मोडतो.

अ) शेती ब) बँकींग क) साखर ड) चहा

३) निर्यातीचा समावेश ............ मध्ये केला जातो

अ) व्यवसाय ब) उद्योग क) सेवा ड) उद्योग संस्था

४) भारतात NIC ने सेवा क्षेत्रांची विभागणी .......... प्रकारात केली आहे.

अ) ५ ब) १० क) १५ ड) २०

५) भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार सेवा क्षेत्रांचे वर्गीकरण .......... गटात केले जाते.

अ) २ ब) ३ क) ५ ड) ७

### ३.२.२ भारतातील सेवा क्षेत्रांचे वाढते महत्व (Growing Importance of Service Sector in India)

देशाच्या आर्थिक विकासाचा संबंध अर्थव्यवस्थेतील वितरणात होणाऱ्या बदलाशी असतो. सायमन कुझनेट्स यांच्या मते व्यवस्थेतील विकास प्रक्रियेत तिन्ही क्षेत्रांच्या संरचनेत बदल घडून येत असतात. विकासाची सुरूवात प्राथमिक क्षेत्राच्या वाढीने होते. तद्नंतर द्वितीय क्षेत्राची वाढ होते व शेवटी अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्रांचे महत्व वाढीस लागते. भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्व पाहत असताना सेवा क्षेत्राची कामगिरी पाहणे महत्वाचे ठरते. पुढिल तक्त्याच्या आधारे देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील सेवा क्षेत्राचा वाटा अभ्यासता येईल.

**तक्ता क्र. ३.१**

**भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनातील सेवा क्षेत्राचा वाटा (टक्के मध्ये)**

| अ.नं. | क्षेत्र | १९५०-५१ | १९८०-८१ | २०१३-१४ |
|---|---|---|---|---|
| १) | शेती व शेती आधारित व्यवसाय | ५५.४ | ३८.० | १३.९ |
| २) | उद्योग | १५.० | २४.० | २६.२ |
| ३) | सेवा | | | |
| | अ) व्यापार, वाहतुक व दळणवळण | ११.३ | १७.४ | २६.४ |
| | ब) वित्तीय सेवा, विमा, स्थावर मालमत्ता इ. | ७.७ | ७.५ | २०.६ |
| | क) सामाजिक, सामुदायिक व वैयक्तिक सेवा | १०.६ | १३.० | १२.९ |
| | **एकूण सेवा क्षेत्र** | **२९.६** | **३८.०** | **५९.९** |

स्त्रोत : दत्त- सुंदरम - ७१ वि. आवृत्ती. पान क्र. ३४ एस. चंद - प्रकाशक.

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की सेवा क्षेत्रांचा वाटा हा १९५०-५१ मध्ये २९.६ टक्के झाला होता. तो २०१३-१४ मध्ये ५९.९ टक्यांपर्यंत वाढला. प्रामुख्याने व्यापार, वाहतुक व दळणवळण या घटकांमध्ये १९५०-५१ मध्ये ११.३ टक्यांवरून २०१३-१४ मध्ये २६.४ टक्के इतकी लक्षणिय वाढ झाली. कारण याच काळात मोबाईल क्षेत्रात मोठी क्रांती घडून आली होती.

वित्त व्यवसाय, विमा व स्थावर मालमत्ता या घटकांमध्ये झालेला व्यवसाय १९५०-५१ मध्ये ७.५ टक्यांवरून २०१३-१४ मध्ये २६.६ वाढलेला होता. शासकीय प्रशासन व्यवस्थेत झालेल्या बदलांमुळे शिक्षण, आरोग्य व  कल्याणकारी योजनांवर अधिक भर दिल्यामुळे १०.६ टक्यांवरून १२.९ टक्यांपर्यत या व्यवसायाचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**२) आंतरराष्ट्रीय तुलना :**

एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्रांचा हिस्सा लक्षात घेतल्यास भारताचा जगात ११ वा क्रमांक लागतो. चीन, अमेरिका, ब्राझिल, ऑस्ट्रेलिया, कोरिया हे देश आघाडीवर आहेत. २०१४ च्या आकडेवारी नुसार भारतात सेवा क्षेत्रांत ८.६ टक्कांनी तर चीनमध्ये ८.४ टक्कांनी सेवा क्षेत्रांचा विकास दर होता. २०१४ च्या आकडेवारी नुसार दिल्लीच्या बाबतीत दिल्लीचा प्रथम क्रमांक (८७.५%) तर त्या खालोखाल (६३.८%) महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक येतो.

**३) राज्यनिहाय सेवा क्षेत्रांची तुलना**

राज्यवार स्थूल राज्यांतर्गत उत्पादनात सेवा क्षेत्रांचा मोठा विचार केल्यास  बहुसंख्या राज्यांमध्ये सेवा क्षेत्रांचा वाटा अधिक आहे. सिक्कीम व अरूणाचल प्रदेश वगळता जवळजवळ राज्यांमध्ये  स्थूल राज्यांतर्गत उत्पादनाच्या या ४० टक्के  इतका हिस्सा सेवा क्षेत्रांचा आहे. सेवा क्षेत्रांमध्ये व्यापार, हॉटेल रेस्टॉरंट या घटकांचा हिस्सा आधिक आहे.  जम्मू व काश्मीर यांचा सेवा क्षेत्राचा विकासदर सर्वात कमी तो २.० टक्के इतका आहे तर बिहार राज्याचा सेवा क्षेत्रांचा विकास सर्वात वेगाने होत आहे. २०१४ च्या आकडेवारीनुसार दिल्लीचा राज्य स्थूल उत्पादनाचा सेवा क्षेत्रांच्या हिश्याच्या बाबतीत दिल्लीचा प्रथम क्रमांक (८७.९%) तर त्या खालोखाल (६३.८%) महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक येतो.

**४) सेवा क्षेत्र व प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक :**

प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीमुळे भारतात सेवा क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळाली आहे. घरबांधणी, स्थावर मालमत्ता, टेलिकम्यूनिकेशन्स, सॉफ्टवेअर या मध्ये परकीय गुंतवणूक महत्वाची ठरत आहे.

५) भारतासारख्या विकसनशील देशात सेवाक्षेत्रामुळे रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी निर्माण केलेल्या आहेत. प्रामुख्याने गेल्या कांही वर्षात माहिती तंत्रज्ञान वाहतुक दळणवळण विमा, पर्यटन व्यापार इत्यादी सेवांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे सेवा क्षेत्र हे भारताच्या रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन बनते आहे.

**६) माहिती व तंत्रज्ञान उद्योगांचा विस्तार**

१९९१ नंतर माहिती व तंत्रज्ञान उद्योगात मोठ्या प्रमाणात क्रांती घडून आली. अलिकडे वृत्तपत्रे,

टेलिव्हीजन, संगणक, मोबाईल व इंटरनेट इत्यादी क्षेत्रांशी संबंधित सुविधांचा वैयक्तिक व सार्वजनिक स्तरावर वापर वाढत आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा विकास जलद होण्यास मदत झाली आहे. थोडक्यात,माहिती तंत्रज्ञान उद्योगांच्या विकासामुळे सेवा क्षेत्रांचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे.

**७) इतर सेवांच्या निर्यातीमध्ये वाढ**

अलिकडे भारतात माहिती तंत्रज्ञान उद्योगांशी संबंधित उत्पादने व इतर सेवांची निर्यात मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही निर्यात अमेरिका, कॅनडा इतर युरोपीयन देशांशी केली जात आहे. भारताच्या सेवा क्षेत्रांची निर्यात २००१ मध्ये १६.८ द.लक्ष डॉलर होती ती २०१४ मध्ये १५५.६ द.लक्ष डॉलर इतकी वाढली आहे. भारताचा जगातल्या सेवा क्षेत्रांच्या निर्यातीमध्ये ८ वा क्रमांक लागतो.

**८) ग्रामीण भागातून सेवा क्षेत्राला वाढती मागणी**

शहरी बरोबरच ग्रामीण जनतेची सेवांमध्ये मोठी वाढ होत आहे. विशेषता वाहतुकीची साधने, टेलिफोन,विमा, संगणक, मोबाईल बँकिंग सेवा इत्यादींच्या मागणीत ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

अशा प्रकारे वरील कारणांमुळे भारतात सेवा क्षेत्रांचे महत्व वाढत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न :**

**दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) भारताच्या सेवा क्षेत्रांची विभागणी ........................... प्रकारात करण्यात आली आहे.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ६

२) ......................... क्षेत्राचा हिस्सा भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादनात वेगाने वाढत आहे.

अ) प्राथमिक ब) द्वितीय क) सेवा ड) उद्योग

३) ............................ हा सेवा क्षेत्रातील प्रमुख घटक मानला जातो.

अ) बँका ब) शेती क) दुग्धव्यवसाय ड) उद्योग

४) ........................ या राज्याचा राज्याच्या उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढलेला नाही.

अ) महाराष्ट्र ब) सिक्कीम क) तामिळनाडू ड) गुजरात

५) भारताच्या सेवाक्षेत्राचा एकूण रोजगार निर्मितीतील हिस्सा अलिकडच्या काळात ....

अ) घटत आहे ब) स्थिर आहे क) वाढत आहे ड) मंदगतीने घटत आहे.

पुढील तक्त्याच्या आधारे जगातल्या कांही प्रमुख देशांतून २०११ ते २०१५-१६ या दरम्यान भारतातच्या प्रमुख क्षेत्रात झालेली प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र. ३.२**

**२०११ ते २०१५ मध्ये जगातल्या प्रमुख देशांची भारतात झालेली प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक**

| अ.नं. | क्षेत्र | सिंगापूर | मॉरिशस | नेदरलँड | अमेरिका | जपान |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सेवा क्षेत्र | १८.६ | १८.९ | १५.४ | १९ | २० |
| २) | दळणवळण | ८.६ | ११.५ | ०.३ | २ | ०.१ |
| ३) | औषधे | ६.६ | १.० | ०.६ | २ | ३ |
| ४) | विज | ५.० | ६.१ | २.७ | ४ | ०.३ |
| ५) | पर्यटन | २.३ | १०.६ | ०.६ | ०.८ | ०१ |
| ६) | पेट्रोल व गॅस | ०.७ | १.१ | ८.४ | ०.१ | १.२ |

**स्त्रोत : आर्थिक पाहणी अहवाल २०१५-१६**

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की भारतामध्ये सेवा क्षेत्रामधील परकीय गुंतवणुकीमध्ये अमेरिका, जपान, सिंगापूर ह्या देशांचा वाटा आहे. तर भारतातल्या एकूण परकीय गुंतवणुकीतीत सेवा क्षेत्रांचा वाटा इतर क्षेत्रांच्या तुलनेत अधिक दिसून येतो. यावरून भारताच्या जलद विकासाच्या दृष्टीने सेवा क्षेत्रांचे महत्व स्पष्ट होते.

१९९०-९१ ते २०१०-११ या कालावधीत सेवांची आयात व निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. सेवांची निर्यात सेवांच्या आयतीपेक्षा अधिक वाढत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासारखेच आरोग्य, उच्च शिक्षण,पर्यटन आणि कायदेशीर सेवा या क्षेत्रामध्येही अधिक चांगल्या क्षमता आहेत. भारतातील सेवा क्षेत्र अधिक विकसित, स्पर्धात्मक होण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीला अधिक वाव देण्याची गरज वाटते.

### ३.२.३ बँका, वित्तीय संस्था व विमा व्यवसायचे महत्व :

भारतीय अर्थव्यवस्थेत विकासाच्या प्रक्रियेत बँका, वित्तीय संस्था अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. सराफी पेठांचा व सावकारांच्या भरमसाठ व्याजदर घेणाऱ्या कर्जपुरवठ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी १९३५ मध्ये 'रिझर्व बँक ऑफ इंडियाची' स्थापना करण्यात आली. व्यापारी बँकांच्या कार्यामध्ये सुधारणा करण्यासाठी १९५५ मध्ये इंपिरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करून 'स्टेट बँकेची' स्थापना केली. १९९१ मध्ये मुक्त अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर नरसिंहम समितीचा अहवाल महत्वाचा ठरला. कारण या अहवालाच्या माध्यमातून बँक, वित्तीय संस्थेचे महत्व अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे हे स्पष्ट झाले. भारतातील बँका व वित्तीय संस्थांचे महत्व आपणांस पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) अग्रक्रम क्षेत्राला पतपुरवठा**

सीमांत शेतकरी, लघु उद्योग किरकोळ व्यापारी, स्वयंरोजगार इत्यादीचा समावेश अग्रक्रम क्षेत्रांमध्ये करण्यात आला समतोल विकास साध्य करावयाचा झाल्यास वरील क्षेत्राला वित्तीय मदत करणे आवश्यक होते.

भारतामध्ये पुढील प्रमाणे या क्षेत्रांना कर्ज पुरवठा केलेला दिसून येतो.

१) शेती क्षेत्राला १९९४ मध्ये २०,९०० को रुपयाचा कर्ज पुरवठा केला होता. तो २००९ मध्ये -

२) लघु उद्योगांना १९९४ मध्ये २१,४४० को. इतके तर २००१ मध्ये १,९१,३०७ को --

३) सार्वजनिक क्षेत्रांच्या एकूण कर्ज पुरवठ्यातील अग्रक्रम क्षेत्रांचा पतपुरवठा ३८ टक्क्यांवरून २००९ मध्ये ४२.५ % पर्यंत वाढलेला आढळून येतो.

थोडक्यात नरसिंह समितीने बँक पतपुरवठ्याची मर्यादा वाढवल्यामुळे अग्रक्रम क्षेत्रांना कर्ज पुरवठ्याचे प्रमाण वाढलेले आढळून येते.

**२) विकासासाठी कर्ज पुरवठा**

स्वातंत्र्यानंतर कांही परंपरागत उद्योगानांचा व्यापारी बँकांचा कर्जपुरवठा होत असे पण राष्ट्रीयीकरणाच्या निर्णयामुळे व्यापारी बँकांना आपला पवित्रा बदलावा लागला. लहान उद्योगांना कर्ज देत असतांना सेवा क्षेत्र दृष्टीकोन स्वीकारला, सन १९९१ नंतर मुक्त व्यवस्था स्वीकारल्यामुळे विदेशी बँकांना मुक्त प्रवेश मिळाल्यामुळे भारतीय बँक व्यवसायाला स्पर्धात्मक वातावरणाचा स्वीकार करावा लागल्यामुळे त्याचा ग्राहकांना फायदा झाला.

अलीकडे केंद्रिय सांख्यिकीय संघटनेच्या (CSO) च्या आकडेवारीनुसार भारताच्या एकूण स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या प्रमाणात एकूण बचतीचा दर हा २०११-१२ मध्ये ३४.६ टक्के, २०१२ -१३ -३३.४ टक्के , २०१३-१४ मध्ये ३३.० तर २०१४ -१५ मध्ये ३३.० या प्रमाणे घटत गेलेले आढळून येते.

**२) बचतीला चालना मिळाली**

बचतीला चालना देऊन ठेवी गोळा करणे हे बँकेचे मुख्य काम आहे. व्यापारी बँकांबरोबर सहकारी बँका, ग्रामीण बँका, विदेशी बँका या देशातील ठेवी संचलनाचे काम करतात. या ठेवी मध्ये सातत्याने वाढ होत गेलेली दिसून येते. अलीकडे अदिवासी भारतीयांच्या ठेवी मिळवण्यासाठीही यशस्वी प्रयत्न या व्यापारी बँकांनी केला आहे.

**३) रोजगार निर्मितीला चालना**

सरकारी क्षेत्रातील बँकांना सरकारने सामाजिक बँकींगच्या माध्यमातून विविध दारिद्र्य निर्मुलनाच्या कार्यक्रमांना कर्ज पुरवठा करण्याची सूचना केली. १९९६ मध्ये अनेक खातेदारांनी ४ टक्के व्याजदाराने ६४० कोटी रूपयांचा कर्ज पुरवठा केला गेला. अलिकडे एकत्मिक ग्रामीण विकास योजनेसाठी मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा केला आहे. सरकारने पंतप्रधान रोजगार योजना बँकाच्या सहकार्याने सुरू केली आहे.

**४) बँक व्यवसायातील विविधता**

१९९१ नंतर स्पर्धात्मक वातावरणात टिकूण राहण्यासाठी बँकांनी नवीन मार्गांचा अवलंब केला. जसे वाणिज्य बँक, म्युच्युअल फंड, किरकोळ बँकिंग, ATM, जोखिम भांडवल निधी, अशा पद्धतीने भारतातील बँकिंग क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात व्यवसायाचे विविधीकरण करून देशाच्या विकास कार्याला हातभार लावला आहे.

### ५) बँकांचा शाखा विस्तार

१९९१ मध्ये एकूण ६०६५० इतकी व्यापारी बँकांची संख्या होती

### ६) ग्रामीण व कृषी विकास

भारतीय अर्थव्यस्थेच्या विकास प्रक्रियेत शेती हे एक महत्वाचे क्षेत्र असून ग्रामीण जनतेचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून आहे. १९५१ पासून शेती व ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी बँका व वित्तीय संस्थांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. तसेच बँक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे बँकांमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली आहे. त्यामध्ये १४,१५० लोकांमागे एक बँक असे प्रमाण होते ते १२००० लोकांमागे एक बँक असे प्रमाण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे लोकसंख्येत ज्या प्रमाणात वाढ झाली त्याच प्रमाणात बँकांच्या शाखा विस्तारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

देशामध्ये प्राथमिक व द्वितीय व सेवा क्षेत्राच्या वाढत्या वित्तीय गरजांची पूर्तता करता यावी म्हणून भारत सरकारने पुढील वित्तीय संस्थांची निर्मिती केली आहे.

१) भारतीय औद्योगिक गुंतवणूक बँक (IDBI) 1985

२) युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया (UTI) 1964

३) भारतीय जीवन विमा महामंडळ (LIC) 1956

४) भारतीय औद्योगिक विकास बँक (IDBI) 1964

५) भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळ (IFCI) 1984

६) भारतीय राष्ट्रीय गृहनिर्माण बँक (NHBI) 2000

७) भारताची आयात –निर्यात बँक (EXIM) 1982

८) भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ (GICI) 1972

९) राष्ट्रीय शेती व ग्रामीण विकास बँक (NABARD) 1982

१०) भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI)

११) भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक महामंडळ (ICICI) 1955

वरील सर्व वित्तपुरवठा संस्थांचा सहभाग भारतातील लघु व मध्यम उद्योगांच्या विकासासाठी महत्वाचा मानला जातो.

### विमा क्षेत्राचे भारतीय अर्थव्यरस्थेतील महत्व :

मानवाच्या जीवनामध्ये निर्माण होणाऱ्या धोक्यातून सावरण्यासाठी विमा व्यवसायाने महत्वाची भूमिका बजावली. भविष्यातील तरतूद, नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण होणाऱ्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी विमा व्यवसायाची स्थापना झाली. नुकसान होण्याची शक्यता असताना संबंधित व्यक्तीकडून विशिष्ट रक्कम विमा हप्त्याच्या रूपाने जमा करून ज्याचे प्रत्यक्ष नुकसान झाले असेल त्याची भरपाई करण्यात येते

भारतात सद्या पुढील विविध प्रकारचा विमा कंपन्या कार्यरत आहेत.

१) न्यू इंडिया इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड

२) भारतीय जीवन विमा महामंडळ

३) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड

४) ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड

५) बजाज अलाएंस कंपनी लिमिटेड

६) टाटा ए.आय.जी कंपनी लिमिटेड

७) मॅक्स न्यूयॉर्क कंपनी लिमिटेड

८) एस.बी.आय. लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड

९) रिलायन्स इन्शुरन्स कंपनी लिमिटेड

१०) लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड

वरील प्रमाणे भारतात विमा सुविधा प्राप्त झाल्या आहेत 'भारतीय जीवन विमा मंडळ' हे विमा व्यवसायात महत्वाची भूमिका पार पाडत आहे. गेल्या २० वर्षात बीमा व्यवसायात वेगाने वाढ होत आहे. त्याचे महत्व पुढील प्रमाणे पाहता येईल.

**१) भांडवल संचय व विमा :**

देशातील भांडवलाच्या साठ्यात म्हणजेच यंत्र अवजारे, इमारती, वाहतुक साधने, दळणवळण इत्यादींचा भांडवल संचयामध्ये समावेश केला जातो. संचयाच्या प्रक्रियेसाठी पुढील घटक महत्वाचे असतात.

**बचत पातळी** : वित्तीय व बिगर वित्तीय संस्थेकडून होणारी बचत गुंतवणूकीसाठी उपलब्ध करून देणे त्यासाठी विमा क्षेत्राची मदत होते.

**गुंतवणूक करणे** :

विमा कंपन्यांच्या सहाय्याने देशातील गोळा झालेली बचत राष्ट्राच्या उभारणीसाठी आवश्यक आसलेल्या मुलभूत साधनांमध्ये गुंतवली जाते.

**रोजगार पातळीत वाढ** :

१९९१ नंतर मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केल्यामुळे खाजगी क्षेत्रांचा विमा क्षेत्रांमध्ये प्रवेश झाल्यामुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या.

**२) ग्रामीण व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक :**

बऱ्याच वेळा आजारपण, दुखापत, अपघात यावर मात करण्यात वैयक्तिक पातळीवर अडचण येते, तसेच व्यवसायात तोटा झाल्यास तो भरून काढणे कठीण जाते अशावेळी विमा क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते. आयुर्विमा निधीतील सुमारे ७५ टक्के निधी हा सामाजिक योजनांमध्ये गुंतविला जातो. वेगवेगळ्या योजना जाहिर करून ग्राहकांना फायदेशीर गुंतवणूकीचे मार्गदर्शन केले जाते. अशा रितीने ग्रामीण सामाजिक क्षेत्रात विमा व्यवसायाचा सहभाग वाढत आहे.

**३) वित्तीय व्यवस्थेतील मध्यस्थ म्हणून काम पाहणे :**

देशातील बचतीचे योग्य पद्धतीने वापर व वाटप करून देशातील गुंतवणूकीची पातळी वाढवण्यासाठी विमा क्षेत्र महत्वाची भूमिका पार पाडते. त्यामध्ये उपलब्ध भांडवलाचा कार्यक्षमपणे वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वाटप करते की ज्यामुळे देशात उत्पादकता व आर्थिक कार्यक्षमता वाढून देशातील भांडवल गुणोत्तर प्रमाण कमी राहण्यास मदत होते.

**४) मोठ्या प्रमाणातील गुंतवणुकीचे फायदे :**

विमा क्षेत्रामुळे मोठ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करणे शक्य होते. मोठ्या प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीमुळे (उदा. रेल्वे) अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूकीचे फायदे मिळू शकतात. त्यामुळे नवीन शोध घेणे व कार्यामध्ये विषेशीकरणाचे लाभ मिळाल्यामुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक कार्यक्षमता व उत्पादकता वाढण्यास मदत होते.

**५) वाणिज्य व व्यापाराला चालना मिळते**

देशातील वाढत जाणऱ्या एकूण देशांतर्गत उत्पादनांचा व व्यापार व वाणिज्य वाढीचा धनात्मक सहसंबंध असतो. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीसाठी विमा कंपन्यांची मदत होते.

**६) स्थावर मालमत्तेचे संरक्षण**

भारतामध्ये घर, इमारत, कारखाने इत्यादी स्थावर मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी विमाा व्यवसाय महत्वाचा ठरला आहे. कोणत्याही कारणाने मालमत्तेचे झालेले नुकसान फक्त विमा व्यवसायाने भरून दिले आहे. यावरून विमा व्यवसायाचे महत्व स्पष्ट होते.

**७) गुंतवणूकदारांना योग्य मार्गदर्शन**

ग्राहकांना विम्याच्या सोई उपलब्ध करून देत असताना त्यांना फायदेशीर गुंतवणूकीच्या संदर्भात योग्य प्रकारे मार्गदर्शन विमा कंपन्यांकडून केले जाते.

**८) परावलंबित्व कमी करणे**

विमा क्षेत्रांमुळे व्यक्तिचे व्यक्तिवर असलेले परावलंबित्व कमी होण्यास मदत झाली आहे. एखाद्या कुटुंबामध्ये कुंटुंब प्रमुखांचे निधन झाल्यास त्या कुटुंबावर ओढवलेल्या संकटावर मात करण्यासाठी विमा आधार देण्याचे कार्य करते. भारतामध्ये विमा महामंडळाने ०.९७% कुटुंबांना वित्तीय मदत केली आहे.

अशा पद्धतीने भारतातील विमा क्षेत्रांचे महत्व स्पष्ट करता येईल.

**स्वयंअध्ययन प्रश्न :**

**दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्यायांची निवड करून विधाने पूर्ण करा.**

१) ............. ही भारतातील सर्वात लोकप्रिय विमा कंपनी आहे.

अ) SBI लाईफ ब) बजाज अलाएज क) LIC ड) यापेक्षा वेगळे

२) विमा सुविधा ही व्यक्तिच्या ....... साठी आवश्यक असते.

अ) शेअर बाजाराच्या विकासासाठी ब) बचती क) दारिद्र्य निर्मूलन

ड) अनिश्चितता कमी करण्यासाठी

३) बँकेत्तर वित्तीय संस्थांनी भारतातील प्रादेशिक विषमता ......

अ) वाढविली आहे ब) विकसीत केली आहे क) स्थिर ठेवली आहे ड) कमी केली आहे

४) भारतात बँकिंग क्षेत्राची विभागणी ..... गटात केली जाते.

अ) ३ ब) ७ क) २ ड) ५

५) अर्थव्यवस्थेतील बँक सेवा या ...... क्षेत्रात मोडतात.

अ) शेती ब) उद्योग क) सेवा ड) पर्यटन

**३.२.४ भारतातील माहिती तंत्रज्ञान, वाहतुक दळणवळण पर्यटन उद्योगांचे महत्व :**

अलीकडे भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रांचा विस्तार वेगाने होत आहे. त्याच बरोबर वाहतुक दळणवळण व पर्यटन क्षेत्रांचा विकास झपाट्याने होत आहे.

**(अ) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व :**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. या क्षेत्राला माहिती अधारीत उद्योग असे म्हटले जाते. या क्षेत्रात देशाचा विकास करण्याची प्रचंड मोठी क्षमता आहे. तसेच कार्यक्षम प्रशासन, माहितीचे प्रसारण, ग्राहकांचे संरक्षण, परिणामकारक प्रशिक्षण इत्यादी अनेक बाबतीत हे क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वाची भूमिका पार पाडत आहे. भारतातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रांच्या विकासाच्या पुढील अवस्था लक्षात घेता येतील.

१९८० पूर्वी - या काळात सरकारने परवाना व जकातीच्या सहाय्याने पूर्ण संरक्षण दिले होते. १९७४ मध्ये टाटा कन्सलटंन्सी (TCS) या कंपनीला या धोरणाचा फायदा झाला.

१९८० ते १९९० - या दशकात TCS, WIPPRO, INFOSYS या कंपन्यांनी निर्यात करायला सुरवात केली. पण सरकारच्या प्रोत्साहनात्मक धोरणाचा अभाव व मुलभूत सुविधांच्या अभावामुळे या क्षेत्रावर खूप मोठा दबाव वाढला. १९८६ मध्ये सरकारने या क्षेत्राच्या बाबतीत काही प्रमाणात उदारीकरणाचे व मुक्त आयत निर्यातीचे धोरण स्वीकारल्यामुळे काही प्रमाणात विकासाला चालना मिळाली.

१९९० ते २००० - या दशकांत या क्षेत्रामध्ये तीव्र स्पर्धा वाढीस लागली. त्याच प्रमाणे या काळात अर्थव्यवस्थेत प्रमुख बदल घडून आले. जसे, आयात निर्बंध दूर झाले, आंतरराष्ट्रीय व्यापारांमध्ये उदारीकरणाला चालना मिळाली. परकीय गुंतवणूक मुक्त करण्यात आली. या धोरणांमुळे परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात भारतात आली. या क्षेत्रात आधुनिकीरणाचे वारे वाहू लागले.

२००० ते २०१० - या काळात या क्षेत्राचा झपाट्याने विकास झाला. सॉफ्टवेअर कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात आपल्या निर्यातीच्या माध्यमातून देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून दिले.

२०१० नंतर - २०१० नंतर माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात सेवा पुरविणारा जगातला मोठा देश ठरला. कारण ऑनलाईन किरकोळ व्यापार व इ-वाणिज्य या दोन कारणांमुळे या क्षेत्राचा जलद विकास घडून आला.

**भारतीय विकासातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रांचे महत्व :**

आर्थिक सुधारणा कार्यक्रमानंतर भारतामध्ये या क्षेत्रांचा वेगाने विकास घडून आला. प्रामुख्याने तंत्रज्ञानाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण घडून आल्यामुळे संगणकांच्या किंमती कमी झाल्यामुळे औद्योगिक

क्षेत्रांमध्ये याचा वापर वाढला. थोडक्यात उदारीकरणानंतरच्या येत्या २५ वर्षात या क्षेत्रात खूप मोठी प्रगती घडून आल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील हिस्सा वाढला. हे पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) स्थूल देशांतर्गत उत्पादनातील वाटा :**

१९९१-९२ ते २०१५-१६ या माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. त्यामुळे देशाच्या उत्पन्नातील वाटा, परकीय चलनाचे प्रमाण व रोजगाराच्या संधी यामध्ये माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामुळे वाढ घडून आली. पुढील तक्त्याच्या आधारे स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील घडून आलेली वाढ दर्शवली आहे.

**तक्ता क्र. ३.३**

**माहिती व तंत्रज्ञान क्षेत्राचा देशांतर्गत उत्पादनातील हिस्सा % मध्ये**

| वर्ष | स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) % मध्ये |
|---|---|
| १९९१-९२ | ०.४ |
| १९९२-९३ | ०.४ |
| १९९३-९४ | ०.५ |
| १९९४-९५ | ०.६ |
| १९९५-९६ | ०.७ |
| १९९६-९७ | ०.९ |
| १९९७-९८ | १.२ |
| १९९८-९९ | १.४ |
| १९९९-२००० | १.८ |
| २०००-०१ | २.६ |
| २००१-०२ | २.७ |
| २००२-०३ | २.८ |
| २००३-०४ | ३.२ |
| २००५-०६ | ३.६ |
| २००६-०७ | ४.३ |
| २००७-०८ | ४.४ |
| २००८-०९ | ५.९ |
| २००९-१० | ५.८ |
| २०१०-११ | ६.१ |
| २०११-१२ | ७.५ |
| २०१२-१३ | ८ |
| २०१३-१४ | ८.१ |
| २०१४-१५ | ९.५ |
| २०१५-१६ | ९.३ |

स्त्रोत : International Journal of Research Vol. 5,Jun 2017

वरील तक्त्यांवरून भारतातील माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रांचा देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात १९५१ मध्ये ०.४ टक्के इतका वाटा होता तो २०१५-१६ मध्ये ९.३ टक्के इतका वाढला आहे.

**२) रोजगार संधीमध्ये वाढ :**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासामुळे देशात कुशल व अकुशल बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या. २०१५-१६ मध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या क्षेत्रांतील ५.१ लोकांना माहिती तंत्रज्ञान मधल्या BPO उद्योगांमध्ये रोजगार उपलब्ध झाला.

पुढील तक्त्यावरून भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात २००१ ते २०१५ या काळात रोजगार संधीचे चित्र स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३.४**

**२००१ ते २०१५ या वर्षातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये निर्माण झालेल्या रोजगार संधी. (लाखांमध्ये)**

| वर्ष | एकूण रोजगार |
|---|---|
| २०००-०१ | ०.५२ |
| २००१-०२ | ०.६७ |
| २००२-०३ | ०.८२ |
| २००३-०४ | १.०६ |
| २००५-०६ | १.२९ |
| २००६-०७ | १.६२ |
| २००७-०८ | २.०१ |
| २००८-०९ | २.२१ |
| २००९-१० | २.२९ |
| २०१०-११ | २.५४ |
| २०११-१२ | २.५४ |
| २०१२-१३ | २.७७ |
| २०१३-१४ | ३.२८ |
| २०१४-१५ | ३.५१ |
| २०१५-१६ | ३.६८ |

**स्त्रोत :** NASSCOM http://www.mit.gov.in

**इतर महत्व :**

१) संगणक क्षेत्रामध्ये क्रांती घडून आल्यामुळे देशामध्ये शैक्षणिक विकास वेगाने होण्यास मदत झाली.

२) इकॉमर्स, इ-बिझनेस, इ-लर्निंग या संकल्पनांमुळे उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासाला महत्वाच्या ठरल्या आहेत.

३) आधुनिकीकरणासाठी व्यवस्थापकीय कौशल्यात वाढ घडवून आणण्यासाठी माहिति तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग होत आहे.

४) माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे देशातील अनेक संशोधकांना आपल्या संशोधनामध्ये उपयोग होत आहे.

५) बँकिंग क्षेत्रात आय.टी मुळे सर्व जग जवळ आल्यामुळे देशातील भांडवल अधिक गतिशील झाले आहे. इ-बँकिंग, मोबाईल बँकिंग, सोईमुळे ठेव ठेवणे, पैशाचे स्थानांतर करणे शक्य झाले आहे.

६) महसूलाचे साधन - भारतातील आय.टी व बी.पी.ओ क्षेत्रांकडून निर्यातीतून मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळत आहे.

७) इंटरनेट वापरात वाढ - भारतातील सर्वाधिक वापर करणारा देश म्हणून चीनचा प्रथम क्रमांक लागतो. तर अमेरिका, दुसऱ्या व भारताचा तिसरा क्रमांक आहे. तरूण महिलांचा सहभागही वाढत आहे.

**(ब) वाहतुकीचे महत्व :**

जलद आर्थिक विकासासाठी कार्यक्षम वाहतुक व्यवस्था आवश्यक असते. विकासाच्या प्रत्येक टप्पामध्ये वाहतुक यंत्रणा महत्वाची असते असे डॉ. मार्शल यांनी म्हंटले आहे. भारतासारख्या विकसनशील देशात रस्ते, रेल्वे, हवाई वाहतुकीचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. पुढील प्रमाणे वाहतुकीच्या साधनांचे अर्थव्यवस्थेतील महत्व लक्षात घेऊ.

**१) वाहतुकीचे सामाजिक व सांस्कृतिक महत्व :**

सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने वाहतुकीचे विशेष महत्व आहे. नागरी समाज घडवण्यासाठी वाहतुक व्यवस्था आवश्यक असते. जसे मुंबई, न्युयॉर्क, मास्को ही शहरे वाहतुक व्यवस्थेच्या जोरावर विकसित झालेली आहेत. वाहतुकीमुळे अद्ययावत ज्ञान व संस्कृतीची देवाण घेवाण शक्य होते. सक्षम व कार्यक्षम वाहतुकीची साधने ही प्रादेशिक विषमता व देशाचा राहणीमानाचा दर्जा सुधारण्यास मदत करत आहेत. ग्रामीण व शहरी निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यात मदत झाली आहे. थोडक्यात, वाहतुक व्यवस्थेचे देशात सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणण्यात मदत झालेली आहे.

**२) आर्थिक विकास व वाहतुक व्यवस्था :**

अर्थशास्त्रामध्ये उत्पादन, वितरण व उपभोग या तीन घटकांचा समावेश असतो. लोक आपल्या गरजा भागवत असतांना नैसर्गिक साधनांवर अवलंबून असतात. परंतु नैसर्गिक साधनांमध्ये सारखेपण नसल्यामुळे राहणीमानाची पातळी ही वेगवेगळी दिसून येते. त्यामुळे अशावेळी वाहतुक व्यवस्था अधिक महत्वाची असते. भारतात नियोजन काळात उद्योग व व्यापारामध्ये वाहतुक व्यवस्थेचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. वाहतूक समस्येमुळे जगांमध्ये कोठे ही उपलब्ध असलेली वस्तु उपभोगता येतात. वस्तुंच्या मागणी पुरवठा व किंमतीमध्ये समतोल प्रस्थापित करण्याचे कार्य वाहतुक व्यवस्था करते. तसेच उत्पादन घटकांचे दर (भूमी, श्रम, भांडवल व संचय) वाहतुकीच्या अंतरावरून ठरत असतात. भारतात वाहतुकीच्या साधनांमुळे कृषी उत्पादनासाठी लागणाऱ्या आधुनिक उत्पादन घटकांचे उत्पादन वितरण हे वाहतुक व्यवस्थेमुळे शक्य झाले आहे.

**३) वाहतुकीचे राजकीय महत्व :**

राजकीय दृष्टीकोनातून वाहतूक व्यवस्थेला महत्व प्राप्त झाले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी व राष्ट्राच्या सरंक्षण व्यवस्थेला बलवान करण्यास उपयोगी ठरली आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात राज्यांच्या राजकीय सीमा निश्चित करण्यास व देशांतर्गत कायदा, सुव्यवस्था व शांतता निर्माण करण्यासाठी वाहतुक व्यवस्था उपयोगी ठरली आहे. अलीकडे जागतिकीकरणाला गती प्राप्त करण्यासाठी वाहतुक व्यवस्थेने वेळ व अंतर कमी करण्यासाठी मदत केली आहे.

**(क) दळणवळणाचे महत्व :**

दळणवळण ही एक प्रक्रिया आहे, की ज्यामध्ये व्यक्ती व संघटना यांच्यमध्ये पूर्वसंम्मतीने माहितींची देवाणघेवाण केली जाते. आधुनिक काळात भारतीय अर्थव्यवस्थेत वर्तमानपत्रे, रेडिओ, टी.व्ही, मोबाईल, इंटरनेट, तार, पोस्ट या साधनांना विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. पुढील प्रमाणे दळणवळणाच्या साधनांचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील महत्व स्पष्ट करता येईल.

**१) आर्थिक महत्व :**

दळणवळणाची साधने आर्थिकदृष्ट्या पुढील प्रमाणे फायदे मिळवून देतात.

१. उत्पादन प्रक्रियेत चालना देऊन कामगार व मालक यांच्यात सलोखा निर्माण करतात.

२. समाजाच्या उपभोग वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या ई–कॉमर्स इ.बिझनेस सारख्या माध्यमांचा उपयोग होतो.

३. वस्तुंच्या उत्पादनानंतर देशात विनिमयासाठी दळणवळणाची साधने प्रोत्साहन देतात.

४. कोणत्या विभागात उत्पादनाची दुर्मिळ साधने उपलब्ध आहेत. हे दळणवळणाच्या साधनांतून त्याची माहिती उपलब्ध होते. व त्यामुळे उत्पादन वाढीला प्रेरणा मिळते.

५. दळणवळणाच्या साधनांमुळे शेती उत्पादनाला बाजारपेठा उपलब्ध होतात. उत्पादनात बदल घडून येतात.

६. सध्या भारतात टी.व्ही, मोबाईल व कॉलसेंटरस इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी उपलब्ध होत आहेत.

**२) राजकीय क्षेत्र व संपर्क साधने :**

परिस्थितीनुसार सरकारला विविध राजकीय व आर्थिक धोरणांची आखणी व अमंलबजावणी करताना संपर्क साधनांच्यामुळे पोषक वातावरण तयार होते. ई. गर्व्हनस पद्धतीमुळे राष्ट्रीय ऐक्य व सर्वसमावेशक विकास साधणे शक्य झाले आहे.

**३) दळणवळणाची साधने व सामाजिक व सांस्कृतिक विकास :**

भारतासारख्या विकसनशील देशात सांस्कृतिक व सामाजिक वारसा जपण्याची महत्वाची भूमिका दळणवळणाच्या साधनांनी पार पाडली आहे. संपर्क साधनांच्या योग्य वापरामुळे देशातील लोकांचे राहणीमान पातळी उंचावण्यास मदत होते. तसेच जुन्या विचारसरणीचा त्याग करून आधुनिक विचारसरणीचा स्वीकार करण्यास संपर्क साधनांमुळे शक्य होते.

**(ड) पर्यटन उद्योगांचे महत्व :**

आर्थिक विकासाचे प्रमुख इंजिन म्हणून पर्यटन क्षेत्रांकडे पाहिले जाते. प्रामुख्याने परकीय चलन मिळण्याचा प्रमुख मार्ग व रोजगार निर्मितीमध्ये मोठा सहभाग असणारे क्षेत्र म्हणून या क्षेत्रांची ओळख आहे. जागतिक पर्यटन

संस्थेच्यामते एकूण जागतिक पर्यटन क्षेत्राच्या जगाच्या २०१४ च्या आकडेवारीनुसार स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) ९.८ टक्के इतका वाटा होता. तो २०२५ पर्यंत १०.५ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे. फ्रान्स हा देश जगातल्या पर्यटकांना आकर्षित करण्यात सर्वात आघाडीवर राहिलेला देश आहे म्हणजे एकूण जागतिक पातळीवर हे प्रमाण ७.४ टक्के इतके असून भारताच्या बाबतीत हे प्रमाण २०१४ च्या आकडेवारीनुसार फक्त ०.७ टक्के इतका आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये या क्षेत्राचे महत्व सातत्याने वाढत चाललेले दिसून येत आहे. देशांतर्गत देशाच्यावरील पर्यटकांची संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे. प्रामुख्याने तामिळनाडू , उत्तर प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र व आंध्रप्रदेश ही पाच राज्ये मोठ्या प्रमाणात पर्यटन आकर्षित करण्यात अग्रेसर राहिली आहेत. अलीकडे सरकारने वैद्यकीय पर्यटन (Medical tourism) ला चालना देण्यासाठी आरोग्य सुरक्षा संकेतस्थळ (Healthcare portal) ची स्थापना केली आहे. भारतीयांना घटक राज्यांची आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये समजून घेण्यासाठी पर्यटन व्यवसाय महत्वाचा ठरलेला आहे. तक्ता क्र.३.५ मध्ये पर्यटन व्यवसायातून भारताला मिळालेले परकीय चलनाचे चित्र अभ्यासता येते.

**तक्ता क्र. ३.५**

**भारताला पर्यटकांतून मिळालेले परकीय चलन**

**स्त्रोत - पर्यटन उद्योगाचा २०१४-१५ चा वार्षिक अहवाल.**

कोष्टक क्र. ३.५ वरून आपणास भारतात २००० ते २०१५ या काळात आलेल्या परकीय पर्यटकांपासून

| वर्ष | देशास मिळालेले परकीय चलन (कोटी रुपये) |
|---|---|
| २००० | १५६२६ |
| २००१ | १५०८३ |
| २००२ | १५०६४ |
| २००३ | २०७२९ |
| २००४ | २७४९९ |
| २००५ | ३३१२३ |
| २००६ | ३९०२५ |
| २००७ | ४४३६० |
| २००८ | ५१२९४ |
| २००९ | ५४९६० |
| २०१० | ६४८८९ |
| २०११ | ७७५९१ |
| २०१२ | ९४४८७ |
| २०१३ | १०७६७१ |
| २०१४ | १२३३२० |
| २०१५ | १३५१९३ |

मिळालेले परकीय चलनांची प्रगती स्पष्ट होते. २००० ते २०१५ या १५ वर्षाच्या कालखंडात परकीय पर्यटकांपासून मिळालेले परकीय चलनांमध्ये सातत्याने वाढ होत गेलेली दिसून येते.

पुढील मुद्यांच्या आधारे भारतातील पर्यटन क्षेत्राचे महत्व विचारात घेऊ.

**१) पर्यटन उद्योगाचे सामाजिक व सांस्कृतिक फायदे :**

पर्यटन व्यवसायाचे आर्थिक दृष्टीकोनातून जितके महत्व आहे. तितकेच ते देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी उपयुक्त आहे. देशांदेशातील सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी पर्यटनांची भूमिका मोलाची ठरत आहे. प्रेक्षणीय व धार्मिक स्थळे यांचे दर्शन घडवून भारतीय सांस्कृतिक ठेवा जपण्याचे कार्य पर्यटन उद्योग करत आहे.

**२) पर्यटन क्षेत्र व आर्थिक विकास :**

पर्यटन क्षेत्रांना भेटी देण्यासाठी अलीकडे मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे त्यामुळे पुढील काही आर्थिक लाभ होत आहेत. पर्यटन उद्योगांमुळे रस्ते, वाहतुकीचे साधने व दळणवळणाच्या साधनांना चालना मिळल्यामुळे रोजगार संधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली

देशांमध्ये पर्यटनामुळे हॉटेल व्यवसायाला चालना मिळावी, परकीय पर्यटनांमुळे देशाच्या परकीय चलनात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. कर रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नात पर्यटन व्यवसायामुळे वाढ होत आहे. थोडक्यात पर्यटक व्यवसायामुळे आर्थिक सामाजिक देवाण घेवाणीतून देशाच्या आर्थिक विकासाला पोषक वातावरण तयार झाले आहे.

**स्वयं – अध्ययनासाठी प्रश्न**

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा**

१) ........... हे संपर्काचे महत्वाचे साधन आहे.

अ) कार  ब) बस  क) मोबाईल  ड) ट्रक

२) वस्तु सेवांच्या उत्पादनासाठी .......... सुविधा आवश्यक आहे.

अ) वाहतुक  ब) मोबाईल  क) शैक्षणिक  ड) पोस्ट

३) भारतामध्ये........ या क्षेत्रात माहिती व तंत्रज्ञान सुविधांचा सर्वाधिक स्पष्ट केला जातो.

अ) औद्योगिक  ब) शेती  क) सांस्कृतिक  ड) शैक्षणिक

४) १९९१ नंतर भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्या ........ आहे.

अ) स्थिर  ब) वाढत  क) घटत  ड) बदलती

५) माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ......... हे शतक ओळखले जाते.

अ) १७ वे  ब) १८ वे  क) २० वे  ड) २१ वे

### ३.३ सारांश

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्रात बँकिंग, वाहतुक, विमा, पर्यटन, किरकोळ व्यापार इत्यादी व्यवसायांचा समावेश होतो. घटक क्र. ५ मध्ये आपण सेवा क्षेत्राचा अर्थ व स्वरूप बँका, बँकेत्तर संस्था व विमा व्यवसायांचे महत्व माहिती तंत्रज्ञान वाहतुक दळणवळण आणि पर्यटन उद्योगांचे महत्व विचारात घेतले आहे.

अ) भारतात सेवा क्षेत्रांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. केंद्र सरकारने केंद्रसूची, राज्यसूची व समवर्ती सूची अशा ३ गटात सेवाक्षेत्रांची विभागणी केली आहे.

ब) भारतीय अर्थव्यवस्थेत व्यापार,बँका,विमा व माहिती तंत्रज्ञान व पर्यटन सुविधांचे महत्व वाढत आहे. १९५० १९५० ते २००९ ते २०१० या काळात देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात सेवा क्षेत्राचा हिस्सा २७.५ % वरून ५६.९% पर्यत वाढला आहे. रोजगार वाढ, माहिती तंत्रज्ञानातील प्रगती विविध सेवांच्या मागणीत झालेली वाढ, परकीय चलनातील वाढ इत्यादींमुळे सेवा क्षेत्रांचे महत्व वाढत आहे.

क) वित्त व्यवस्था ही भारतीय विकासाचा पाया मानला जातो सद्या भारतात राष्ट्रीयकृत व्यापारी बँकांच्या सुमारे ८४६०४ इतक्या ग्रामीण व शहरी भागात शाखा आहेत. विमा व्यवसाय व बँकांनी सामाजिक सुविधा व रोजगारांच्या संधींच्या बाबतीत मोलाची कामगीरी केली आहे. विशेषत: विमा व्यवसायाने आर्थिक व सामाजिक विषमता कमी करण्यात मोलाची कामगीरी बजावली आहे.

ड) प्रामुख्याने १९९१ नंतर माहिती व तंत्रज्ञानाने मोठ्या प्रमाणात अघाडी घेतली आहे. उद्योग, विमा वाहतुक दळणवळण या क्षेत्रात विकासाची महत्वाची कामगिरी केली आहे. वाहतुकीच्या साधनांनी ग्रामीण व शहरी बाजारपेठा जोडण्याचे काम केले आहे. पर्यटन व्यवसायाने परकीय चलन मिळवून देण्यात व रोजगार वृद्धीत मोलाची भर टाकली आहे.

### ३.४ पारिभाषिक शब्द :

१) सेवा क्षेत्र - समाजाला बँकिंग, हॉटेल, पर्यटन व विमा इत्यादी सेवांचा पुरवठा करणारे क्षेत्र

२) माहिती तंत्रज्ञान - शेती, उद्योग, व्यापार बँका, इ क्षेत्रात संगणक, मोबाईल या आधुनिक साधनांचा वापर करणे.

३) दळणवळण - वेगवेगळ्या संपर्क साधनांमार्फत माहिती कंपन्यांची देवाण घेवाण करते.

### ३.५ वस्तूनिष्ठ प्रश्नांची उत्तरे

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३.२.१ - | १) - ब | २) - क | ३) - अ | ४) - ब | ५) - क |
| ३.२.२ - | १) - ब | २) - क | ३) - अ | ४) - ब | ५) - क |
| ३.२.३ - | १) - अ | २) - क | ३) - ड | ४) - ड) | ५) - क |
| ३.२.४ - | १) - क | २) - अ | ३) - ड | ४) - ब | ५) - ड |

**३.६ सरावासाठी प्रश्न**

**अ) टीपा लिहा**

१) सेवा क्षेत्रांचा अर्थ व स्वरूप

२) सेवा क्षेत्रांची रचना

३) भारतीय सेवा क्षेत्रांचे महत्व वाढण्याची कारणे

४) वाहतुकीचे महत्व

५) पर्यटनाचे महत्व

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) सेवा क्षेत्र म्हणजे काय ते सांगून त्याची रचना स्पष्ट करा

२) बँका व वित्तीय संस्थांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्व स्पष्ट करा.

३) माहिती तंत्रज्ञान म्हणजे काय ते सांगून त्याचे भारतीय आर्थिक विकासातील महत्व विषद करा.

४) भारतीय विमा व्यवसायाचे स्वरूप सांगून त्याचे महत्व स्पष्ट करा.

५) दळणवळणांच्या साधनांचे भारतीय आर्थिक विकासातील महत्व सांगा.

**३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ** :

1) Datt Mahajan Indian Economics, 2017
71th Revised Edition S.Chand Company, New Delhi

2) Economic Survey 2015-16 Govt. of India, New Delhi

3) Annual Report of Tourism Industry o2015

***

# घटक –४
# आर्थिक सुधारणा
# (Economic Reforms)

**अनुक्रमाणिका**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ विषय विवेचन
 ४.२.१ उदारीकरण
 ४.२.२ खासगीकरण
 ४.२.३ जागतिकीकरण
 ४.२.४ नविन निर्यात प्रोत्साहन धोरण.
४.३ सारांश
४.४ पारिभाषिक शब्द
४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.६ सरावासाठी स्वाध्याय.
४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके.

**४.० उद्दिष्ट्ये**

प्रस्तुत घटकांच्या अभ्यासासाठी आपणास खालील बाबी लक्षात येतील.

१) आर्थिक सुधारणा विषयक उदारीकरणाची संकल्पना व त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणाम लक्षात येतील.

२) खासगीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणामाची कल्पना येईल.

३) जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणकोणते परिणाम झालेले आहेत हे लक्षात येईल.

४) आर्थिक सुधारणांच्या अनुषंगाने नविन निर्यात धोरण लक्षात येईल.

**४.१ प्रस्तावना**

उत्पादन तंत्राची उपलब्धता नैसर्गिक विविधता व भांडवलाला पुरवठा इ. मुळे विशिष्ट देशांना वस्तूंचे उत्पादन करणे फायद्याचे ठरते. भारताने स्वातंत्र्यानंतर आर्थिक विकासासाठी नियोजनाचे आवलंब केला. सुरूवातीला सार्वजनिक क्षेत्राचा विस्ताराचे धोरण ठेवले. विकासाकरिता क्षेत्राचा विस्ताराचे धोरण ठेवले.

विकासाकरिता देशी व विदेशी कर्जे उभारली. पुढे सार्वजनिक क्षेत्र तोटयात चालू लागले. त्याची कार्यक्षमता घटली, अनेक उद्योग आजारी पडले; यामुळे १९८० पासूनच भारतात हळूहळू उदारीकरणाला सुरूवात झाली सन १९९० ते १९९२ या काळात भारताची अर्थिक स्थिती चिंताजनक बनली. सार्वजनिक उद्योग अडचणीत आले, परकीय भांडवल गुंतवणूक व त्यावरील व्याजाचा बोजा वाढत गेला. आखाती युद्धामुळे पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाली. निर्यात घटत गेली, आयात वाढत राहिली. आयात करण्यासाठी आवशक असलेले परकीय चलन अपुरे पडू लागले यामुळे आर्थिक पेचप्रसंग उद्‌भवला. भारताचे तत्कालीन पंतप्रधान चंद्रशेखर यांना भारताच्या गंगाजळीतील २.५ टन सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेऊन परकीय चलन मिळविण्यासाठी नामुष्की ओढावली. एकूणच भारतासह अनेक विकसनशिल देशांचा परकीय कर्जाचा बोजा वाढत गेला. निर्यात घटत गेली. परकीय देवघेवीची असमतोल वाढू लागला. म्हणून जागतिक पातळीवर आर्थिक सुधारणा विषयक विचार विनिमय व चर्चा होऊ लागल्या. सुरुवातीस अनेक देश या धोरणाच्या विरोधी होते. पण असहायता, गरज आणि तत्कालीन परिस्थिती इ. मुळे भारतासह अनेक देशांनी आर्थिक सुधारणा कार्यक्रमांना टप्प्याटप्याने संमती दिली.

आर्थिक सुधारणा कार्यक्रमामध्ये नाणेनिधी, जागतिक बँक इ. सदस्य राष्ट्रांनी उदारिकरण, खासगीकरण व जागतिकीकरण धोरणाचा स्वीकार करणे आणि आपआपल्या देशातील उद्योगांची कार्यक्षमता, गुणवत्ता आणि उत्पादकता इ. वाढ करणे अपेक्षीत आहे. जागतिक स्तरावर आर्थिक सुधारणा कार्यक्रम १९९१ चा सुरु झाला. भारताने सुरुवातीस चलन क्षेत्रात सुधारणा केल्या पुढे टप्प्याने उद्योग, व्यापार, वाहतुक, दळणवळण, शेती सुधारणा कार्यक्रमाची अम्मलबजावणी केल्याचे दिसून येते.

**४.२ विषय विवेचन–**

**४.२.१ उदारीकरण**

**प्रस्तावना–**

अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेत खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या तिन्ही संकल्पना एकत्रित अमलात आणण्याचा प्रयत्न केला जातो. सन १९८० नंतर भारतात उदारीकरण प्रक्रिया सुरु झाली. उदारीकरण म्हणजे आपल्या देशाचा जगातील इतर देशांशी खुला व्यापार असणे व देशांतर्गत खाजगी क्षेत्रावर कोणतेही निर्बंध नसणे. उदारीकरणाचा परिणाम होऊन अर्थव्यवस्थेत गतिशिलता आली आहे; परंतू आयात निर्यातीतील उदारीकरणामुळे देशातील अनेक घरघुती उत्पादने करणारे व्यवसाय प्रभावित झालेले आहे. सध्या उदारीकरणाची संकल्पना ही बाजारयंत्रणा किंवा खुला व मुक्त बाजार व मुक्त स्पर्धा यावर आधारीत आहे. जेव्हा उदारीकरणाची धोरण स्विकार केला जातो तेव्हा पर्यायाने सरकार निष्क्रीय असावे. पण उदारीकरणाच्या धोरणात अर्थव्यवस्थेच्या कोणत्याही क्षेत्रात सरकारच्या अनावश्यक हस्तक्षेप नसावा हे अभिप्रेत आहे. यावरुन या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होईल.

**व्याख्या –**

१. **डॉ. एम. रमनजनेयुल : –** ''आर्थिक उदारीकरण म्हणजे आयात, उत्पादन व गुंतवणूकीवरील अनिष्ठ म्हणजे निर्बंध, नियंत्रणे, परवाने मोडीत काढणे होय.''

२. **डॉ. अंत्री : –** ''आर्थिक उदारीकरण म्हणजे अधिक विस्तृतपणे किंमत यंत्रणेचा वापर करणे होय.

**उदारीकरणाची वैशिष्टये –**

१. भारतात जून, १९६६ मध्ये रुपयाचे केलेले अवमूल्यन हा आर्थिक उदारीकरणाचा पहिला टप्पा मानला जातो.

२. सन १९७५ ते ८० या कालावधीत उदारीकरणाच्या दिशेने अनेक निर्णय घेण्यात आले. आणिबाणीनंतर सन १९७६ मध्ये खुला सर्वसाधारण परवाना दृष्टीकोन स्वीकारून निवडक वस्तुंबाबत आयात उदारीकरणाचे धोरण स्वीकारण्यात आले सन १९७५ मध्ये औद्योगिक परवाना धोराचे उदारीकरण करण्यात आले.

३. सन १९८१ ते ८५ या कालावधीत नेमण्यात आलेल्या विविध समित्यांनी उदारीकरणाच्या धोरणाची शिफारस केली. सन १९८० नंतर निर्यातवाढीसाठी आवश्यक असणारी आयात करण्यासाठी परवानगी देण्याचे धोरण स्विकारले गेले. सन १९८४ मधिल अबिध हुसेन कमिटी व सन १९८५ मधिल नरसिंहम समिति, अर्जुन सेना गुप्ता समिती, एल. के. झा.समिती व व्ही. आर. पंचमुखी समिती या सर्व समित्यांनी उदारीकरणास अनुकूल भुमिका घेतली होती.

४. सन १९८६ ते १९९० या काळात उदारीकरणाच्या धोरणात बदल होत गेले. सन १९८६ मधील जगदीश भगवती समितीने उदारीकरणास अनुकूल भुमिका घेतली. जागतिक अर्थव्यवस्थेला अनेक क्षेत्रांत भारतीय अर्थव्यवस्था खुली करण्यात आली; पण यंत्रसामग्री, मोटरसायकल, रसायन उद्योग, औषध निर्मीती उद्योग इत्यादींनी विविधीकरणाचे स्वातंत्र्य देण्यात आले.

५. सन १९८६ मध्ये २३ उद्योगांना परवानामुक्त करण्यात आले.

६. मक्तेदारी नियंत्रण कायद्याअंतर्गत उद्योगांच्या संपत्तीची मर्यादा २० कोटी रुपयांवरुन १० कोटी रुपये करण्यात आली; परंतु सरकारच्या चुकीच्या धोरणाने सन १९९० मध्ये अर्थव्यवस्थेत आर्थिक अरिष्ठ निर्माण झाले.

७. सन १९९१ नंतर आर्थिक अरिष्ठामुळे सरकारला’ नविन सुधारणा ताबडतोब अमलात आणाव्या लागल्या.

**भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले उदारीकरणाचे परिणाम : –**

**अ) अनुकुल/इष्ट परिणाम.**

भारतीय अर्थव्यवस्थेवर उदारीकरणाच्या धोरणाच्या विविध इष्ट परिणामांची पुढे चर्चा केली आहे.

**१) अन्नधान्याचे उत्पादन वाढले –**

उदारीकरणाच्या धोरणामुळे भारतातून निर्यात होणाऱ्या अनेक कृषी उत्पादनावरील नियंत्रणे दुर करण्यात आली. अलिकडे अतिशय निवडक शेतमालाच्या निर्यातीवरच संख्यात्मक निर्बंध आहेत. अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपूर्णता लाभल्याने भारताला सन १९७७ नंतर अन्नधान्याची आयात करावी लागली नाही. त्यामुळे शेतमालास प्रोत्साहन मिळाले.

**२) शेतीसाठी योग्य उपाययोजना : –**

उदारीकरणाच्या धोरणाने सरकारने शेतीसाठी योग्य उपाययोजना केल्या. सरकारचे अन्नधान्यांवरील

अर्थसाहय्याचे दोन उद्देश होते. अ) शेती उत्पादनाला प्रोत्साहन प्राप्त होण्यासाठी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या किंमती स्थिर रहाव्यात आणि त्यांना किमान भावाची हमी मिळण्यासाठी ब) जनतेला अन्नधान्याचा पुरवठा सुरळीत व्हावा.

**३) परवानामुक्त व नियंत्रणमुक्त धोरण : –**

उदारीकरणाच्या नितीने भारतात परवानामुक्त व नियंत्रणमुक्त औद्योगिक धोरण स्वीकारण्यात आले. औद्योगिक परवाना सुलभ केला. सार्वजनिक क्षेतातील राखीव उद्योगांची संख्या कमी केली. खाजगी क्षेत्रातील उदयोगांना प्रोत्साहन देण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समभागाची निर्गुंतवणूक केली.

**४) विदेशी व्यापारावरील अनुकुल परिणाम : –**

उदारीकरणाच्या धोरणाने विदेशी व्यापारावर चांगला परिणाम झाला. विदेशी गुंतवणूक वाढून भारताच्या व्यवहारशेषातील प्रतिकुलता कमी झाली. भारतात आर्थिक सुधारणा अमलात आणण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदातील तुट होय. हि तुट कमी करण्यासाठी उदारीकरणाचा मोठा फायदा झाल्याचे दिसून येते.

**५) विदेशी राखीव निधीचा साठा वाढला : –**

सन १९९३–९४ मध्ये भारतातील विदेशी राखीव निधी ६.४ बिलीयन डॉलर्सचा होता. तो वाढून सन २००२–०३ मध्ये ७६.१ बिलीयन डॉलर्स झाला. तो तून २००२–०३ मध्ये ७६.१ बिलीयन डॉलर्स झाला. तो जून २००८ मध्ये वाढून ३०२.३२ बिलीयन डॉलर्स झाला.

६) शेतीचा वाढता लाभ.

७) परदेशी सहयोग मान्य झाला.

८) औद्योगिक प्रगतिचा वेग वाढला.

९) विविध सेवांची प्रगती

१०) इतर लाभ.

**प्रतिकूल / अनिष्ट परीणाम**

**१) रोजगारनिर्मिती वाढली नाही :**

भारतासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या देशात रोजगारनिर्मिती झाली नाही. उदारीकरणाचे धोरण पुरेशा प्रमाणात रोजगार निर्माण करू शकला नाही. संघटीत औद्योगिक उत्पादन सन १९९१ ते ९५ या काळात दुप्पट होऊनही रोजगार पातळी केवळ २.६% वाढ झाली. मुळात बेकारी असणाऱ्या देशात आणखी बेकारी वाढली.

**२) आंतरराष्ट्रीय संस्थांचा दबाव :**

अनेक विचारवंतांच्यामते, भारताने आर्थिक उदारीकरणाचा निर्णय नाणेनिधी व जागतिक बँक या संस्थाच्या दबावाने घेतला आर्थिक गरज म्हणून स्विकारले नाही. विशेषत: सन १९९१ मध्ये भारताने नाणेनिधीच्या सल्ल्याने स्थिरीकरणाची निती' स्वीकारली होती. या अंतर्गत विविध उपायांना आर्थिक उदारीकरण संबोधले गेले.

**३) सामाजिक आवंटन प्रमाणावर परिणाम–**

उदारीकरणाच्या काळात भारतातील विविध राज्यांत सामाजिक सेवांवर केल्या जाणाऱ्या खर्चावर परिणाम झाला. सामाजिक सेवांवर केल्या जाणाऱ्या खर्चावर परिणाम झाला. सामाजिक आवंटन प्रमाण म्हणजे सरकारच्या एकंदर महसुली उत्पन्नापैकी जेवढे उत्पन्न सामाजिक सेवांवर खर्च केले जाते ते होय.

**४) भारतीय उद्योगांना धोका –**

भारतात चांगल्या प्रकारे स्थापन झालेल्या व सध्या कार्यरत असलेल्या उद्योगांना ५१% विदेशी गुंतवणूकीच्या परवानगीने धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे काही चांगले भारतीय तंत्रज्ञान व उद्योग या क्षेत्रातून बाहेर ढकलले जाण्याचा संभव आहे. तसेच हे उद्योग भारतात कालबाह्य तंत्रज्ञान आणतील. इतर देशातील उपयुक्त तंत्रज्ञान या देशात फायदेशीर ठरेल असे नाही. कारण भारतासारख्या देशातील मोठ्या श्रमशक्तीचा वापर पुर्णपणे केला जाणार नाही.

**५) लघु उद्योगांवर अनिष्ट परिणाम –**

भारतासारख्या विकसनशिल देशात लघु उद्योगांना फार महत्त्वाचे असते. जपानसारख्या विकसनशील देशातही लघु उद्योगाचे क्षेत्र मोठे आहे. तथापि उदारीकरणाच्या धोरणाने भारतातील लघु उदोगांच्या विकासाकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही. या धोरणाने बहुराष्ट्रीय महामंडळाच्या उत्पादनाशी स्पर्धा करण्याची त्यांची शक्ती क्षीण झाली आहे. भारतातील लघु उद्योगांची संख्या वाढली; परंतू आजारी उद्योगांची संख्याही वाढत आहे. लघु उद्योगांच्या दृष्टीने हा उदारीकरणाच्या धोरणाचा मोठा दोष आहे. कारण या धोरणाने अनेक उपभोग्य वस्तु आयात करता येतात.

**६) तूट कमी झाली नाही –**

उदारीकरणाच्या धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे वित्तीय तूट कमी करणे होय; पण यामध्ये फारसे यश आले नाही. केंद्र सरकारच्या महसुली तुटीचे स्थुल राष्ट्रीय उत्पादनाशी प्रमाण सरासरी १९९०-९१ मध्ये ३.५% होते. महसुली तुटीचे नियंत्रण योग्य प्रकारे झाले नाही. तथापि राजकोषीय तूट कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला.

**७) शेतीवर अनिष्ट परिणाम –**

उदारीकरणाच्या धोरणाने शेतीच्या विविध क्षेत्रांत प्रगती झाली. अन्नधान्याचे उत्पादन वाढले असे सांगितले जाते. तथापि सन १९९० ते २००० या काळात (दशकात) शेती विकास २ टक्यांवरच स्थिर होता. तो १९९७ ते २००० या काळात २.१% झाला. दहाव्या योजनेत २००२ ते २००७ या काळात तो २.३% होणयची अपेक्षा होती. कारण शेतीची संरचना कमकुवत होती, खताचा वापर असमान होता, शेतीला अपुरे उत्तेजन दिले गेले. पिकापूर्वी व पिकानंतर योग्य मुल्यांकन कमी झाली जी शेती ५८ टक्के लोकांना उपजिविका पुरवते. तिच्यावरील गुंतवणूक अतिशय अपुरी आहे.

अशाप्रकारे जागतिकीकरणाचे काही तोटे सांगितले असले तरी सद्याच्या जागतिक वातावरणाचा विचार करता भारताला उदारीकरणाच्या धोरणापासून मागे येता येणार नाही. कोणत्या पद्धती भारताला सोईस्कर ठरतील हे जाणून घेतले पाहिजे. उपक्रमनिहाय पद्धती ठरवाव्या लागतील.

### ४.२.२ खाजगीकरण

**प्रस्तावना –**

सन १९८० च्या दरम्यान जगात सर्वत्र खाजगीकरणाची लाट आली. कारण समाजवादी अर्थव्यवस्थेने भ्रमनिरास झालेला जगाने पाहिला होता. संकुचित अर्थान खाजगीकरण म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या मालकीवर खाजगी मालकी प्रस्थापित करणे होय. तसेच जगातील मिश्र भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील सार्वजनिक क्षेत्राची मोहीनीही दुर झाली. रशियातील याच काळातील पेरेस्त्राईका (पुननिर्माण) या आर्थिक सुधारणेची लाट पूर्व युरोपीय अर्थव्यवस्थेत पसरली. कम्युनिस्ट चीनसुद्धा या विचाराने प्रभावित झाले. अर्थव्यवस्था खाजगीकरणाच्या धोरणाकडे वाटचाल वाटचाल करू लागली. लोकप्रशासन, अर्थकारण व सरकारी धोरण यामध्ये सध्या 'खाजगीकरण' हा परवलीचा शब्द झाला आहे.

**व्याख्या –**

**१) बार्बरा ली व जॉन नेलीस –**

खाजगीकरण म्हणजे मालकीमध्ये खाजगी क्षेत्र गुंतविण्याची सर्वसाधारण प्रक्रिया होय. अगर सरकारी मालकीच्या उद्योगांची व्यवस्था पाहणे. होय. म्हणून या शब्दाचा संदर्भ सर्व कंपनी खाजगी विकत घेण्याची वा अंशत: विकत घेण्याची आहे. यामध्ये उद्योग ताब्यात घेण्याची व व्यवस्थापनाचे खाजगीकरण याचाही समावेश होतो. हे संपादन व्यवस्थापन करार, भाडेपट्टीने चालविण्यास देणे अगर मुक्त व्यवस्था या माध्यमात असते.

**२) अर्थतज्ज्ञ इ. एम सावा –**

खाजगीकरण म्हणजे अशी आर्थिक किंवा भांडवली हक्काच्या स्थलांतराची क्रिया की ज्यामुळे सरकारची एखादी क्षेत्रातील भूमिका कमी होऊन खाजगी व्यक्तींची भूमिका वाढते.

**भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले खाजगीकरणाचे परिणाम.**

**अनुकुल/इष्ट परिणाम–**

**१) उत्पादनक्षमता वाढून उपभोक्त्यांचा लाभ –**

भारताने खाजगीकरणाचा अवलंब केल्याने विविध क्षेत्रांची उत्पादनक्षमता वाढली. त्यामुळे उत्पादन खर्च कमी झाल्याने वस्तुंची किंमत कमी होऊन उपभोक्त्यांना लाभ झाला. खाजगीकरणाने सरकारचा अनेक क्षेत्रांतील अवाजवी हस्तक्षेप दूर केला. विशेषत: शेती उत्पादकता वाढली. अन्नधान्याची आयात बंद झाली.

**२) वेगवान आर्थिक प्रगती –**

खाजगीकरणाने भारताला आर्थिक विकास तीव्र करण्यास मदत झाली. उदा. भारतातील भांडवली वस्तूंचा वार्षिक सरासरी वृद्धिदर सन १९८०–८५ मध्ये ७.३ टक्के होता तो सन १९९३–९४ मध्ये १०.२ टक्के झाला.

**३) राखीव उद्योगांची संख्या कमी–**

भारतात सन १९५९ औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रासाठी १७ उद्योग राखीव ठेवले होते. त्यांची संख्या १९९१ च्या औद्योगिक धोरणाने ८ व १९९३ मध्ये ६ झाली याचा अर्थ खाजगीकरणाचे धोरण सार्वजनिक क्षेत्रासाठी स्वीकारण्यात आले. अनेक खाजगी उदयोगांवरील परवाना राज समाप्त करण्यात आले.

### ४) भागांची निर्गुंतवूणक -

भारतातील खाजगीकरणाच्या कार्यक्रमाचे प्रमुख ध्येय म्हणजे नफा मिळवणाऱ्या सार्वजनिक उद्योगांचे निवडक संख्येत सरकारी भागाची निर्गुंतवणूक करणे हे होते.

### ५) सेवा क्षेत्राचा विकास-

भारतातील खाजगीकरणाच्या माध्यमाने विविध प्रकारच्या सेवा क्षेत्रांचा विकास झाला. रस्ते बांधणी, गृहनिर्माण, दूरसंचार व्यवस्था इ. क्षेत्रांत समानधानकारक परिवर्तन झाले. खाजगीकरणाने भविष्यांत विविध सेवांचा विस्तार होईल. खाजगीकरणाने सेवा क्षेत्रात वृद्धिदर वेगाने वाढत आहे.

### ६) आधारभुत सुविधांचा विकास-

खाजगीकरणाने भारतात फार मोठ्या प्रमाणात रस्ते, पुल बांधण्याचे कार्यक्रम सुरू आहेत. खाजगीकरणाचा मंत्र बांधा-वापरा-हस्तांतरण करा हा आहे. खाजगी लोकांनी भांडवली खर्च करून प्रकल्प उभारवयाचा व टोल रुपाने लाभ प्राप्त करुन मुदत संपल्यानंतर प्रकल्प सरकारकडे हस्तांतरण करावयाचा.

### ७) शैक्षणिक सुविधा-

शिक्षणाच्या खाजगीकरणाने खाजगी संस्था शैक्षणिक प्रकल्प उभारतात. मेडिकल व इंजिनिअरींग महाविद्यालये उभारणे व ती कार्यक्षमपणे चालवणे सरकारला शक्य होत नाही. भारतासारख्या गरीब देशातील सरकारकडे तेवढा पैसा नसतो. मात्र अशा खाजगी प्रकल्पाचा फायदा श्रीमंतांना होतो, गरीबांना नाही.

### ८) अपव्यय टाळला जातो-

खाजगीकरणाने अनेक प्रकारचे अपव्यय टाळता येतात त्यामुळे सरकारी क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या राजकीय दबावाच्या मागण्या टाळता येतात. खाजगीकरणामुळे प्रकल्प उभारणीतील विलंब टळतो.

### ९) राजकोष वाढतो-

सरकारला काहीही खर्च न करता खाजगीकरणाने विविध सेवा वाढवता येतात. या सेवांवर विविध कर आकारून सरकारला उत्पन्न वाढवता येते. खाजगीकरणाने सेवांचाा दर्जा सुधारतो व त्याचा लाभ उपभोकत्यांना होतो. खाजगीकरणाने सरकारी खजिन्यात भर पडते. विविध सेवांच्या निर्यातीपासून सरकारला प्रचंड लाभ होतो. त्यासाठी सरकारला कोणताही खर्च करावा लागत नाही.

## भारतीय अर्थव्यवस्थेवरील खाजगीकरणाचे अनिष्ट परिणाम

### १) खाजगी मक्तेदारी निर्माण झाली -

खाजगीकरणाने काही वेळा सरकारी मक्तेदारी जाऊन खाजगी मक्तेदारी निर्माण होण्याचा धोका असतो. खाजगीकरणाने विशेष काळजी घेतली पाहिजे. गैरफायदा घेतला जाऊ नये, खाजगीकरणाने अकार्यक्षमता व मक्तेदारी शक्ती खाजगी क्षेत्राकडे स्थलांतरीत होते. त्याचा त्रास व खर्च उपभोक्त्यांना सहन करावा लागतो. अकार्यक्षम सार्वजनिक मालकीऐवजी कार्यक्षम खाजगी मालक मक्तेदारीयुक्त पिळवणूक करतात.

### २) कार्यक्षमता सुधारता नाही -

अनेक विचारवंत खाजगीकरणाने कार्यक्षम सुधारते असा विश्वास व्यक्त करतात. पण काही टिकाकारांच्या

मते, मालकी हक्क व कार्यक्षमता यामध्ये सकारात्मक सहसंबंध नसतो. म्हणून खाजगीकरण स्वत:च अधिक कार्यक्षमतेकडे नेते हे विधान प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. याचा अर्थ खाजगी क्षेत्राने कार्यक्षमता वाढते असे नाही. कार्यक्षमतेसाठी मालकी महत्त्वाची नसते. खाजगीकरणाने कार्यक्षमतेत फारशी वाढ होत नाही.

**३) शेतीवरील अनिष्ट परिणाम –**

खाजगीकरणाचे शेती व्यवसायावर अनेक अनिष्ट परिणाम झाले. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील कृषी क्षेत्राचा हिस्सा वेगाने घटला. सन, १९५०–५१ मध्ये एकुण राष्ट्रीय उत्पन्नतील कृषी क्षेत्राचा हिस्सा वेगाने घटला व ५५.३ टक्के होता. ती सन १९९०–९१ मध्ये ३१.४ टक्के व सन २००८–०९ मध्ये १७ टक्के झाला. खाजगीकरणाने शेतीचे आकारमान वाढले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला. रासायनिक खते, किटक नाशके, सुधारीत बियाणे, वाढता पाणीपुरवठा, आधुनिक अवजारे यांचा वापर वाढला, असे खर्च करणे लहान शेतकऱ्यांना अनेक व्यवसायिकांनी कर चुकवण्यासाठी शेती विकत घेतली.

**४) औद्योगिक कामगारांचे शोषण व वाढती बेकारी –**

खाजगीकरणाने औद्योगिक क्षेत्रात मक्तेदारी निर्माण झाली. कामगारांचे शोषण झाले. यास कामगारांचा विरोध होता. करार पद्धतीने कामगार नेमून त्यांचे शोषण झाले. योग्य पगार, पेन्शन, उत्पादन इ. सुविधांना कामगारांना मुकावे लागले. स्वेच्छा निवृत्ती योजनेने समाजात व कामगार वर्गात नैराश्य निर्माण झाले. भारतातील बेकारी वाढली. उद्योग जगतावर आर्थिक सुधारणांचा दबाव होता, त्यांनी करार पद्धतीने कामगार कामगार घेतले. भविष्यात कामगार भरतीचे चित्र नैराश्यत्मक झाले.

**३) लाभ हेतूचा प्रभाव –**

कोणत्याही देशातील खाजगी क्षेत्र हे पूर्णपणे लाभाच्या हेतूनेच प्रेरित असते. भारतातील खाजगीकरणही त्याला अपवाद नाही. त्यामुळे खाजगीकरण केलेल्या पाणीपुरवठा, वीजपुरवठा, इंधन पुरवठा, दूध पुरवठा इत्यादी सेवांचा लाभ समाजातील काही घटकांच्या आवाक्याबाहेर जाईल, त्यांना ते परवडणार नाही. हे घटक अशा सेवांपासुन वंचित राहतील, म्हणजेच खाजगीकरणाने समाजातील गरीब वर्गाला आवश्यक सेवेचा लाभ मिळणार नाही.

**६) निर्गुंतवणूक पैशाचा अयोग्य वापर –**

भारत सरकाने खाजगीकरणानंतर सार्वजनिक उद्योगांच्या निवडक संस्थात सरकारी भागाची निर्गुंतवणूक केली. म्हणजे भागरोखे विकून पैसे जमवले. खाजगी क्षेत्राला ते विकले. सन १९९१–९२ ते सन २००९–१० या काळात निर्गुंतवणूकीचे प्रत्यक्ष ५७.६८२.९३ कोटी रुपये मिळाले, पण या कालावधीत लक्ष्य मात्र ९६.८०० कोटी रुपयांचे होते. सरकारला प्रत्येक वर्षात निर्गुंतवणूकीचे लक्ष्य साध्य करण्यात अपयश आले. सरकारने सार्वजनिक उपक्रमाचे खाजगीकरण करून या उपक्रमापासून मिळणाऱ्या भविष्यकालीन उत्पन्नापासून वंचित केले.

**७) मालमत्तेचे अवमूल्यन –**

सरकारने खाजगीकरणाने आपल्या मालमत्तेचे अधोमूल्यन केले; ज्यामुळे सरकारचा भरीव तोटा झाला. तसेच देशातील कर देणाऱ्या नागरीकरणांचाही हा तोटा होता. सर्व सार्वजनिक मालमत्तेच्या खाजगीकरणाची मुख्य समस्या होती. ते कमी किमतीने विकले गेले. परिणामी तो सरकारी खजिना लाभाऐवजी तोटा ठरला. सरकारने

सर्व मालमत्ता योग्यपणे विकली नाही. त्यातून सरकारी उत्पन्नही भरून निघले नाही. त्या विकून सरकारला भविष्यकालीन उत्पनाला मुकावे लागले.

### ८) आर्थिक विषमता वाढली –

खाजगीकरणाने विशेषत: ग्रामीण क्षेत्रात आर्थिक विषमता वेगाने वाढली. तांत्रिक बदलाने मोठे शेतकरी व लहान शेतकरी, भुमिहीन शेतकरी यांच्या उत्पन्नात खुपच तफावत निर्माण झाली. खाजगीकरणामुळे शेती मजुरांच्या वेतनावर नियंत्रण राहीले नाही. बड्या शेतकऱ्यांच्या दबावाने त्यांची स्थिती खालावली. सामाजिक, आर्थिक संबंध दुरावले, क्षेत्रीय असमतोल शहरीकरण वाढले. खाजगीकरणाने अर्थव्यवस्थेत विविध विषमता निर्माण निर्माण झाली आहे.

### ९) कमी किमतीत विक्री –

सरकारने बालको (BALCO) ही नफा मिळवणारी कंपनी ५५० कोटी रुपयांनी विकली. यावर भारतीय मजदूर संघाचे नेते श्री. ठेंगडी यांनी कठोर टिका केली. त्यांच्या मते. सरकारचे निर्गुंतवणूकीचे धोरण म्हणजे आधुनिक अन्न मते, सरकारचे निर्गुंतवणूकीचे धोरण म्हणजे आधुनिक अन्न टाकाऊ किमतीने विकाणे होय.' बालको करार म्हणजे लबाडी आहे. त्याचे शेअर्स कमी किमतीला विकले. सरकारचे हे धोरण म्हणजे सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापण्यासारखी होते.

### १०) इतर तोटे –

भारतीय अर्थव्यवस्थेवर खाजगीकरणाचे इतर काही महत्त्वाचे अनिष्ट आघात झाले. अनेक सरकारी अधिकाऱ्यांनी शेअर्स मित्रांना विकताना कमी किंमतीला विकले, लाचखोरी होती. कामगार बेकार झाले. त्यामुळे त्यांना पेन्शन, प्रॉव्हिडंड फंड इ.बंद झाले. त्यामुळे कामगारांचे जीवन अंधारमय झाले. देशाच्या अर्थव्यस्थेत विविध विषमता निर्माण झाली.

### खाजगीकरणाची वैशिष्टये –

भारताने जुलै १९९१ मध्ये नविन औद्योगिक धोरणाने सार्वजनिक क्षेत्रातील उदयोगांसाठी चार महत्त्वाचे निर्णय घेतले. १) सार्वजनिक क्षेत्रातील राखीव क्षेत्रातील उदयोगांची संख्या १७ वरून सहापर्यंत कमी करणे. राखीव क्षेत्रात ज्यायोगे निवडक स्पर्धा सुरू करता येईल. २) सार्वजनिक क्षेत्रातील विडक उद्योगात अल्पगुंतवणूकीचे धोरण स्वीकारणे, ज्यामुळे साधनसामग्री उभारती येईल. ३) सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योगांसाठी जे धोरण असेल तेच खाजगी क्षेत्रातील उद्योगांसाठी असेल. ४) मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग पद्धतीच्या माध्यमाने कार्यक्षमतेत सुधारणे करणे. ज्यामध्ये व्यवस्थापनात अधिक स्वायत्ता देणे पण ती विशेष परिणामाच्या जबाबदारीसह असेल. याशिवाय आजारी अथवा संभाव्य आजारी सावजनिक क्षेत्रातील उद्योगाच्या अंदाजपत्रकीय मदतीत परिणामकारक घट करणे यानुसार खाजगीकरणाच्या दृष्टीने पुढील निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली.

### १) अराखीव –

१९९१ च्या औद्योगिक धोरणाने अणुऊर्जा, कोळसा व लिग्नाईट, खनिज तेल, अशुद्ध लोखंड माती मँगनिज, क्रोमियम माती, जिप्सम, सल्फर, सोने व हिरे यांच्या खाणी तांबे, रेल्वे वाहतुक, शस्त्रे, दारुगोळा हे ८ उद्योग राखीव ठेवून अन्य अराखीव करण्यात आले.

सन १९९३ मध्ये यातील ६ उद्योग राखीव ठेवण्यात आले.

**२) ज्ञापनावर – (Memorandom of Understanding)**

सन १९८८ मध्ये पत्राद्वारे ही संकल्पना सुरू करण्यात आली. ज्ञानपनाचा मुख्य उद्देश असा होता की, नियंत्रणाची संख्या कमी करणे व जबाबदारीची गुणवत्ता वाढवणे. दैनंदिन कामगाराचे कामामध्ये हस्तक्षेप करण्यापेक्षा निश्चित केलेल्या बाबी मिळवण्यासाठी व कबुली केलेली उद्दिष्टे प्राप्त करण्यावर जोर देणे, हळूहळू ज्ञानपनावर पद्धतीच्या वाढीच्या दरात वाढ होत आहे.

**३) नवरत्नासाठीचे धोरण –**

सन १९९७–९८ च्या अंदाजपत्रकात सार्वजनिक क्षेत्रातील नऊ उत्कृष्ट कार्यक्षमता असणाऱ्या उद्योगांचा नवरत्नाचा दर्जा देण्यात आला. या नऊ उद्योगांना पूर्ण वित्तीय व व्यवस्थापकीय स्वायत्तत्ता देण्यात आली. ज्यायोगे ते जागतिक आकराचे बनतील. उच्च कार्यक्षमता हे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उद्योगांना मिळणाऱ्या नफ्याच्या ७५ टक्के नफा मिळवीत असत. नंतर त्यामध्ये दोन उद्योगांचा समावेश केल्याने ते नवरत्नाऐवजी ११ झाले.

ऑक्टोंबर १९९७ मध्ये नफा प्राप्त करण्याऱ्या ९७ उद्योगांना मिनिरत्न संबांधले गेले. त्यांच्यासाठी सरकारकडून वित्ताची योजना व कार्यात्मक स्वायतत्तता जाहीर करण्यात आला.

**४) भागांची निर्गुंतवणुक – (Disinvestment of Shares)**

भारतातील खाजगीकणाच्या कार्यक्रमाचे प्रमुख कलम म्हणजे नफा मिळवणाऱ्या सार्वजनिक उद्योगांचे निवडक संख्येत सरकारी भागांची निर्गुंतवणूक करणे हे होते. १९९१–९२ मध्ये निर्गुंतवणूकीचा कार्यक्रम जाहीर केला. सन १९९७–९८ पर्यंत निर्गुंतवणूकीच्या विविध फेऱ्यांतून सरकारला ११.३६९ कोटी रु. मिळवण्याची अपेक्षा होती. सन. १९९८–९९ मध्ये सरकारने अपगुंतवणुकीच्या ५००० कोटी रु. लक्ष्य निर्धारित केले होते. पण प्रत्यक्षात सरकारला केवळ २२२ कोटी रु. पुर्तता झाली.

**५) निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना – (Setting up of Disinvestment Commission)**

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या समभागाची निर्गुंतवणुक होण्यासाठी योग्य व्यूहरचना म्हणून सन १९९३ सरकारने सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला. पुढे ऑगस्ट १९९६ मध्ये सरकाने जी. व्ही रामकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली पाच सभाससदांची सार्वजननिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोगाची रचना केली. या आयोगाने आतापर्यंत आठ अहवाल सादर केले. त्यामध्ये ४३ उद्योगांचा समावेश होता.

### ४.२.३ जागतिकीकरण

**प्रस्तावना –**

जगातील सर्व देशात १९८५ नंतर उदारीकरण, व जागतिकीकरण या संकल्पना महत्त्वाच्या मानल्या जातात. दुसऱ्या महायुद्धानंतर युनो, गॅट, नाणेनिधी, जागतिक बँक इ जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या. या सर्वांचा उद्देश जगातील विविध देशांनी कोणत्याही अडथळ्याविना वेगवेगळे व्यवहार एकमेकांमध्ये करावेत, त्यांनी जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू केली. जागतिक बाजारपेठेची उपलब्धी आणि व्यवसायासाठी जागतिक

आर्थिकपर्यावरणाची उपलब्धी हे अलिकडच्या काळातील सर्वात मोठे परिवर्तनशिल बदल समजले जातात. अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे स्पर्धेच्या माध्यमाद्वारे देशांतगत किमतीचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमतीशी समानीकरण करणे होय. यासाठी उपलब्ध संसाधनांचा मुक्त संचार होऊ देणे आणि स्पर्धेचा नवपरंपरावादी दृष्टीने स्वीकारणे होय.

**व्याख्या –**

**१) जागतिक अधिकोषानुसार –**

''जागतिकीकरण म्हणजे अ) उपभोग वस्तुसहीत सर्व वस्तुंच्या आयातीवरील निर्बंध उठवणे. ब) आयात प्रशुल्काचा दर कमी करणे क) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे होय.''

**२) प्रो. सी. टी. कुरियन –**

''जागतिक अर्थव्यवस्था म्हणजे विविधता असलेल्या अर्थव्यवस्थांचा समूह होय ज्यामुळे निरनिराळ्या कार्यक्रमांनी जे एकमेकांशी विविध मार्गांनी परस्परांवर क्रिया करतात आणि अशा रितीने कालांतराने त्याच्या वृत्तीत बदल करतात.''

**३) सोप्या भाषेत अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे –**

स्पर्धेच्या माध्यमाद्वारे देशांतर्गत किंमतीचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील किंमतीशी समानीकरण करणे होय.

**जागतिकीकरणाची वैशिष्टये –**

१) उच्च अग्रक्रम उद्योगांना १ कोटी रुपयांपर्यंत विदेशी करारांना आपोआप परवानगी देण्यात येईल. विदेशी तंत्रज्ञान भाड्याने घेण्यासाठी अगर देशी प्रगत तंत्रज्ञान विदेशी परिक्षणासाठी आता परवानगीची आवश्यकता नाही.

२) भारतीय रुपयाचे आंतरराष्ट्रीय समायोजन करण्यासाठी जुलै १९९१ मध्ये रुपयाचे अवमूल्यन साधारणत: २० टक्के करण्यात आले. तसेच निर्यातीला उत्तेजित करणे. आयातीला नाऊमेद करणे आणि विदेशी भांडवलाचा आगमप्रवाह उंचावणे.

३) आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेला तोंड देण्यासाठी सरकारने व्यवहारशेषातील तूट दुरुस्त करणे व आंतरराष्ट्रीय व्यापारातील भारताचा हिस्सा वाढवणे असे विविध प्रयत्न केले साधारणत: ५००० भारतीय कंपन्यांना ISO -9000 सर्टिफिकेटस गेल्या ५ वर्षांत मिळवली आहे.

४) भारतीय अर्थव्यवस्था जागतिक स्पर्धात्मकेच्या कक्षेत आणण्यासाठी सरकारने योग्य प्रमाणात जकात शुल्कात सुधारणा केली.

५) सन १९९१ च्या नविन आर्थिक धोरणाने प्राधान्य उद्योगासाठी उच्च तंत्रज्ञान व उच्च गुंतवणूकीची विशेष यादी तयार करण्यात आली. त्यायोगे विदेशी समभागांना ५१ टक्क्यां पर्यंत विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला आपोआप परवानगी उपलब्ध करून देण्यात येईल. नंतर ही मर्यादा ७४ टक्के व १०० टक्क्यांपर्यंत वाढली.

६) जगाच्या अर्थव्यवस्थेशी भारतीय अर्थव्यवस्थेचे विशिष्ट हेतूने एकत्रिकरण करण्यासाठी अपरिहार्य कृत्य करण्यात आले. यासाठी रुपया अंशत: परिवर्तनीय करण्यात आला. सरकाने पूर्णत: एकीकृत बाजार मांडून विनिमय दर पध्दत निश्चित केली. मार्च, १९९३ मध्ये चालू खाते परिवतीय असा मोठा निर्णय घेतला.

७) विदेशी गुंतवणूक आणि तंत्रज्ञान यांचा प्रवाह वाढवण्यासाठी सरकारने अनेक उपाय योजले- १) फेर कंपन्यांना सवलती देणे. २) उच्च अग्रक्रम उद्योगांच्या विदेशी तंत्रज्ञान संयुक्तीकरणाला परवानगी दिली. ३) खाजगी उद्योगांना विदेशी तंत्रज्ञान आयातीचे स्वातंत्र्य दिले व देशांतर्गत तंत्रज्ञानाच्या विदेशी परिक्षणाला स्वातंत्र्य दिले. ४) विदेशी गुंतवणूक व संयुक्त योजना यासाठी विदेशी गुंतवणूक मंडळ स्थापन केली.

**भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले जागतिकीकरणाचे परिणाम –**

**अनुकुल/इष्ट परिणाम–**

**१) भारताची निर्यात वाढली –**

जागतिकीकरणाचे मुख्य उद्दिष्टे वस्तु व सेवांच्या व्यापाराचा विस्तार करणे हे होते. सन १९९५ ते २००६ या वर्षात ११ वर्षात सरासरी १३.३ टक्के दरांनी वाढली. या काळात जागतिक सरासरी वार्षिक निर्यात ८ टक्क्यांनी वाढली. याची तुलना करताना भारताला जागतिकीकरणाने निर्यात वृद्धिदर वाढविण्याचा लाभ झाला.

**२) सेवा क्षेत्राची निर्यात वाढली –**

भारताची सेवा क्षेत्रातील निर्यातीची कार्यक्षमता अधिक चांगली होती. सन १९९५ मध्ये सेवा क्षेत्रातील निर्यात १० ब्रिलीयन डॉलर्स (१०,०६२ मिलीयन डॉलर्स.) होती. ती सन २००६ मध्ये १३ बिलीयन डॉलर्स झाली. तर २००८ मध्ये ती १०३.९५० दशलक्ष डॉलर्सपर्यंत वाढली.

**३) व्यापारी व सेवाची क्षेत्रांची एकत्रित निर्यात –**

जर भारताच्या व्यापारी व सेवा क्षेत्राच्या निर्यातीचा एकत्रित विचार केला तर सन १९९५ मध्ये जी ४०.६९ बिलीयन डॉलर्स होती ती सन २००८ मध्ये २८०.३ बिलीयन डॉलर्स एवढी वाढली. ही वार्षिक सरासरी वृद्धिदर १६. टक्के दर्शविते. जागतिकीकरणाने भारताने वस्तू व सेवा निर्यातीला जागतिक हिश्यांमध्ये सुधारणा केली.

**४) अप्रत्यक्ष (अदृश्य) ताळेबंदात वृद्धी –**

जागतिकीकरणाने भारताच्या अदृश्य निर्यातीला भरीव वाढ झाली. भारताने निव्वळ सकारात्मक ताळेबंदातील अप्रत्यक्ष वृद्धी कार्यक्षमतेने साध्य केली. त्यामुळे व्यापार तुट कमी करता आली. सन २००३-०४ मध्ये निव्वळ अदृश्य हा सकारात्मक ताळेबंद एकुण देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ४.६ टक्के होता. यामुळे व्यापार तोलातील तुटच दूर केली नाही तर चालू खात्यात सकारात्मक समतोल निर्माण केला.

**५) वाढता विदेशी गुंतवणूकीचा प्रवाह –**

जगतिकीकरणाने विदेशी गुंतवणूकीचा मोठा प्रवाह येतो. जो प्राप्तकर्ता देशाच्या अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढवितो. विदेशी गुंतवणूकिचे दोन प्रकार असतात. १) विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक व २) विदेशी रोखसंग्रह गुंतवूक. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता वाढवण्यास मदत करते. तर विदेशी रोखेसंग्रह गुंतवणूक ही अधिक सट्टा स्वरुपाची असते व ती अतिशय चंचल असते. सन १९९० - ९१ ते १९९४-९५ या कालावधीत एकुण गुंतवणूक अंत: प्रवाहात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा हिस्सा २४.२ टक्के होता. तर विदेशी रोखेसंग्रह गुंतवणूकीचा हिस्सा ७५.८ टक्के होता.

**६) शेतमाल निर्यात वाढली –**

जागतिकीकरणाने शेतमालाच्या निर्यातीवरील नियंत्रण घटणे. साठागृहांची सोय, वाहतूक व कर्जसुविधा उपलब्ध होईल. त्यामुळे भारतातील अनेक शेतकालाची निर्यात वाढली. भारतीय शेतीत अनेक वस्तुंची निर्यात वाढवण्याची मोठी क्षमता आहे. सन १९८०-८१ मध्ये भारतातील शेती व संबंधित उत्पादनाची निर्यात २०७ कोटी रुपयांची होती. ती सन २००८-०९ मध्ये ८०.६४९ कोटी रुपयांची होती. ती सन २००८-०९ मध्ये ८०.६४९ कोटी रुपये एवढी वाढली.

**७) विदेशी विनिमय गंजाजळीत वाढ –**

जागतिकीकणाने भारताच्या विदेशी विनिमय गंगाजळीत चांगलीच वाढ झाली. जून १९९१ मध्ये विदेशी विनिमय गंगाजळी फक्त १.३ बिलीयन डॉलर्सची होती. ती मार्च २००८ मध्ये ३०९.७ कोटी बिलीयन डॉलर्स एवढी प्रचंड वाढ झाली. पण मार्च २००९ मध्ये ती २५२ बिलीयन डॉलर्स तर डिसेंबर २००९ मध्ये २८३.५ बिलीयन डॉलर्स झाली. तर ती २०१०-११ मध्ये ३०४.८ बिलीयन डॉलर्स झाली. तर ती २०१०-११ मध्ये ३०४.८ बिलीयन डॉलर्स होती.

**८) निर्यातवाढीपेक्षा आयातवाढ अधिक –**

उदारीकरण व जागतिकीकरणाची नविन व्यूहरचना स्वीकारण्याचे कारण म्हणजे विदेशी बाजारपेठांत अधिक परिणामकारकपणे प्रवेश करावा हे निमित्त होते. सन १९९०-९१ भारताची निर्यात स्थुल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ५.८ टक्के होता ती वाढून सन १९९५-९६ मध्ये (GDP) ९.१ टक्के झाला. त्यानंतर ती हळूहळू वाढून निर्यात सन २००८-०९ मध्ये स्थुल देशांतर्गत उत्पन्नाच्या १४.४ टक्के झाली सन १९९६-९७ मध्ये भारताची व्यापारी तुट स्थुल देशांतर्गत उत्पन्नाच्या ३.१ ते ४ टक्के या मर्यादेत होती.

**अनिष्ट परिणाम –**

**१) रोजगाराची वाईट स्थिती–**

जागतिकीकरणाच्या कालखंडात भारतातील रोजगाराची स्थिती खूप वाईट होती. सन १९८३-८४ मध्ये रोजगार वृद्धीचा दर २.०४ टक्के होता तो घटून सन १९९४-२००० मध्ये ०.९८ टक्के झाला. विशेषत: शेतातील रोजगार वृद्धीच्या नकारात्मक कारणाने हे घडले. जी देशातील साधारणत: एकुण रोजगार श्रमिकांपैकी ६५ टक्के सामावून घेत असे. तसेच सन १९८३ ते ९४ मध्ये सामुदायीक, सामाजिक व व्यक्तीगत सेवांचा वृद्धिदर २.९० टक्के होता तो वेगाने घटून सन १९९४-२००० मध्ये ०.५५ टक्के झाला. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीकडे दुर्लक्ष आणि सार्वजनिक क्षेत्रावर रोजगारांनी अतिरिक्त भार टाकला होता. ज्यावरील नोकरभरतीवर सातत्याने बंदी घातली होती.

**२) संघटीत क्षेत्राचे रोजगारातील अपयश –**

संघटीत क्षेत्र हे वृद्धीचे इंजिन समजले जाते. पण ते भारतातील संघटीत क्षेत्रालाही १९९४-२००० मध्ये पुरेसा रोजगार निर्माण करण्यात अपयश आले तसेच जागतिकीकरणाने श्रमिकांना संघटीत क्षेत्राकडून असंघटीत क्षेत्राकडे ढकलले जाते. सामान्यत: संघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांना असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांपेक्षा

चांगले वेतन मिळते. त्यांना नोकरीची सुरक्षितता असते. इतर लाभ मिळतात. खाजगी क्षेत्रात अशा सुविधा सहज मिळत नसतात.

**३) औद्योगिक वृध्दीचा दर वाढला –**

जागतिकीकरणाने भारताला औद्योगिक क्षेत्राची कार्यक्षमता कमी झाली. यावरुन जागतिकीकरणाने सुरवातीला औद्योगिक वृद्धिदर वाढत असल्याने दिसुन येत असले तरी नंतर विविध क्षेत्रात वृद्धिदर घटत असल्याचे दिसून येते.

**४) लघु उद्योगांवर अनिष्ट परिणाम –**

जागतिकीकरणाने अनेक देशातील आकर्षक व स्वस्त वस्तुंनी भारतीय बाजारपेठा व्यापल्याने भारतीय लघु उद्योगांवर अनिष्ट परिणाम झाला. जागतिकीकरणापासून लघु उद्योगांचे रक्षण करणारी यंत्रणा उभारणे शक्य नव्हते. वाढत्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाने कोणत्याही क्षेत्रात भारतीय लघु उद्योगांना स्पर्धा करणे शक्य नव्हते. स्वस्त आयातीने अनेक भारतीय लघु उद्योग बंद पडले. त्याचा अनिष्ठ परिणाम अर्नोपचारिक अर्थव्यवस्थेवर तसेच शेतीवर झाला. हा जागतिकीकरणाचा परिणाम झाला. यामध्ये गरीब, मालमत्ताहीन, अकुशल श्रमिकांचे नुकसान झाले. तर श्रीमंत लोकांना फायदा झाला.

**५) शेतीवर अनिष्ठ परिणाम –**

जागतिकीकरणाचा एक महत्त्वाचा अविष्कार म्हणजे बहुराष्ट्रीय कंपन्या संविदा कृषिव्यवस्था स्थापण्याच्या प्रयत्नात आहेत. म्हणजे एका बाजूने बि-बियाणे, खते, किटकनाशके, यांच्या पुरवठ्यावर तर दुसऱ्या बाजूने जागतिक शेती शेती उत्पादन बाजारावर पूर्ण नियंत्रण ठेवणे होय. कृषी जागतिकीकरणाच्या नविन व्यवस्थेत भारतासारख्या ८० टक्के लहान शेतकरी असणाऱ्या देशात त्याचे अस्तित्व नष्ट होईल. जैविक विज्ञानाने ऊती संवर्धनाचे उत्पादन होऊ लागल्याने शेती अता प्रयोगशाळेत बंदिस्त होतील. संगणकीकरणाच्या सार्वत्रीकरणाने शेतीची कारखानदारी होईल.

**६) सामाजिक क्षेत्रावर अनिष्ट परिणाम –**

जागतिकीकरणाने भारतातील सामाजिक क्षेत्रावर अनिष्ट परिणाम झाले. मानवी भांडवलीनिर्मितीने लोकांची क्षमता वाढवण्यास मदत होईल. ज्यायोगे ते जागतिकीकरणाचे लाभ प्राप्त करतील. यासाठी देशाने शिक्षण, आरोग्य, दारीद्र्यनिर्मूलन कार्यक्रम यांवरील खर्चात वाढ केली पाहिजे. जर आरोग्य व शिक्षण याला वित्तपुरवठा करण्यास संपूर्ण जबाबदारी. व्यक्तीवर सोपवली तर पण ते बाजारबलावर सोडले तर फक्त श्रीमंतच मानवी भांडवल प्राप्त करतील व मोठ्या प्रमाणावर गरीब वगळले जातील.

**अलिकडील काळातील निर्यात प्रोत्साहन धोरण – (Reecut export Promotion Policy)**

कोणत्याही देशाच्या दृष्टीने आयात निर्यात धोरण महत्त्वाचे ठरते. विशेषत: व्यवहार तोलाच्या दृष्टीने या धोरणास खुप महत्त्व असते. १९७०. पासून भारताचा व्यवहारतोल सातत्याने व्यस्त होता. निर्यातीच्या तुलनेने वेळोवेळी निर्यात प्रोत्साहन धोरण जाहिर केले. विविध उपाययोजना केल्या परंतू निर्यातवृद्धीनत अपेक्षीत यश आले नाही.

सन २०१४ मध्ये देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तारूढ झाले. नविन सरकारने २०१४ ते २०१९ या काळासाठी आयात-निर्यात धोरण जाहिर केले. या धोरणाअंतर्गत निर्यात प्रोत्साहनासाठी खालील प्रमाणे उपाय योजल्याचे दिसून येते.

१) निर्यात उद्योगांसाठी कच्चामाल, यंत्रसामुग्री व भांडवली साधने सवलतीच्या दराने आयातीसाठी प्रोत्साहनपर योजना सुरू केल्या.

२) निर्यात उद्योगासाठी शुल्क माफी योजना व प्रत्यक्ष करार सवलती देऊ केल्या.

३) १००% निर्यातअभिमुख उद्योगांना सयंम, भांडवली वस्तू, कच्चामाल, आवश्यक घटक आमली पदार्थासाठी आवश्यक उत्पादन शुल्क व इतर शुल्कातून सूट देऊ केली.

४) निर्यातक्षम उद्योगांना रेल्वे व जहाज सेवा सवलतीच्या दराने देऊ करण्यात आल्या.

५) निर्यात शुल्क काढून टाकणे अथवा कमी करणे याशिवाय निर्यातीच्या उदारीकरण्याला परवानगी देणे.

६) निर्यातदारांना उदारपणे पतपुरवठा सुविधा देणे.

वरीलप्रमाणे सेवा सुविधा देऊन भारताने निर्यात प्रोत्साहनाबाबत उपाय योजले. यामुळे तयार कपडे, कारखानदारी वस्तू, दागिने इ. वस्तूंची निर्यात वेगाने वाढत गेली. परंतू चहा, ज्यूट, तंबाखू, इ. वस्तू आणि परंपरागत वस्तूंच्या निर्यातीत वाढ होऊ शकली नाही.

**अ. स्वयं अध्ययन प्रश्न –**

**प्र.१ ला खालील पैकी योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा.**

१) भारतात उदारीकरण प्रक्रियेला सुरूवात ----------- पासून झाली.

अ) १९५० ब) १९६० क) १९७० ड) १९८०

२) उदारीकरणात --------------------- चा अंतरभाव होतो.

अ) परवाना पद्धतीचे सुलभीकरण ब) निर्यात बंदी

क) आयात बंदी ड) या पैकी नाही.

३) खासगीकरण धोरणात ---------- क्षेत्राची भूमिका कमी करण्यात येते.

अ) सहकारी क्षेत्र ब) बहुराष्ट्रीय कंपन्या

क) सार्वजनिक क्षेत्र ड) या पैकी नाही.

४) खासगीकरण धोरणामुळे सरकारी महसुलात ----------------- होते.

अ) घर ब) वाढ क) स्थिर ड) या पैकी नाही.

५) -------------------- धोरणामुळे आर्थिक विषमतेत वाढ होते.

अ) खासगीकरण ब) सरकारीकरण

क) सहकारी विकास ड) या पैकी नाही.

६) भारतीय रूपया परिवर्तशिल करणे हा ---------------- धोरणाच्या भाग आहे.

अ) खासगीकरण ब) उदारीकरण

क) जागतिकीकरण ड) या पैकी नाही.

७) देशाची अर्थव्यवस्था जागतिक बाजरासाठी मुक्त करणे म्हणजे -------------- होय.

अ) उदारीकरण ब) खासगीकरण

क) जागतिकीकरण ड) या पैकी नाही.

८) जागतिकीकरण धोरणामुळे भारताच्या निर्यातीत ---------------- झाली आहे.

अ) वाढ ब) घट क) स्थिर ड) या पैकी नाही.

९) भारतातील नविन आर्थिक धोरण ------------- मध्ये जाहिर करण्यात आले.

अ) १९९१ ब) १९१४

क) १९०४ ड) या पैकी नाही.

१०) रोजगार वाढीचे अपयश हे ---------------- धोरणाचे प्रमुख वैशिष्ठ मानले जाते.

अ) आर्थिक सूधारणा ब) समाजवादी समाजरचना

क) साम्यवादी धोरण ड) या पैकी नाही.

**प्र.२ रा. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अर्थीक सुधारणा धोरणाचा अर्थ सांगा.

२) आर्थिक उदारीकरण म्हणजे काय.

३) खाजगीकरणाची व्याख्या सांगा?

४) जागतिकीकरणाचा अर्थ सांगा?

५) नविन निर्यात धोरण कोणत्या सरकारने जाहिर केले आहे.

**४.३ सारांश –**

वित्तीय प्रेचप्रसंग, परकीय चलनाचा तुटवडा, आयात व्यापाराचे सातत्य ठेवण्यासाठी आर्थिक सुधारणाची अत्यंत आवश्यकता असते. स्वातंत्र्यानंतर पहिली तीन दशके सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करण्याचे धोरण ठेवण्यात आले. परंतू भारतातील सार्वजनिक क्षेत्राची उद्योगधंदे तोटयात चालू लागले. अकार्यक्षमता, दप्तर दिरंगाई, लाचलुचपत, नोकरशाहीचे दुष्परीणाम वाढू लागले. म्हणून सरकारने सार्वजनिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी आभ्यास करून शिफारशी करण्यासाठी तज्ज्ञ समित्यांच्या नेमणूका केल्या. तज्ज्ञ समित्यांनी उदारीकरण, खासगीकरण व उदारीकरण यावर आधारीत आर्थिक सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली.

१९८० पासून भारतात अंशत: उदारीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण आणि निर्यात प्रोत्साहन धोरणाला सुरूवात झाली. पुढे १९९१ मध्ये भारतावरील वित्तीय पेचप्रसंगाचे संकट तिव्र बनले. भारत दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आला. म्हणून जागतिक पातळीवर डंकेल प्रस्ताव स्विकारण्याबाबत नाणेनिधी, जागतिक बँक इ. दबाव वाटत गेली. म्हणून भारताने डंकेल प्रस्तावाला मान्यता दिली. आणि १९९१ साली नविन आर्थिक धोरणाची घोषणा केली. नविन धोरणामध्ये सरकारने आर्थिक सुधारणा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने स्विकारण्याचे निश्चीत केले. भारताने आजपावोतो आर्थिक सुधारणा कार्यक्रम विविध क्षेत्रात सुरू केला आहे. आज सुधारणा कार्यक्रमास २५

वर्षाहून जास्त काळ लोटला आहे. या कार्यक्रमास अभूतपूर्व यश प्राप्त झाले आहे.

खासगीकरण धोरणाद्वारे शासनाने अनेक सार्वजनिक उद्योगांचे ३०% ते ७०% पर्यंत खासगीकरण घडवून आणले. खासगी व्यवस्थापनामुळे अनेक सार्वजनिक उद्योगांची कार्यक्षमता, गुणवत्ता, उत्तपादकता वाढू लागली आहे. निर्यातीच्या बाबतीत खुप प्रगती झाली आहे. शेतीमाल, औद्योगिक वस्तू, अभियांत्रीकी वस्तू, तंत्रज्ञान, सेवा क्षेत्र इ. निर्यातीत प्रगती झाली आहे परंतू आर्थिक सुधारणामुळे रोजगारीत मात्र अपेक्षीत वाढ होऊ शकली नाही. याला अर्थतज्ज्ञ जॉबलेस इकॉनामीक ग्रोथ असे म्हणतात.

**४.४. पारिषभाषीक शब्द.**

**१. एम. आर. टी.पी. कायदा –** मक्तेदारी प्रतिबंधक कायदा १९८५

**२. नाणेनिधी –** जागतिक पातळीवरील सदस्य देशांना अल्पकालीन परकीय कर्ज पुरवठा करणारी बँक.

**३. जागतिक बँक –** आंतरराष्ट्रीय पुर्नरचना व विकास बँक सदस्य देशांन दीर्घकालीन परकीय कर्जपुरवठा करणारी बँक.

**४. डीरिझर्व्हेशन–** विशिष्ट क्षेत्रापुरते असणारे परवाना धोरण खुले करणे.

**५. एफ. डी. आय –** परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक.

**६. निर्गुंतवणूक –** शासनाने आपल्या प्रकल्पात केलेली गुंतवणूक खासगी क्षेत्रासाठी विक्री करण्याचे धोरण.

**४.५. स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे.**

१) ड    २) अ    ३) क    ४) ब

५) अ    ६) क    ७) क    ८) अ

९) अ    १०) अ.

१. आर्थिक सूधारणा म्हणजे निर्यातवृद्धी, परकीय चालनाची गरज पूर्ण करण्याबाबत सरकाने निश्चीत केलेले धोरण होय.

२. आयातीवरील बंधने, नियंत्रणे आणि अनावश्यक परवाने रद्द करण्याचे धोरण म्हणजे आर्थिक उदारीकरण.

३. खासगीकरण म्हणजे सार्वजनिक प्रकल्पातील भाग खासगी भांडवलदार, गुंतवणूकदार व व्यवस्थापना विक्रीचे धोरण.

४. जागतिकीकरण म्हणजे देशातील उद्योग, शेती व प्रकल्पाची कार्यक्षमता वाढवून अंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मकता वाढविणे होय.

५. नविन निर्यात धोरण कालावधीसाठी जाहीर करण्यात आले.

**४.६. सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) टीपा लिहा.**

१) उदारीकरण धोरण २) खासगीकरण

३) जागतिकीकरण ६) नविन निर्यात धोरण.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१) उदारीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील बरे-वाईट परीणाम स्पष्ट करा.

२) खासगीकरणाची वैशिष्ट्ये सांगून खासगीकरणाचे परीणाम सांगा.

३) जागतिकीकरण धोरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परीणाम थोडक्यात स्पष्ट करा.

**४.७. अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :**


१) Bansil P.C. Agricultural Problems of India.

२) Mishra S. K., Puri V. K. - Indian Economy, Himalaya Publication, Mumbai.

३) Rudra Data & KPM Sundaram - Indian Economy, S. Chand and Company, New Delhi.

४) Mamoria C. B. - Agricutural Problems of India - Kitab Mahal Publication.

५) डॉ. घाटगे व डॉ. वावरे - भारतीय अर्थव्यवस्था-निराली प्रकाशन, पुणे २०१०

६) डॉ. जी. एन. झामरे - भारतीय अर्थव्यवस्था- पिंपळापूरे ॲन्ड कंपनी पब्लीकेशन. नागपूर.


***